म. ग्रं. सं. ठाणे
विषय परिच
सं. क्र. १३७६
१९९५.

REFBK-0014529

भावार्थ

# श्रीगुरुचरित्र



प्रा. सीताराम गणेश देसाई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २०५७६ दि: ५/१२/७
क्रमांक ९३७६ नों दि: २९/५/८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. १४५०२०

# भावार्थ श्रीगुरुचरित्र

लेखक

प्रा. डॉ. सीताराम गणेश देसाई
एम. ए., पीएच. डी.
संस्कृतविभागप्रमुख, मीठीबाई कॉलेज,
विलपार्ले, मुंबई ५६.

REFBK-0014529

प्रस्तावना

प्रा. के. वि. बेलसरे, एम्. ए.
सिद्धार्थ कॉलेज, मुंबई १

★

प्रमुख विक्रेते

रामकृष्ण बुक डेपो, मुंबई ४

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

प्रथम आवृत्ति : १९६५ ( दत्तजयंति )

किंमत चार रुपये

प्रकाशक :

**प्र. म. टिळक**

त्रिदल प्रकाशन,

२६७, वि. प. रोड,

मुंबई ४

मुद्रक :

**मा. प. तळेकर**

श्री दत्त मुद्रणालय,

३२५ शनिवार, पुणें २

# प्रस्तावना

डॉ. सी. ग. देसाई यांनीं लिहिलेलें **'भावार्थ श्रीगुरुचरित्र'** मीं वाचून पाहिलें. एकंदर ग्रंथ सुबोध पद्धतीनें लिहिला असून सामान्य वाचकाला त्यावरून गुरुचरित्राचा चांगला परिचय होईल. आपल्याकडील संप्रदायां-मध्यें दत्तसंप्रदायाला बराच मान आहे. त्याचे अनुयायीदेखील सर्व ठिकाणीं आढळतात. या संप्रदायामध्यें श्रीपादश्रीवल्लभ, नृसिंहसरस्वति, जनार्दनस्वामी यांच्यासारखे थोर लोकसंग्रही पुरुष होऊन गेले. प्रत्येकानें आपापल्यापरी धर्मरक्षणाचें आणि अध्यात्मप्रसाराचें केलेलें कार्य इतिहासांत नमूद आहे. अगदीं अलीकडच्या काळांत माणिकप्रभु, अक्कलकोटचे स्वामी आणि टेंबेस्वामी हे मोठे दत्तभक्त होऊन गेले. अध्यात्माचें मर्म ओळखून दत्तोपासना केली असतां ती सद्यःफलदायी होते यांत शंका नाहीं; परंतु कांहीं कारणा-मुळें हें ध्येय नजरेआड होऊन दत्तसंप्रदायामध्यें सकामता फार मोठ्या प्रमाणावर शिरलेली आढळते. रोग बरा व्हावा म्हणून, पिशाच्चबाधा सुटावी म्हणून, मुलीचें लग्न जुळावें म्हणून, नोकरी लागावी म्हणून, व्यापार बरा चालावा म्हणून, इतकेंच नव्हे तर परीक्षा पास व्हावी म्हणून देखील गुरुचरित्राचीं पारायणें करण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर सुशिक्षित लोकांत देखील चालू झाली आहे. कोणताहि संप्रदाय शुद्ध व पवित्र राहण्याच्या दृष्टीनें असें होणें चांगलें नाहीं. श्रीएकनाथांना जनार्दनस्वामींनीं दत्तदर्शन घडविलें होतें. भागवताच्या आरंभीं नाथांनीं दत्ताला वंदन केलें आहे; परंतु उपास्य दैवत म्हणून दत्ताकडे पाहण्याची त्यांची दृष्टि अतिशय भक्तियुक्त तशीच ज्ञानप्रधान होती, असें त्यांनीं केलेल्या " त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्त हा जाणा " या आरतीवरून स्पष्ट दिसतें. श्री. देसाई यांचें पुस्तक वाचून दत्ताची खरी उपासना करण्याची बुद्धि वाचकांना होवो हीच माझी दत्ताचरणीं प्रार्थना आहे.

के. वि. बेलसरे

सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई

## शुभ आशीर्वाद

डॉ. सीताराम गणेश देसाई, एम्. ए., पीएच्. डी. यांनीं तयार केलेली श्रीगुरुचरित्राची ही अर्थबोधिनी मीं वाचून पाहिली. श्रीगुरुचरित्रासारख्या वेदतुल्य ग्रंथाचा गद्य अनुवाद सोप्या भाषेंत आणि नवीन पद्धतीनें लिहिण्याचें कौशल्य लेखकाला साधलें आहे. त्यांच्या या ग्रंथानें दत्तवाङ्मयांत अधिक मोलाची भर पडून स्त्रिया व मुलांनासुद्धां या ग्रंथाचें माहात्म्य कळेल व त्यांच्या ज्ञानांत भर पडेल. या ग्रंथाच्या आम्हीं वाचलेल्या भागावरून सामान्य धर्मजिज्ञासु लोकांना या पुस्तकाचा पुष्कळच उपयोग होईल, असें वाटतें. लेखकानें हें ग्रंथलेखनाचें लोकोपयोगी कार्य तत्परतेनें आणि उत्साहानें केलेलें पाहून कोणा गुणग्राही रसिकाला आनंद होणार नाहीं? खरोखर हे श्रेष्ठ ग्रंथकर्ते श्रीदत्तप्रभूंच्या कृपेनें अशा प्रकारच्या लोकोपयोगी लेखनाचा अधिकाधिक व्यवसाय आमरण करोत, असें आम्ही इच्छितों.

**श्रीसत्येंद्रनाथ स्वामी**
श्रीपाद श्रीवल्लभ सेवामंडळ
१० कॉर्नर न्यू गोखले रोड,
उत्तर दादर, मुंबई २८

# निवेदकाचें मनोगत

॥ ॐ श्रीराम ॥ श्रीगुरवे नमः ॥

दोन वर्षांपूर्वी श्रीदत्तजयंतीच्या दिवशीं, श्रीदत्तक्षेत्र गरुडेश्वर येथें, प. प. वासुदेवानंदसरस्वतींच्या समाधिमंदिरांत, श्रीगुरुचरित्राच्या सप्ताह-वाचनाची समाप्ति करण्याचा सुयोग आला होता. तेव्हां भावार्थ श्रीगुरुचरित्र लिहावें हा विचार मनांत रुजला. त्या विचाराला मूर्तस्वरूप येण्याचा सुयोग, या वर्षीं श्रीदत्तजयंतीच्या दिवशींच यावा, हें मी माझें सुदैव समजतों. हें पुस्तक लिहिण्याचे मुदतींत गेल्या दोन वर्षांत डॉ. ना. ज. शेंडे, प्रा. के. वि. बेलसरे, श्रीसत्येन्द्रनाथस्वामी, श्रीकेतकरमहाराज, श्रीगुळवणीमहाराज, श्रीगुरु श्रीधरस्वामी, पारनेरचे डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर, सौ. इंदिराबाई दांडेकर, श्री. वासुदेव गोपाळ परांजपे, श्री-अवधूतस्वामी ( लिमये ), श्री. रामकृष्णपंत बोरकर, डॉ. बी. एन्. के. शर्मा, माझे शाळा व कॉलेजांतील अध्यापक व प्राध्यापक यांचे शुभ आशीर्वाद मला मिळाले हें मी परमभाग्य समजतों. माझे मित्र डॉ. अरविंद विनायक आपटे, एम्. ए., पीएच्. डी. यांनीं हें पुस्तक लिहीत असतांना वेळोवेळीं मला बहुमोल सूचना केल्या व पुस्तकाची छपाई चालू असतांना तें आत्मीयतेनें वाचून आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके थोडेच होतील. माझ्या या विनम्र प्रयत्नाचे आपले अभिप्राय व आशीर्वाद देऊन ज्यांनीं कौतुक केलें त्या सर्वांचा मी आभारी आहें.

हें भावार्थ श्रीगुरुचरित्र लिहितांना ज्यांच्या पुस्तकांचा मला उपयोग झाला त्या सर्वांचा मी ऋणी आहे. हें पुस्तक वाचून कांहीं वाचकांना जरी श्रीगुरुचरित्राची पोथी मुळांतून वाचावी, अशी उत्सुकता वाटली तरी माझे परिश्रम सार्थकीं लागले असें मला वाटेल.

या पुस्तकांतील ओव्यांचे क्रमांक, श्रीधर कोंडो कौशिक यांनीं १९५९ मध्यें प्रकाशित केलेल्या त्रेपन्न अध्याय असलेल्या श्रीगुरुचारित्राच्या पोथीं-तील आहेत. विवेचनांतील विविध स्तोत्रांचा संग्रह व माहिती वाचकांना उपयुक्त वाटेल अशी आशा वाटते.

या पुस्तकांत अनवधानानें, ( पृ. ६ ओळ दोन. वेदधर्म याऐवजीं देवंधर्म, आणतें ऐवजीं आणेंत ( पृ. १८ ) का ऐवजीं क ( पृ. ६६ ) स्वामी ऐवजी स्वामी ( पृ. ८१ ) वगैरेसारखे कांहीं मुद्रणदोष राहून गेले आहेत, त्याबद्दल भाविक वाचक मला थोर मनानें क्षमा करतील, अशी आशा वाटते.

या पुस्तकाबद्दलचे अभिप्राय व सूचना वगैरे वाचकांनी मला कळ-विल्यास मला आनंदच वाटेल व पुढील आवृत्त्यांत त्यांचा विचार करतां येईल. दत्तभक्त या पुस्तकाचें हार्दिक स्वागत करोत व असलें धार्मिक पुस्तक छापण्याचें धाडस करणाऱ्या त्रिदल प्रकाशनाची आर्थिक हानि न होवो ही माझी सदिच्छा.

या पुस्तकाचें प्रकाशन करून त्रिदल प्रकाशनानें मला उपकृत केलें आहे.

सुबक छपाईबद्दल श्रीदत्त मुद्रणालयाचे श्री. मा. प. तळेकर यांचा मी मन:पूर्वक आभारी आहें.

या जगांत सर्व लोक सुखी व निरोगी होवोत. त्यांना भद्र म्हणजे मंगल गोष्टींचा अनुभव येवो. कोणालाहि दु:ख प्राप्त होऊं नये ही उप-निषदांतील उदात्त प्रार्थना श्रीगुरुदत्तांचे कृपेनें सफल होवो.

श्रीगुरुकृपेचा तृषार्त चातक
**सीताराम गणेश देसाई**, ( गाडगीळ )

१।५ न्यू शहा बिल्डिंग
११५, लेडी हार्डिंग रोड,
माहिम, मुंबई नं. १६

बुधवार, ता. ८।१२।६५
मार्गशीर्ष शु॥ १५ शके १८८७

## ॥ आनंद - मंगल ॥

माझे भाचे डॉ. सी. ग. देसाई यांनीं श्रीगुरुचरित्रासारख्या प्रासादिक ग्रंथाचें सुबोध गोष्टीरूप असें गद्य भाषांतर करून, ओवीबद्ध ग्रंथ वाचणें आणि त्याचा अर्थ जाणणें ज्यांना कठीण जातें अशा लोकांची, तसेंच श्रीगुरुचरित्राचे पाठ अगर सप्ताह करतांना आवश्यक तें पथ्य ज्यांना पाळणें शक्य होत नाहीं, अशा लोकांची मोठी गैरसोय दूर केली आहे.

श्रीगुरुचरित्राला गद्यरूप देतांना त्या ग्रंथांत असलेली भाविकता जशीच्या तशी या ग्रंथांत उतरली असल्याकारणानें, मूळ ग्रंथवाचनाची जी फलश्रुति, तीच फलश्रुति हा गद्य ग्रंथ वाचूनहि भाविक वाचकांना मिळेल असें मला वाटतें.

माझी स्वतःची गुरुपरंपरा म्हणजे—श्रीगुरुदत्त— अक्कलकोटस्वामी, सीताराम (मंगलवेढा)— शिवदत्त व केशवदत्त (सोनगीर) अशी आहे. त्यामुळें या प्रयत्नाबद्दल मला जास्त आपुलकी वाटते.

या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत दिलेल्या विवेचनामुळें दत्तभक्तांना आपल्या आराध्यदैवताविषयीं अधिक माहिती मिळून, तें विवेचन उद्बोधक ठरेल.

हें पुस्तक लिहिण्यामागें ग्रंथकर्त्याच्या असलेल्या अपेक्षा फलद्रूप होवोत आणि भाविक भक्तांना या ग्रंथाच्या वाचनानें भगवान् श्रीगुरुदेवदत्त यांची कृपा लाभो असें मी इच्छितों.

वा. गो. परांजपे
सेवानिवृत्त डेप्युटि चीफ ऑडिटर
महाराष्ट्र स्टेट

रामदास बिल्डिंग, दुसरा मजला
गिरगाव, मुंबई नं. ४, दि. २७।१०।६५

॥ श्री स द् गु रु प्र स न्न ॥

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् ।

मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोः कृपा ॥ गुरुगीता, श्लोक ७६ ॥

प्रा. डॉ. सी. ग. देसाई यांनीं श्रीगुरुचरित्राच्या ओंवीबद्ध पोथीचें केलेलें हें गोष्टिरूप गद्यनिवेदन, अत्यंत परिश्रम करून तयार केलें आहे. हें पुस्तक सर्व प्रकारच्या वाचकांना व मुलांनाहि समजण्यास अगदीं सोपें असें झालें आहे. श्रीगुरुमहिमा काय आहे हें जाणून घेणारांना व श्रीगुरु-भक्तांना हें पुस्तक साधें व सोपें साधन ठरावें. हल्लींच्या काळांत अशा पुस्तकांची अत्यंत गरज आहे. सुखाचीं सर्व साधनें उपलब्ध असूनहि शांततेनें व सुखानें राहणें अशक्य झालें आहे. अशा या कलियुगांत अशा प्रासादिक पुस्तकांची उपयुक्तता पटावी. ह्या पुस्तकांतील श्रीगुरूंच्या गोष्टी व चमत्कार जे बद्ध आहेत, म्हणजे आहार, निद्रा, भय व मैथुन यांतच गढले आहेत अशांना अशक्यप्राय वाटतील. जे लोक मुमुक्षु असतील ते ह्या गोष्टी वाचून श्रीगुरूंच्या शोधार्थ हालचाल करतील व जे आधींच साधक आहेत त्यांना श्रीगुरूंच्या लीला वाचून अंतर्बाह्य सुखावून सिद्धावस्थेला जाण्याला मदत होईल.

जे सिद्ध असतील त्यांना श्रीगुरु मागें होऊन गेले, आतां नाहींत व पुढें कोणास ठाउक ? असा भ्रम कधींहि नसतोच. माझा स्वतःचा अनुभव असा आहे कीं श्रीगुरु तिन्ही काळांत आहेतच. हें सत्य माझे सद्गुरु भागीरथीबाई वैद्य यांच्या कृपेनें आमच्या दत्तपरंपरेंतून मला अनुभवाला आलें आहे. आमची परंपरा म्हणजे दत्त, नारायणमहाराज ( जाळवणकर ), लक्ष्मण-महाराज ( इंदोर ), बलभीममहाराज देशमुख ( पाडेगांव ) व भागीरथीबाई वैद्य ( इंदूर ) अशी आहे. या दत्तसंप्रदायाच्या ज्ञानप्रसाराचें पवित्र कार्य माझे सद्गुरु माझेकडून करवून घेत आहेत. या वर्षी श्रीदत्तजयंतीला

माझ्या वयाच्या पन्नासाव्या वाढदिवसाचे दिवशीं, भावार्थ श्रीगुरुचरित्रा-सारख्या या बहुमोल ग्रंथावर अभिप्राय देण्याचा अत्यंत शुभ योग आला आहे. सर्वांच्या उपयोगी अशा या गोष्टीरूप श्रीगुरुचरित्राच्या विवेचनांतील भागहि अत्यंत उपयुक्त आहे. असा हा ग्रंथ गुरुरायानें श्री. देसाई यांच्याकडून निर्माण केला, त्याबद्दल त्यांना शुभ आशीर्वादहि तेच देत आहेत. प्रत्येक साधकानें या अभिप्रायाच्या प्रारंभीं दिलेल्या श्लोकांतील श्रीगुरूंच्या रहस्याचा अनुभव घ्यावा, म्हणजे चारहि दशा गुरुकृपेनें ओलांडून सद्गुरुस्वरूपाचा अनुभव घेऊन स्थिर होतां येईल. श्री. देसाई यांच्या हातून अशीं पवित्र कार्यें श्रीगुरूंच्या कृपेनें अधिकाधिक व्हावोत, त्यांना उदंड आयुष्य लाभो व श्रीगुरूंचें सत्यरूप उमजो, एवढेंच श्रीगुरूजवळ मागणें आहे.

**सौ. इंदिराबाई दांडेकर**
रामबाग

दि. २१।११।१९६५

## ॥ हा र्दि क आ शी र्वा द ॥

माझे विद्यार्थी—मित्र डॉ. देसाई यांनीं ' नव्य उपनिषदांचा विवेचनात्मक अभ्यास ' ह्या प्रबंधाचें लेखन करतांना अनेक संप्रदायांचा बारकाव्यानें अभ्यास केला. दत्तसंप्रदाय हा त्यांपैकींच एक. या संदर्भांतच त्यांचें लक्ष गुरुचरित्राचा गद्य अनुवाद करण्याकडे वळलें असावें. त्यांचा हा ग्रंथ भाविक लोकांना मूळ ओवीबद्ध ग्रंथाइतकाच प्रासादिक वाटावा. उत्तरोत्तर त्यांच्या हातून मौलिक ग्रंथरचना होवो हीच माझी अपेक्षा.

डॉ. ना. ज. शेंडे
एम. ए., पीएच. डी., डी. लिट्.
सेंटर ऑफ ॲडव्हान्स्ड् स्टडी
इन् संस्कृत, पुणे विद्यापीठ

दि ७।११।६५

# अनुक्रमणिका


| | अध्याय | पृष्ठ |
|---|---|---|
| नामकरणीची गोष्ट | १ | १ |
| नामकरणीची व सिद्धमुनींची गोष्ट | २ | २ |
| चार युगें | २ | ४ |
| दीपकाची गुरुभक्ति | २ | ५ |
| अंबरीषाची गोष्ट | ३ | १३ |
| प्रतिव्रता सती अनसूया | ४ | १६ |
| जन्मले श्रीपादश्रीवल्लभ | ५ | २१ |
| शिवभक्त रावण | ६ | २६ |
| सौदामिनीचा उद्धार | ७ | ४० |
| कुरवपूरची अंबिका | ८ | ४४ |
| चंद्रसेनराजाची गोष्ट | ८ | ४७ |

| | अध्याय | पृष्ठ |
|---|---|---|
| धोबी राजा झाला | ९ | ५१ |
| चोरांची खोड मोडली | १० | ५६ |
| श्रीपादयतींचा नवा अवतार | ११ | ६० |
| नरहरींचें आईला उत्तर | १२ | ६७ |
| नरहरीची गोष्ट | १३ | ७० |
| रत्नाईची कथा | १३ | ७६ |
| पोटशूळ बरा झाला | १३ | ७९ |
| दुष्ट यवनाचें पारिपत्य | १४ | ८३ |
| तीर्थयात्रांची माहिती | १५ | ८५ |
| धौम्यऋषि व त्यांचे तीन शिष्य | १६ | ८८ |
| बाळ उपमन्यूची गोष्ट | १६ | ९० |
| देवीभक्त ब्राह्मण गुरुभक्त झाला | १७ | ९७ |
| मोहरांचा हंडा | १८ | १०१ |
| पृथ्वीवरील एक कल्पवृक्ष | १९ | १०३ |
| नदींत स्वर्गीय महाल | १९ | १०५ |
| मुलगा जिवंत झाल्याची गोष्ट | २० | १०८ |
| मेलेला मुलगा जिवंत केला | २१ | ११५ |
| वांझ म्हैस दूध देऊं लागली | २२ | ११९ |
| ब्रह्मराक्षसाचा उद्धार | २३ | १२३ |
| त्रिविक्रमभारतीच्या पराजयाची कथा | २४ | १२५ |
| विदूरनगरच्या राजाचें व मदोन्मत्त ब्राह्मणांचें परिपत्य | २५ २६ | १२७ |
| गर्वाचें घर खालीं | २७–२८ | १३५ |
| भस्माचा प्रताप | २९ | १४० |

| | अध्याय | पृष्ठ |
|---|---|---|
| एका द्रविड ब्राह्मणाची कथा | ३० | १४२ |
| गोपीनाथाची गोष्ट | ३१ | १४५ |
| लोपामुद्रेची गोष्ट | ३२ | १४९ |
| राजा भद्रसेन | ३३ | १५५ |
| देवयानी व संजीवनी | ३४ | १६२ |
| सीमंतिनीची गोष्ट | ३५ | १६७ |
| परान्नं प्राणसंकटम् । | ३६–३७ | १७५ |
| तिघां पुरतें अन्न, जेविले सहस्र ब्राह्मण | ३८ | १८० |
| साठाव्या वर्षी पुत्रप्राप्ति | ३९ | १८४ |
| धनंजयाची कथा | ४० | १९० |
| काशीयात्रा | ४१–४२ | २०१ |
| अनंतव्रताची गोष्ट | ४३ | २०४ |
| सुशीलेची गोष्ट | ४३ | २०६ |
| घरबसल्या श्रीशैलयात्रा | ४४ | २१३ |
| विमर्षणराजाची गोष्ट | ४४ | २१६ |
| नंदीनाम्याचें कोड बरें झालें | ४५ | २२१ |
| उमजला स्वरूप केसरी | ४६ | २३० |
| श्रीगुरु एक, झाले अनेक | ४७ | २३२ |
| अवेळीं कापलें शेत | ४८ | २३६ |
| असा हा थोर अमरसंगम | ४९ | २४१ |
| राजा झालेला धोबी | ५० | २४७ |
| पिंगलेची गोष्ट | ५० | २५२ |
| श्रीगुरूंची समाधि | ५१ | २५२ |
| श्रीगुरुप्रसादाचा महिमा | ५२ | २६५ |

पृष्ठ

## भाग २


| | |
|---|---|
| श्रीगुरुचरित्राची अवतरणिका | २६७ |
| श्रीगुरुचरित्र लेखक परिचय | २७१ |
| विविध पोथ्यांतील फरक | २७२ |
| श्रीगुरुचरित्राच्या सप्ताहवाचनाची पद्धति | २७४ |
| श्रीगुरुचरित्रवाचनाची फलश्रुति | २७६ |
| गुरुगीता | २७७ |
| श्रीगुरुचरित्रांतील कानडी पदें | २८० |
| श्रीगुरुचरित्रांतील संस्कृत श्लोक व दोन स्तोत्रें | २८४ |
| श्रीरंगावधूतस्वामीविरचित दत्तबावनी | २९२ |
| बावन्न श्लोकी श्रीगुरुचरित्र | २९४ |
| श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचित तीन दत्तस्तोत्रें व करुणात्रिपदी | २९९ |
| श्रीनारदविरचित दत्तात्रेयम् | ३०४ |
| श्रीशंकराचार्यकृतं गुर्वष्टकम् | ३०५ |
| श्रीदत्तस्तुति | ३०६ |
| श्रीदत्तात्रेयउपनिषद् | ३०९ |
| श्रीगुरुचरित्राचें संक्षिप्त रसग्रहण | ३१३ |
| श्रीदत्तसंप्रदायाचा परिचय | ३१५ |
| श्रीदत्तांची आरती | ३२० |





**गणेशगुरु माझे पिता । सरस्वती माझी माता ।**
**त्यांच्या पदकमलीं स्वचित्ता । मनोभावें अर्पिलें मी ॥**

माझ्या बालपणापासून उपासनामार्गाचे संस्कार करून, माझ्या ऐहिक यशाचा पाया ज्यांनीं घातला व ज्यांनीं आपलें सर्व आयुष्य श्रीमन्नारायणाच्या उपासनेंत व जपांत घालविलें, त्या माझ्या वडिलांच्या **कै. गणेश गोपाळ देसाई** (गाडगीळ) यांच्या पवित्र स्मृतींना ही भक्तिभेट सादर सविनय समर्पण.

श्री दत्तजयंती, बुधवार
दिनांक ८–१२–१९६५

**सीताराम गणेश देसाई**
(गाडगीळ)

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...................... वि: ......................
क्रमांक ...................... नों. दि. ......................

# नामकरणीची गोष्ट

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५६६९

श्रीगुरु नृसिंहसरस्वती गाणगापुरास राहाते असत. तिथे लांबलांबचे लोक त्यांच्या दर्शनाला येत व जें जें इच्छीत तें त्यांना मिळे, अशी या दत्तरूप नृसिंहसरस्वतींची कीर्ति **नामकरणी** नांवाच्या एका भक्ताच्या कानांवर गेली व त्याला गाणगापुरीं जाऊन श्रीगुरूंचें दर्शन घ्यावें असें फार वाटूं लागलें आणि मनांत निर्धार करून अखेर तो निघाला सुद्धां. त्याला ना तहान ना भूक ! सारखा चालत होता. गुरुदर्शनाचा ध्यास लागला होता त्याला. वाटेंत तो श्रीगुरूंचें गुणवर्णन करीत होता. त्यांच्या नामस्मरणानें आपलेंहि दैन्य नष्ट होईल अशी त्याला खात्री वाटत होती.

कलियुगांत ख्याति । नृसिंहसरस्वती ।
भक्तासी सारथी । कृपासिंधु ॥ ( १·८२ )

असा त्याचा निश्चय झाला होता. आपण कांहीं तरी दिल्याशिवाय श्रीगुरु आपल्याला दर्शन देणार नाहींत का, असा युक्तिवाद मनांतच तो करीत होता. कारण समग्र पृथ्वीचें दान करणाऱ्या बळीला देवानें काय दिलें ? तर पाताळांत रवानगी ! याउलट ध्रुवाला अढळपद ज्या देवानें दिलें त्या देवाला ध्रुवानें व्यावहारिक असें काय दिलें होतें ? श्रीगुरूकडे आई या भावनेनें पाहणारा तो नामकरणी मनांत विनवीत होता,

बाळापाशीं माता । काय मागे ताता ।
ऐकें श्रीगुरुनाथा । काय देऊं ॥ ” ( १·१०९ )

बरें, कांहीं तरी घेऊन मगच देणारा खरा दाता कसा होणार ? हाहि युक्तिवाद करून, आपण कांहीं सेवा केली नाहीं, म्हणून श्रीगुरु रागावले

असावेत असा प्रश्न उभा करून, तो गुरूला सेवेच्या अपेक्षेविरहित ढगां-प्रमाणें कृपेचा वर्षाव करण्याची विनंति करतो.

अशा रीतीनें नामकरणीची आर्तता पाहून कृपाळू श्रीगुरुनाथ वेगानें धांवून आले. वांसराला पाजायला जाणारी गाय ज्या त्वरेनें जाते, तसे भक्ताच्या मनाचें समाधान करण्याकरितां प्रत्यक्ष श्रीगुरु गाणगापुराहून येऊन अर्ध्या वाटेंतच नामकरणीला मनानें भेटले. मनःचक्षूसमोर दिसणाऱ्या त्या मूर्तीच्या चरणकमळांवर नामकरणीनें आपलें मस्तक ठेवलें व त्यांची चरणधूळ आपल्या जटेच्या केसांनीं झाडली. त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंची माळ ओघळूं लागली.

●●●

# नामकरणीची व सिद्धमुनींची गोष्ट

त्या मानस-भेटीचा आनंद अनुभवीत नामांकित असा तो नामकरणी गाणगापूरला जाण्याच्या रस्त्याची वाटचाल करीतच होता. वाटेंत फार थकला म्हणून तो एका झाडाखालीं क्षणभर बसला, तोंच त्याला झोंप लागली. त्या क्षणभराच्या झोंपेंतहि तो श्रीगुरूंचें चिंतन करीत होता. तेव्हां त्याला स्वप्नांत श्रीगुरूंचें दर्शन पुन्हा झालें. त्या सुषुप्ति अवस्थेंत त्याला श्रीगुरूंचें स्वरूप दिसलें तें असें. त्या जटाधारी साधूनें अंगाला भस्म फासलें होतें. वाघाचें कातडें पांघरलें होतें. पीतांबर नेसला होता. नामकरणीच्याजवळ जाऊन त्या साधूनें त्याला भस्म लावलें. त्या वेळीं नामकरणीला जाग आली. तो चारी दिशांना पाहूं लागला, परंतु तसा

जटाधारी साधु आसपास तर कुठे नव्हता. तेव्हां त्याच मूर्तीचें मनांत ध्यान करीत नामकरणीनें आपला पुढला प्रवास सुरू केला. पुढें वाटेंत, स्वप्नांत जसा दिसला होता तसाच एक योगी त्याला दिसला. मनोमन खूण पटली व त्यानें त्या योगिराजाला वंदन करून कुठला, काय वगैरे तपास केला. तेव्हां तो योगी म्हणाला, "अमरजासंगमाजवळच गाणगापूर नांवाचें पवित्र स्थान आहे, तेथें प्रत्यक्ष त्रिमूर्ति श्रीदत्तात्रेयांचा अवतार असलेले नृसिंहसरस्वती हे आमचे गुरु राहतात."

"यतिमहाराज, अहो, मी सुद्धां त्याच श्रीगुरुयतींचें ध्यान सदैव करतों. मला त्यांचेंच दर्शन घडावें अशी फार उत्कट इच्छा आहे, परंतु तें मला कधीं जमेल याची शंका वाटते."

"बाळ, ज्याच्यावर श्रीगुरुकृपा झाली त्याला दैन्य-दारिद्र्य बाधत नाहीं. त्याच्या वंशांत सर्वहि देव राहतात. असें असतांना,त्या सद्गुरूची मानासिक पूजा व ध्यान करूनहि तूं अजून दीनवाणेपणा वाटतो, असें सांगतोस. यावरून तुझ्या मनाचा तितका दृढनिश्चय अजून झाला नसावा असें वाटतें. विष्णु किंवा शंकर हेहि एखादेवेळीं भक्तावर रागावले तर श्रीगुरु त्याचें रक्षण करूं शकतील; परंतु श्रीगुरु एखाद्यावर रागावले तर मात्र ब्रह्मा, विष्णु, महेश किंवा दुसरा कोणीहि देव त्याला वांचवूं शकणार नाहीं !"

"यतिराज, आपण गुरूविषयीं एवढें सांगितलेंत याला कांहीं शास्त्राधार आहे का ? आपण माझा संदेह फेडलात तर माझें मन दृढ होईल."

"बाळ, चांगला प्रश्न विचारलास. ऐक तर मग. ब्रह्मदेवाच्या मुखांतून चार वेद उत्पन्न झाले. द्वापारयुगाच्या शेवटीं श्रीभगवान् विष्णूंनीं व्यासांचें रूप घेतलें. त्या व्यासांपासून सर्व ऋषिजनांनीं वेदवाक्यांचा विस्तार ऐकला."

'तर मग मलाहि तो सांगा ना यतिराज."

" हो तर, सांगतों ना. प्रलयकाळीं आदिमूर्ति नारायण वटपत्रावर झोंपले होते. त्यांचेपासून चेतन-बुद्धि निर्माण झाली. आदिपुरुषाला सृष्टि-रचना करण्याकरितां जाग आली. त्याच्या बेंबींतून एक कमळ उत्पन्न झालें. त्या कमळामधून ब्रह्मदेव उदय पावला. चार दिशांना त्यानें पाहिलें तों त्या त्या दिशेला त्याला एक एक मुख आलें व अशा रीतीनें त्याला चार तोंडें झालीं. ब्रह्मदेवाला त्यामुळें आपणाहून अधिक बळी कोणी नाहीं असा गर्व झाला. तेव्हां महाविष्णूंनीं हंसून त्याला आपला खरा परिचय करून दिला व सृष्टिरचना करावयाची आज्ञा केली.

ब्रह्मदेवाला सृष्टि उत्पन्न कशी करावी हें तर माहीत नव्हतें. त्या वेळीं श्रीविष्णूंनीं त्याला वेद ग्रंथ दिले व त्यांच्या आधारानें जग निर्माण करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें वेदांच्या आधारानें ब्रह्मदेवानें जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज अशीं चतुर्विध प्राणिमात्रें निर्माण केलीं. तिन्ही जगांची बांधणी केली. पुढें व्यासऋषींनीं या सृष्टिरचनेची सविस्तर माहिती अठरा पुराणांतून सांगितली. त्या अठरा पुराणांत ब्रह्मवैवर्त-पुराण प्रख्यात आहे. ब्रह्मवैवर्त-पुराणांतील चार युगांच्या उत्पत्तीबद्दलची गोष्ट तुला उद्बोधकच वाटेल.

● ● ●

## चार युगें

ब्रह्मदेवानें कृतयुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुग अशीं चार युगें क्रमशः पृथ्वीवर पाठविलीं. कृतयुगाचा अलंकार जानवें हा होता. रुद्रा-

क्षांच्या माळांनीं त्याचे हात भूषित होते.त्याच्या अंगीं पूर्ण वैराग्य बाणलेलें होतें. त्रेतायुगाचें शरीर कांहींसें स्थूलच होतें. धर्मप्रवर्तक व यज्ञयागांचा पुरस्कर्ता अशी त्याची ख्याति होती. द्वापारयुग या दोघांहून निराळें होतें. त्याचा चेहरा उग्र दिसत असला तरी मनांत शांति होती. तें निष्ठुर होतें, तसेंच दयाळूपण होतें. हीं तिन्ही युगें पृथ्वीवर संचार करावयाला जाऊन आल्यावर कलियुगाची पाळी आली. तें विधात्यानें बोलवितांच, त्याच्या समोर आलें, तें फार चमत्कारिकपणेंच. तशा अवस्थेंत येण्याचें कारण सांगतांना

" कलियुग म्हणे ब्रह्मयासी । जिंकीन समस्त लोकांसी ।
लिंगजिव्हा रक्षणासी । हारी असे आपणांतें ।। ( २–८२ )

ब्रह्मदेवाची आज्ञा होतांच कलियुग आपला संचार भूतलावर करावयाला निघालें असतांना, विधात्यानें त्याला ' गुरुसेवकाला त्रास देऊं नको !' असें सांगितलें. गुरूची सेवा केली असतां अपूर्व सिद्धि प्राप्त होतात, हें ऐकतांच, कलियुगानें ब्रह्मदेवाला, उदाहरण म्हणून एखादी गोष्ट सांगण्याचा आग्रह केला. तेव्हां ब्रह्मदेव दीपकाची गोष्ट त्याला सांगूं लागले.

●●●

# दीपकाची गुरुभक्ति

फार वर्षांपूर्वींची गोष्ट. गोदावरी नदीच्या कांठावर अंगिरसऋषींचा पवित्र आश्रम होता. त्या आश्रमाची शोभा पुष्पफळांनीं समृद्ध अशा झाडांनीं व वेलींनीं द्विगुणित झाली होती. गुरूच्या जवळ वेदाध्ययन कर-

णारे अनेक शिष्य तेथें राहात असत. अशा वेदाचार्यांत एक प्रमुख आचार्य होते, देवधर्म नांवाचे मुनि. दीपक नांवाचा एक शिष्य इतर शिष्यांहून त्यांचा जरा अधिक आवडता होता. गुरूंची सेवा दीपक मनोभावानें करीत असे. तो शास्त्रपुराणांचा अभ्यास गुरूजवळ करीत होता. एक दिवस वेदधर्मऋषींनीं आपल्या सर्व शिष्यांना एकत्र बोलविलें व त्यांना ते म्हणाले—

" शिष्यांनो, माझ्यावर तुमची भक्ति असेल तर माझें बोलणें नीट ऐका ! "

" गुरुराया, भक्ति असेल म्हणजे काय, आहेच ! आपण जें जें कांहीं सांगाल त्याचा स्वीकार आम्ही करूं. गुरूची आज्ञा पालन केली नाहीं तर अविद्यारूपी मायासमुद्रांत बुडावयाला होईल, हें आम्हांला पटलें आहे.

" शिष्यांनो, ऐका तर मग. मी पूर्वींच्या हजारों जन्मांत महापातकें केलीं होतीं. त्यांतील बरींच पापें अनुष्ठान करून धुऊन टाकतां आलीं; परंतु आतां उरलेलें कांहीं पूर्वकर्म भोगल्यावांचून सुटका होणार नाहीं. त्याकरितां वाराणसीला म्हणजे काशीला जाऊन तें सर्व पाप भोगून फेडावें असा माझा मानस आहे. तरी मला काशीला न्या. मी शरीरानें पाप भोगीन. माझी देखभाल तुम्ही करा. बोला, तुमच्यांतील कोण माझ्याबरोबर काशीला यायला तयार आहे ? "

" गुरुनाथा, मी संदीपक तुमच्याबरोबर यावयाला तयार आहें ! "

" बाळा संदीपका, माझ्या अंगावर कोड फुटणार आहे व मी आंधळा व पांगळा होणार आहें. त्या अवस्थेंत एकवीस वर्षें माझा संभाळ करावा लागेल. जर तुझी भक्ति दृढ असेल तरच या सेवेचा अंगीकार कर !"

" गुरुवर्या, एवढंच असेल तर तुमच्याऐवजीं मी स्वतःसुद्धां कोडी, आंधळा व पांगळा व्हायला तयार आहें व अशा प्रकारें तुमचें पाप फिट-

णार असेल तर त्वरित सांगा. मी आनंदानें एकवीस वर्षें हें सर्व स्वीकारीन ! ”

“ बाळ, तुझें मन मोठें आहे, पण प्रत्येकाला आपलें पाप स्वतःच भोगावें लागतें. तें मुलगा शिष्य किंवा इतर दुसऱ्या कोणाला देतां येत नाहीं. म्हणून मी स्वःच माझें पाप भोगीन. फक्त तूं माझा सांभाळ कर. अरे, रोगानें त्रस्त झाल्यापेक्षां, त्याचा प्रतिपाळ करणाऱ्याला जास्त कष्ट पडतात, हें लक्षांत आहे ना ? ”

“गुरुराया, मी तुम्हांला ठरल्याप्रणें काशीला जरूर नेईन ! तेथें एकवीस वर्षे तुम्हांला काशीविश्वनाथ मानून तुमचीच सेवा करीन ! ”

याप्रमाणें संदीपक शिष्यानें आश्वासन दिल्यावर कांहीं दिवसांनीं त्या वेदधर्ममुनीच्या अंगावर कोड फुटलें. तेव्हां वचन दिल्याप्रमाणें संदीपक गुरूला काशीला घेऊन गेला व

माणिकर्णिका उत्तरदेशीं । कंबळेश्वर सन्निधेसी ।
राहिले तेथें परियेसी । गुरुशिष्य दोघे जण ॥ २–१८५

वेदधर्ममुनींची पीडा असह्य होत होती. त्यांना कुष्ठरोग तर होताच; परंतु त्यांतच त्यांची दृष्टि गेली व पाय पांगळे झाले. तरी संदीपक मनोभावानें त्यांची सेवाचाकरी करीत होता. गांवांत भिक्षा मागण्याकरितां जाई तेवढाच काय तो सेवेंत खंड पडावयाचा. रोगानें गुरूंचा स्वभाव चिडखोर बनला होता. एखाद्या दिवशीं संदीपकानें भिक्षा आणली कीं ती फारच थोडी आहे असें म्हणून गुरु जेवीत नसत व जमिनीवर सर्व अन्न उपडें करून टाकीत असत. दुसऱ्या दिवशीं संदीपकानें जास्त भिक्षा मागून आणली तर त्यांत मिष्टान्नें नाहींत, म्हणून गुरु रागावत असत. जितकें मागून आणी तितकें फुकट घालवून शिव्या देत असत, तर एखादे वेळीं आपल्यानिमित्त फार कष्ट सोशीत असल्याबद्दल शिष्याचा गौरव करीत; माशा बसतात, तरी त्यांचे

निवारण करीत नाहींस, माझे कपडे नीट धूत नाहींस, चांगली भिक्षा आणीत नाहींस, अशी त्याची कानउघाडणी अधूनमधून करीतच असत. काशीक्षेत्रांत राहूनहि कधीं तीर्थयात्रेला किंवा देवदर्शनाला सुद्धां तो संदीपक शिष्य गेला नाहीं. गुरुसेवेंत तेवढासुद्धां खंड पडलेला त्याला चालला नसता. अशा तऱ्हेनें निष्ठेनें त्याची गुरुसेवा अहोरात्र चालू असतां, प्रत्यक्ष शंकर प्रसन्न होऊन त्याच्या समोर प्रकट झाले व म्हणाले—

" गुरुभक्ता संदीपका , तुझ्या भक्तीनें आम्ही प्रसन्न झालों आहोंत. तर आता वर माग ! "

" हे मृत्युंजया, मला क्षमा असावी. गुरूला न विचारतां मी कोणताहि वर मागू शकत नाहीं. तेव्हां मी गुरूला विचारून येईपर्यंत थांबा ! "

संदीपक वेदधर्मगुरूंकडे गेला व म्हणाला,—

" गुरुराया, काशीविश्वनाथ प्रसन्न होऊन आले आहेत. आपण जर परवानगी दिलीत तर आपली व्याधि बरी व्हावी, असा वर मी त्यांच्याकडे मागेन ! "

" संदीपका, माझ्या व्याधीनिमित्त ईश्वराला प्रार्थना करूं नको ! भोगल्यावांचून पातकांची फेड होत नाहीं. आतां बरा झालों तरी पुढील जन्मीं भोगावें लागेलच. मला मुक्त व्हावयाचें आहे. मुक्ति इच्छिणाऱ्यानें निःशेष पाप धुतलें पाहिजे हें मागें एकदां मी तुला सांगूनहि पुनः माझा घात करावयाला बघतोस काय ? तूं कसला माझा हितचिंतक ? जा माझ्या समोरून ! तोंड काळें कर ! "

" गुरुवर्या, क्षमा करावी एक वेळ मला. पुनरपि अशी चूक नाहीं करणार मी !" असें विनवून संदीपक परत गेला व शंकरांना म्हणाला, " देवा, गुरूच्या मनांत नाहीं, तर मी तुमचा वर कसा घेऊं ? आपण मला क्षमा करा. जातों मी. माझ्या गुरुसेवेंत विलंब होतो आहे. "

संदीपक निवून गेल्यावर, भगवान् शंकर मोक्षमंडपांत गेले व सर्व देवांना त्यांनीं तो वृत्तांत सांगितला. अनेक दिव्य सहस्रवर्षे तप करणारे महाऋषि रात्रंदिवस वर मागण्याकरिता आतुर असतांना, त्यांना वर द्यायला आपली तयारी नसते व ज्याला वर माग म्हणून आपण होऊन सांगावें,त्यानें तो घेऊं नये याचें त्यांनीं आश्चर्य प्रकट केलें. तेव्हां श्रीविष्णु त्या दीपक शिष्याला पाहावयाला गेले व त्याची गुरुभक्ति पाहून संतुष्ट झाले.

" संदीपका, तुझ्या भक्तीनें मी संतुष्ट झालों आहें. तरी आता वर माग ! "

" देवा, माझी अशी काय मोठी भक्ति आपण पाहिलीत व मला वर द्यायला तयार झालांत ? हजारों, लाखों कोटयवधि वर्षे अरण्यांत राहून तप करणाऱ्यांना तुम्हीं उदास करतां, त्यांना वर देत नाहीं, अशी त्यांची तक्रार आहे आणि मी तर तुमचें कधीं स्मरण करीत नाहीं. तुमची भक्ति केली नाहीं. तर मग जबरदस्तीनें येऊन मला वर कसा काय देऊं केलात ?"

" संदीपका, तूं माझी भक्ति करीत नसलास, तरी आपल्या गुरूची जी मनोभावें सेवा करतोस ती पाहून आम्हीं संतुष्ट झालों. अरे, तूं जी गुरूची सेवा केलीस तीच मला पावली. जो गुरुभक्त असतो तो मला जीव कीं प्राण वाटतो. त्याचा मी अंकित असतों. तो काय मागेल तें मी त्याला देईन. शिष्यानें केलेली निस्सीम गुरुभक्ति जशी मला प्रिय आहे व मलाच ती पावते, तशीच मुलानें केलेली आई–वडिलांची सेवा, स्त्रीनें केलेली नवऱ्याची सेवा मलाच पोंचते ! "

" देवा, आपण सांगितलेंत तें खरं असलं तरी तुम्ही त्रिमूर्ति सुद्धां माझ्या गुरूच्या आधीन आहांत हें मला माहीत आहे. गुरूकडून ज्ञान मिळतें व ज्ञान झाल्यावर ईश्वर कितीसा दूर राहील ? "

" बाळ संदीपका, तुझी धन्य आहे ! तूं शिष्योत्तम आहेस. पूर्वी विश्वनाथ येऊन विन्मुख गेले. आतां माझ्याजवळ तरी कांहीं माग !"

त्यावर संदीपकानें गुरूची आज्ञा मागून येतों असें सांगितलें व तो गुरूकडे गेला.तेव्हां ते म्हणाले,' माझ्याकरतां कांहीं मागावयाचें नाहीं असं मागें एकदां सांगितलें होतें ना ? जा, ' फार तर तुझ्याकरितां कांहीं तरी मागण्याची मी तुला परवानगी देतों ! ' गुरूंना, नमन करून संदीपक परत आला व म्हणाला, " विष्णुदेवा, तुमचा आग्रहच आहे तर मागतों. द्याल ना ? "

" संदीपका, अरे शंका कशाला ? लवकर माग ! मागशील तें दिलं असं समज ! "

" जर मला वर देणारच म्हणतां, तर माझ्या मनांत गुरुभक्ति अधिक वाढेल असें ज्ञान मला द्या ! गुरूचें रूप मला ओळखतां येईल असें ज्ञान मला द्या, याहून आणखी कांहीं मला नको ! "

" बाळा संदीपका, तूं माझा प्राणसखा आहेस ! तूं गुरूला ओळखलें आहेस, परब्रह्माला डोळ्यानें पाहिलें आहेस. अधिक जर आम्हांला विचारशील तर आम्ही एवढेंच सांगतों कीं, अहोरात्र गुरूची उत्तमोत्तम स्तुति कर! गुरु हीं दोनच अक्षरें असलीं तरी त्यांत अमृताचा समुद्र भरलेला आहे. त्यांत बुडल्यावर किती परमावधिचा आनंद होईल याची कल्पना अनुभवानेंच येईल ! "

विष्णूंनीं गुरुभक्ति वाढेल असा वर दिल्यावर तो संदीपक गुरूकडे गेला. तेव्हां वैकुंठनायकानें काय दिलें, असं गुरूंनीं विचारलें तेव्हां

' म्यां मागितलें तयासी । गुरुभक्ति व्हावी म्हणोनिया ॥ ' २.२६६

असें वरदान मागितल्याचें संदीपकानें सांगितलें. तेव्हां वेदधर्ममुनि संतुष्ट झाले व म्हणाले,

" बाळ संदीपका, तुझ्या घरांत सर्व ऐश्वर्यें प्राप्त होतील. तुला वाक्सिद्धि प्राप्त होईल. प्रत्यक्ष विश्वनाथ तुझ्या स्वाधीन राहातील. तुझें

स्मरण करणाऱ्यांचें कोड वगैरे असाध्य रोग बरे होतील व तुझ्या आठवणीनें गृहस्थांना सर्व सुखांची प्राप्ति होईल ! ”

असा आशीर्वाद संदीपकाला दिल्यावर गुरूंचा देहहि दिव्यरूप झाला. त्यांचें कोड बरें झालें. शिष्याची सत्त्वपरीक्षा पाहण्याकरितां घेतलेलें तें एक सोंग होतें. कारण वेदधर्मासारख्या मोठ्या तपस्व्याला कुठलें पाप पिडणार होतें ? कलियुगानें ही गोष्ट ऐकली व तें निमूटपणें निघून गेलें.

अशी ही कथा त्या वाटेंत भेटलेल्या सिद्धपुरुषानें, श्रीगुरूंच्या दर्शनाला निघालेल्या नामकरणीला सांगितली.

नामकरणीला ह सर्व ऐकून फार आनंद झाला व त्यानें त्या सिद्ध-मुनीला विचारलें—

“ अहो मुनिमहाराज, आपण कुठें राहातां ? दररोज जेवणाखाण्याची सोय काय? हें सर्व विचारण्याचें कारण मला तुमचा दास होण्याची इच्छा आहे ! ”

“अरे मुला,ज्या ज्या ठिकाणीं ते सद्गुरु नृसिंहसरस्वती असतात तिथें मी असतों. माझा दररोजचा आहार म्हणशील तर, तो आहे श्रीगुरूंचें स्मरण व चिंतन. श्रीगुरुचरित्राच्या माहात्म्याचें अमृतपान आम्ही नित्य करतों.हें बघ तें पुस्तक. यांत श्रीगुरुचरित्र वर्णन केलें आहे. जें जें वांच्छित असेल, तें तें, ही कथा ऐकली असतां त्वरित साध्य होतें.

“ धनार्थियांसी अक्षय धन । पुत्रपौत्रादि गोधन ।
कथा ऐकतां होय जाण । ज्ञानसिद्धि तात्काळ ॥ ३.१० ॥
जे भक्तीनें सप्तक एक । पठती ऐकती भक्त लोक । ”
काम्य होती तात्काळिक । निपुत्रिकां पुत्र होती ॥ ३.११॥

“ अहो स्वामी, सिद्धमुनि, तुम्हीं जणु काय गुरुमूर्तीचा साक्षात्कार मला दाखविलात. माझ्या मनांतहि श्रीगुरुचरित्र ऐकण्याची इच्छा फार

दिवस होती. एखाद्या वाटसरूला तहान लागली असावी व त्या वेळींच त्याला कोणी अमृत प्यावयाला आणून द्यावें, तसे तुम्ही मला भेटलांत व श्रीगुरुचरित्राचें अमृत बरोबर आणलें आहे म्हणतां, तर मग मला सांगा तें गुरुचरित्र!"

हें ऐकून, नामकरणीला उजव्या हातानें पकडून, ते सिद्धमुनि आपल्या मुक्कामावर घेऊन गेले. एका कल्पवृक्षासारख्या अश्वत्थवृक्षाच्या छायेंत त्यांनीं त्याला बसविलें व श्रीगुरुचरित्र सांगायला सुरुवात केली.

"अरे नामधारका, गुरुमूर्तीची ओळख व्हायला प्रथम आपल्या आचार-विचारांत व मनांत दृढ भक्ति बाणविण्याचा प्रयत्न कर!"

"स्वामि, मी तुमच्या पायां पडतों, पण आतां माझा उद्धार करा! तापत्रयानें मी पोळलों आहें. संसारसागरांत बुडालों आहें. येथें काम-क्रोधादि जलचर मला खात आहेत. तरी, आतां ज्ञाननौकेंत बसवून, आपल्या कृपेचा वारा शिडांत भरून मला तारून न्यावें!"

"ठीक आहे. नामकरणी, ऊठ वर. पूस डोळे. मी तुझें सांकडें फेडीन असें आश्वासन देतों! अरे, अविद्येच्या मायेंत गुरफटून, श्रीगुरु काय देतील असा मनांत संशय धरलास म्हणून तुला इतके कष्ट पडले. तर आतां मनांतला सारा संशय काढून टाक.मेघासारखा सद्गुरुकृपेचा वर्षाव सर्वत्र करतात. यामुळें श्रीगुरूला उपमा द्यायची तरी तेंही कठीण जातें. त्यांना कल्पतरु म्हणावें तर कल्पतरु जें जें मागितलें तें तेंच देतो, परंतु श्रीगुरु तर न मागतांच इच्छा पुऱ्या करणारी दुर्मिळ कामधेनु आहे."

स्वामी, असा तो श्रीगुरु त्रिमूर्ति आहे असें ऐकतों. तरी त्यांनीं मनुष्य-योनींत कां अवतार घेतला हें सर्व सांगितलंत, तर फार आनंद वाटेल."

"नामधारका, मी एवढा प्रवास करीत आलों, परंतु श्रीगुरुचरित्र ऐक-ण्याची इच्छा प्रकट करणारा तूं एकटाच. त्रिमूर्तींनीं कलियुगांत मनुष्यरूप धारण केलें. त्रिमूर्तींचे तीन गुण आतां ऐक. ते आदिवस्तु म्हणून एक

असले तरी प्रपंचवस्तु या दृष्टीनें त्रिविध आहेत. ब्रह्मदेवाचा रजोगुण, विष्णूचा सत्त्वगुण व शंकराचा तमोगुण एकत्र येऊन एक त्रिगुणात्मक मूर्ति तयार झाली. सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय हे तिन्ही गुण त्रिमूर्तींत एकत्र आले. हे तीन देव निरनिराळे नसून, वस्तुतः एकरूपच असले तरी कार्यकारणपरत्वें पृथ्वीवर अवतार घेऊन ते भूभार फेडतात. एकादशी-व्रताचें माहात्म्य टिकवण्याकरितां, अंबरीष ब्राह्मणासाठीं श्रीविष्णूंनीं अवतार घेतल्याचीच गोष्ट उदाहरणादाखल पहा ना !"

• • •

# अंबरीषाची गोष्ट

अंबरीष नांवाचा एक ब्राह्मण होता. तो नित्य श्रद्धापूर्वक एकादशीचें व्रत करी. त्या दिवशीं निर्जल उपवास करी. अभ्यागताचें स्वागत करण्यांत त्याचा नांवलौकिक होता. सदैव हरिचिंतनांत वेळ घालवीत असे तो अंबरीष ब्राह्मण. त्याच्या एकादशीव्रताचा भंग करावा या हेतूनें एकदां दुर्वासमुनि त्याच्याकडे गेले. त्यांनीं त्याची खूप कीर्ति ऐकली होती. साधन-द्वादशी लागावयाला एक घटका असतांना दुर्वास अंबरीषाकडे गेले. त्यांना अर्घ्यपाद्य देऊन, अंबरीषानें त्यांचें यथोचित स्वागत केलें व त्यांना विनंति केली.

"मुनिमहाराज, एका घटकेनें ( सुमारें २४ मिनिटांनीं ) एकादशीचें पारणें फेडण्याची वेळ आहे. त्या वेळीं साधनद्वादशीचा प्रारंभ आहे. तेव्हां आपण तोंपर्यंत नदीवरून स्नानादि उरकून, लवकरच परत यावें म्हणजे मला उपवास वेळेवर सोडतां येईल !"

" ठीक आहे. अंबरीषा, चाललों मी नदीवर स्नानाला ! मी येतोंच एवढ्यांत ! "

असें सांगून, दुर्वासऋषि गेले व नदीतीरावर स्नानानंतर अनुष्ठान करीत बसले. इकडे अंबरीषाला चैन पडेना. त्यानें तर एकादशीचें व्रत घेतलें होतें. त्या व्रताची सांगता, पारणें वेळेवर फेडूनच होतें. आतां तर ती वेळ फार जवळ आली होती. त्याच्या घरीं तर दुर्वासांसारखे मोठे मुनि अतिथि म्हणून आले होते. मग त्यांच्या आधीं अन्नभक्षण कसें करावें हा मोठाच प्रश्न अंबरीषापुढें उभा होता. अतिथीच्या आधीं जेवावें तरी दोष, न जेवावें तर व्रताचा भंग होणार ! अंबरीषानें जेवणाची सर्व तयारी केली. आतां अगदी थोडा वेळ उरला होता. दुर्वासांना एक घटका मुदत दिली होती, त्यांतलीं फक्त कांहीं पळेंच आतां शिल्लक राहिलीं होतीं. जेवायला विविध पक्वान्नें केलीं होतीं. पानें वाढून तयार होतीं. दुर्वास वेळेवर आले नाहींत म्हणून अंबरीषानें विष्णूचा धावा केला व नियमाप्रमाणें पारणें फेडण्याकरितां श्रीविष्णुप्रतिमेचें तीर्थजल प्राशन केलें व दुर्वासांची वाट न पाहतां त्यानें भोजन उरकून घेतलें. तेवढ्यांत दुर्वास परत आले. अंबरीषच्या तोंडाकडे पाहून, ते क्रोधानें लाल होऊन म्हणाले,

" अरे दुष्टा, तूं अतिथीची वाट न पाहतां आधींच भोजन केलेंस ना ? ठीक आहे. भोग आपल्या पापाचें फळ ! तुला अखिल योनींत जन्म घ्यावा लागेल. तोंपर्यंत तुला मुक्ति मिळणार नाहीं ! पुनः एकदां चौऱ्याऐंशीं लक्ष योनींत तूं जन्म घेशील असा मी तुला शाप देतों !"

त्या वेळीं अंबरीषानें शारंगधर विष्णूचें स्मरण केलें. भक्तवत्सल नारायण वैकुंठांतून ताबडतोब तेथें आले. अंबरीषानें श्रीविष्णूंचे पाय धरले. तेव्हां विष्णु दुर्वासाला म्हणाले—

" महामुनि, आपण उगाचच या अंबरीषाला शाप दिलात. मी याचें रक्षण करायला समर्थ आहें. तर आतां एवढें करा कीं,त्याच्या ऐवजीं तो शाप मला लागेल असा उःशाप द्या ! "

" ठीक आहे ! अंबरीषाला मुक्ति मिळेल, परंतु विष्णुदेवा, तुम्हांला मात्र नाना स्थळीं भूमीवर जन्म घ्यावा लागेल.त्यांतहि दहा वेळां तुमचा अवतार प्रसिद्ध रूपानें होईल व इतर अवतार उपावतार म्हणून समजले जातील. तसा तर तूं सर्व जगांत नेहमींच भरून राहिला आहेस, परंतु भूमीवर अनाचार माजला, जुल्म-जबरदस्ती व अधर्माचें प्राबल्य झालें कीं, साधूंचें रक्षण करण्याकरितां व दुष्कृत्यें करणाऱ्यांचा समूळ नाश करण्यासाठीं व धर्माची संस्थापना व्हावी याकरितां, हें पूर्णावतार किंवा अंशावतार होणें जरूरच पडेल !"

" ठीक आहे. दुर्वासऋषि, मी तुमचा हा शाप, माझा भक्त अंबरीष याच्याकारितां स्वीकारतों. सुष्टांचा प्रतिपाळ व दुष्टांवर कोप,हें तर माझें ब्रीद आहे. परंतु अंबरीष व्रतनिष्ठेच्या परीक्षेंत पार पडला यानेंच मला आनंद होत आहे ! "

असें बोलून श्रीविष्णु अंतर्धान पावले व मग दुर्वासऋषींनीं आनंदानें भोजन केलें व अंबरीषाचा निरोप घेतला. मत्स्य, कूर्म वगैरे विष्णूचे प्रसिद्ध दहा अवतार महाभागवतांत विस्तारानें सांगितले आहेत, ते प्रसिद्ध आहेतच, पण त्याशिवाय क्वचित् क्वचित् त्याचे गुप्तपणें जे अवतार होतात ते भक्तांनाच समजतात. आपापल्या गुरूंत त्याचा साक्षात्कार एकनिष्ठ शिष्यांना होतो. इतर मूढमति लोक त्याला मानव समजले तरी त्या दैवी विभूतियुक्त व्यक्ति विष्णूचेच अवतार आहेत हें गुरुपरंपरेंतील व्यक्तीच ओळखूं शकतात. जरी ब्रह्मा, विष्णु व महेश यांनीं वेगवेगळे अवतार घेतले, असें तुला सांगितलें तरी एकदां अशी एक घटना घडली कीं, त्या तिन्ही देवांचा

एकाच वेळीं, एकाच ठिकाणीं पृथ्वीवर जन्म झाला. पतिव्रता अनसूयेची ती गोष्ट आहे.

नामधारकाची उत्सुकता वाढत होती. गुरूंची परम पवित्र कथा ऐकण्याकारितां त्याचे कान तहानलेले होते. त्यानें सिद्धमुनींना विनंति केली,' सिद्धमुनि, मला ती अनसूयेची गोष्ट सविस्तर सांगा !"

●●●

# पतिव्रता सती अनसूया

अत्रिऋषि हे ब्रह्मदेवाच्या सात मानसपुत्रांतले एक ब्रह्मपुत्र होते. त्यांच्या बायकोचें नांव होतें अनसूया. पतिव्रताधर्माचें पालन ती फार काटेकोरपणें करीत असे. आपल्या पतीलाच देव समजून त्याची कायावाचामनें निःस्वार्थीपणें व एकनिष्ठपणें सेवा करणें हें फार अवघड व्रत आहे. अत्रिऋषींची पत्नी रूपानें अत्यंत सुंदर व मनोहर होती. स्वतः चंद्रच जिचा मुलगा ती आई किती स्वरूपवान् असेल त्याची कल्पना करतां यावी अशा त्या अनसूयेच्या पातिव्रत्याची ख्याति भूतलावर पसरली. एवढेंच नव्हे तर स्वर्गापर्यंतहि पोंचली.आपलें स्वर्गाचें ऐश्वर्य असल्या जाज्वल्य उपासनेनें, ही अनसूया हिरावून नेईल या भीतीनें सर्व देव काळजींत पडले. तेव्हां इंद्र वगैरे देवांनीं अनसूयेची ही दिव्य पतिभक्ति ब्रह्मा, विष्णु व महेश या त्रिमूर्तींना जाऊन सांगितली.

अनसूया पतिसेवा करी, तशीच ती अतिथींचें स्वागत मनोभावें करायला कधीं चुकत नसे. कोणताहि याचक अत्रिऋषींच्या झोंपडींतून विमुख

जात नसे.अनसूयेच्या उग्रतपश्चर्येचा परिणाम असा झाला कीं, पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पंचमहाभूतें तिला भिऊन वागूं लागलीं होतीं. तिला उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून,तिला अत्रिऋषींच्या आश्रमाच्या परिसरांत सूर्य आपल्या किरणांची प्रखरता मंद करीत असे. तिला अग्नीची उष्णता शीतल वाटत असे. वारा त्या आश्रमाच्या परिसरांत मंद मंद वाहून, तिला सुख व्हावें असा प्रयत्न करी. पृथ्वी तिच्या पावलांना त्रास होऊं नये म्हणून आपला कठिणपणा सोडून,कापसासारखी मऊ होत असे अनसूयेच्या पायांखालीं ! अशी ती अनसूया, स्वर्गांतलें कोणतें स्थान घेईल याचीच सर्वांना भीति वाटत होती.

ब्रह्मा, विष्णु व महेश हें वर्तमान ऐकून मोठ्या रागानें कांपूं लागले. देवादिकांनाहि राग चुकला नाहीं. क्रोध आला कीं देवाचा सुद्धां दानव होऊं शकतो. त्या तिन्ही देवांनीं अनसूयेच्या पातिव्रत्याचा भंग करावयाचें ठरविलें व इंद्रादि देवांना अभय देऊन व ब्राह्मणाचें रूप घेऊन ते तिथे अत्रिऋषींच्या आश्रमांत गेले. त्या वेळीं अत्रिऋषि अनुष्ठान करायला नदीवर गेले होते. त्या तीन ब्राह्मणांनीं आपण अतिथि आलों आहोंत, असें अनसूयेला सांगितलें. ते तिला म्हणाले,

“आम्हांला फार भूक लागली आहे. तरी अहो बाई,आम्हांला तावडतोब जेवण द्या. आपणाला जमणार नसेल तर तसें सांगा म्हणजे आम्ही दुसरीकडे जातों. तुमच्या आश्रमांत अतिथीला कधीं निराश होऊन जावें लागत नाहीं, तुम्ही इच्छभोजनाचें दान देतां अशी कीर्ति ऐकली व मोठ्या आशेनें आम्ही येथें आलों आहोंत. तर आपला काय विचार आहे ?”

“माझे पति अनुष्ठान आटपून येतील तोंपर्यंत आपण स्नानादिक विधि पुरे करावे म्हणजे तोंपर्यंत आपण सांगाल तसा स्वयंपाक तयार करीन !”

" अत्रिमुनि घरीं परत येईपर्यंत फार वेळ लागेल. तोंपर्यंत थांबणें आम्हांला शक्य होणार नाहीं, आम्हांला फार भूक लागली आहे. जर आपण ताबडतोब जेवण द्यायला तयार नसाल, तर हे चाललों आम्ही दुसरीकडे. तुमची ख्याति ऐकून आलों, पण आज निराश होऊन परत जावें लागणार म्हणायचें ! "

असें बोलून ते तिघे ब्राह्मण दुसरीकडे जावयाला निघालेसुद्धां. तेव्हां अनसूयेनें मनांतल्या मनांत अत्रिऋषींचें ध्यान केलें व कांहीं निश्चय करून ती त्या ब्राह्मणांना म्हणाली,

" अतिथिदेवांनो, थांबा. मी आपली इच्छा पुरी करायला तयार आहें. बसा या आसनांवर. अर्घ्यपाद्य आणेंत लगेच. "

ते तिघेही ब्राह्मण मोठ्या आनंदानें आसनांवर बसले. योग्य तें स्वागत त्यांनीं स्वीकारलें व म्हणाले—" बाई, आमचें स्नान वगैरे विधि आटपूनच आम्ही येथें आलों आहोंत, तरी लगेच जेवणाचीं पानेंच वाढा ! "

" ठीक आहे. लवकरच वाढतें मी तुमचीं पानें. " असें म्हणून अनसूयेनें जेवणाचीं पानें तयार करून आणलीं व अन्नशुद्धि करून अतिथींना जेवावयाला सुरवात करण्याची विनंति केली. तरी ते अतिथि मात्र जेवावयाला प्रारंभच करीत नाहींत हें पाहून, तिनें, ' आपलें कांहीं चुकलें का ? ' असा प्रश्न त्यांना विचारला. तेव्हां अतिथि म्हणाले,

" अहो बाई, आम्ही फार दूरवरून येथें आलों आहोंत. आपल्या स्वरूपाची वाखाणणी फार ऐकली होती, त्याचें प्रात्यक्षिक आज पाहिलें. त्यामुळें आमच्या मनांत आणखी एक इच्छा निर्माण झाली आहे. "

" अतिथिदेवांनो, सांगा तर लवकर. मी आपणांकरिता काय करूं ? आपणांला फार भूक लागली आहे ना ? "

" हे सुंदरि, आम्ही मागूं तें तूं देशील ? "

" आजपर्यंत या घरांतून कोणी अतिथि विन्मुख गेला नाहीं. संकोच न चाळगतां काय हवें तें मागा. "

" हे सुंदरि, तुझ्या या आश्वासनानें आमचा उत्साह वाढला आहे. तर मग आम्हांला तूं विवस्त्र होऊन जेवण वाढावेंस अशी आमची इच्छा आहे. "

ही विचित्र मागणी ऐकून अनसूयेनें मनांत विचार केला, — " हे ब्राह्मण माझी सत्त्वपरीक्षा घ्यायला आलेले दिसतात. माझें मन निर्मळ आहे तर मदनाची काय कथा ? शिवाय माझ्या पतींचें तपोबल मला तारील. "

असा निश्चय करून अतिथींना त्यांची इच्छा पुरी करण्याचें आश्वासन देऊन, तिनें स्वयंपाकघरांत प्रवेश केला. नंतर आपल्या पतीचें मनोभावानें चिंतन केलें व मनांत ' अतिथि हे मला माझ्या बाळांप्रमाणें आहेत ' असा विचार करून ती विवस्त्र होऊन जेवण वाढायला बाहेर आली. तोंच काय आश्चर्य ! तीन ब्राह्मणांऐवजीं तेथें तीन तान्हीं बाळें लोळत होतीं. तीं बाळें रडूं लागलीं. तेव्हां त्यांना पाहून अनसूयेचें वात्सल्य जागृत झालें व स्तनांत दूध आलें. चटकन् तिनें त्या बालकांना छातीशीं धरलें व त्यांना स्तनपान करूं देऊन संतुष्ट केलें. सृष्टिकर्ता ब्रह्मा, कर्पूरगौर पंचमुखी शंकर व जगाचा पालक विष्णु यांची तृप्ति, त्या पतिव्रतेच्या स्तनपानानें झाली. तेवढ्यांत दुपार झाली. माध्यान्हकाळीं अत्रिमुनि अनुष्ठान संपवून घरीं परत आले, तोंच त्यांना अनसूया ओव्या म्हणत, पाळण्याला झोंके देत आहे असें अभिनव दृश्य दिसलें. त्यांनीं घरांत प्रवेश करतांच, त्यांना तीं तीन बाळें दिसतांच आणखीच आश्चर्य वाटलें. त्यांना तर मूल नव्हतें. पातिव्रता अनसूयेनें त्यांना सर्व हकीगत सांगितली. अत्रिमुनींनीं लगेच समाधि लावली व त्यांना अंतर्ज्ञानानें खरा प्रकार लक्षांत आला. त्यांनीं अनसूयेचें अभिनंदन केलें. ब्रह्मा, विष्णु व महेश तिचीं बाळें झालीं

होतीं हा तिचा केवढा गौरव होता ! त्या वेळीं त्या उभयतांसमोर त्रिमूर्ति प्रगट झाले.

अनसूयेनें अपत्यहिनतेचें दु:ख आजवर सोसलें होतें. घरांत मूल नसलें तरी उगाचच पाळणा बांधून ठेवून, ती आपल्या मनानें पुत्रप्राप्तीचीं गोड स्वप्नें पाहात होती. आज एकाऐवजीं तीन बाळांनीं तिचें स्तनपान एकदम केलें होतें.

त्रिमूर्तींनीं प्रसन्न होऊन वर मागायला सांगतांच, अनसूयेनें आपल्या पतीला पुत्रप्राप्तीविषयीं प्रार्थना करायला सांगितलें.अत्रि ऋषीनीं तशी प्रार्थना केली तेव्हां त्या तीन देवांनीं पुन: पाळण्यांत पूर्वींप्रमाणेंच आपलीं शिशु-रूपें ठेवून दिलीं व ते अनसूयेच्या पातिव्रत्याची स्तुति करीत स्वर्गलोकांत परत गेले. तीं तीन बालकें म्हणजे त्या तीन प्रमुख देवांचींच छोटीं रूपें होतीं. ब्रह्मा चंद्र या नांवानें प्रसिद्ध झाला, तर विष्णूचाच अंश दत्त या नांवानें वाढू लागला. शंकरानें दुर्वासरूपानें आपल्या बाललीला त्या पवित्र आश्रमांत चालू केल्या. दुर्वास व चंद्र हे थोडे मोठे झाल्यावर दुर्वास आईला म्हणाले,

" आई, मी तप करण्याकरितां माझ्या निजस्थानीं जातों. मला तर्थियात्रा करावयाच्या आहेत. " तें दुर्वासाचें बोलणें संपतें आहे तोंच चंद्र म्हणाला, " आई, माझें वास्तव्य चंद्रलोकांत होणार आहे. तिथून मी नभो-मंडळांत रात्रीं संचार करतांना तुमच्या चरणांचें दर्शन घेईन ! "

तें त्या दोन्ही मुलांचें बोलणें ऐकून त्यांचा विरह होणार या कल्पनेनें अनसूयेला फार दु:ख झालें व तिनें शोक करावयाला प्रारंभ केला. तेव्हां श्रीदत्त पुढें होऊन आईला म्हणाले,

" आई, तूं कांहीं शोक करूं नकोस. मी तुला अंतर देणार नाहीं. शिवाय माझ्या रूपांत या दोघांचेंहि तुला दर्शन होईल. दोघांना जाण्याची अनुज्ञा दे, अशी मी तुला आग्रहाची विनंति करतों. "

" बाळा, दत्ता, तुझे हे अमृतासारखे मधुर बोल पुनः बोल रे ! तूं माझी जीवनांतील आशा आहेस. तूं सांगतोस म्हणून या दोघांना जाण्याची परवानगी मी देतें, पण तुझें वास्तव्य माझ्या घरीं सदैव असलें पाहिजे ! "

– त्याप्रमाणें श्रीगुरूंनीं मान्य केलें आणि चंद्र व दुर्वास आईवाडिलांचा निरोप घेऊन दूर गेले, पण–

अनसूयेचे घरीं देखा । त्रयमूर्ति राहिली मूर्ति एका ।
नाम दतात्रय ऐका । मूळपीठ श्रीगुरूचें ।। ४.७१

नामधारकाला ही परम पवित्र कथा ऐकून आनंद वाटला. समाधान वाटलें. पण श्रीगुरुचरित्र आणखी ऐकण्याची उत्कंठा वाढली. त्यानें श्रीगुरूच्या दुसऱ्या अवतारांची माहिती सांगा,' अशी सिद्धमुनींना विनंति करितांच ते म्हणाले,

●●●

# जन्मले श्रीपादश्रीवल्लभ

" पीठापूर गांवांत आपळराजा नांवाचा आपस्तंभ शाखेचा एक ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीचें नांव होतें सुमता. अनसूयेसारखीच तीहि आदर्श पतिव्रता होती.अतिथीच्या पूजेंतहि ती कांहीं कमी पडूं देत नसे.त्या दोवां नवराबायकोंचा वेळ धार्मिक आचरण व उपासना करण्यांत आनंदानें जात असे. एकदा आपळराजाकडे अमावास्येला श्राद्ध होतें. त्या वेळीं श्राद्धाकरितां उत्तमोत्तम सुरस स्वयंपाक तयार केला होता. श्राद्धाचे ब्राह्मण जेवावयाचे होते.त्याआधींच अतिथिवेषांत श्रीदत्त त्या ब्राह्मणाच्या घरीं गेले व त्यांनीं

भिक्षा मागितली. त्या वेळीं सुमतेनें श्राद्धाचे ब्राह्मण जेवण्यापूर्वीं, अतिथीला विमुख पाठवावयाचें नाहीं या श्रद्धेनें, श्रीदत्तांना भोजनाची भिक्षा घातली. ती तिची परम श्रद्धा व व्रतानुष्ठान पाहून दत्त प्रसन्न झाले व तिला आपलें त्रयमूर्तींचें रूप दाखविलें. त्या पतिव्रतेनें त्यांचे पाय धरले व प्रार्थना केली. श्रीदत्तात्रेयांनीं तिला इच्छित वर मागायला सांगतांच ती म्हणाली,

" हे जगन्नाथा, माझ्या मनांतील आर्तता पुरी करावी. तुझे बोल कधींच मिथ्या होत नाहींत. ध्रुवाला अढळपद देणारा, बिभीषणाला लंका देऊन राज्यावर स्थापणारा तूंच आहेस, असा माझा विश्वास आहे. आपण माझी इच्छा पुरविणार म्हणतां, तर आपण मला आतां जी ' आई ' म्हणून हांक मारलीत, ती सत्यार्थानें खरी ठरावी हीच माझी इच्छा ! दत्तात्रेया, मला पुष्कळ मुलगे झाले, पण बरेच उपजतांच मेले, व जे दोन वांचले ते आंधळे व पांगळे झाले आहेत. त्यांतला एकहि योग्य नाहीं. सगळे मूर्ख आहेत. तरी मला तुमच्यासारखा ज्ञानी व सर्वगुणसंपन्न मुलगा व्हावा. नाहीं तर माझा जन्म निरर्थक आहे !" "ठीक आहे. तुला असा मुलगा होईल व तो तुमच्या वंशाचा उद्धार करील. तुम्ही त्याच्या मनाप्रमाणें वागा. तो मोठा झाल्यावर नेहमीं तुमच्याजवळ राहणार नाहीं, परंतु तुमचें दैन्य मात्र निश्चित दूर करील ! "

एवढें सांगून तो तापसी अदृश्य झाला. त्या वेळीं तिचे पति घरीं नव्हते. ते परत येतांच तिनें त्यांना सर्व वृत्तान्त सांगितला. त्या उभयतांना फार आनंद झाला. प्राप्त परिस्थितींत अतिथिसेवा फार मोठी करतां आली नाहीं तरी

मध्यान्हसमयीं अतिथिकाळीं । दत्त येताती तये वेळीं ।
विमुख न होतां तये काळीं । भिक्षा मात्र घालिजे ॥ ५·३४

आपळराजा आपल्या पत्नीला म्हणाला, " अग, माहूर करवीर क्षेत्र हें दत्तात्रेयांचें स्थान असून तेथें त्यांचा सदैव वास असतो. पांचाळेश्वर नगरांत

तेच सतत राहतात. तेच दत्तात्रेय, भिक्षुकाचे विविध वेष घेऊन येतात असें मी ऐकलें आहे. तेव्हां आज घातलीस तशीच माझ्या परवानगीची वाट न बघतां, त्यांना तूं भिक्षा घालीत जा. कोणत्या रूपानें देवभेट देईल, हें आधीं कळत नाहीं. तीच तर परीक्षेची वेळ असते. आज तूं त्या परीक्षेंत यश मिळवलेंस. आमच्या वंशाचे चांगले दिवस आतां दूर नाहींत. आज पितरांच्या ऐवजीं, प्रत्यक्ष विष्णुभगवानच जेवून गेले. आपणाला आता खचितच चांगला मुलगा होईल, याची खात्री वाटते. त्या यतीचे बोल खोटे ठरणार नाहींत ! ”

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर त्या यतीचा आशीर्वाद खरा ठरला. सुमतेला दिवस राहिले व शुभ मुहूर्तावर नऊ महिन्यांनीं ती प्रसूत होऊन मुलगा झाला. ‘ हा दीक्षाकर्ता जगद्गुरु होईल ’ असें जातक ब्राह्मणांनीं वर्तविलें. आईवडिलांनीं मोठ्या आनंदानें दत्ताच्या वरदानाप्रमाणें झाला म्हणून त्या मुलाचें नांव श्रीपाद, असें ठेविलें. अशा रीतीनें श्रीपाद त्यांचे घरीं वाढूं लागला. त्याच्या बाळलीला पाहून सुमतेचें मन तृप्त झालें. सात वर्षे पुरीं झाल्यावर श्रीपादाची मुंज विधिपूर्वक मोठ्या थाटानें एका शुभमुहूर्तावर करण्यांत आली. मुंज लागल्यावर ताबडतोब श्रीपादानें चारी वेद, मीमांसा, तर्कशास्त्र विस्तारपूर्वक म्हणून दाखवितांच सगळ्यांनाच मोठें आश्चर्य वाटलें. श्रीपाद आचार, व्यवहार, प्रायश्चित्तें, वेदांतभाष्य अशा सर्व विषयांवर सारख्याच अधिकारवाणीनें बोलत होता. आईवडिलांचें मन आनंदानें मोहरलें. त्यांना धन्य वाटलें. श्रीपाद गांवांतील मुमुक्षूंना ज्ञानदान देऊं लागला. अशीं आणखीं आठ वर्षे गेलीं. श्रीपाद आतां सोळा वर्षांचा झाला होता. त्याचा विवाह करून देण्याचीं सुखस्वप्नें सुमता पाहात होती. एक दिवस तिनें श्रीपादजवळ लग्नाचा विषय काढण्याचें ठरविलें व श्रीपादाला म्हणाली, “बाळ श्रीपाद, आतां तूं मोठा झालास; आतां तुझें लग्न करावें

असा माझा मानस आहे. तर तुझी लग्नाला संमति आहे ना ? माझी इच्छा तूं पुरवशील ना ?"

" आई, मी लग्न करावयाला तयार आहें."

" बाळ श्रीपाद, खरं सांगतोस ना हें ?"

" आई, अग माझं म्हणणं तर पुरें ऐकून घे. मी लग्न करायला तयार आहें व मला एक मुलगी पसंतहि पडली आहे."

" छान ! बाळा श्रीपादा, मला इतके दिवस कळूं सुद्धां दिलें नाहींस ना ? अरे, कोण आहे ती एवढी भाग्यवान् कन्या ?"

" अग आई, वेळ आल्यावर सांगावें, असा मानस होता. आज आतां तूं विचारलेंस म्हणून सांगितलें."

" बाळ, सांग ना लवकर ! माझे कान कसे अधीर झाले आहेत माझ्या सुनबाईचें नांव ऐकावयाला !"

" आई, ऐक तर. पण मी म्हणतों त्या कन्येशीं विवाह करायला तुझी परवानगी आहे, असें आधीं वचन दे !"

" श्रीपादा, किती रे अंत पाहतोस ! हें दिलें वचन. आतां तरी सांग ना !"

" आई, वैराग्यवृत्ति हीच माझी आवडती कन्या. त्या वैराग्यस्त्रीवांचून दुसऱ्या सर्व स्त्रिया मला मातेसमान आहेत. तरी ती सुंदर वैराग्यस्त्री शोधून आणलीस कीं मी तावडतोव तिचें पाणिग्रहण करीन ! योगस्त्रियेवांचून मला दुसरी पत्नी नाहीं. मी ब्रह्मचारी तापसी असून माझें खरें नांव श्रीवल्लभ आहे. तुम्हीं श्रीपाद ठेवलेंत. तरी आतां माझें नांव श्रीपादश्रीवल्लभ म्हणून प्रसिद्ध होईल ! तरी मी उत्तरेकडे तपश्चर्येला जावें म्हणतों."

आपळराजा व सुमता यांना पूर्वीं भेटलेल्या यतीचे बोल आठवले व ही खूण पटली. श्रीपादाच्या सांगण्याप्रमाणें वागण्यांतच भलाई आहे, हें

त्यांनीं ओळखलें. तो अवतारी पुरुष असून केवळ आपणांवर अनुग्रह करण्याकरतां त्यानें आपल्या पोटीं जन्म घेऊन, आपल्यावर अनुग्रह केला असें त्यांनीं आपल्या मनाचें सांत्वन केलें व श्रीपादाला आई म्हणाली—"

"बाळा श्रीपादा, तूं आमचा म्हातारपणीं सांभाळ करशील अशी फार मोठी आशा मनांत होती. पण आता तूं आम्हांला सोडून जाणार यामुळें आमचा जीव कासावीस झाला आहे. तूं गेल्यावर आमचा सांभाळ कोण करील ?" त्यानंतर सुमता तर पुत्रविरहाच्या कल्पनेनें मूर्च्छा येऊन पडली. तिच्या डोळ्यांतून घळघळ आसवांच्या सरी ओघळूं लागल्या. तेव्हां श्रीपाद म्हणाले, "आई, तूं कांहीं चिंता करूं नको !" नंतर त्यांनीं आपल्या दोन अंध व पांगळ्या भावांकडे अमृतदृष्टीनें पाहतांच ते चांगले डोळस झाले. त्यांचा पांगळेपणा संपला, शरीरें शतपट तेजःपुंज झालीं व त्यानंतर श्रीपादयतींनीं तिथून, नारायणाची भेट घेण्याकरतां प्रथम बदरीनाथाकडे प्रयाण केलें. त्यानंतर श्रीपादश्रीवल्लभ तीर्थयात्रा करायला निघाले ते प्रथम गोकर्णक्षेत्रांत गेले.

हें ऐकून नामधारक म्हणाला, "अहो, सिद्धमुनी श्रीगुरूंनीं इतर सर्व क्षेत्रें सोडून प्रथम गोकर्णक्षेत्राला जाणें पसंत केलें, यांत कांहीं तरी रहस्य असलें पाहिजे. आपण कृपा करून तें मला सांगाल का ?"

"नामधारका, त्या क्षेत्राचा व रावणाच्या गोष्टीचा फार जवळचा संबंध आहे."

"रावणाचा या भक्तिकथेंत काय संबंध ?"

"अरे नामधारका, रावण हा मोठा शिवभक्त होता. त्याच्या मोठेपणाची खरी कल्पना तुला नाहीं !"

"सिद्धमुनि, सांगा तर ती रावणाची गोष्ट मला."

"ठीक आहे. ऐक तर मग लक्ष देऊन...."

• • •

# शिवभक्त रावण

फार प्राचीन काळची गोष्ट. पुलस्त्य नांवाचा एक सज्जन ब्राह्मण होता. त्याची बायको शिवभक्त होती. तिचें नांव होतें कैकया. दररोज शिवपूजन केल्याशिवाय ती जेवति नसे. एक दिवस, कैकयेला शिवलिंग पूजनाकरितां देवळांत जातां आलें नाहीं, म्हणून तिनें घरांतच मातीचें शिवलिंग तयार केलें व व्रतभंग होऊं नये म्हणून, त्या मातीच्या लिंगाचीच मोठ्या भक्तीनें पूजा केली. तिला एक मुलगा होता. त्याचें नांव दशशिर रावण. एरव्हीं फार क्रूर असला तरी तो मातृभक्त होता. तो दशशिर आईला भेटावयाला त्याच वेळीं आला असतांना, आपली आई मृत्तिकालिंगाची पूजा करते आहे, हें पाहून त्यानें आईला विचारलें, "

" आई, या मृत्तिकालिंगाची पूजा करून काय मिळतें ? "

" बाळ, यामुळें कैलासांत मोठें मानाचें स्थान मिळतें. "

" मग मी हें व्रत न करतांच, प्रत्यक्ष कैलासासहित श्रीशंकरांनाच येथें आणलें नाहीं, तर रावण हें माझें नांव सोडून देईन. "

आईला असें आश्वासन देऊन रावण मनोवेगानें निघाला व लवकरच कैलासावर पोंचला. त्यानें तो शुभ्र कैलास पर्वत, आपल्या वीस बाहु-भुजांच्या बळानें मोठ्या रागानें हलवायला सुरुवात केली. दहाही डोक्यांनीं आधार देऊन, कैलास पर्वत मुळासकट उपटण्याचा प्रयत्न रावण करीत होता. कैलासपुरांत हाहा:कार माजला. सर्व देव भयभीत झाले व शंकराजवळ गेले. पार्वतीसुद्धां त्या धरणीकंपाच्या धक्क्यानें घाबरली व शंकरांना म्हणाली,

" अहो, तिकडे नगरांत चालला आहे आकांत व आपण बसला आहांत, स्वस्थचित्त ! उठा, कांहीं तरी प्रतिकार करा या धरणीकंपाचा !"

" अग गिरिजे, कांहीं घाबरूं नकोस. हा सगळा,माझा भक्त जो रावण त्याचा प्रेमानें चाललेला खेळ आहे."

" अहो, त्या रावणाचा होईल खेळ व आमची येईल अंतवेळ ! कांहीं तरी लवकरच करा ना."

" ठीक आहे. हा बघ माझ्या डाव्या हातानें हा कैलास पर्वत चेपून धरतों. काय, झाला ना धरणीकंप बंद ?"

" हो; आता नाहीं आपला मठ हालत."

तिकडे कैलासपर्वताच्या पायथ्याशीं रावण दडपला गेला होता. त्यानें मनांतल्या मनांत शंकराचा धांवा सुरू केला.

" हे पिनाकपाणि जगरक्षका, मी तुला शरण आलों आहें. आपल्या भक्ताला तूं मारणार नाहींस, याची मला खात्री आहे. मला या दडपणांतून सोडव !"

रावणाची ती प्रार्थना ऐकून भोळ्या महादेवांना दया आली व त्यांनीं त्याची सुटका केली. तेव्हां रावणानें शंकराची विविध प्रकारें स्तुति केली. आपल्या दहा डोक्यांतील एक डोकें कापलें, त्याला तंबोऱ्यासारखा आकार देऊन व आपल्या आंतड्यांचाच तारेसारखा उपयोग करून सुस्वर गायनानें शंकराचें स्तवन करूं लागला. शरीरांतून भळभळा रक्त वाहत होतें, परंतु त्याची त्याला पर्वा नव्हती. शास्त्रोक्त वेदपठण रावण करीत होता. त्या गायनाबरोबर त्यानें नाचहि केला. वेणुवादन केलें. छत्तीस रागांत गायन केलें. तेव्हां स्वतः पंचमुख, त्रिनेत्रधारी उमारमण त्याच्या त्या स्तुतीनें प्रसन्न झाले व त्याच्या समोर उभे राहून म्हणाले—

" रावणा, मी तुझ्या या अनुपम भक्तिगायनानें संतुष्ट झालों आहें. तर आतां वर माग."

" शिवशंकरा, लक्ष्मी माझ्या घरीं दासी आहे. आठ निधि माझ्या ताब्यांत आहेत. चतुर्मुख ब्रह्मदेव माझा जोशी असून, तेहतीस कोटि देव

माझी रात्रंदिवस सेवा करतात. इंद्रजितासारखा मुलगा, कुंभकर्णासारखा भाऊ, समुद्रांतील अजिंक्य लंकेचें राज्य, इच्छा पुरविणारी कामधेनु व एक हजार कोटि वर्षांचें आयुष्य हें सर्व माझ्याजवळ असतांना तुमच्याजवळ काय मागूं ? माझी आई तुमची पूजा करते. आज तिला मृत्तिकालिंगाची पूजा करतांना पाहून मला राग आला व मी कैलासासकट प्रत्यक्ष तुम्हांलाच आईच्या पूजेकरितां घेऊन जावें, म्हणून आलों आहें. ''

" रावणा, असें असेल तर कैलास पर्वत नेण्याची जरूर काय ? मी माझें आत्मलिंगच तुला देतों. तें तूं घेऊन जा ! या लिंगाची १०८ दां जप करून, दरदिवस तीन वेळ भक्तिपूर्वक पूजा करणाऱ्याचे प्रत्येक मनोरथ पूर्ण होतील, पण रावणा, हें माझें आत्मलिंग लंकेंत नेतांना, वाटेंत कुठें जमिनीवर ठेवूं नको. तीन वर्षें याची पूजा केलीस कीं तूं स्वतःच ईश्वर होशील. ''

रावणानें शंकराला वंदन केलें व त्याचें आत्मालिंग घेऊन तो लंकेकडे निघाला. ही बातमी नारदांनीं इंद्राला जाऊन सांगितली व म्हणाले " नारायण ! नारायण ! इंद्रराजा, आतां रावण तीन वर्षांत स्वतःच ईश्वर होणार ! मग देवांना कायमचेंच दास्य पतकरावें लागणार तर ! तुम्ही देवांची सुटका आतां कशी कराल ? उर्वशी, रंभा वगैरे अप्सरा घेऊन आपण आतां रावणाच्या सेवेला जावें हें बरें. ''

इंद्राला हें ऐकून भीति वाटली व नारदांच्या सांगण्याप्रमाणें तो ब्रह्मदेवाकडे त्यावर उपाय विचारावयाला गेला. तेव्हां ब्रह्मदेवानें विष्णूचें नांव सुचविलें. नारद, इंद्र व ब्रह्मदेव वैकुंठाला गेले व विष्णूला सर्व प्रकार त्यांनीं सांगितला. तेव्हा नारायण त्या सर्वांना घेऊन शंकराकडे गेले व त्यांना म्हणाले,'महादेवा, आपलें प्राणलिंग रावणाला द्यावयाची काय जरूर होती ? रावण आधींच महाक्रूर दैत्य. इतर देव त्यानें तुरुंगांत ठेवलेच आहेत

आणि आतां तीन वर्षें तुमच्या प्राणलिंगाची पूजा करून तो देवत्व पावला म्हणजे आपणां सर्वांचा कायमचाच निकाल लागला ! "

" विष्णु नारायणा, अरे, त्या रावणाच्या भक्तीनें या गोष्टीचा मला विसर पडला व मोठ्या संतोषानें मी त्याला माझें प्राणलिंग दिलें. त्यानें आपलें डोकें कापून त्याचा तंबोरा बनविला, आंतडीं फाडून त्यांच्या तारा लावल्या व वेदशास्त्रोक्त गायन केलें ! केवढी निस्सीम भक्ति ! केवढें आत्मबलिदान ! अरे,त्या वेळीं त्याच्या त्या गायनानें मी इतका खूष झालों होतों कीं विचारूं नको, त्या वेळीं पार्वती मागता, तरी मी ती त्याला देऊन टाकली असती ! "

" छान ! तुम्ही असे भक्तीला भुलून पडतां आणि असले भलभलते वर रावणासारख्या दुष्टांना देतां म्हणूनच, मला देवामानवांच्या रक्षणाकरतां अवतार घ्यावे लागतात ! तुम्ही करायचें व मी निस्तरावयाचें, असा संकेतच ठरून गेला आहे. प्राणलिंग रावणाला दिलेंत त्याला किती वेळ झाला तें तरी कृपा करून सांगा. "

" विष्णु भगवन् , रावणाला मीं प्राणलिंग दिलें त्याला आतां पांच घटि एवढा वेळ झाला आहे. शंकराचें हें उत्तर ऐकून, श्रीविष्णूनें आपलें सुदर्शनचक्र बोलाविलें व त्याला सांगितलें, " हें पहा सुदर्शना, रावण शंकराचें प्राणलिंग घेऊन लंकेकडे चालला आहे. सूर्यास्ताला वेळ असला तरी, आज तूं स्वत: आपल्या पाठीं सूर्य झांकून टाकून, तात्पुरता सूर्यास्त झाल्याचा भास निर्माण कर. "

" विष्णुदेवा,पण असं करून काय फायदा ? "

" अरे सुदर्शनचक्रा, रावण मोठा धार्मिक व कर्मठ ब्राह्मण आहे. तो सायंसंध्या केल्याशिवाय, कुठेंहि असला तरी पुढें जाणार नाहीं. तूं आतां लवकर नीघ व सूर्याला झांकून टाक. मग काय होतें, तें कळेलच तुला आपोआप. "

विष्णूचें व सुदर्शनचक्राचें हें संभाषण ऐकून, नारदमुनि तावडतोब रावणाकडे गेले. रावण झपाट्यानें लंकेकडे जात होता. इकडे विष्णूंनीं रावणाच्या मार्गांत विघ्न आणण्याकरितां, गणेशाला पाठवावयाचें ठरविलें. ते गणेशाला म्हणाले—

" अरे गजानना, तुझ्या नकळत शंकरांचें प्राणलिंग रावण घेऊन चालला आहे. तर तूं आतां एका ठेंगू बाळाचें रूप घे व रावण लंकेकडे चालला आहे त्या मार्गांत वा त्याच्या मागोमाग जा. वाटेंत सूर्यास्त होईल तेव्हां रावण संध्या करण्यासाठीं थांबेल. त्याला वाटेंत थांबवायला नारदमुनींना पाठविलें आहेच. शंकराची रावणाला अशी आज्ञा आहे कीं वाटेंत तें प्राणलिंग जमिनीवर ठेवतां कामा नये. तें प्राणलिंग संध्येंतील आचमनाचे वेळीं स्वत:जवळ ठेवणें,रावण उचित समजणार नाहीं. अशा वेळीं त्याचा विश्वास संपादन करून, तूं बाळवेषानें तें लिंग हस्तगत करा व रावण संध्या करावयाला जातांना तें तुझ्याजवळ ठेवून गेला कीं, तूं तें जमिनीवर ठेव. म्हणजे लिंग तेथेंच राहील व रावणाला दिलेला वर खरा ठरणार नाहीं. "

" विष्णुदेवा, मी. जाईन, पण एका अटीवर. "

" सांग लवकर. काय ती अट ? "

" मला खायला द्या आधीं वाटेंत कांहीं तरी ."

" काय देऊं ? "

" लाडू, तिळवड्या, ऊस, खोबरें, डाळिंब, साखर, तूप, दूध, आधीं आत्ता खायला द्या. वाटेंत खायला, भिजविलेले चणे, तांदुळाच्या लाह्या व साखर एवढें दिलेंत कीं पुरे ! "

" ठीक आहे; हें सर्व मान्य आहे. ह्या सर्व गोष्टींची व्यवस्था करतों लवकरच, पण काम फत्ते झालें पाहिजे हं ! "

त्याप्रमाणें उत्तम फराळ करून व चणे खात, ब्रह्मचाऱ्याचें रूप घेऊन गजानन रावणाकडे निघाले. तिकडे नारदांनीं रावणाला बोलण्यांत गुंतविलें होतेंच.

" काय रावणा, कुठून आलांत ? '

" अहो नारदमुनि, कैलासाहून आलों आज मी बेहद्द खुश आहें. "

" असें झालें तरी काय ? "

" मी आज शिवशंकरांना तपोबलानें जिंकलें व हें पहा त्यांचें प्राण-लिंग घेऊन चाललों आहें.आतां तीन वर्षें याची पूजा केली कीं, मी स्वतःच ईश्वर होईन असा वरहि शंकरांनीं मला दिला आहे. "

" रावणा, पण तें लिंग मला दाखव, मी आधीं पाहतों त्यांत कांहीं लबाडी नाहीं ना. "

रावणानें दुरूनच तें प्राणलिंग नारदांना दाखविलें तेव्हां नारद म्हणाले,

" रावणा, जरा थांबू या का ? या समोरच्या झाडाच्या थंडगार साव-लींत बसून मग मी तुला या प्राणलिंगाची उत्पत्ति, त्याचें महत्त्व वगैरे माहिती सांगेन. "

" ठीक आहे. परंतु थोडक्यांत सांगा. मला लवकर लंकेला जावयाचें आहे. "

अशा रीतीनें रावणाला विलंब करून, नारद त्याला म्हणाले, " अरे रावणा, सूर्यास्त झालासा वाटतो. तूं सहस्रवेद वाचतोस. तुला मी काय सांगणार ? पण मला वाटतें तूं घरीं पोंचेपर्यंत संध्येची वेळ टळून जाईल. तुझें काय तें तूं ठरव. मी आपला जवळच्या नदीकाठीं जाऊन संध्यावंदन करीन म्हणतों. ठीक आहे. नारायण ! नारायण ! "

एवढ्यांत ब्राह्मणबटूचें रूप घेतलेला गणेश, रावणाला समोरून येतांना दिसला. आपल्या त्रिकाळ संध्या करण्याच्या व्रताचा भंग होईल ही नार-दानें दाखविलेली भीति त्याला भेडसावीत होती. पण ईश्वराचें प्राणलिंग

जमिनीवर न ठेवतां संध्या कशी करावी हा बिकट प्रश्न होता. तेवढ्यांत नदीतीरावर समिधा तोडणारा तो बटु रावणानें पाहिला व त्याच्या हातांत लिंग धरायला द्यावें, संध्या उरकावी व मग स्वस्थ चित्तानें लंकेला जावें, असा विचार करून रावण त्या बटूकडे जाऊं लागला, तों त्या बटूनें भिण्याचें सोंग केलें व दूर पळून जाऊं लागला. तेव्हां रावणानें त्याला अभय दिलें व विचारलें,

" बाळ, तूं कोण ? तुझ्या आईवडिलांचें नांव काय ? कुठल्या कुळांत जन्मलास ? "

" कोण रे तूं ? माझ्या वडिलांनीं तुझें काय चार चव्वल देणें तर नाहीं ना ? त्यांचा तपास तुला काय करायचा ?"

" असा रागवूं नको बाळ. मी सात्त्विक मनानें तुला हें विचारतों आहें. कारण तुझ्याजवळ माझें एक काम आहे. "

" अहो, माझे वडील जटाधारी बैरागी आहेत. ते सर्वांगाला राख फांसतात. रुद्राक्षाच्या माळा गळ्यांत घालतात. भिक्षा मागणें हा त्यांचा धंदा ! ते बैलावर बसून प्रवास करतात व माझी आई उमेसारखी जगन्माता आहे. हं चला. सोडा आतां माझा हात. मला एवढें सगळें कां विचारतां आपण ? मला तर तुमची भीतिच वाटूं लागली आहे. "

" अरे बाळा, तूं कोणाचा मुलगा वगैरे माहिती केवळ स्नेहभावानें विचारली. तुझे वडील बैरागी दरिद्री आहेत, असें तूंच सांगितलेंस. ते घरोघर भिक्षा मागतात. मग तुला ते काय सुख देत असतील याची कल्पना करतां येते. याउलट तूं माझ्या लंकापुरीला आलास व माझ्याबरोबर राहिलास तर तुझें जन्माचें दारिद्र्य फिटेल. अरे, लंकेचा राजा रावण म्हणतात तो मीच आहें. तूं मागशील तें तें देईन. तर मग झाली ना आतां खात्री ? आतां येणार ना माझ्याबरोबर ? "

अनुक्रम... वि: ...
... नों दि ... ३३

" अहो रावणमहाराज, तुमच्या त्या लंकेंत पुष्कळ राक्षशिणी आहेत असें ऐकतों. मी तर अरण्यांत राहणारा छोटा बालक. त्या राक्षशिणी तुमच्या नकळतां मला खाऊन टाकतील. मी नाहीं रे बाबा तुमच्या लंकेला येणार. सोडा मला, जाऊं दे मला माझ्या घरीं. फार भूक लागली आहे म्हणून ही भातुकली खातों आहें. "

" बरें, तूं जा आपल्या घरीं, पण मी संध्या करतों तोंपर्यंत ही एक वस्तु हातांत धरून ठेवतोस का ? माझें काम केलेंस तर मोठें बक्षीस देईन तुला मी. "

" महाराज, तुमची ती वस्तु जड असेल तर मला पेलणार नाहीं. तरी उगाचिच मला नका गळ घालूं. "

" अरे बाळा, ही वस्तु अगदीं हलकी आहे. तुला सहज पेलेल. पण एक लक्षांत ठेव. मी येईपर्यंत ही वस्तु जमिनीवर ठेवायची नाहीं. "

" बरं आहे बुवा. आपण तितकीच गळ घालतां तर आणा ती वस्तु. पण आपणाहि एक गोष्ट लक्षांत ठेवा. मी येथें ही वस्तु हातांत धेऊन तुमची वाट पाहीन, पण बराच वेळ लागला तर तीन हांका मारीन. त्या तीन हांका मारूनहि तुम्हीं आला नाहींत, तर मी ही वस्तु जमिनीवर ठेवून घरीं जाईन. आधींच मला उशीर झाला आहे. "

" ठीक आहे. मी येतोंच लवकर संध्या आटपून. घे ही वस्तु माझ्या-जवळची. जप हं तिला. "

असें म्हणून रावणानें शिवलिंग गणेशाच्या हातांत दिलें व आपण संध्या करायला समुद्रतीरावर बसला. त्यानें संध्या करायला सुरुवात केली. तो वरुणाला अर्घ्य देत असतांना, गणेशानें पहिली हांक मारली. रावण मोठा कर्मठ ब्राह्मण होता. तो विधिपूर्वक अर्घ्यदान करीत. असे. संध्या करतांना बोलूं नये असा तर त्याचा नियम होता. त्यामुळें त्यानें हातानें खुण

करूनच गणेशाला लवकर येतों असं सांगितलें.क्षणभर वाट पाहून गणेशानें आणखी दोनदां रावणाला बोलाविलें;पण रावण ध्यानस्थ होऊन गायत्रीमंत्र जपत होता. त्यामुळें तो येऊं शकला नाहीं. याचा फायदा घेऊन गणेशानें शिवलिंग जमिनीवर ठेवलें.तेव्हां देवांनीं पुष्पवृष्टि करून आकाशांतून आपला आनंद प्रकट केला. इकडे संध्या आटपून रावण परत आला.लिंग जमिनीवर ठेवलेलें त्याला दिसलें. त्याला फार दु:ख झालें. तो बालक जवळच उभा होता. त्यानें असा विश्वासघात केला म्हणून आवेशानें रावण त्या गणेशाला ठोसे मारूं लागला. तेव्हां गणेशानें रडावयाचें सोंग केलें व भूमीवर लोळण मारीत म्हणाला, " मला मारलंत काय ? आतां माझ्या वडिलांना तुमचें नांव सांगतों. मी तीनदां तुम्हांला हांका मारल्या; पण तुम्हीं आलां नाहींत. अखेर कंटाळून मीं ही वस्तु खालीं ठेवली. तरी मी मला हें जमणार नाहीं असें सांगत होतों, तर तुम्हींच मला आग्रह केलात. मी तुमचं ऐकलं त्याचं असं फळ काय ? छान बक्षीस दिलंत मला ! " असं म्हणत गणेशजी धांवत तिथून निघून गेले. इकडे, रावण तें शिवलिंग जमिनींतून उपटून घेण्याचा प्रयत्न करूं लागला. त्यानें आपलें सर्व बळ पणाला लावलें. तरी त्या महाबळीला त्या महादेवाचें लिंग भूमींतून वर ओढून काढतां येईना. त्यानें आपलें डोकें त्याच्यावर आपटून घेतलें व अखेर पुन्हा एकदां जोराचा प्रयत्न केला. तर तें लिंग चेपटलें गेलें. त्याला गाईच्या कानाचा आकार आला. त्यामुळेंच पुढें या लिंगाचें गोकर्णमहाबळेश्वर असें नांव झालें. शिवलिंग उकरून काढतां येत नाहीं हें पाहून रावण निराश होऊन पुन: एकदां घोर तपश्चर्या करावयाला निघून गेला. अशी ही गोकर्णमहाबळेश्वराची पवित्र कथा स्कंदपुराणांत सांगितली आहे. या गोकर्णक्षेत्राचा महिमा फार मोठा आहे. त्याबद्दल अनेक सुंदर कथा पुढें प्रसिद्ध झाल्या.

• • •

# मित्रसहराजाची गोष्ट

इक्ष्वाकुवंशांत मित्रसह नांवाचा एक राजा होऊन गेला. तो सर्व शास्त्रांत निपुण व परम धार्मिक होता. एकदां मनोरंजन व्हावें म्हणून तो शिकारीला गेला. शिकारीच्या नादांत एका मोठ्या निर्मनुष्य अरण्यांत प्रवेश केल्यावर त्याला एक भयंकर राक्षस दिसला. त्याला पाहतांच राजानें त्याच्यावर बाणांचा पाऊस पाडला. तेव्हां तो राक्षस जमिनीवर कोसळला. त्या राक्षसाचा भाऊ जवळच होता. त्यानें आपल्या भावाची ती विकल अवस्था पाहून खूप आक्रोश केला. मरतां मरतां तो राक्षस आपल्या भावाला म्हणाला, " अरे, रडत काय बसलाहेस ? तुला खरोखरच वाईट वाटलं असेल तर माझ्या मरणाचा सूड घे म्हणजे माझा आत्मा संतुष्ट होईल. "

" ठीक आहे दादा, मी तुम्हांला वचन देतों कीं, तुमच्या मृत्यूचा सूड जरूर घेईन. "

त्यानंतर तो राक्षस मरण पावल्यानंतर त्याच्या भावानें एका गरीब नोकराचें सोंग घेतलें व तो मित्रसह राजा शिकारीला पुढें गेला होता त्या जागेच्या आसपास उभा राहून आपला परिचय त्याला करून देण्याच्या संधीची वाट पहात उभा राहिला.

शिकार करतांना थकल्यावर मित्रसहराजा विश्रांति घेण्याकरितां एका झाडाखालीं बसला असतांना मृत राक्षसाचा भाऊ फळें व पाणी घेऊन पुढें झाला व त्यानें आतिथ्याचा स्वीकार करण्याची राजाला विनंति केली. राजानें त्याला तूं कोण, कुठला वगैरे विचारतांच, तो म्हणाला, " महाराज, मी या रानांतच राहतों. मी फार गरीब असून कांहीं कामधंदा मिळाला तर बघतों आहें. आपण आपल्या सेवेंत मला घेतलंत तर फार उपकार होतील आपले. "

" ठीक आहे. नेमलं आम्हीं तुला आजपासून आमच्या खास सेवेसाठीं परिचारक म्हणून. "

" महाराज, तर मग माझ्या गरिबाच्या झोंपडींत एक-दोन दिवस राहण्याची कृपा करावी व थोडे दिवस शिकार करून मग नगरांत परत जावें अशी मी विनंति करतों."

" अरे वा ! तूं तर आतिथ्यही उत्तम करूं जाणतोस ! ठीक आहे. राहूं आपण तुझ्या झोपडींत कांहीं दिवस. वनांतील हा भाग मला फार आवडला आहे. "

अशा रीतीनें त्या राक्षसानें मित्रसहराजाचा विश्वास संपादन केला व त्याला राजानें आपल्याबरोबर राजधानींत नेलें व त्या नव्या सेवकाची एकनिष्ठता पाहून फार संतुष्ट झाला. असें चाललें असतां एक दिवस राजाच्या वडिलांचें श्राद्ध होतें. वसिष्ठादि मुनींना श्राद्धाला बोलाविलें होतें. म्हणून राजानें त्या नव्या विश्वासू नोकराला स्वयंपाकघरावर देखरेख ठेवायला सांगून काय लागेल त्या वस्तु आणून देऊन, जेवणांत कांहीं न्यून राहू देऊं नको असें सांगितलें. राक्षस अशा संधीची वाटच बघत होता.

त्यानें नरमांस आणून तें शिजवून घेतलें व ऋषींचीं पानें वाढून ते जेवायला बसतांच, प्रथम तें नरमांसच वाढायला नेलें. वसिष्ठांनीं तें पाहतांच राजाला शाप दिला—

" अरे नीचा मित्रसहा, तूं आम्हांला श्राद्धान्नांत नरमांस वाढून आमचा अपमान केला आहेस. या कर्माचें फळ म्हणून तूं ब्रह्मराक्षस होशील. "

" वसिष्ठमुनि, आपण क्रोध आवरावा. मला हें दुष्ट कृत्य कोणीं केलें हें माहीत नाहीं. मी बुद्धिपुरस्सर असलें काम करीन असें आपणांला वाटतें का ? आपण मला वृथा शाप दिलात. तर मग माझीही कांहीं पुण्याई असेल तर—" असें म्हणून वसिष्ठाला उलट शाप देण्याकरितां

राजानें आपल्या ओंजळींत पाणी घेतलें तोंच त्याची राणी मदयंती चटकन् पुढें होऊन म्हणाली, "

" महाराज, आपण गुरूला शापलेंत तर फार मोठा दोष लागेल. या उलट त्यांचे पाय धराल तर भवसागरहि तरून जाल. "

आपली पत्नी सती मदयंतीचा उपदेश राजाला एकदम मान्य झाला व त्यानें शाप देण्याकरितां मंत्रलेलें पाणी आपल्या स्वतःच्याच पायांवर टाकलें व त्याचा परिणाम म्हणजे त्याच्या पायांवर तावडतोब काळेनिळे डाग पडले व वसिष्ठमुनींच्या शापाप्रमाणें तो ब्रह्मराक्षस झाला. त्याला कल्माषपाद असें नांव पडलें. राणी मदयंतीनें वसिष्ठमुनींचे पाय धरले व उःशाप मागितला. तेव्हां त्यांना दया आली, व ते म्हणाले,—" राजा, तूं बारा वर्षांनीं पुन्हां पूर्ववत् होशील. जा आतां, रानावनांत जाऊन हें शापित आयुष्य घालव. त्यानंतर वसिष्ठमुनि निघून गेले. राजा म्हणजेच ब्रह्मराक्षस कल्माषपाद हाहि वनांत निघून गेला. इकडे राजवाड्यांत राहून मदयंती आपल्या पतीचा उद्धार लवकर व्हावा म्हणून परमेश्वराची उपासना करूं लागली.

कल्माषपाद आतां दररोज नरमांस खात असे. वाटसरूंना पकडून त्यांना ठार मारून खायचें असा त्याचा क्रम होता.

अशा रीतीनें दिवस जात असतांना, एक दिवस तो कल्माषपाद होता त्या अरण्यांतून एक वृद्ध ब्राह्मण व त्याची पत्नी अशीं दोघें प्रवास करीत असतांना, त्या ब्रह्मराक्षसाच्या तावडींत सांपडलीं. राक्षसानें आपल्या नवऱ्याला पकडतांच ती वृद्ध ब्राह्मणस्त्रीसुद्धां त्याच्याबरोबर गेली व आपल्याला खाऊन नवऱ्याला जिवंत सोडावें, अशी तिनें त्या ब्रह्मराक्षसाची परोपरीनें विनवणी केली. त्या कल्माषपादानें तिचें कांहीं एक न ऐकतां त्या म्हाताऱ्या ब्राह्मणाला अतिशय निर्दयपणानें तिच्या देखत ठार मारलें. तेव्हां त्या वृद्ध स्त्रीनें त्याला शाप दिला.

" अरे ब्रह्मराक्षसा, पूर्वी तूं राजा होतास. ऋषीच्या शापामुळें तुझी ही अवस्था झाली. पूर्ण बारा वर्षांनीं तुला पूर्व स्थिति प्राप्त होणार आहे, त्या वेळीं माझा शाप तुला बाधेल. तूं माझ्या पतीला ठार मारिलेंस म्हणून तूंहि पुन: राजा होऊन आपल्या राणीबरोबर विहार करूं लागलास, रममाण होऊं लागलास, कीं तुझा प्राण जाईल व तुझ्या पत्नीला वैधव्याच्या यातना भोगाव्या लागतील. "

ब्रह्मराक्षसाला असा शाप देऊन त्या ब्राह्मणाच्या स्त्रीनें आपल्या पतीची चिता पेटविली व सहगमन करून तिनें आपल्या जीविताचा अंत करून घेतला.

कल्माषपाद या रूपांत बारा वर्षें काढल्यावर शापमुक्त झाला व पुन: त्याचें शरीर पूर्ववत् तेज:पुंज झालें. मित्रसहराजा या प्रकारें शापमुक्त झाल्यावर राजधानीला परतलेला पाहून राणी मदयंतीला फार आनंद झाला, परंतु त्या वृद्ध ब्राह्मणीचा शाप राजानें तिला सांगतांच, तिला फार दु:ख झालें. मदयंतीला अद्याप मूलबाळ झालें नव्हतें. त्यामुळें पत्नीशीं संग केला तर आपला मृत्यु ओढवेल हा शाप त्याला आधिकच जिव्हारीं लागला. मंत्री व पुरोहित यांना एकत्र बोलावून त्या शापापातून मुक्त होण्याचा उपाय कोणाला माहीत आहे का याचा राजानें तपास केला. तेव्हां सर्व तीर्थयात्रा केल्यास तो शाप बाधणार नाहीं, असें सर्वांचें मत पडलें.

त्याप्रमाणें मित्रसहराजा तीर्थयात्रा करायला निघाला. त्यानें पुष्कळ पुण्यस्थानांना भेटी दिल्या, ब्राह्मणांना अन्नदान केलें, विविध यज्ञ केले. अशा अनेक तीर्थयात्रा करूनहि ब्रह्महत्येचें पातक अजून राजाचा पाठपुरावा करीत होतेंच. असाच हिंडत असतांना तो मित्रसहराजा मिथिलानगरींत गेला. नगराबाहेरील एका झाडाखालीं तो थकूनभागून बसला असतांना दैवयोगानें गौतमऋषि त्या ठिकाणीं आले. मित्रसहराजानें त्यांना साष्टांग नमस्कार घातला. त्याची सर्व हकीगत कळतांच त्याला गौतमऋषि

म्हणाले, " राजा, भिऊं नको. मृत्युंजय शंकर तुझें रक्षण करील. तुझें महापातक फेडावयाला तूं गोकर्णक्षेत्रांत जा. त्या ठिकाणीं मृत्युंजय सदाशिवाचें पवित्र वास्तव्य आहे. अंधार घालवायला अग्नि, चंद्र किंवा दिवा समर्थ असले तरी सूर्यप्रकाशावांचून गति नाहीं, तसेंच इतर तीर्थांना जाऊनहि या गोकर्णक्षेत्रावांचून गति नाहीं. त्या ठिकाणीं स्वर्गलोकच भूतलावर महादेवाची सेवा करायला अवतरला आहे.

रावण-कुंभकर्ण वगैरेंना त्याच ठिकाणीं वर मिळाले. त्या महाबळेश्वर-लिंगाची पूजा सर्वजणच मनोभावें करतात.

कृतयुगीं महाबळेश्वर श्वेत । त्रेतायुगीं दिसे लोहित ।
द्वापरीं सुवर्णपीत । कलियुगीं कृष्णवर्ण जाहला ।। ( ७–१०१ )

पश्चिम समुद्राच्या तीरावरील हें महादेवाचें लिंग फार प्रभावी आहे. त्याची पूजा केली असतां ब्रह्महत्यादि महापातकें जातात. "

" माझ्या मनांत फार मोठें कुतूहल निर्माण झालें आहे. तरी याच्या माहात्म्याचा अनुभव पूर्वीं कोणाला आला होता, तें मला सांगावें अशी या दासाची विनंति आहे. " असें राजा म्हणाला.

" राजा, अरे त्या गोकर्णक्षेत्राचें माहात्म्य मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. एकदां मी तीर्थयात्रेला गेलों असतांना, माध्यान्हकाळीं एका वृक्षाच्या सावलींत बसलों होतों. तेव्हां मला दुरून तिकडेच येत असलेली एक म्हातारी आंधळी चांडाळीण दिसली.

● ● ●

# सौदामिनीचा उद्धार

त्या चांडाळणीला महारोग झाला होता. विवस्त्र स्थितींत रोगजर्जर होऊन ती हिंडत होती. अशी ती विधवा चांडाळीण, मी बसलों होतों त्या झाडाजवळ आली. तिचा देह कांपत होता. ती एकाएकीं जमिनीवर पडली व तिनें प्राण सोडले. त्याच वेळीं आकाशांतून एक स्वर्गीय विमान खालीं आलें व त्यांतून शिवदूत बाहेर पडले. ते त्या चांडाळणीला नेऊं लागले. तेव्हा आश्चर्य वाटून मी त्यांना विचारलें—

"काय रे शिवदूतांनो, त्या पापी चांडाळणीला विमानांत बसवून नेणें म्हणजे एखाद्या कुत्रीला सिंहासनावर बसविण्यासारखें आहे. हिला शिवाचें ज्ञान नाहीं. ही तर कांहीं तप किंवा उपासना करीत नसे. मग अशा या पापिणीला आपण कैलासांत घेऊन जावयाला आलांत हें कमें काय ?" तेव्हां माझी जिज्ञासा पाहून ते शिवदूत सांगूं लागले,

"अहो गौतमऋषि, पूर्वी सौदामिनी नांवाची एक ब्राह्मणकन्या होती. ती दिसायला फार सुंदर होती. ती जसजशी वाढूं लागली तसतशी तिच्या आईवडिलांना तिच्या अनुरूप वर शोधून काढण्याची काळजी पडली. अखेर एका चांगल्या ब्राह्मणाशीं, दहाव्या वर्षींच त्यांनीं तिचें लग्न लावून दिलें.

लग्नानंतर कांहीं दिवस ती आपल्या नवऱ्याबरोबर नांदली, परंतु पुढें दुर्दैवानें तिचा नवरा मृत्युमुखीं पडला. तेव्हां आईवडिलांनीं तिला माहेरीं नेलें. सौदामिनीची मोठी व्याकूळ व दयनीय अवस्था झाली. बालवयांत वैधव्य आलें होतें, परंतु यौवनाचा जोर प्रबळ होता. तिच्या मनाला हरघडी परपुरुषाच्या दर्शनानें मोह पडत असे. एकदां ती त्या मोहाला बळी पडली. तिनें जरी अगदीं गुप्तपणें तें कृत्य केलें होतें तरी पाप कधीं

दडून राहात नाहीं. तें कधीं ना कधीं बाहेर पडतेंच. बालविधवा सौदामिनीचें पाऊल वांकडें पडल्याची बातमी सर्व लोकांना समजली. आईवडील व नातेवाइकांनीं तिची निर्भर्त्सना केली. आपण प्रायश्चित्त घेऊन मोकळे झाले व तिला वाळींत टाकलें. तेव्हां ती उघडपणेंच व्यभिचार करूं लागली. त्या गांवांत एक अतिशय सुस्वरूप असा वाणी होता. सौदामिनी त्याला आवडली व तिच्याही तो मनांत भरला. म्हणून ती त्याच्या घरीं राहूं लागली. अशा आपल्या पापी आचरणानें तिनें आपल्या बेचाळीस पिढ्यांची अपकीर्ति केली. याविषयीं असा एक श्लोक आहे—

स्त्रिय: कामेन नश्यन्ति । ब्राह्मणा हीनसेवया ।
राजानो ब्रह्मदंडेन । यतयो भोगसंग्रहात् ॥ ( ७–५९ )

अशा रीतीनें ती त्या वाण्याच्या घरीं राहात असतांना तिला एक मुलगा झाला. ती रोज मांसाहार करी. मद्यपान करून दिवसभर धुंद राही. त्या वाण्याची एक सुंदर गाय होती. ती नुकतीच व्याली होती. तिचें गोजिरवाणें वासरूं दारांतच बांधलेलें होतें. एक दिवस दारूच्या धुंदींत असतांना त्या सौदामिनीनें बोकड समजून त्या चिमुकल्या वासरालाच ठार मारलें व त्याचें डोकें दुसऱ्या दिवशीं खाण्याकरितां शिंक्यांत टांगून ठेवून बाकीचें मांस शिजविलें. संध्याकाळीं जेवायच्या आधीं ती गाईचें दूध काढायला गेली असतांना तिला सर्व प्रकार समजला. तिची धुंदी उतरली व बोकडाऐवजीं आपण वांसरूं मारलें आहे हें तिच्या लक्षांत आलें व तिला फार पश्चात्ताप झाला. नकळत आपल्या हातून हें पापकर्म घडलें अशी तिनें चंद्रमौळी शंकराची प्रार्थना केली व घरांत जाऊन वांसराचें डोकें शिक्यांतून काढून घेऊन दूर फेकून दिलें. त्याचीं हाडें व कातडें गोठ्यांतच ठेवून देऊन, वाघानें वांसरूं खाल्लें असें तिनें सर्वांना सांगितलें व आपला बचाव केला. परंतु कांहीं दिवसांनीं ती मरण पावल्यावर तिला

यमदूत नरकांत घेऊन गेले. तेथें तिनें अनेक दु:खें भोगलीं व पुन: एकदां तिचा एका चांडाळाच्या घरीं जन्म झाला. जन्मत:च ती आंधळी निपजली व तिचा रंग तर कोळशासारखा काळा होता. लहानपणीं आईवडिलांनीं दया येऊन तिच्या तोंडांत उष्टें व शिळेंपाकें अन्न घालून तिचा कसाबसा सांभाळ केला, परंतु पुढें आईवडील मृत्यु पावल्यावर ती निराश्रित झाली. त्यांतच तिच्या सर्व अंगावर कोड फुटलें. ती भिक्षा मागून आपलें पोट कसेंबसें भरीत असे. एक दिवस गांवांतले सर्व लोक शिवरात्रीच्या यात्रे-करितां गोकर्णक्षेत्राला जाण्याकरितां निघाले होते. त्या सर्वांबरोबर ती चांडाळीण पण गोकर्णक्षेत्राला गेली. शिवरात्रीचा दिवस उजाडला. ती चांडाळीण रस्त्यांत भिक्षा मागत होती, परंतु सारेजण शिवदर्शनाला जाण्याच्या घाईंत होते. त्यामुळें कोणीच तिला भिक्षा घातली नाहीं. एका भाविकानें मात्र " अग भिकारड्ये ! आज शिवरात्रीचा उपास आहे. " असें म्हणून, तिच्या हातावर एक बेलाचें पान टाकलें. त्या आंधळीनें त्याचा वास घेतला व ती कांहीं खायची वस्तु नाहीं हें तिला समजलें. तें बेलाचें पान हातांत घेऊन ती चांडाळीण तशीच पुढें चालत राहिली. कांहीं वेळानें ती शंकराच्या देवळाजवळ पोंहोंचली. त्या वेळीं रात्र झाली होती. दिवसभर कांहीं खायला मिळालें नव्हतें म्हणून चिडून तिनें हातांतलें बेलाचें पान दूर भिरकावून दिलें. तें योगायोगानें मंदिराच्या उघड्या दरवाजांतून आंत जाऊन शिवलिंगावर पडलें. या तिच्या नकळत घड-लेल्या पूजेनेंही महादेव संतुष्ट झाले. अशा रीतीनें आदल्या दिवशीं सबंध दिवस तिला उपवास घडून हातून शिवशंकराची पूजा झाली. आधींच अशक्त झालेली ती चांडाळीण हे कष्ट सहन न होऊन मरण पावली. तिच्या कृतकर्मांचीं फळें तिनें पुरेपूर भोगलीं होतींच. तेव्हां आतां तिचा उद्धार करावा या हेतूनें शंकरांनीं आम्हांला येथें पाठविलें आहे. "

अशा रीतीनें त्या चांडाळणीची मागिल गोष्ट मला सांगून तिच्या मृत देहावर शिवदूतांनीं अमृतसिंचन केलें. तेव्हां ती पहिल्याहूनही अधिक सुंदर झाली व शिवदूतांबरोबर शिवलोकाला गेली. तेव्हां हे राजा, तूं वेळ न मोडतां ताबडतोब गोकर्णक्षेत्रीं जा व शंकराची उपासना कर म्हणजे तूं शापमुक्त होशील. " गौतमऋषींचा हा उपदेश ऐकून व त्यांना वंदन करून मित्रसहराजा गोकर्णक्षेत्रांत गेला व शिवोपासना करून शापमुक्त झाला. अशी कथा सांगून सिद्धमुनि म्हणाले, " हे नामधारका, श्रीपाद-श्रीवल्लभ तीर्थयात्रेला निघाल्यावर प्रथम गोकर्णक्षेत्रीं कां गेले, याचा उल-गडा आतां तुला झालाच असेल. "

" अहो सिद्धमुनि, श्रीपादश्रीवल्लभांचें पुढील चरित्रहि ऐकण्याची मला फार उत्कंठा लागून राहिली आहे. तर तें मला सांगावें."

" ठीक आहे. ऐक तर मग यापुढील कथाभाग. श्रीपादश्रीवल्लभ गोकर्ण-क्षेत्रांत तीन वर्षें गुप्तपणें राहिले व नंतर लोकानुग्रह करण्याकरितां ते श्रीगिरिपर्वतावर गेले. तेथें चार महिने राहून नंतर निवृत्तिसंगमावरील कुरवपुराला जाऊन साधुजनांना दर्शन द्यावयाचें त्यांनीं ठरविलें. कुरवपूर तीर्थाचा महिमा सांगावा तेवढा थोडाच. श्रीगुरूंनीं त्या गांवांतील मनःपूर्वक भक्ति करणाऱ्या सर्व भक्तांचे मनोरथ पूर्ण केले. त्याच गांवांत एक वेदशास्त्र-संपन्न ब्राह्मण होता. त्याच्या बायकोचें नांव अंबिका असें होतें. ती फार सुशील व पतिसेविका अशी पुण्यवान् स्त्री होती. श्रीगुरूंचा अनुग्रह तिच्यावर कसा झाला तें आतां ऐक.

• • •

# कुरवपूरची अंबिका

अंबिकेला अनेक मुलगे झाले. परंतु पूर्वकर्माच्या प्रभावामुळें आई-वडिलांच्या मनाला दु:खाचा चटका लावून लहानपणींच इहलोक सोडून गेले. त्या दांपत्यानें त्याकरितां अनेक तीर्थयात्रा केल्या. अखेरशेवटीं परमेश्वरानें त्यांची प्रार्थना ऐकली. त्यांचा एक मुलगा पांच वर्षांहून मोठा झाला. आतां दिवसेंदिवस हा मुलगा दीर्घायु होणार अशी आशा अंबिकेला वाटूं लागली. त्याला ती जीव कीं प्राण जपत असे. तो मुलगा आठ वर्षांचा झाल्यावर त्याची मुंज मोठ्या थाटानें आईवडिलांनीं साजरी केली. परंतु तीच त्यांच्या भावी दु:खाची नांदी ठरली. कारण तो मुलगा बुद्धीनें मंद निघाला. त्याला वेदविद्या आत्मसात् करतां आली नाहीं. अनेक देवांची आराधना करून एक मुलगा तेवढा जगला, पण तो सुद्धां असा मंदमति उपजला हें पाहून आईवडिलांना अपरंपार दु:ख झालें. त्यांना रात्रंदिवस चिंता लागून राहिली. स्वत: वडील वेदशास्त्रसंपन्न, तर चिरंजीवांना वेदाचें एक अक्षरही धड म्हणतां येईना ! वडील त्याला खूप मारीत. त्यामुळें अंबिकेला फार दु:ख होत असे. ती आपल्या पतीला म्हणे, " नवसासायासानें एवढा बाळ जगला. त्याची बुद्धिच मंद, त्याला तो काय करणार ? तुम्ही त्याला मारूं नका. त्याला पुन्हा माराल तर मी जीव देईन. त्याच्या पूर्वकर्माचा परिणाम म्हणून हा मूर्ख, ठोंब्या झाला असावा. "

" ठीक आहे. अंबिके, यापुढें या मुलाला मी बोटही लावणार नाहीं. त्याचें नशीब व तो. माझें आंतडें तुटलें म्हणून मीं त्याला मारलें. पोटांत माया म्हणूनच त्याला मीं मारून विद्या शिकविण्याचा प्रयत्न केला, पण तूं म्हणतेस तेंहि खरेंच. नशिबांतच नसेल, तर जंग जंग

पछाडले तरी विद्या कशी येणार ? यापुढें परमेश्वराची मर्जी असेल तसें होईल." त्या ब्राह्मणानें असें म्हटलें तरी ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागून राहिली व या अपकीर्तीचा धसका घेऊन तो ब्राह्मण कालांतरानें इहलोक सोडून गेला. पतिनिधनानंतर मोठ्या धीरानें तिनें आपल्या मुलाचें पालनपोषण केलें. बुद्धीची वाढ झाली नाहीं तरी तिच्या मुलाच्या शरिराची वाढ होतच होती. ( दाढी व वय कांहीं न करतांच वाढतें. ) अंबिकेचा मुलगा विवाहयोग्य झाल्यावर तिची काळजी द्विगुणित झाली. गांवांतले सर्व लोक त्याची ठोंब्या म्हणून निंदा करीत असत. त्याला लांकडें किंवा पाणी वाहून आणण्याचें काम करायला सांगण्यापर्यंत लोकांची मजल गेली. अंबिका वृद्ध झाल्यावर तिचा मुलगा भीक मागूं लागला. त्याला गांवांतील लोक चिडवीत, "अरे ठोंब्या, फुकट तुझा जन्म ! तुझ्या वडिलांची चारी राष्ट्रांत वेदधर्मशास्त्रपारंगत म्हणून ख्याति होती तर तूं मात्र अति मूर्ख मंदमति ! अरे मूर्खा, तुझ्या या जिंदगीचा धिक्कार असो. त्यापेक्षां तूं गंगेंत उडी मारून जीव दिलेला बरा !"

लोकांचें ते वाक्प्रहार त्याच्या मर्मावर आघात करित. रोजरोजचा हा अपमान सहन न होऊन एक दिवस अंबिकेचा मुलगा नदीवर जीव द्यायला गेला. त्याची अस्वस्थता ओळखून अंबिकाही त्याच्या पाठोपाठ नदीवर गेली. सुदैवानें त्याच वेळीं श्रीपादश्रीवल्लभयति कुरवपुरांतील त्या संगमावर स्नानाला आले होते. प्राणत्याग करण्याआधीं श्रीगुरूंचें दर्शन घ्यावें या हेतूनें अंबिका आपल्या मुलाला घेऊन श्रीगुरूंच्या दर्शनाला गेली व श्रीगुरूंना वंदन करून आपली सर्व मनोव्यथा तिनें त्यांना सांगितली व म्हणाली, "देवा, या जन्मांत आपल्या मुलाची सर्व लोकांनीं केलेली टिंगल पाहाणें नशिबीं आलें. मरणाहून तीव्रतर मरणाचाच अनुभव होता तो ! त्यापेक्षां असा ठोंब्या मुलगा झाला नसता तरी बरें झालें असतें. आतां या यातना सहन करण्याचें ना त्राण ना मनोबल माझ्या जर्जर देहांत.

गंगेंत बुडी मारून आम्ही मायलेक आमची इहलोकची यात्रा संपविणार आहोंत. तरी देवा, एवढाच आतां वर द्या कीं पुढील जन्मीं तरी अगदीं तुमच्यासारखा मुलगा मला व्हावा व त्याचें नांव त्रैलोक्यांत पूजनीय ठरावें व माझ्या या जन्मींच्या वेदनांची जागा आनंदोर्मींनीं भरून निघावी. ब्रह्मज्ञानी मुलगा आपणाला व्हावा अशी फार इच्छा होती, पण तें या जन्मांत तरी नुसतें सुखस्वप्नच ठरलें आहे. भावी जन्मांत तरी तें स्वप्न सत्य ठरावें अशी माझी इच्छा आहे !"

" बाई, तूं ईश्वराचें आराधन कर म्हणजे तुला श्रीहरीसारखा मुलगा होईल. गौळणीनें व्रत केलें व महादेवाची पूजा केली. नंतर गोकुळांत कृष्णजन्म झाला. "

" गुरुमहाराज, आपण म्हणालांत तसें शिवव्रत कोणीं केलें तें मला सविस्तर सांगा, म्हणजे मी तसलेंच व्रत करीन. '

" ठीक आहे, ऐक तर मग. शनिवारीं, त्रयोदशीला प्रदोषकाळीं ( म्हणजे सायंकाळीं ) शंकराची पूजा भक्तिभावानें करण्याचें तें व्रत असून, कृष्णजन्मापूर्वीं एका गौळणीनें हें व्रत केलें होतें, ही कथा फार सुरस सांगितली आहे.

" गुरुमहाराज, ती स्कंदपुराणांतील गोष्ट सविस्तर ऐकण्याची मला फार उत्कंठा लागून राहिली आहे. तर मग, मला ती ऐकण्याचा आनंद आपण द्याल ना ? "

" सत्प्रवृत्ति वाढविणाऱ्या गोष्टी पुनःपुनः सांगण्यांत मलाहि सात्त्विक आनंदच वाटतो. ऐक तर मग ती परम पवित्र चंद्रसेनराजाची गोष्ट.

•••

# चंद्रसेनराजाची गोष्ट

उज्जयिनीनगरीचा राजा चंद्रसेन मोठा धर्मपरायण होता. ईश्वर-भक्तींत त्याचा दिवसांतला बराच वेळ जाई. त्याचा एक जिवलग मित्र होता. त्याचें नांव होतें मणिभद्र. त्या मणिभद्रानें सदाशिव भोलानाथाला नानाविध भक्तीनें व उपासनेनें प्रसन्न करून घेतलें होतें. त्याला श्रीशंकरांनीं एक माणिक दिलें होतें तें त्यानें चंद्रसेन राजाला आणून दिलें. श्रीशंकराचा प्रसाद म्हणून चंद्रसेनराजानें तें रत्न गुंफून घेतलें होतें. तो मणि म्हणजे पारसमणि होता. लोखंडाला लावला कीं त्याचें सोनें होत असे. जें जें मागावें तें तें त्या मण्याच्या प्रभावानें मिळत असे. चंद्रसेना-जवळ असलें माणिक आहे ही बातमी हां हां म्हणतां चारी दिशांना पसरली व अनेक राजांनीं विविध प्रकारांनीं त्या मण्याची मागणी केली. कोणी सौम्य विनंति करून वाटेल तेवढें धन त्या मण्याऐवजीं देऊं केलें, तर कोणी बऱ्या बोलानें न दिल्यास, जबरदस्तीनें तें हिरावून नेण्याचा धाक घातला. त्या माणकाकरितां युद्ध करण्याची धमकी देऊनच कांहीं राजे थांबले नाहींत, तर त्यांनीं आपली एकी करून, संयुक्त आघाडी उघडली व त्यांनीं उज्जयिनी नगरीला वेढा घातला. त्या दिवशीं शनिवार, त्रयोदशी होती. चंद्रसेनराजा शंकराच्या पूजेला बसला होता. शिवालयांत बसून मनांत कसलीही चिंता न बाळगतां राजा आपल्या उपासनेंत मग्न होता. महाबळेश्वरलिंगाची पूजा करतांना त्याला मानसिक आनंद मिळत होता. शिवालयांत त्याच वेळीं आलेला गौळ्याचा एक लहान मुलगा ती पूजा लक्ष लावून पहात होता. तो बाहेर पडून आपल्या सवंगड्यांना म्हणाला, " चला रे, आपणहि असलाच खेळ खेळूं या आज बाहेर जाऊन. "

असें ठरवून खरोखरच आपल्या घराजवळ जाऊन त्या गौळ्याच्या मुलानें एका दगडाचें शिवलिंग बनवून आपल्या मित्रांबरोबर त्याची पूजा चालू केली. आपापल्या परीनें त्यांनींहि यथाशक्ति त्या दगडाच्या लिंगाची षोडशोपचारांनीं पूजा केली व नैवेद्य दाखविला. संध्याकाळ संपून रात्र पडूं लागल्यावर गौळ्यांच्या इतर मुलांना त्यांच्या त्यांच्या आया घरीं परत घेऊन गेल्या. परंतु ज्यानें तो खेळ खेळण्याची कल्पना काढली होती, तो मुलगा मात्र शिवोपासनेंत इतका मग्न झाला होता कीं, त्याला घरीं यायला उशीर झाला म्हणून त्याची आई त्याला पाहावयला आली, तर तो शिवपूजेंत गढून गेलेला तिला दिसला. तिनें आपल्या मुलाला तडाखे मारले व म्हणाली, “अरे बाबा, तुला घरीं यायचं नाहीं का ? किती काळोख पडला बघ. जेवायचं नाहीं का आज ? ”

परंतु गौळ्याचा मुलगा जागचा हालला नाहीं किंवा शिवमंत्र म्हणायचें त्यानें थांबविलें नाहीं. ‘ ॐ नमः शिवाय ’ या मंत्राच्या सुरांनीं तें सर्व वातावरण भारून टाकलें होतें त्यानें. त्याच्या आईला, त्याच्या उत्कट भावसमाधीची कल्पना आली नाहीं. तिला वाटलें, मुलांचे कांहीं तरी छंद असतात त्यांतलाच तो एक असावा. त्यामुळें तिनें आपल्या घराच्या पुढील अंगणांत दूरवर मांडलेलें तें उघडें देऊळ मोडून टाकलें. लिंग म्हणून तो मुलगा पूजन करीत होता, तो दगड दूर भिरकावून दिला व “ घरांत यायचें नसलें तर बस इथेंच कारट्या ! पोटांत कावळे ओरडायला लागले कीं आपसूक येशील या देवपूजेचें नाटक बंद करून ! ” असें म्हणून ती आपल्या कामाला गेली. आपली पूजा आईनें मोडली हें पाहून त्या गौळ्याच्या मुलानें अनेक प्रकारें शोक केला. त्याला रडूंच आलें. तो मूर्च्छा येऊन जमिनीवर पडला. जरा सावध झाल्यावर जिथें शिवलिंगाची स्थापना त्यानें केली होती त्या जागीं लक्ष केंद्रित करून, लय लावून त्यानें आपले प्राण सोडण्याचा निश्चय करतांच त्याच्या त्या सात्त्विक व दृढ

भक्तीनें शूळपाणी शंकर प्रसन्न झाले व त्याला योगनिद्रा आणवून तेवढ्या वेळांत आपल्या मायेनें तो बाळ बसला होता त्या जागींच एक रत्नखचित स्तंभावर आधारलेलें एक मोठें शिवालय निर्माण केलें. ज्या जागीं शिव-लिंग म्हणून त्या मुलानें दगड ठेवला होता तिथें सूर्यासारखें तेज:पुंज असें रत्नखचित शिवलिंग निर्माण केलें व नंतर त्या गौळ्याच्या मुलाला जाग आणविली. तो मुलगा जागा होतांच श्रीशंकरांनीं प्रकट होऊन त्याचा हात धरून त्याला वर उठविलें व वर मागायला सांगितलें. तेव्हां एका भव्य व दिव्य अशा अपूर्व शिवमंदिरांत बसलेलें पाहून आधींच आश्चर्य-चकित झालेला तो बालक म्हणाला, " हे ईश्वरा, माझ्या आईनें तुझी पूजा मोडली याबद्दल तिला क्षमा कर. "

" बाळा, तुझ्या भक्तीनें मी प्रसन्न झालों आहें. तुझ्याकारितां तुझ्या आईला मी क्षमा करतों. तुझ्या आईला प्रदोषकालीं शिवपूजेचा लाभ झाला म्हणून तिच्या पोटीं प्रत्यक्ष विष्णूचा अवतार होईल. बाळा, तूं जें जें मनांत आणशील तें तें तुला मिळेल. तुझ्या वंशांत अखंड सौख्य नांदेल व नातू व पणतू पाहाण्याचा आनंद तुला लाभेल. " असा आशीर्वाद देउन शंकर त्या लिंगांत गुप्त झाले. कोटि सूर्यांचा प्रकाश पडावा तसा प्रकाश, त्या नव्या शिवालयांतील रत्नखचित शिवलिंगामुळें आसपास पसरला व रात्रीं पुन्हां सूर्य उगवला कीं काय असा भास सर्व लोकांच्या मनांत उत्पन्न झाला. स्वारी करायला आलेले राजे सुद्धां स्तिमित झाले व ज्या चंद्रसेनाच्या राज्यांत रात्रीं सुद्धां सूर्य उगवतो त्याच्याशीं वैर करण्यात आपली धडगत लागणार नाहीं हें लक्षांत घेऊन त्यांनीं आपली शरणांगति दूत पाठवून चंद्रसेनराजाला कळविली. चंद्रसेनानें तो निरोप पोंचतांच, त्या सर्व राजांना सन्मानपूर्वक आपल्या राजवाड्यांत बोलाविलें. चंद्रसेनालासुद्धां, रात्रीं दिवसाएवढा प्रकाश त्या दिवशीं अचानक कसा पडला.

याचें आश्चर्य वाटत होतें. तोंपर्यंत नगरांत त्या नवीन देवळाची बातमी सगळीकडे पसरली होती. चंद्रसेन व इतर राजे तें देऊळ पहावयाला गेले. त्यांनीं त्या गौळ्याच्या मुलाला सर्व हकीगत विचारली. त्यानेंही ती आनंदानें सांगितली. तेव्हां गवळ्यांचा राजा म्हणून त्याचा गौरव सर्वांनीं केला व त्याला पुष्कळ देश व संपत्ति बहाल केली. स्वारी करायला आलेले इतर राजे आश्चर्यचकित होऊन आपापल्या देशीं परत गेले. अशा रीतीनें त्या शनिप्रदोषाचें व्रत आचरण करणाऱ्या चंद्रसेनाला जिंकण्याला आलेले राजे त्याचे भक्त होऊन परत गेले. राजाजवळ शिवभक्तीचें फळ असें तें दिव्य माणिक होतें, तर गवळ्याच्या त्या साध्याभोळ्या मुलानें त्यापलीकडलें असें कांहीं मिळविलें होतें कीं, त्याचें माहात्म्य शब्दांनीं वर्णन करतां येण्यासारखें नव्हतें. गवळ्याचा तो मुलगा घरीं परतला व त्यानें शंकरांनीं दिलेलें वरदान आईला सांगितलें. आपल्या पोटीं प्रत्यक्ष विष्णुनारायण जन्म घेणार हें समजतांच त्या गौळणीचा आनंद मनांत सामावेना. अशी आहे या विष्णूच्या कृष्णअवतारामागील पूर्वपीठिका.

" अंबिके, तुला जर माझ्यासारखा मुलगा पुढील जन्मीं व्हावा अशी इच्छा असेल, तर तूंहि हें शनिप्रदोषव्रत जरूर कर. " असें सांगून व त्या वृद्ध स्त्रीच्या भोळ्या भावानें प्रसन्न होऊन, श्रीपादयतींनीं तिच्या 'ढ' मुलाला जवळ बोलावलें व प्रेमभावानें त्याच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेविला. तात्काळ त्या मठ्ठ मुलाला सर्व ज्ञान स्फुरलें व तो तिन्ही वेद म्हणूं लागला. तेथें जमलेल्या इतर ब्राह्मणांना अचंबा वाटला. ज्यांनीं त्या ठोंब्या ब्राह्मणाची कुचेष्टा केली होती, त्यांच्या माना लाजेनें खालीं वळल्या व श्रीगुरुयतींचा तो चमत्कार पाहून सर्वांनीं अभावितपणें व नकळतच त्यांना नमस्कार केला. अंबिकेची तर श्रीपादयति हेच ईश्वर आहेत अशी खात्री पटली. पुढें अंबिकेच्या मुलाची एक विद्वान् पंडित म्हणून त्या

कुरवपुरांत ख्याति झाली व सांगून आलेल्या मुलींतील एका सुशील व अनुरूप मुलीशीं अंबिकेनें आपल्या मुलाचें लग्न लावून दिलें. ”

‘ मूकं करोति वाचालम् ’ अशी ही श्रीगुरूची कृपा आहे. सिद्धमुनींनीं सांगितलेली ही रसाळ कथा ऐकण्यांत नामधारक तल्लीन झाला होता. त्याची भावसमाधि श्रीगुरूंनीं त्याल स्पर्श करतांच उतरली व तो म्हणाला,

“ अहो सिद्धमुनी, श्रीपादयति कुरवपुरांत असतांना पुढें काय घडलें, आणखी कोणाला त्यांच्या कृपेचा अनुभव आला, तें सर्व सांगून माझी गुरुचरित्र ऐकण्याची तहान आपण भागवावी, ही माझी नम्र विनंति. ”

“ नामधारका, तुझ्यासारखा श्रोता असल्यामुळें मला श्रीगुरूचें चरित्र वर्णन करण्यांत अधिकच आनंद वाटेल. ह्या श्रीगुरुचरित्राची गोडीच अशी अवीट आहे. कुरवपुरांत अंबिकेच्या मुलाला ज्ञानी केल्यावर श्रीपादश्रीवल्ल-भांच्या कृपेनें एक धोबी राजा झाल्याची अद्भुत घटना घडली. ती पवित्र कथा ऐकून तुझा आनंद द्विगुणित होईल. ”

“ यतिमहाराज, मी चातकाप्रमाणें आपल्या अमृतमय बोलांची वाट पाहात आहें. सांगा तर ती धोब्याची गोष्ट मला. ”

“ ठीक आहे. ऐक तर मग—

## धोबी राजा झाला

श्रीपादश्रीवल्लभ दररोज सकाळीं संगमावर जाऊन विधिपूर्वक स्नान करीत. ज्यांच्या दर्शनानें गंगास्नानाचें पुण्य मिळावें, ते श्रीपादयति गंगा-

स्नान व विधिपूर्वक आचरण लोकानुग्रहार्थ करीत असत. ते नदींत स्नान करीत असतांना त्या जागेजवळच रोज एक परीट कपडे धूत असे व श्रीगुरु स्नानाला आले कीं, रोज त्यांना न चुकतां नमस्कार करीत असे. श्रीगुरु त्रिकाळ स्नान करीत, तसेंच धोबीपण तीनदां त्यांना मनोभावानें वंदन करीत असे. असें बरेच दिवस चाल्लें होतें. त्यानंतर एक दिवस श्रीगुरूंनीं त्या धोब्याला म्हटलें, " काय रे बाबा, दररोज तूं इतके कष्ट कां घेतोस ? तुझ्या भक्तीनें मी संतुष्ट झालों आहें. तर आतां सुखानें राज्य कर. "

श्रीगुरूंचा आशीर्वाद त्या धोब्याला शुभशकुनच वाटला. त्यानें श्रीगुरूंची आणखी सेवा करावयाचा निर्धार केला. तो रोज श्रीगुरूंच्या मठांत जाऊन अंगण झाडी, पाणी शिंपी व दुरूनच त्यांना दंडवत करित असे.

अशा रीतीनें नियतीचें चक्र फिरत असतां, वैशाख महिन्यांतील एके दिवशीं तो धोबी नदीवर कपडे धूत असतांना, एक म्लेंच्छ राजा आपल्या स्त्रियांसह जलक्रीडा करावयाला तिथें आला. वसंतऋतूचे दिवस होते ते. ह्या म्लेंच्छ राजाचें घोडदळ, हस्तिदळ व पायदळ नदीच्या दोन्ही कांठांवर येऊन थांबलें. त्याचे नोकरचाकरही अलंकार घालून मोठ्या दिमाखानें मिरवीत होते. तें पाहून व मंगलवाद्यांचा ध्वनि ऐकून, कृष्णाकांठीं कपडे धूत असलेला तो श्रीगुरुभक्त धोबी स्वतःशींच विचार करूं लागला,

" मनुष्यजन्माला येऊन असलें सुख भोगायला मिळालें नाहीं तर तो जन्म काय कामाचा ? काय या राजाची चंगळ आहे ! नाहीं तर मी ! बडवतोंय कपडे जन्मभर ! पशुसमान आहे माझ्यासारख्या गरिबाचें जिणें. राजाचें आयुष्य किती चांगलें. त्याला स्त्रिया, पोषाख, दागिने अगदीं मनसोक्त वापरायला मिळतात. आम्च्यासारख्यांना नाहीं एक नार तर

राजाला दासी हजार ! हा म्लेंच्छ राजा ईश्वराचा केवढा मोठा भक्त असला पाहिजे. याचें कोणतें आर्जव फळाला आलें व हा राजा झाला न कळे ! कोणत्या वरें देवाची आराधना यानें केली असावी ? याला कोणते श्रीगुरु भेटले असावेत, कीं ज्यांच्या कृपेनें त्याला असलें ऐश्वर्य भोगायला मिळत आहे ? "

धोबी मनांत असा विचार करीत आहे, तोंच श्रीपादराज नित्याप्रमाणें स्नानाला आले. त्यांनीं धोब्याच्या मनांतील चलबिचल ओळखली होती. धोब्यानें नित्याप्रमाणेंच वंदन करतांच ते म्हणाले,

" काय रे, काय विचार चालला आहे मनांत ?

" स्वामि, आतांच या म्लेंच्छ राजाची जलक्रीडा पाहून मनाला संतोष वाटला व मनांत आलें, पूर्वकर्माचें फळ या जन्मांत भोगावें लागतें असें म्हणतात, तर मग या राजानें पूर्वजन्मीं देवाची चांगली आराधना केली असावी. त्यामुळें याला या जन्मांत राज्यपद मिळालें. पण जरी अज्ञानामुळें इंद्रियांना नाना वासना निर्माण झाल्या तरी या विविध भोगांची चाड मला नसून, तुमच्या पायींच हे श्रीगुरुराया, माझें सर्व सुख आहे हेंही खरें आहे. "

" अरे रजका, तूं जन्मल्यापासून कष्ट उपसलेस. तुझ्या मनांत आतां भोग भोगायची वांच्छा होणें अगदीं साहाजिकच आहे. राज्यभोग घ्यावासा तुला वाटला ही तमोवृत्ति आहे. सगळ्या इंद्रियांना एकदां वीट आला पाहिजे विषयसुखांचा. असें झालें नाहीं व इंद्रियें वखवखलेलीं राहिलीं तर निर्मळ मोक्ष मिळत नाहीं व पुढें तीं बाधा निर्माण करतात. वासनांचीं गाडलेलीं भुतें पुन: पुढील जन्मांत वर येतात व मुक्तिमार्गांत अडथळे आणतात. तेव्हां आतां तुझ्या मनांत जी भोगेच्छा निर्माण झाली आहे ती पुरी होण्याकरितां तुला पुढील जन्म म्लेंच्छवंशांत येईल व राज्यपद मिळून आपल्या सर्व इंद्रियांची तृप्ति तुला करतां येईल. जा तूं आतां ! "

" हे श्रीगुरुराजा, माझी अशी उपेक्षा कां करतां ? तुमचे पाय त्यामुळें मला अंतरतील ! जर मला तुम्ही पुनर्दर्शन देऊन व अनुग्रह करून सत्य ज्ञान देणार असाल, तर पुढील जन्मांत तुम्ही म्हणतां तसा, म्लेंच्छ वंशांत जन्म घेण्याची माझी तयारी आहे. नाहीं तर विषयसुखांच्या भोवऱ्यांतच मी कायमचा अडकून पडेन. "

" अरे धोब्या, तुझा पुढील जन्म वैदूरनगरांत होईल. तेथेंच तुला राज्यपद मिळेल व तुझ्या अंतकाळीं मी तेथें येऊन तुला भेट देईन. त्या वेळीं तेथें यायलाच लागणार आहे मला दुसऱ्या कांहीं कारणास्तव. माझी भेट झाली कीं, तुला पुनः ज्ञान होईल. तूं कांहीं चिंता करूं नको. माझ्या बोलण्यावर भरंवसा ठेव. आणखी कांहीं कारणाकरितां, पुढील काळांत श्रीनृसिंहसरस्वती या नांवानें मी अवतार घेऊन संन्यासीरूपानें वावरणार आहें. "

" ठीक आहे, श्रीपादश्रीवल्लभराया, तुमचे शब्द म्हणजे विधिलिखितच तें ! त्याला कोण डावलूं शकेल ? जातों मी तर मग घरीं. पुढील जन्मांत आपली भेट होईल ती श्रीनृसिंहसरस्वती या रूपांत. "

" अरे धोब्या, थांब जरा. जवळ ये असा माझ्या. हं सांग आतां, तुला राज्यभोग याच जन्मांत भोगायची इच्छा आहे का ? "

" श्रीपादस्वामि, मी आतां म्हातारा झालों आहें. तर पुढील जन्मांत लहानपणापासूनच सर्व राज्यविलास भोगून यौवनांत गोड राज्यभोगांचा उपभोग घेईन. आतां या म्हातारपणीं राज्यपद मिळून काय फायदा ? "

" तुझ्या इच्छेप्रमाणें पुढील जन्मीं तुला हें सर्व मिळेल असा तुला वर देतों. "

श्रीगुरूंनी निरोप देतांच, तो वृद्ध धोबी घरीं गेला. नंतर त्याचा मृत्यु झाला. त्याच वेळीं वैदूरनगरांतील राजाच्या एका स्त्रीला दिवस

अनुक्रम ... दि: ......८५......
........................ नों. दि: ..........

राहिले व तिच्या उदरीं तो धोबी वाढूं लागला. पुढें त्या धोब्याचा राजपुत्र म्हणून जन्म झाला वगैरे कथाभाग सांगण्याआधीं हे नामधारका, कुरवपुराला श्रीगुरु असतांना आणखी काय घडलें तें प्रथम ऐक. त्या धोब्याची पुढील गोष्ट तुला नंतर सांगणार आहें. त्या कुरवपुरांत श्रीगुरूंचें एवढें माहात्म्य वाढलें कीं, त्याचें विस्तारपूर्वक वर्णन करूं लागलों तर तें एक महाकाव्य होईल. श्रीगुरूंचे पुढील असंख्य असे अवतार वर्णन करायला माझी वाणी अपुरी पडेल. श्रीगुरु श्रीपादश्रीवल्लभ ज्या ज्या ठिकाणीं राहिले त्या त्या ठिकाणचा अपार महिमा वाढला. श्रीगुरूंच्या तेथील कांहीं काळाच्या वास्तव्यामुळें तीं तीं स्थानें तीर्थक्षेत्रें म्हणून प्रसिद्धि पावलीं. अशा रीतीनें अनेकांचा उद्धार करीत असतांना आश्विन वद्य द्वादशीला मृगराज नक्षत्रावर श्रीगुरु निजानंदीं बसले व गंगेंत अदृश्य झाले. जरी लौकिक दृष्टीनें त्यानंतर कोणाला दिसले नाहींत, तरी ते श्रीपादश्रीवल्लभ कुरवपुरांतच होते. अदृश्य होऊन सगुण रूपाचें, निर्गुण निराकार स्वरूपांत त्यांनीं परिवर्तन केलें होतें, एवढाच काय तो फरक. जे खरे गुरुभक्त होते, ज्यांना ज्ञानचक्षूंचा लाभ झाला होता, अशाच कुरवपुरवासीय भक्तांना ते दिसत असत. त्या कुरवपुराची ख्याति एक अपूर्व तीर्थक्षेत्र अशी या भूतलावर कायमची झाली आहे. ”

“ अहो सिद्धमुनि, आपण मला चांगलेंच गोंधळांत टाकलेंत हो ! एकदां म्हणतां श्रीपादश्रीवल्लभयति खरे म्हणजे कुरवपुरांतून तसे गेले नाहींत. एकदां सांगतां त्यांनीं निजानंदांत समाधि घेतली. त्यांतच म्हणालांत कीं, त्यांचे पुढे आणखी अवतार झाले. तरी हें सर्व मला नीट समजावून सांगा, अशी माझी आग्रहाची विनंती आहे.”

“ अरे नामधारका, श्रीगुरूंचा महिमा किती वर्णन करूं ?

ते त्या कुरवपुरांत गुप्तवेषानें होते असें मला सांगायचें होतें. परशुराम नाहीं का चिरंजीव झाले ? तसेंच श्रीगुरूपण वस्तुतः चिरंजीव

आहेत. प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणीं तो एकच नारायण वास करतो. ह्या त्रिमूर्तींचें तीन गुण आहेत. उत्पत्ति, स्थिति व प्रलय. ब्रह्मा, विष्णु व महेश हे तीन देव हे वस्तुत: एकाच मोठ्या देवाचीं तीन रूपें. एकाच्याच त्या तीन मूर्ति ! भक्तजनांचा उद्धार करण्याकरितां अंबऋषीला मिळालेला शाप श्रीविष्णूनें आपणांवर घेतला व त्यामुळें पुढें त्याचे अवतार झाले हें मागें तुला सांगितलेंच होतें. त्याच श्रीविष्णूंच्या अनेक अवतारांतील प्रमुख अवतार अनसूयेच्या घरीं त्रिमूर्तिरूपानें झाला हेंही तुला आठवत असेलच. त्या ब्रह्मा-विष्णु-शिवाचे अवतार श्रीपादश्रीवल्लभ यांचें आतांपर्यंत ऐकलेंस तेवढें चरित्र केवळ तुझ्या गुरुभक्तीमुळेंच तुला ऐकायला मिळालें. दृढतर भक्ति करावी, गंभीरपणें धैर्य धरावें तरच पैलपार लाभतो व या लोकीं व परलोकांत परमसुखाची प्राप्ति होते. हे नामधारका, श्रीगुरु लौकिकार्थानें अदृश्य झाल्यावर, त्यांच्या कृपाप्रसादाचा वांटेकरी पुढें आणखी कोण झाला हेंच तुला ऐकायचें होतें ना ? ऐक तर मग. वल्लभेश नांवाच्या ब्राह्मणाचें चोरांपासून श्रीगुरूनीं कसें रक्षण केलें ती कथा."

"सिद्धमुनि, मी लक्षपूर्वक ऐकतों आहें. सांगा तर मग ती गोष्ट."

• • •

# चोरांची खोड मोडली !

काश्यपगोत्रोत्पन्न असा वल्लभेश नांवाचा एक ब्राह्मण होता. तो मोठा आचारवंत होता. श्रीपादक्षेत्राला दरवर्षीं तो यात्रेला जात असे. एकदां

व्यापारधंद्यानिमित्त निघाला असतां, ‘ आपणाला उत्तम नफा झाला, तर एक हजार ब्राह्मणांना जेवण घालून संतुष्ट करीन.’ असा नवस मोठ्या आनंदानें त्यानें केला. त्याप्रमाणें श्रीपादवल्लभांचें मनांत अविरत चिंतन करीत तो निघाला तेव्हां ज्या ज्या ठिकाणीं तो सौदा करी त्या त्या ठिकाणीं त्याला शंभरपट लाभ होई. त्यामुळें त्याला परमानंद झाला. श्रीगुरुवरील त्याची निष्ठा अधिकच वाढली. त्यानंतर कृतज्ञतापूर्वक नवसाची आठवण ठेवून, वल्लभेश श्रीपादक्षेत्राच्या यात्रेला आपल्याजवळील द्रव्य घेऊन निघाला. ती गोष्ट कांहीं चोरांनीं पाहिली व त्यांनींहि यात्रेकरूचा वेष घेऊन, कपटानें ते त्या वल्लभेश ब्राह्मणाबरोबर यात्रेला निघाले. दोन तीन दिवस असा प्रवास केल्यावर त्या दुष्ट पाषाण-हृदयी चोरांनीं आपलें खरें स्वरूप एका रात्रीं वाटचाल करीत असतांना प्रकट केलें. त्या ब्राह्मणाला त्यांनीं ठार मारलें व त्याचें सर्व द्रव्य लुबाडलें. तेवढ्यांत हातांत त्रिशूळ व खट्वांग घेतलेला असा श्रीपादश्रीवल्लभ, जटा-भस्मांकित तपस्व्याचें रूप घेऊन तिथें प्रकट झाला. त्यानें आपल्या त्रिशूळानें त्या चोरांना ठार केलें. त्या चोरांतील एक चोर मात्र श्रीपाद-श्रीवल्लभांना शरण आला. तो म्हणाला, “ अहो यतिराज, मला वांचवा हो. हे इतर साथीदार या वल्लभेश ब्राह्मणाला ठार मारतील असें मला वाटलें नव्हतें. द्रव्याची चोरी करावयाची एवढेंच ठरलें होतें आमचें. त्यामुळें त्यांचा साथीदार व्हायला मी तयार झालों. आपण सर्व विश्वाचें स्वरूप ओळखतां, मग माझ्या मनांतील हे सर्व भाव आपण ओळखाल यांत शंकाच नाहीं. ”

“ ठीक आहे. मानतों मी तुझें बोलणें. ऊठ तर मग. तुला मी क्षमा केली आहे. असा पुढें ये. ही मंत्रवून दिलेली रक्षा मी देतों आहें ती या वल्लभेश ब्राह्मणाचे देहावर प्रोक्षण कर !” असें श्रीगुरुयतींनीं सांगतांच त्या १ आत्तापदग्ध चोरानें त्याप्रमाणें केलें. त्या वल्लभेश ब्राह्मणाच्या प्रेताच्या

गळ्याभोंवतीं ती मंतरलेली विभूति लावतांच, तो तात्काळ जिवंत झाला. एवढ्यांत सूर्योदय झाला. आपण वाटेंत झोंपलों होतों कीं काय, असा प्रश्न त्यानें त्या सहप्रवाशाला विचारला. तेव्हां त्यानें त्या वल्लभेश ब्राह्मणाला सर्व हकीकत सांगितली. वल्लभेश त्या जटाधारी संन्याशाच्या शोधार्थ झटकन् वर उठून निघाला, पण पुष्कळ शोधूनहि कुठें आसपास तरी त्या यतीचा पत्ता लागला नाहीं. श्रीपादश्रीवल्लभ केव्हांच अदृश्य झाले होते. वल्लभेश त्या चोराला म्हणाला, " तुझें भाग्य थोर म्हणून तुला त्या यतींचें दर्शन झालें. मी नित्यनियमाप्रमाणें श्रीपादक्षेत्राची यात्रा करूनहि तें भाग्य माझ्या नाशिबीं नव्हतें. श्रीगुरुरायानें मला जिवंत केलें, चोरांपासून वांचविलें; पण सगुणरूपांतील दर्शनाला मात्र वंचित केलें. "

" चल तर आपण पुढील यात्रा पार पाडूंया. " असें बोलून व चोरांनीं हिरावून घेतलेलें द्रव्य परत घेऊन तो ब्राह्मण कुरवपुराला गेला व त्यानें एक सहस्र ब्राह्मणभोजनाऐवजीं चार हजार ब्राह्मणांना जेवण दिलें. अन्नदानासारखें दुसरें दान नाहीं. त्या वल्लभेश ब्राह्मणानें इतर भक्तांसमवेत श्रीगुरूंची पूजाअर्चा केली व यात्रेहून तो घरीं परतला.

चोरांची खोड श्रीगुरूंनीं कशी मोडली याची गोष्ट सांगून सिद्धमुनि म्हणाले, " अरे नामधारका, आतां तरी श्रीगुरु अदृश्यरूपानें कुरवपुरांत होते हें पटलें ना तुला ?"

" सिद्धमुनि, माझ्या मनांत तसा संशय नव्हताच, पण आपणांकडून पुढील सुरस कथा ऐकावयाला मिळावी म्हणून मीं तसें विचारिलें होतें. माझ्या अपराधाची क्षमा असावी. "

" नामधारका, अरे, तूं कशाला कष्टी होतोस ? तुझा खरा भक्तिभाव मला माहीत का नाहीं ? ऐक तर पुढील चरित्रभाग. श्रीपादश्रीवल्लभांनींच पुढें श्रीनृसिंहसरस्वती या नांवानें लौकिक अवतार घेतला.

" सिद्धमुनि, त्या श्रीनृसिंहसरस्वतीरूप श्रीपादयतीनें जन्म केव्हां व कुठें घेतला, तें सांगा. माझे कान श्रीगुरुचरित्र ऐकायला अधीर झाले आहेत. "

" अरे नामधारका, कुरवपुराच्या अंबिकेला ' शनिप्रदोषाचें व्रत कर म्हणजे तुला माझ्यासारखा ज्ञानी व विरागी मुलगा होईल असें ' श्रीपाद-श्रीवल्लभांनी सांगितलें होतें, तें तुला आठवतें का ? "

" अहो ती अंबिका म्हणजे त्या प्रथम ठोंब्या मुलगा होता त्याची आई ना ? आठवलें सारें कांहीं. मायलेक जीव द्यायला चालल्ीं असतांना श्रीपादयतींनीं त्यांना वांचविलें होतें. "

" अरे नामधारका, त्यानंतर ती वृद्ध आंबिका, जन्मांत शनिप्रदोष व्रत आचरून, शंकराची पूजा करीत होती, परंतु तिची देहवासना शिल्लक असतांनाच तिला मृत्यु आला व पुढें तिचा जन्म करंजनगर नांवाच्या उत्तरेकडील गांवीं वाजसनेयी शाखेच्या एका ब्राह्मणाचे घरीं झाला. पुण्याईच्या बळावर, लगेच नरदेह देऊन, आत्मकल्याण साधण्याची संधि साधकाला देव जरूर देतो ती अशी. या दुसऱ्या जन्मांत तिचें नांव आईवडिलांनीं अंबाभवानी असें ठेविलें. अंबाभवानी मोठी झाल्यावर, त्याच गावांतील माधव नांवाच्या एका ब्राह्मणाशीं तिचा विवाह झाला. तो ब्राह्मण शिवभक्त होता. अशा रीतीनें अंबाभवानीची मागल्या जन्मांतली उपासना पुढें चालू राहिली. पतिपत्नी दोघेंहि शनिप्रदोषव्रत पाळीतहि. शिवभक्तींत त्यांचा वेळ आनंदानें जात असे. शनिवारीं त्रयोदशीला तर, त्या दांपत्याचा सर्व दिवस उपासनेंत जायचा. काळचक्र अशा रीतीनें फिरत असतांना अंबाभवानीला गर्भ राहिला. तिसऱ्या व पांचव्या महि-न्यांत तिला उत्तम असे डोहाळे लागले. ती ब्रह्मज्ञान बोलूं लागली. सातव्या महिन्यांत माधवानें सुवासिनींना अक्षयवाणें वांटलीं. अशा रीतीनें नऊ

महिने पुरे भरतांच, एका शुभ दिवशीं अंबाभवानी प्रसूत होऊन, माधवाला पुत्ररत्नाचा लाभ झाला.

• • •

# श्रीपादयतींचा नवा अवतार

## जन्मतांच 'ॐ'कार म्हणणारा बालक

जन्मतांच तो मुलगा ॐकार शब्द म्हणूं लागला. तें ऐकून आई-वडील तटस्थ झाले. माधवानें मुलाचें जातक वर्तवून घेतलें. ज्योतिष्यांना खूप दक्षिणा दिली. त्यांनीं सांगितलें,

" माधवराव, तुमचा हा मुलगा अवतारी पुरुष होणार अशीं लक्षणें आहेत. हा साधासुधा योग नाहीं. हा कोणी तरी युगपुरुष, तुमच्या थोर भाग्यानें तुमच्या घरीं जन्माला आला असावा. हा तुझा मुलगा सर्वांचा गुरु होईल. याचा ज्याच्यावर अनुग्रह होईल, तो सर्व जगाला वंद्य होईल. याच्या दारीं आठी सिद्धि वोळंगत राहतील, तर नवनिधि यांच्या घरीं कायमची वस्ती करतील. पण याचें लग्न होण्याचा योग दिसत नाहीं. परंतु तो गृहस्थाश्रम न स्वीकारतां एकदम संन्यासी होईल, असें ज्योतिष-शास्त्र सांगतें. याच्या नुसत्या दर्शनानें पतितांचा उद्धार होईल. "

माधव व अंबाभवानी यांना आपल्या मुलाचें हें भविष्य ऐकून, अपरंपार आनंद वाटला. त्यांनीं त्या ज्योतिष्यांना आणखी वस्त्रें व अलंकार वगैरे भेटी दिल्या. सर्व लोक परत गेल्यावर अंबाभवानीनें आपल्या त्या गोजिरवाण्या

मुलाची दृष्ट काढून टाकली. तिकडे सगळे लोक उपजतांच ॐकार म्हणणाऱ्या त्या मुलाचें आश्चर्य करीत घरीं जात होते. दुसऱ्या दिवसापासून त्या मुलाला बघावयाला नगरांतील इतर लोकांची व अंबाभवानीच्या व माधवाच्या नातेवाइकांची ही रीघ लागली. तेव्हां त्याच्यावर दृष्ट पडेल या भयानें, त्या दांपत्यानें त्या मुलाचें तोंड झांकून ठेवून नुसता ॐकार शब्द ऐकण्याची संधि लोकांना मिळूं दिली. त्या मुलाला दृष्ट लागू नये म्हणून रोज मंत्रवलेला अंगारा लावीत. आई व वडिलांनीं त्याच्या हातांत रक्षाकरण्डकही बांधला व गळ्यांत ताईत बांधला. मायामोहामुळें परमात्म्याच्या त्या अवताररूपाला, मायबाप इतके जपत होते. त्या मुलाच्या जन्मानंतर दहा दिवस केव्हांच निघून गेले. मोठ्या थाटामाटांत बारसें साजरें करून, अंबाभवानीनें मुलाचें जन्मनांव शालिग्रामदेव असें ठेवलें, तर नरहरि हें व्यावहारिक नांव त्याच्या कानांत विधिपूर्वक सांगितलें. अंबाभवानीला त्यापुढची काळजी पडली ती मुलाचें पोट भरण्याची. तिच्या मनानें तिला आपल्या स्तनांत दूध फार थोडें आलें आहे असें वाटलें, म्हणून मुलाला पाजायला घेतला असतांना ती आपल्या पतीला म्हणाली,

"अहो, आपल्या नरहरीला माझं दूध पुरणार नाहीं,असं वाटतंय मला. त्याची उपासमार व्हावयाला नको म्हणून, आपण दाई ठेवूं या का? किंवा असं करा. आजच गुरांच्या बाजारांत जाऊन एक उत्तम म्हैस विकत घेऊन या. म्हणजे तिचें वरचें दूध घातलें कीं, मग आपल्या बाळाची भूक शमेल." अंबाभवानीच्या मांडीवर असलेल्या चिमुकल्या तान्ह्या नरहरीचा इवलासा हात तेवढ्यांत आईच्या स्तनाला लागला व काय आश्चर्य! अंबाभवानीच्या स्तनांतून बत्तीस धारांनीं दूध वाहूं लागलें. तिची चोळी दुधानें भरून गेली व स्तन्य दूध जमिनीवरही वाहूं लागलें! तेव्हां त्यांनीं तो चमत्कार पाहून, आपल्याच बाळाचे पाय धरून त्याला नमस्कार घातला. परंतु त्याला दृष्ट लागेल म्हणून तो चमत्कार गुप्त ठेवण्याचें ठरविलें.

अंबाभवानी नरहरीला पाळण्यांत घालून झोक्या काढूं लागली कीं तो पाळण्यांत कधीं राहात नसे. सारखा जमिनीवर खेळायचा तो. अशा रीतीनें नरहरीचें कोडकौतुक चाललें असतांना तो एक वर्षाचा झाला. त्याची शरीरकांति तेजःपुंज होती. बाकी सर्व ठीक होतें, परंतु ॐ कार हा एकच शब्द अजूनहि तो बोलत असे. त्याला दुसरा कांहीं शब्द अजून फुटला नव्हता. त्यामुळें आईबाडिलांना काळजी वाटूं लागली. फार तर दोन-तीन वर्षांपर्यंत तरी हा बोलूं लागेल, असें त्यांनी आपल्या मनाचें सांत्वन करून घेतलें. परंतु नरहरि तीन वर्षांचा झाला तरी ॐ काराखेरीज एकहि दुसरा शब्द तो बोलेना. अंबाभवानी परोपरीनें त्याला बोलायला शिकवी, परंतु तिच्या पदरीं केवळ निराशाच येई. आपला मुलगा मुका निपजला याबद्दल आई-वडिलांना आतां खात्रीच वाटूं लागली. तेव्हां मनाचें सांत्वन करावें म्हणून; त्यांनीं पुनः ज्योतिष्यांचा सल्ला घेतला. मुलगा बोलूं लागावा म्हणून कांहीं उपाय आहे का असें त्यांनीं विचारतांच, ज्योतिषी म्हणाले, " कुलदेवतेची आराधना करा. अश्वत्थवृक्षाच्या पानावरून तीनदां त्याला अन्न खाऊं घाला. " कांहीं म्हणत, 'हा मुकाच आहे' तर कोणी म्हणत, अहो, याला नीट शिकवा, म्हणजे प्रयत्नानें थोडेंथोडें शिकेल, कारण याला ऐकायला तर चांगलें येतें. शिवाय हा बालक ॐकार उत्तम म्हणतो. जो जें जें सांगे, तें तें अंबाभवानी व माधव करून बघत; परंतु सात वर्षें पूर्ण झालीं तरी मुलगा ॐकाराशिवाय कांहींहि बोलूं लागला नाहीं. त्याचें आतां मुंज करण्याचें वय झालें होतें. गांवांतील पुरोहितांनीं मुंज लावून देण्याचा सल्ला दिला. परंतु त्याला गायत्रीमंत्राचा उपदेश केला तर तो कसा म्हणणार, याची माधव ब्राह्मणाला काळजी पडली होती. ती पतिपत्नी मनांत फार कष्टी होऊन, त्यांच्या मनांत विचार आला,—" काय हें आमचें अदृष्ट ! शंकर-पार्वतीची आराधना केली. त्रयोदशीला शंकराचें पूजन केलें तें सर्व वाया गेलें का ? आम्हांला

हा एकुलता एक मुलगा झाला. आमच्या वृद्धापकाळीं हा रक्षण करील, अशी केवढी आशा आम्ही मनांत बाळगली होती !"

त्याच वेळीं तिचा मुलगा तिथें आला व त्यानें गमतीनें जवळ असलेला लोखंडाचा तुकडा हातांत घेतला, तोंच काय आश्चर्य ! त्या लोखंडाचें सोनें झालें होतें ! आईवडिलांनीं घराचे प्रवेशद्वार लावून घेतलें, ती गोष्ट गुपित ठेवण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. आणखी एकदा प्रचीति पहावी म्हणून, त्यांनीं मुलाला घरांत नेऊन, दुसरा लोखंडी गोळा त्याच्या हातांत दिला. त्यानें त्याच्याकडे नुसतें अमृतदृष्टीनें पाहतांच त्याचें सोनें झालें ! तेव्हां तो कोणी मोठा अवतारी पुरुष आहे, याबद्दल आई-वडिलांची खात्री पटली. त्यांनीं मुलाला पटकन् पोटाशीं धरलें व पटापट त्याचे पापे घेऊन त्याला म्हटलें, "बाळा, लोक तुला मुका म्हणतात. पण तुझ्यामुळें, आम्हांला अपरंपार आनंद होतो. अरे बाळा, तुझे बोबडे बोल ऐकावे, अशी आमची फार मोठी इच्छा आहे. तर आमची एवढी इच्छा पुरव ना ! तूं योगी पुरुष असावास याबद्दल, आतां आमची खात्री झाली आहे. मग तूं आपली ती शक्ति वापरून बोलूं कां लागत नाहींस ?"

त्यावर त्या मुलानें खुणेनें असें सांगितलें कीं, ' माझी मुंज करून दिलीत कीं मला सगळें कांहीं बोलतां येईल. " त्यावर विश्वास ठेवून आईवडिलांनीं ताबडतोब विद्वान् ज्योतिष्यांना बोलावणें पाठविलें. व ते आल्यावर, त्यांच्या सल्ल्यानें व्रतबंधाकरतां जवळचा मुहूर्त ठरविला. रत्नखचित अलंकार तयार केले. मोठ्या उत्साहानें सर्व तयारी केली. गांवांतील लोक त्यांची गंमत पाहावयाला तयार होते. ' मुक्या मुलाची मुंज करणार, तर तो मुंजीनंतर गायत्रीमंत्राचा उच्चार तरी कसा करणार ? एवढा मोठा खर्च वृथा केला जात आहे. " असे उद्गार कांहीं चाणाक्ष लोक काढीत होतेच; पण त्याच्याकडे, माधव ब्राह्मण व अंबाभवानी यांनीं बिलकूल लक्ष दिलें नाहीं. मुंजीला चतुर्वेदी ब्राह्मण बोलविले, मोठ्या थाटामाटांत मुंजीचा

सोहळा सुरू तर केला. गांवांत निरनिराळी टीका होतच होती. कोणी असेंही म्हणाले, " अहो न का बोलेना त्या माधवाचा मुलगा. आपणाला मिष्टान्न तर गांवभोजनाचे वेळीं मिळेल ना ? शिवाय फार मोठी भोजन-दक्षिणाही तो निमंत्रितांना देणार आहे असें ऐकतों. "

इकडे माधवानें आदले दिवशीं मुलाचें चौलकर्म केलें व अभ्यंगस्नान घालून त्याला विधिपूर्वक जानवें घातलें. नंतर मातृभोजनाकरतां अंबा-भवानी नरहरीला घेऊन गेली. त्यानंतर आईजवळ जेवण करून, मौंजी-बंधनाकरतां नरहरि वडिलांकडे गेला. माधवानें विधिपूर्वक त्याच्या कमरेभोंवतीं मौंजीबंधन केलें व ठरलेल्या शुभ मुहूर्तावर नरहरीला गायत्रीमंत्र कानांत सांगितला. त्या वेळीं त्याच्या सभोंवार अलोट गर्दी जमली होती. सर्वांचे डोळे उत्सुकपणें पहात होते व सर्वांचे कान नरहरि गायत्री मंत्र म्हणतो कीं नाहीं, याकडे लागले होते. त्यावेळीं वडिलांनीं क्रमाक्रमानें गायत्रीमंत्र शिकवितांच नरहरीनें त्याचा उच्चार केला. पण तो मनांतल्या मनांत ! उघड, स्पष्टपणें त्यानें गायत्री-मंत्राचा उच्चार केला नाहीं. त्यामुळें माधव ब्राह्मणाच्या तोंडावर निराशा पसरली. बघ्ये लोक आपापसांत,वरून, खोटी सहानुभूति दाखवीत, आंतून फिदीफिदी हंसूं लागले. ' छान लागली मुक्याची मुंज !' असे उद्गार काढण्यापर्यंत, कांहीं जणांची मजल गेली. इकडे भवानी निष्ठापूर्वक, आपल्या ब्रह्मचारी पुत्राला, पहिली भिक्षा वाढायला घेऊन आली व तिनें नरहरीला वस्त्रें-आभरणें दिलीं.पहिली भिक्षा देऊन आईनें आशीर्वाद देतांच नरहरीबाळानें, 'अग्निमीळे—' या ऋग्वेदांतील प्रथम मंत्राचा उच्चार करून सर्व वेद म्हणून दाखविला ! दुसरी भिक्षा घालतांच ' इषेत्वा' वगैरे मंत्र म्हणून दाखविला. यजुर्वेदातील प्रारंभीचा भाग व सर्व यजुर्वेदाचें पठण केलें. तें ऐकून सारेच लोक आश्चर्यचकित झाले. टिंगलखोरांची चांगलीच खोड मोडली. आईनें तिसरी भिक्षा घालतांच नरहरीनें ' अग्न आयाहि '

पासून प्रारंभ करून, समग्र सामवेदाचें गायन करून दाखविलें आई-वडिलांचा आनंद गगनांत मावेना. मुका मुलगा चारी वेद म्हणून दाखवूं लागला. नरहरि हा जगद्गुरूंचाच अवतार अशी लोकांची खात्री पटली व सर्वांनीं त्याच्यापुढें नमस्कार घातला. तेव्हां नरहरि अंबाभवानीला म्हणाले, " आई, तूं भिक्षा मागण्याचा उपदेश मला केला आहेस तर तुझ्या उपदेशाप्रमाणें मी वागेन ! तरी आतां मला निरोप दे. तीर्थयात्रेला जावें असा माझा निश्चय ठरला आहे. घरोघर भिक्षा मागून पोट भरावें व ब्रह्मचर्यव्रताचें पालन करून वेदाभ्यास करावा, असा माझा मानस आहे."

तें ऐकतांच अंबाभवानीचा गळा दुःखानें दाटून आला. कोणतेंहि मोठें सुख एकाएकीं मिळालें कीं तें फार काळ टिकत नसावें, असें तिला वाटलें. ती डोळ्यांत पाणी आणून नरहरीला कांहीं सांगणार, तोंच तिला मूर्च्छा आली. क्षणभरानें सावध झाल्यावर तिनें नरहरीला परोपरीनें घरीं राहाण्याबद्दल विनविलें. तेव्हां नरहरि आईचें सांत्वन करीत म्हणाले,

" आई, तूं आपल्या मनांत बिलकूल खेद मानूं नको. कारण मी तीर्थयात्रेला गेलों तरी तुम्हांला आणखी चार मुलगे होणार आहेत. ते तुमची मनोभावानें सेवा करतील. आई, तूं मागील जन्मांत शंकराची आराधना केली होतीस ना ? त्याची आठवण कर." त्यानंतर नरहरीनें आईच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवतांच तिला पूर्वजन्मांचें स्मरण झालें व नरहरि म्हणजेच श्रीपादश्रीवल्लभ, याची खूण पटून तिनें त्याच्या चरणकमलावर आपलें डोकें ठेवलें. तेव्हां श्रीपादांनीं तिला वर उठवून सांगितलें, " आई, हें सर्व कोणाला सांगूं नकोस. आम्ही संन्यासी यति असून संसारांत अलिप्त आहोंत. म्हणून यापुढें सर्व तीर्थयात्रांना भेट द्यावी असा मानस आहे. तर आतां मला निरोप दे– "

अंबाभवानी तें ऐकून नरहरीला म्हणाली, "बाळा नरहरी, तूं ज्ञानानें मोठा आहेस. माझी एक शंका आहे, ती तुला विचारूं का ?"

"हो, विचार ना खुशाल."

"अरे नरहरि, धर्मशास्त्रांत ब्राह्मणानें चारी आश्रमांचें आचरण करावें, असें सांगितलें आहे ना ? मुंज झाल्यावर बारा वर्षें ब्रह्मचर्याश्रम आचरण करावा, त्यानंतर गृहस्थाश्रमांत आयुष्य घालवावें. सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम मुख्य आहे, असें धर्मशास्त्राचें मत आहे ना ? ब्रह्मचर्यांत वेदादिक पठण करावेत, गृहस्थाश्रमांत विवाह करून पुत्रपौत्रांचें सुख अनुभवावें, यज्ञ वगैरे पवित्र कर्में करावींत व त्यानंतर वानप्रस्थाश्रम स्वीकारून अखेर शेवटीं संन्यास घ्यावा. धर्मशास्त्राच्या मताप्रमाणें,

समग्र इंद्रियें संतोषवावीं । मनींची वासना पुरवावी ।
नंतर तपाची वाट धरावी । संन्यास घेतां मुख्य असे ॥

(११·१०३)

असें असतांना, तूं बालपणांतच संन्यास घेणार म्हणतोस, हें धर्मशास्त्राला धरून कसें काय आहे तें माझ्या लक्षांत नाहीं आलें."

त्यावर श्रीनरहरियतींनीं आपल्या आईला जें उत्तर दिलें तें अत्यंत समर्पक व फार उद्बोधक असेंच आहे.

• • •

# नरहरीचें आईला उत्तर

नरहरि त्यावर आईला म्हणाले,

" आई, मी तुझ्या प्रश्नाचें उत्तर देईन. पण त्या आधीं मीच तुला एक प्रश्न विचारतों. "

" काय तो प्रश्न ? "

" मी चारही आश्रम आचरावे असें तुझें मत आहे. तेव्हां मी किती वर्षें जगणार आहें, हें तुला माहीत आहे का ?"

" अरे नरहरि, तें मी कसें सांगूं ? कारण पुढच्या क्षणीं काय होईल हें सुद्धां सांगणें कठीण असतें. "

" आई, माझें सुद्धां हेंच म्हणणें आहे. शरीर अनित्य आहे. तें कधीं पडेल याचा भरंवसा नाहीं. ऐहिक वैभव शाश्वत टिकणारें नसतें. मृत्यु हा नित्य जवळ उभा आहे. म्हणून माणसानें नेहमीं क्षणाक्षणाला पुण्य-संग्रह करावा असें मला वाटतें. चारी आश्रम जगून संन्यास घेणें हें, जो चिरंजीव असेल त्याला योग्य. पण मी चिरंजीव आहें कीं नाहीं, हें ना तुला माहीत ना मला. म्हणून उद्यांचें काम आज करावें, दुपारचें सकाळीं करावें, कारण मृत्यु नेहमीं जवळच टपलेला आहे, असेंहि धर्मशास्त्र सांगतें. आई, म्हणून धर्माचरण पुढें करीन, आधीं भोग भोगून घेतों असें म्हणणाऱ्यांची कशी दिशाभूल होते तें लक्षांत घे. सूर्याच्या गतीप्रमाणें फार झपाट्यानें आयुष्य पळापळानें कमी होत असतें. झाडावर पिकलेलें पान लोंबत असतें. तें केव्हां पडेल याचा भरंवसा नसतो. तसेंच आपलें हें शरीर केव्हां मृत्यु-मुखीं पडेल याचा नेम नाहीं. नद्यांचें पाणी सागराला जाऊन मिळतें, तें पुन्हा कधींहि परत येत नाहीं त्यांच्या उगमाकडे. तसेंच आयुष्यांतले गेलेले क्षण पुन: परत येत नाहींत माणसाच्या हातांत. म्हणून माणसानें ज्या

दिवशीं कांहीं पुण्यकर्म हांतून घडलें नाहीं तो दिवस वाया गेला असें मानलें पाहिजे. आपल्या या शरीराला, सुसर ज्याप्रमाणें मनुष्याला खाते, त्याप्रमाणें गट्ट करायला म्हातारपण तयारच असतें. [ म्हातारपणीं आत्म-कल्याण साधीन, असें म्हणतां म्हणतां, अखेर इंद्रियें थकतात, शारीरिक बळ क्षीण होत जातें. नुसतें देवाचें नाम ध्यायचें म्हटलें तरी तोंडांत दांत नसल्यामुळें, ' राम ' याचा उच्चार ' लाम ' होऊं लागतो व मग आत्म-कल्याणाच्या गोष्टीहि लांबच राहतात. ] म्हणून—

जो यमाचा असेल इष्ट । त्यानें करावा हा हट्ट
अमर असेल जो सुभट । त्यानें पुढें धर्म करणें ॥ (१२.२०)

असें मला वाटतें. शिवाय संसार हा स्वप्नासारखा आहे. मोगऱ्याचें फूल जसें फार लवकर कोमेजतें, तसेंच आपला देह कधीं गळून पडेल हें सांगतां येणार नाहीं, वीज क्षणभर चमकावी तसा जीविताचा ठेवा क्षणभर चमकून जातो.

अग आई, पुत्र, पौत्र,ललना, धन, संपत्ति यांच्याविषयींची ओढ माझ्या मनांत नाहीं. माझ्याच जीविताचा मला भरंवसा नाहीं. इतर सर्वहि गोष्टी अंतिम सुखाच्या दृष्टीनें तितक्याच अशाश्वत आहेत याबद्दल माझ्या मनांत खात्री पटली आहे. [ त्यामुळें ' ज्या क्षणीं खरें वैराग्य निर्माण होईल, त्या क्षणीं संन्यास घ्यावा. संन्यासदीक्षा घेण्याला आयुर्मर्यादेची अट नाहीं " असें याज्ञवल्क्य आदि ऋषींनीं सांगितलें आहे. ] आपणाला जें योग्य वाटेल त्याचा माणसानें स्वीकार करावा. मला ब्रह्मचर्य आश्रमांतून संन्यासाश्रमाकडे गरुडभरारी मारणें शक्य आहे, अशी माझी खात्री आहे. म्हणून, मी तावडतोब संन्यासदीक्षा घ्यावी असा माझा मानस आहे. ज्याला असें जमणार नाहीं, ( बहुतेक लोकांना बहुधा तें जमत नाहींच ) त्यांच्याकरितां चार आश्रम जगण्याचा तो मुंगीच्या गतीनें जाणारा मार्ग

आहेच. पण त्यांत अंतिम ध्येय गांठतां येण्याची शक्यता कमीच. शिवाय आतां मी ब्राह्मण झालों. माझी तुम्ही मुंज लावून दिलीत. तेव्हां 'ब्रह्म जानाति असौ ब्राह्मण ' :--ब्रह्मज्ञान ज्याला झालें, तो खरा ब्राह्मण—या व्याख्येप्रमाणें तें खरें चिर शाश्वत, सत्य शिव सुंदर ज्ञान मिळविण्याकरितां मी आतां गुरूकडे जाऊन, त्यांना शरण जावें असा माझा निश्चय ठरला आहे. तर मग आतां तरी नाहीं ना तूं मला थांबविणार ? जें ज्याला आवडतें, त्याचाच आपल्या प्रिय व्यक्तीला आपण आग्रह करतों. त्याला नावडणाऱ्या गोष्टी खाण्याचा आपण आग्रह करीत नाहीं, तसेंच मला संसारसुखाची ना गोडी ना आकर्षण. तर मग आत्मानंद मिळविण्याच्या प्रयत्नांत तूं मला आशीर्वादच देशील ना आई ? "

" बाळ, तुझें म्हणणं पटतें रे, पण कांहीं गोष्टी समजतात पण उमजत नाहींत जगतांत. तसेंच तूं जाणार म्हणतोस, पण जोंयर्त आमच्या मनाला दुसरा विरंगुळा नाहीं, तोंपर्यंत तरी जाऊं नकोस अशी माझी इच्छा. कारण तूं गेल्यावर माझें जीवन भकास होईल. पुढें तुला चार मुलगे होतील, असें तूं म्हणालास. पण पुढचें कोणी बघितलें आहे ? तेव्हां मला आणखी एक मुलगा होईपर्यंत तरी तूं आमच्या घरीं राहून आम्हांला तुझा सहवास लाभूं दे, असें मी तुझ्याजवळ मागणें मागत्यें. तूं आम्हांला कुलदैवतच आहेस. "

" आई, मी तुला पुढें चार मुलगे होणार आहेत असें सांगितलें त्यावर विश्वास ठेव. पण त्यांतूनहि तुझा असा आग्रहच आहे म्हणून मी एक कां दोन मुलगे तुला होईपर्यंत तुमचे घरीं राहाण्याचें आश्वासन देतों. आतां झालें ना तुझ्या मनासारखें ? "

●●●

# नरहरीची गोष्ट

माधव ब्राह्मणाच्या घरीं श्रीपादश्रीवल्लभांचा, नरहरि या स्वरूपांत जन्म होऊन, केवळ आईवडिलांच्या समाधानाकरितां मुंजीनंतर लगेच तीर्थयात्रेला न निघतां, नरहरीनें वर्षभर तरी घरीं राहावयाचें कबूल केल्यामुळें आईवडिलांना फार संतोष झाला. श्रीनरहरियतींनीं आपल्या गांवांतील लोकांना वेदाभ्यास शिकवून आपला वेळ घालविण्याचें ठरविलें. त्यांनीं अनेक शिष्य त्या कालावधींत वेदज्ञानांत तयार केले. त्रिवेदी ब्राह्मणहि अंबाभवानीच्या नरहरीकडे येऊन शास्त्रें शिकूं लागले. श्रीगुरूंच्या वचनाप्रमाणें लवकरच अंबाभवानीला दिवस गेले व नऊ महिन्यांनीं एका शुभ मुहूर्तावर तिला एकदम दोन मुलगे झाले. आपले भाऊ तीन महिन्यांचे झाल्यावर, श्रीगुरु आईला म्हणाले,

" आई, तुला यापुढें आणखी दोन मुलगे व एक मुलगी होणार आहे. त्यांच्यासह तुम्हीं ज्याला सुख मानतां तें सुख तुम्हांला आयुष्यभर मिळेल. तर आपल्या ठरावाप्रमाणें मला आतां निरोप दे. मी वर्षभर येथें राहून माझें तुला दिलेलें वचन पुरें केलें आहे ! "

तेव्हां आईवडिलांनीं नरहरीच्या पायांवर डोकें ठेवलें व आपल्या हातून त्याचें संगोपन करतांना, नकळत ज्या चुका घडल्या असतील व जे प्रमाद घडले असतील त्याबद्दल क्षमा करण्याविषयीं त्याला विनविलें. देवच प्रत्यक्ष उदरीं येऊन, मानवाचें रूप घेतल्यामुळें, जी सलगी त्यांच्याकडून घडली त्याबद्दल माधव ब्राह्मण व अंबाभवानीनें श्रीगुरूंची पुन: एकदां क्षमा मागितली व श्रीगुरूंनीं " जेव्हां कधीं माझें चिंतन कराल, मला भेटण्याची उत्कंठा वाटेल तेव्हां तुम्हांला मनोवेगानें येऊन भेटेनच.' असें आश्वासन

दिल्यावरच त्यांनीं नरहरीला संन्यासदीक्षा घेण्याला परवानगी दिली व एका शुभ मुहूर्तावर, मनांत विषाद व निराशा वाटत असतांनाही तोंडावर लटका आनंद दर्शवीत आईवडिलांनीं नरहरीला निरोप दिला.गांवातले सर्व लोक त्यांना गांवाच्या सीमेपर्यंत निरोप द्यावयाला जमले होते. नऊ वर्षांचा मुलगा संन्यास घ्यावयाला निघाला ही कल्पनाच सर्वांना नवीन होती. कांहीं लोकांनीं तर अंबाभवानी व माधव यांना, सुखानें नरहरीला निरोप देतांना पाहून नवल व्यक्त केलें. त्या आईवडिलांचें मन पत्थराचें असावें अशीहि टीका कांहींनीं केली. पण त्याकडे दुर्लक्ष करून आईवडील नरहरी-पाठोपाठ जातच होतीं. इतर सर्व लोक परतले होते. तेव्हां नरहरियांनी आईला व वडिलांना म्हणाले,

" आई, बाबा, तुम्ही आतां येथून परत जा. माझे छोटे भाऊ तुमच्या-वांचून रडत असतील. तीस वर्षांनीं मी तुम्हांला पुन्हां दर्शन देईन. तोंपर्यंत सध्यां, बदरीवनांत जाऊन सिद्धदर्शन घ्यावें असें ठरविलें आहे. आई, माझें खरें स्वरूप आठव म्हणजे तुझ्या मनाची शांति तुला प्राप्त होईल. "

श्रीअंबाभवानीला श्रीपादश्रीवल्लभांनीं पुनः एकदां मूळ स्वरूपांत दर्शन देतांच, तिच्या मातृस्नेहाला बंध पडले व एक सात्त्विक समाधान लाभून ती आपल्या पतीबरोबर घरीं परत गेली. "

" अहो सिद्धमुनि, श्रीगुरु निघाले ते बदरीवनाला जाण्याकरितां. त्यांच्या वाटेंत काय काय घडलें तें सांगा ना मला. "

" नामधारका, किती रे हें श्रीगुरुचरित्रावरील तुझें प्रेम ! अशा भक्ताला तें चरित्र सांगण्याचें परम भाग्य मला लाभलें याचा मला आनंद वाटतो.

नामधारका, श्रीनरहरि बदरीवनांत जाण्याकरितां निघाले ते प्रथम वाराणसीक्षेत्रांत गेले. वाराणसी म्हणजेच काशीक्षेत्र. त्या ठिकाणीं

राहून कांहीं दिवस विश्वेश्वराचें दर्शन घ्यावें व आत्मानुष्ठान करावें, असा क्रम चालला होता. अष्टांगयोगाचें आचरण ते तेथें करीत होते. काशींत असलेल्या व नित्य तिथें येणाऱ्या संन्याशांना व योगाभ्यासधुरंधरांना नरहरीची तपश्चर्या पाहून नवल वाटे. नऊ वर्षांचा मुलगा तो काय व घोर तपश्चर्या व योगानुष्ठान करतो काय याचें सर्वांना आश्चर्य वाटे. श्रीगुरु रोज मनकर्णिका घाटावर त्रिकाल स्नानाला जात असत, तेव्हां काशींतील इतर सर्व संन्यासी त्यांचें दर्शन घ्यायला येत असत. त्या काशीक्षेत्रांत एक कृष्णसरस्वती नांवाचे वृद्ध यति होते.त्यांनीं नरहरीला पाहतांच इतर तापसी-जनांना म्हटलें " अहो यतिजन, या नरहरीला केवळ नर समजूं नका. तो अवतारपुरुष नारायण आहे. वय लहान आहे म्हणून त्याला जर तुम्हीं नमन केलें नाहींत, तर पुढें पश्चात्ताप पावाल. त्रिभुवनांत वंद्य अशी ती मूर्ति असून मला तर अतिशय वंदनीय वाटते.तरी मी वृद्ध असल्यामुळें त्याला वंदन केलें तर इतरांना दुःख वाटेल. तेव्हां याला आम्हीं संन्यासदीक्षा देण्याचें ठरविलें आहे. त्यानें संन्यासदीक्षा घ्यावी व मग परोपकार करीत हिंडावें असा माझा मानस आहे. त्याला तसें कळवा. "

त्याप्रमाणें इतर तापसी नरहरीकडे गेले व त्यांनीं त्याला रीतसर संन्यासदीक्षा घ्यावयाला सांगितली.श्रीशंकराचार्यांनीं संन्यासमार्गाची पुनः स्थापना केल्यानंतर कलियुगांत कलि प्रबळ होऊन संन्याससंप्रदाय नाश पावत होता, त्याकरितां तरी नरहरीनें दीक्षा घ्यावी व संन्यासमार्गाची महती वाढवावी, असा सर्वांनीं आग्रह करतांच, श्रीगुरुमुनींनीं वृद्ध कृष्ण-सरस्वतींकडून संन्यासदीक्षा घेतली.

" अहो सिद्धमुनि, माझ्या मनांत हें ऐकून संदेह निर्माण झाला आहे. श्रीगुरु तेच श्रीजगद्गुरु असतांना, त्यांचा आणखी दुसरा गुरु कोण होणार ? त्या त्रिमूर्तिअवतार श्रीपादश्रीवल्लभांचें नरहरिस्वरूपांत असतांना, गुरु होण्याचें सौभाग्य कोणाला मिळावें, हें मनाला पटत नाहीं. "

" नामधारका, अरे विष्णूचेच अवतार प्रभु रामचंद्र यांनीं वसिष्ठांना गुरु केलें. आठव्या अवतारांत कृष्ण झाल्यावर त्या आदिनारायणानें सांदीपनीऋषीला गुरु केलें, हें तुला माहीत आहे ना? मनुष्याप्रमाणें जन्म घेतल्यावर तसेंच वागावें लागतें. प्रत्यक्ष श्रीहरीला सुद्धां मानवजन्मांत श्रीगुरुवांचून दुसरा तारक नाहीं. गुरूला शरण गेल्याशिवाय ज्ञान होणार नाहीं, अहंकार जळणार नाहीं, असें श्रीहरींनीं आपल्या उदाहरणानें जगाला दाखवून दिलें. 'महाजनो येन गतः स पन्थाः' असें असतें सामान्य लोकांचें. लोकसंग्रहाकरितां एक आदर्श पुढें ठेवण्याकरितां परमेश्वरानें मनुष्यजन्मांत अवतार घेतल्यावर, दुसऱ्या मानवगुरूला, शरण जावें यांतील तुला वाटणारा विरोधाभास आतां तरी नष्ट झाला ना? अरे, या गुरुत्वाची व गुरुपरंपरेची थोरवीच अशी अनोखी आहे. यांत गुरुशिष्य हें नातेंच कांहीं निराळें असतें. तेथें जातपात, स्त्रीपुरुष, वय यांच्या बंधनाच्या बेड्या नसतात. परमेश्वराला सुद्धां मनुष्यजन्म घेतल्यावर, सद्गुरुवांचून तरणोपाय नाहीं, तर मग इतर पामरांची काय कथा? जगांत कोणतीहि गोष्ट किंवा कला गुरुमुखांतून ऐकली कीं ती लवकर मनावर ठसते हा अनुभव आहे. एकलव्यानें स्वतः उपासना केली, पण गुरूच्या प्रतिमेला गुरुस्वरूप मानून. प्रत्येक जण लहानपणापासून वार्धक्यापर्यंत जगांतलें विविध ज्ञान त्या त्या गुरूकडून मिळवीत असतो. ते व्यावहारिक गुरु तर हें आत्मज्ञान सांगणारे ते परमार्थगुरु. 'मी विद्वान् आहें, पंडित आहें, मला गुरूची काय जरूर?' असा अहंभाव बाळगणारे हें विसरतात, कीं मुंजींत गायत्रीमंत्राचा जप शिकविणारे वडील तरी त्यांना गुरुपदीं नाहींत का? अरे नामधारका, त्या वृद्ध कृष्णसरस्वतींचा अधिकार जाणून श्रीनरहरियतींनीं त्यांच्याकडून दीक्षा घेतली व त्यानंतर ते नृसिंहसरस्वती या नांवानें प्रसिद्ध झाले. "

" अहो सिद्धमुनि, नरहरीच्या नांवापुढें सरस्वती असें पद कां जोडतात ? "

" अरे नामधारका, संन्यासमार्गाची दीक्षा घेणाऱ्या प्रत्येकाच्या नांवापुढें सरस्वती हा संन्यासमार्गनिदर्शक शब्द वापरतात. श्रीगुरूंचे गुरु कोण होते तें आठव, म्हणजे लक्षांत येईल तुझ्या. "

" खरेंच कीं. नरहरियतींनीं कृष्णसरस्वतींना गुरु केलें असें आपण सांगितलेलें माझ्या लक्षांत आहेच. पण त्या कृष्णसरस्वतींचे गुरु कोण होते हो ? "

" नामधारका, ती एक गुरुपरंपरा आहे. मूळ आदिमहादेव शंकर, त्यानंतर विष्णु, ब्रह्मा, वसिष्ठ,पराशर, व्यास, शुक, गौडपाद आचार्य,गोविंद, शंकराचार्य, विश्वरूपाचार्य, ज्ञानबोधगिरिय, सिंहगिरिय, ईश्वरतीर्थ, नृसिंह-तीर्थ, विद्यातीर्थ, माळियानंद, देवतीर्थ, सरस्वती वृंद ' सरस्वती व यादवेंद्र, अशी ही क्रमवार गुरुपरंपरा आहे. त्या यादवेंद्रमुनींचे शिष्य म्हणजे कृष्णसरस्वती. ते फार काळ संन्यासव्रताचें आचरण करीत काशींत रहात होते व त्यांचा अधिकार तितकाच मोठा होता. त्यांचें शिष्यत्व पत्करून नृसिंहसरस्वतींनीं चारी वेदांचा अर्थ वाराणसीनगरींतील शिष्यांना सांगितला. तिथे त्यांचे अनेक शिष्य झाले, तेव्हां ते उत्तरेकडे बदरीवनांत जाण्याकरितां निघाले. त्यांचेबरोबर अनेक शिष्यहि तीर्थयात्रा करावयाला गेले. नंतर श्रीगुरुनृसिंहसरस्वती प्रयागक्षेत्रांत पोंचले असतांना, त्यांना माधव नांवाचा एक ब्राह्मण भेटावयाला आला. त्याला ब्रह्मज्ञान शिकवून संन्यासव्रताची दीक्षा श्रीगुरूंनीं दिली. तो माधव-सरस्वती हा, संन्याससंप्रदायांतील शिष्यांतला त्यांचा आवडता शिष्य ठरला. या माधवसरस्वतीशिवायहि श्रीगुरूंचे अनेक शिष्य झाले. त्यांची माहिती या चरित्रवर्णनांत पुढें येणार आहेच. "

" अहो सिद्धमुनि, त्या माधवसरस्वतींवर अनुग्रह केल्यावर श्रीगुरु पुढें कुठें गेले तें मला सांगा. "

" अरे नामधारका, प्रयागक्षेत्रांत श्रीगुरुनृसिंहसरस्वती कांहीं काळ राहिले असतांना पहिला शिष्य माधवसरस्वती झाला हें तुला सांगितलेंच. त्यानंतर जरी त्यांचे त्या ठिकाणीं असंख्यात भक्त झाले, तरी त्यांत माधव-सरस्वतीप्रमाणेंच बाळ, कृष्ण, उपेंद्र, सदानंद, ज्ञानज्योति, सरस्वती हेहि श्रीनृसिंहसरस्वतींचे प्रख्यात शिष्य झाले. त्या शिष्यांसह ते दाक्षिणापथ ओलांडून, सर्व क्षेत्रांना भेटी देत देत करंजनगरांत आले व मागें वचन दिल्याप्रमाणें त्यांनी आपल्या आईवडिलांची भेट घेतली. तेव्हां त्याच्या घरांतील सर्वांनीं त्यांना वंदन केलें व श्रीगुरूंनीं त्यांना आशीर्वाद दिले. संन्यासमार्गाचें महत्त्व सांगतांना,

श्रीगुरु म्हणती तयासी । एखाद्या काळीं परियेसी ।<br>
पुत्र होईल संन्यासी । उद्धरील कुळें बेचाळीस ॥(१३·१२८)

नंतर आपल्या आईवडिलांना, अंतकाळीं काशीक्षेत्रांत त्यांचें वास्तव्य घडून येईल व मुक्ति मिळेल असें आश्वासन श्रीगुरूंनीं दिलें. तेव्हां रत्नाई नांवाच्या त्यांच्या बहिणीनें, त्यांना वंदन केलें व गुरूचा उपदेश विचारला. रत्नाईला तप करण्याची इच्छा होती. श्रीगुरु तिला म्हणाले,

● ● ●

# रत्नाईची कथा

" अग रत्नाई, स्त्रियांना निराळें तप करावयाची जरूर नाहीं. पतिसेवा हेंच त्यांचें व्रत. तें नीट केलें, कीं त्यांना मोक्ष मिळतो. तुझा विवाह झाल्यावर तूं पतिसेवा दृढभक्तीनें कर, हाच तुला उपदेश. "

" स्वामी, तुम्ही त्रिकालज्ञ आहांत. तेव्हां माझ्या प्रारब्धांत काय आहे तें मला सांगाल का ? "

" ठीक आहे. सांगतों. तुझी तप करण्याकडे वासना आहे. परंतु पूर्वीचें संचितकर्म फेडल्यावांचून तुला गति मिळणार नाहीं. मागील जन्मांत तूं गाईला लाथ मारली होतीस. शेजारच्या नवराबायकोंत उगीचच भांडण लावलें होतेंस. त्यामुळें या जन्मांत तुझ्या अंगावर कोड फुटणार आहे व लग्नानंतर तुझा नवरा संन्यास घेऊन तुझा त्याग करणार आहे. असें आहे तुझें अदृष्ट."

हें ऐकल्यावर, रत्नाई दुःख करून श्रीगुरुचरणांवर लोळण घेऊं लागली. तिला त्यानंतर श्रीगुरु म्हणाले—

" रत्नाई, बाळे, वर ऊठ व डोळे पूस. लग्नानंतर कांहीं काळ तुमचें ठीक चालेल, परंतु उतारवयांत तुझे यजमान यति होतील. त्यानंतर तुझ्या अंगावर कोड फुटेल. मग तुझा देह नासल्यावर, माझी व तुझी भेट होईल. त्यामुळें तुला बरें वाटेल. तुझें पाप जाळून टाकावयाला तूं भीमानदीच्या कांठच्या गाणगापूर ( गंधर्वपूर ) येथें जा व उपासना कर. "

रत्नाईची कशीबशी समजूत घालून, श्रीगुरु नरहरियति दक्षिणेकडील नाशिक क्षेत्रांत गेले. त्या ठिकाणीं गौतमी नदी वाहते. तें एक मोठें क्षेत्र आहे. "

" अहो सिद्धमुनि, त्या नदीचें गौतमी नांव आहे, त्यामागें गौतमऋषींचा कांहीं संबंध आहे कीं काय ? "

अनुक्रम .............. .. वि: ..................
...... ...................... नोंद वि ..............


" बरोबर ओळखलेंस. एक तर ही गौतमीची कथा. नाशिकजवळच ब्रह्मर्षि गौतमऋषींचा आश्रम होता. ते अनुष्ठान व तपश्चर्या करून आपला वेळ घालवीत. गंगानदीला श्रीशंकरांनीं जटेंत बद्ध करून ठेवलें होतें. पूर्वींच्या ऋषींचें तपःसामर्थ्य एवढें मोठें होतें, कीं ते रोज पेरून आपल्याला लागणारें धान्य पिकवीत असत. त्यांचे मंत्र होतेच तसे प्रबळ! सर्व ऋषि गौतमऋषींना महाज्ञानी व ईश्वराचा दास म्हणून मान देत असत. त्यांना सांकडें घालून, त्यांच्यामार्फत गंगा भूतलावर आणावी, असा इतर ऋषिजनांनीं बेत ठरविला. एकदां का जटेंत अडकलेली गंगा भूतलावर आली कीं, सर्व प्राणिमात्रांना मुक्तिद्वार खुलें होईल, असें ऋषींना वाटत होतें. त्याकरितां सर्व मुनींनीं मिळून दूर्वांची एक सवत्स गाय निर्माण केली व गौतमऋषि अनुष्ठान करायला बसले होते त्या स्थानाजवळीलच त्यांच्या एका शेतांत ती दूर्वांची गाय व वासरूं त्यांनीं सोडून दिलें. गौतमऋषि अनुष्ठानाला बसले होते. त्यांनीं गाय शेत खात आहे असें पाहून तिला घालवून द्यायला म्हणून पवित्र दर्भ मंत्रवून सोडला. त्या दर्भानें आपलें काम अपेक्षेबाहेर पुरें केलें व ती दूर्वांची गाय व तें वासरू वज्राघात झाल्याप्रमाणें जमिनीवर मरून पडलीं. त्यामुळें गौतमऋषीला गोहत्या घडली. तेव्हां त्यानें सर्व मुनिजनांना प्रायश्चित्त घेण्याचा आपला मानस सांगितला. प्रायश्चित्त म्हणून भूमंडळावर गंगा आणावी, असें गौतमाला इतरांनीं सांगितलें. त्याप्रमाणें गौतमऋषींनीं हजार वर्षे घोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येनें शंकर प्रसन्न झाले व त्यांनीं वर मागायला सांगितला, तेव्हां गौतमऋषि म्हणाले —

" सर्वेश्वरा शंकरा, आपण जर माझ्यावर प्रसन्न झालां आहांत, तर चराचराचा उद्धार करण्याकरितां, गंगानदी भूमंडळावर सोडावी. त्यामुळें मानवांना आपलें पापक्षालन करणें सोपें होईल."

" तथास्तु !" असें श्रीव्योमकोशी शिवांनीं म्हणांच, गंगाभागीरथी भूतलावर आली. तिचें सर्व मुनिनींनीं गौतमी असें नांव ठेवलें. या नांवापाठी अशा रीतीनें गौतमऋषींची हजार वर्षांची तपश्चर्या आहे वरें का नामधारका ! "

अशा त्या परम पवित्र गौतमीनदीकांठच्या पवित्र तीर्थस्थानाला भेट देऊन, लोकानुग्रहार्थ श्रीगुरु महीतलावर हिंडत होते. यात्रा करतां करतां श्रीगुरु नृसिंहसरस्वती मंजरिका गांवीं आले. तेथें माधवराय नांवाचा एक विख्यात मुनि होता. तो श्रीगुरूंची सदैव मानसपूजा करीत असे. त्यानें श्रीगुरूंचें दर्शन होतांच, विविध स्तोत्रें रचून त्यांची पूजा केली. त्या माधवरायमुनीला गुरु म्हणाले, —" तुझ्या मंत्राची सिद्धि झाली आहे. तुला ब्रह्मलोक प्राप्त होईल, तूं दररोज नृसिंहमूर्तींची मानसउपासना करीत जा, म्हणजे तुला साक्षात्कार होईल, यांत संशय बाळगूं नकोस. "

श्रीगुरु त्यानंतर वासरब्रह्मेश्वर या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं गेले. त्या गांवांत जाऊन, शिष्यांसमवेत श्रीगुरु गंगाकिनारीं स्नानाला गेले असतांना तिथें एक ब्राह्मण आला. त्याला पोटदुखीचा फार मोठा त्रास होता. तो नदीकांठीं गडबडां लोळत होता. पोटदुखीनें त्रस्त झाला होता तो ब्राह्मण.

" मग श्रीगुरूंनीं त्याला बरें केलें असेल? " नामधारक म्हणाला.

• • •

# पोटशूळ बरा झाला

" नामधारका, श्रीगुरूंना अशक्य काहीं नाहीं. त्यांची कृपादृष्टि ज्यांच्यावर वळते, त्यांचें भलें होतें. तो ब्राह्मण गंगाकिनारीं गडबडां लोळत होता व स्वत:शींच बोलत होता,'कोणाला सांगूं माझी दु:खव्यथा ? भयंकर पोटशूळानें मी बेजार झालों आहें. रोज उपास करतों पण एखादे वेळीं जेवलोंच, तर पोटांत प्राणांतिक वेदना होतात. म्हणून मी रोज फळें खाऊन राहतों. अन्नाचें व माझें वैर निर्माण झालें असून अन्न खावें तर प्राण जगण्याऐवजीं प्राणत्याग होईल असें भय वाटतें. पंधरवडयानें किंवा महिन्यानें थोडेंसें जेवतों, पण तें अंगाला लागत नाहीं. काल गांवांत महानवमीचा सण होता. म्हणून एक महिन्यानें मी काल मिष्टान्न जेवलों. त्याचा परिणाम मीं आज हा असा पोटदुखीनें लोळतों आहें. मला प्राणांतिक यातना होत आहेत. त्यापेक्षां या गंगेंत उडी मारून जीव द्यावा व पोटदुखीपासून कायमची सुटका करून घ्यावी असें मला वाटतें."

असा निश्चय ठरवून तो ब्राह्मण नदीकांठावरील एक मोठा धोंडा घेऊन आला. तो पत्थर पोटाशीं बांधून, त्यानें गंगेंत प्रवेश केला. त्या वेळीं त्याच्या मनांत आलें—" मी फुकट जन्मलों या भूमीवर. पूर्वजन्मीं मीं कांहीं पुण्य केलें नसावें. मी कोणाच्या तोंडचा घास काढून घेतला होता त्याचें हें फळ पोटदुखीच्या रूपानें मला मिळालें असावें. गुरूंची निंदा केली होती, कीं आईवडलांची अवज्ञा केली होती ? आल्या अतिथीला जेवण दिलें नव्हतें, कीं आईवडिलांना हालांत ठेवून पंचपक्वान्नें जेवलों होतों ?"

याप्रमाणें तो ब्राह्मण नदींत बुडणार तोंच श्रीगुरूंचें लक्ष तिकडे गेलें. त्यांनीं शिष्यांना म्हटलें,

" अरे, तो पहा तिकडे कोणी तरी जीव देत आहे. आत्महत्या करणें महापातक आहे. त्याला वांचवा लवकर." शिष्यांनीं त्या ब्राह्मणाला नदींतून वर काढलें व ते त्याला श्रीगुरूंजवळ घेऊन आले. तेव्हां श्रीगुरूंनीं त्याला सर्व हकीगत विचारतांच त्यानें आपली पोटदुखीची व्यथा व मरणप्राय वेदनां-बद्दल त्यांना सांगितलें. त्यावर श्रीगुरु म्हणाले, " अरे ब्राह्मणा, आज तुझा भोग संपला. तुझी उदरव्यथा बरी झाली. पोटशूळ समूळ नाहींसा झाला असें समज. माझ्या शब्दांवर विश्वास ठेव व पोटभर भोजन कर. "

" ठीक आहे मुनिराज, " असें म्हणून, त्या ब्राह्मणानें श्रीगुरुचरणांवर आपलें मस्तक टेवून, त्यांना भक्तिपूर्वक नमस्कार केला. इतक्यांत, त्या गांवांतील अधिकारी असलेला ब्राह्मण, गंगेवर स्नानाला आला. त्यानें श्रीगुरूंना पाहतांच जवळ येऊन भक्तीनें वंदन केलें. श्रीगुरूंनीं त्याचें नांव वगैरे विचारिलें. तेव्हां तो सायंदेव नांवाचा ब्राह्मण, कडगंजीचा राहणारा असून यवनाच्या सेवेंत होता, असें त्यांना कळलें. सायंदेव अनेक प्रकारें श्रीगुरूंची आळवणी करीत होता. आपल्या स्तुतींत तो म्हणाला,

गंगा पापं शशीतापं दैन्यं कल्पतरुस्तथा।
पापं तापं च दैन्यं च हरेत् श्रीगुरुदर्शनम्॥ ( १३।१२९ )

ती स्तुति ऐकून श्रीगुरु त्याला कल्याण होईल असें आश्वासन देऊन म्हणाले," सायंदेवा, या ब्राह्मणाला पोटदुखीचा फार त्रास होतो.म्हणून तो पोटशूळ असह्य होऊन ह्या गंगेंत जीव देत होता. त्याला मी परत बोला-विलें आहे. त्याच्या रोगावर इलाज म्हणून माझ्या सांगण्यावरून तूं त्याला आपल्या घरीं घेऊन जा व मिष्टान्न जेवायला वाढ. हा पोटभर जेवला कीं याची व्याधि बरी होईल. "

" मुनिराज, हें सोडून बाकी कांहींहि काम सांगा. अहो, मी या ब्राह्मणाला ओळखतों. एक महिन्याच्या उपासानंतर काल हा जेवला, तर त्याची प्राण जावयाची वेळ आली पोटदुखीनें ! तर मग याला घरीं नेऊन

मीं मिष्टान्न भोजन दिलें, तर त्याचा मृत्यु नक्कीच ओढवेल व मला ब्रह्म-हत्येचें महापातक लागेल. तेव्हां आपण मला ही गळ घालूं नका. ”

“ अरे सायंदेवा, माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव. या ब्राह्मणाला घरीं ने व खीर वगैरे गोडधोड खायला कर. ”

“ पण मग स्वामी, आपण भिक्षेला माझ्याकडेच या. ”

“ ठीक आहे, येतों आम्हीं सर्व तुझ्या घरीं भिक्षेला. ”

असें सांगून दुपारीं श्रीनृसिंहसरस्वती शिष्यांसह सायंदेवाकडे भिक्षा मागावयाला गेले. सायंदेवाची पत्नी पतिव्रता जाखाई हिनें, त्यांची आपल्या पतिसमावेत षोडशोपचारें पूजा केली. तेहां श्रीगुरूंनीं त्याला आशीर्वाद दिला, “ सायंदेवा, तुझ्या घरीं वंशपरंपरागत गुरु वास करील. तुझ्या वंशाची भरभराट होईल. ” सायंदेवानें त्या आशीर्वादाचा आनंदानें स्वीकार केला व जेवणाचीं पानें घेतलीं. पोटदुखी असलेला तो ब्राह्मणहि पंगतीला होताच. जेवणाची पंगत बसली. श्रीगुरूंनीं आग्रह धरून त्या पोटशूळानें त्रस्त झालेल्या ब्राह्मणाला, तृप्त होईपर्यंत पक्वान्नें वाढायला लाविलीं.

सायंदेवाच्या मनांत जराशी भीति होतीच. परंतु जेवणें उरकल्यावर तर तो पोटदुखी असलेला ब्राह्मण, आपल्याला आतां छान वाटत आहे, पोट वगैरे आजिबात दुखत नाहीं असें सांगूं लागला. तेव्हां सर्वांनाच आश्चर्य वाटलें. पण खरें म्हणजे, त्यांत नवल असें कांहींच नव्हतें. कारण लोखंडाला परिस लागला व त्याचें सोनें झालें, किंवा सूर्योदय झाल्यावर रात्रीच्या अंधाराचा नाश झाला, तर त्यांत कोणाला कांहीं नवल वाटतें का ? जें अन्न त्या ब्राह्मणाला कुपथ्य होतें तेंच त्याला पोटदुखीवर औषध

ठरलें हें कळतांच ग्रामवासी लोक श्रीगुरूंकडे मोठ्या आदरानें पाहूं लागले. असा आहे गुरुकृपेचा महिमा.

ज्यांच्यावर गुरुकृपा होते त्यांचे जन्मांतरींचे दोष जातात, तर त्यांच्या देहांत व्याधीला वाव कसा राहणार ? त्या ब्राह्मणाची पोटदुखी बरी झाली व सायंदेवाच्या मनांत गुरुभक्ति कायमची रुजली. त्यानें श्रीगुरूंना म्हटलें, " हे त्रिमूर्तिरूप सद्गुरु, तूंच सर्व विश्वात्मा आहेस. तुझे गुण वर्णन करणें मला शक्य नाहीं. माझ्या पुत्रपौत्रांच्या मनांत गुरुभक्ति दृढ होऊन सद्गति मिळो हीच इच्छा. श्रीगुरुराया, दुसरें असें कीं येथील यवन राजा दरवर्षी अनेक ब्राह्मणांना बोलावून त्यांचा घात करतो. आज माझी पाळी आहे. तो माझे प्राण नक्कीच घेईल. तुमची भेट झाली त्यामुळें आतां मृत्यूचें काय भय ? "

" सायंदेवा, घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. तूं त्या क्रूर यवनाला जाऊन भेट. तो तुला इजा न करतां उलट संतुष्ट होऊन स्नेहभावानें पुन्हां आमच्याकडे परत पाठवील. तूं परत येईपर्यंत आम्ही येथेंच राहूं. जा तूं निर्धास्तपणें. "

" सिद्धमुनि, त्या यवनराजानें सायंदेवाचें स्वागत कसें काय केलें तें सांगावें. माझी उत्सुकता वाढली आहे. "

" बाळ नामकरणी, ऐक तर मग त्या दुष्ट यवनाचें पारिपत्य श्रीगुरूंनीं कसें केलें तें.

• • •

# दुष्ट यवनाचें पारिपत्य

श्रीगुरूंचा वर मिळतांच, सायंदेव यवनाकडे गेला. त्या यवनराजाचा स्वभाव फार क्रूर होता. जणूं काय दुसरा यमच ! त्या सायंदेव ब्राह्मणाला पाहतांच तो क्रोधानें जळूं लागला. त्या सायंदेवाकडे पाठ फिरवून तो यवन घरांत गेला. ब्राह्मणाला आपलें आतां काय होणार याचें भय वाटत होतें. त्यानें मनांतल्या मनांत श्रीगुरूंचें ध्यान चालू केलें. त्याला वस्तुतः भिण्याचें कारण नव्हतें. गरुडाच्या पिलांना सर्प दंश करायला धजेल का ? ऐरावत-हत्ती असला तरी सिंहाला कधीं खाईल का ? अगदीं तसेंच ज्याच्या हृदयांत सतत गुरुस्मरण चालू असतें त्याला काळमृत्यु काय बाधा करूं शकणार ? अपमृत्यूचें त्याला काय भय ?

सायंदेवावर रागावून तो यवनराजा घरांत गेला, तों त्याला झोंप लागली. एवढी गाढ झोंप लागली कीं, त्या यवनाला आपल्या शरीराचेंहि स्मरण राहिलें नाहीं. एकाएकीं हृदयांत भडका होऊन तो जागा झाला तों त्याला प्राणांतिक व्यथा होऊं लागली. कोणी तरी ब्राह्मण आपल्याला शस्त्रानें मारीत असून, अवयव तोडून टाकीत आहे असें त्याला वाटलें. तेव्हां एका ब्राह्मणाला आपण बाहेर तिष्ठत ठेवलें आहे याची त्याला आठवण झाली व त्यानें धांवत बाहेर जाऊन सायंदेवाचे पाय धरले व क्षमा मागितली व सायंदेवाला वस्त्रेंभूषणें देऊन निरोप दिला, तेव्हां त्याची शरीरव्यथा बरी झाली. सायंदेव परत गेला तो शुद्धभक्तीनें भारावून ! त्याला श्रीगुरूंनीं दक्षिण भारतांत यात्रेला जाण्याकरिता बोलावतांच त्याला अत्यानंद झाला. सायंदेव श्रीगुरूंच्या शिष्यांत सामील झाला व श्रीगुरूंचा सहवास कधींही न सोडण्याचा त्यानें निश्चय ठरविला. त्यानंतर श्रीगुरु त्या नव्या

शिष्याला बरोबर घेऊन इतर शिष्यांसमवेत वैजनाथ नांवाच्या महाक्षेत्राला भेट द्यायला गेले व त्यांनीं तेथें गुप्तरूपानें राहावयाचें ठरविलें."

"अहो सिद्धमुनि, श्रीगुरूंनीं गुप्तपणें राहण्याचें कां ठरविलें?"

"अरे नामधारका, श्रीगुरूंचा महिमा प्रकट झाल्यावर सारेच लोक श्रीगुरुजवळ येऊं लागले. आलेले सर्व लोक शिष्य व्हावयाची इच्छा प्रकट करीत. ज्याप्रमाणें भार्गवरामानें सर्व पृथ्वी निःक्षत्रिय करून ब्राह्मणांना राज्य दिलें व तो स्वतः पश्चिम समुद्रकांठीं गेल्यावर तेथेंहि ब्राह्मण ठाव मागायला गेले, तेव्हां आणखी वर मागतील या भयानें परशुराम गुप्त होऊन सागरमध्यांत राहूं लागले. त्याचप्रमाणें नाना जातींचे लोक येऊन ऊठसूट वर मागावयाला लागल्यामुळें श्रीगुरूंनीं गुप्तपणें राहण्याचा निर्णय घेतला व सर्व शिष्यांना जवळ बोलावून तीर्थयात्रा करायला जाण्याची आज्ञा केली. ते शिष्यांना म्हणाले,

"शिष्यहो, तुम्हीं सर्व तीर्थयात्रा करून, बहुधान्य नांवाचें संवत्सर चालू झालें कीं श्रीशैल्य पर्वतावर मला येऊन भेटा."

"गुरुराया, तुमच्या दर्शनानेंच आम्हांला समस्त तीर्थयात्रांचें पुण्य लाभतें आहे. आमच्याजवळच निधान असतांना आम्हांला रानोरान हिंडण्याची जरूर काय? कल्पवृक्ष सोडून इतर वृक्षांचा आश्रय घेणें कितपत सुज्ञपणाचें ठरेल?"

"शिष्यांनो, आम्ही संन्यासी आहोंत. एका ठिकाणीं पांच दिवस राहूं नये. संन्यास घेतल्यावर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं हिंडावें. त्यानें मन स्थिर झालें कीं मग एका ठिकाणीं राहावयाला हरकत नाहीं. आम्हीं सांगतों म्हणून तुम्ही सर्वजण तीर्थयात्रेला जा व श्रीशैल्य पर्वतावर ठरल्याप्रमाणें परत याल त्या वेळीं परत भेट होईल."

"ठीक आहे श्रीगुरुराया, जातों आम्हीं यात्रेला, परंतु आम्हीं कोणकोत्या तीर्थांना जावें याबद्दल आम्हांला मार्गदर्शन करावें."

" बरं आहे. ऐका तर मग. "

● ● ●

# तीर्थयात्रांची माहिती

शिष्यजनहो, सर्वप्रथम तुम्हीं काशीक्षेत्राला जाऊन, गंगाभागीरथींत स्नान करा. त्यानंतर भागीरथीची साठ योजनांची पवित्र यात्रा करून प्रयागला भेट द्या. नंतर यमुना नदीकांठच्या पंचवीस गांवांना जाऊन नंतर सरस्वती नदीच्या कांठच्या चोवीस गांवीं जा. त्यानंतर वरुणा, शतद्रू, विपाकशा, वितस्ता, शरावती, मरुद्वृधा, असिक्नी, मधुमती, पयस्विनी, घृतवती या नद्यांची तटाकयात्रा तुम्ही करा. हें सर्व झाल्यावर देवनदीच्या कांठच्या पंधरा गावांची तटाकयात्रा तुम्हीं करा. जितक्या गांवांना भेटी द्याल तितकीं कृच्छ्रव्रतें आचरण्याचें फळ तुम्हांला मिळेल. चंद्रभागा, रेवती, शरयू, गोमती, वेदिका, निम्नजला, मंदाकिनी, सहस्रवक्त्रा, पुण्या, बाहुदा, वरुणा, यांच्या कांठच्या यात्राहि तुम्हीं करा. जिथें नदी-संगम असतो, तेथें स्नान करणें जास्तच पुण्यप्रद असतें. "

" सिद्धमुनि, या एवढ्या तीर्थक्षेत्रांना गेल्यावर आणखी कोणत्या तीर्थांना जावयाला सांगितलें त्या शिष्यांना श्रीगुरूंनीं ? ही यादी फारच लांबलचक दिसते. "

" अरे नामधारका, संन्यासव्रत असेंच कठीण आहे पालन करायला. निरनिराळ्या तीर्थयात्रांच्या मिषानें सर्व भारतवर्षभर, संन्यासव्रत घेतलेल्या यतींकडून साहजिकच प्रवास होत असे व विविध मनोवृत्तींचा

परिचय होऊन मनाचें स्थिरीकरण होण्याला मदत होत असे. तूं म्हणतोस त्याप्रमाणें हीं तीर्थक्षेत्रें पुष्कळ आहेत हें मान्य आहे, पण तीं पुष्कळ आहेत म्हणून त्यांचा निर्देश न करणें योग्य नाहीं.

श्रीगुरूंनीं असंख्य तीर्थक्षेत्रांचीं नांवें व महत्त्व आपल्या शिष्यांना सांगितलें व त्यांना निरोप देऊन आपण स्वतः गौप्यरूपानें वैजनाथसान्निधानींच राहिले. त्या ठिकाणीं गुप्तरूपानें एक वर्ष राहिल्यावर श्रीगुरूंना पाहतांच तिथें आलेल्या एका ब्राह्मण मुनीनें वंदन केलें. तो श्रीगुरूंच्या चरणकमलावर मस्तक ठेवून, स्तुतिस्तोत्रें गाऊं लागला. श्रीगुरूंना तो म्हणाला, " स्वामी, मला वांचवा, मी अज्ञानसमुद्रांत बुडालों आहें. आज अनेक दिवस तप करतों आहें. पण माझें मन स्थिर नाहीं. त्यामुळें सत्य ज्ञानाचा मार्ग सांपडत नाहीं आणि

" ज्ञानाविणें तपास । वृथा होती सायास ।
तुम्हां देखतां मानस । संतोषलें स्वामिया ॥ (१६.१५)
गुरुसेवा बहु दिवस । केली नाहीं सायास ।
याचि कारणें मानस । स्थिर नोहे स्वामिया ॥ (१६.१६)

हे गुरुराया, तूं विश्वाचा तारक आहेस. म्हणून मला उपदेश करून ज्ञानप्राप्तीचा दरवाजा आपण उघडा करावा. "

" तुला गुरूशिवाय मुनिपण कसें मिळालें तें आधीं मला सांग. "

" गुरुराया, काय सांगूं हो ! आठवण झाली तरी अजून दुःख होतें व माझ्या डोळ्यांतून आसवें ओघळूं लागतात. मीही पूर्वी एका गुरूला शरण गेलों होतों, त्याचें बोलणें अतिशय निष्ठुर होतें. त्यानें माझी खूप गांजणूक केली. नको तें करायला तो मला सांगावयाचा. वेद शिकायला राहिलों होतों, तर वेदशास्त्रांचें अध्ययन मात्र कधींच शिकविलें नाहीं. एकसारखा ' तुझें अन्तःकरण अद्याप स्थिर नाहीं, आणखी सेवा कर. ' असें सांगायचा

व मी त्याचें ऐकलें नाहीं कीं माझ्यावर रागवायचा. असें असूनहि त्या गुरूजवळ मी कसेवसे अनेक दिवस काढले. पण अखेर त्याचा जाच सहन न होऊन मी तेथून त्या गुरूवर रागावून येथें आलों आहें."

"अरे ब्राह्मणा, तूं स्वतःचा घात केला आहेस. एखाद्या मूर्खानें आपल्या घरांतील देव्हाऱ्यावर मलविसर्जन करून आपलें असेंच अदृष्ट आहे असें सर्वांना सांगावें, तसें तुझें अंतःकरण आहे. आपलें नाक कापून पुढल्यांना अपशकून करणारांपैकीं तूं एक आहेस. तूं आपले गुण कधीं विचारांत घेतलेस का? तुला ज्ञानप्राप्ति कशी होणार? तूं तर देशद्रोही आहेस. आपल्या गुरूंच्या गुणदोषांचें वर्णन तूं सदैव मोठ्या आनंदानें सांगतोस, मग तुझें मन स्थिर होणार कसें व तुला ज्ञानलाभ होणार कसा? जवळची कामधेनु टाकून तूं आलास. कारण,

संतोष होतां श्रीगुरूसी। अष्टसिद्धि त्याच्या दासी
क्षण न लागतां परियेसी। वेदशास्त्रें त्यासी साध्य ॥ १६·३२॥

"श्रीगुरुराया, हे जगद्गुरु, मला गुरुरूपाचें ज्ञान झालें नाहीं. तरी गुरु कसा ओळखावा, त्याची सेवा कशी करावी हें सर्व सविस्तर सांगा, म्हणजे माझें मन स्थिर होऊन श्रीगुरूची ओळख पटेल."

"ठीक आहे. ऐक तर मग गुरूंचें लक्षण.

गुरु म्हणजे जनकजननी होय. जो कोणी उपदेशकर्ता असेल तोच परमगुरु जाण. गुरु म्हणजेच सर्व देव अशा भावनेनें त्याची भक्तिपूर्वक सेवा करावी. महाभारताच्या आदिपर्वांतील धौम्यऋषि व त्यांच्या तीन शिष्यांची कथा या दृष्टीनें तुला उद्बोधक वाटेल.

● ● ●

# धौम्यऋषि व त्यांचे तीन शिष्य

द्वापारयुग संपत आलें होतें त्या वेळची गोष्ट. धौम्यऋषींच्या पवित्र आश्रमांत त्यांचे तीन शिष्य त्यांच्याजवळ वेदाभ्यास करण्याकरितां राहिले होते. आरुणि पांचाळ, बैद व बाळ उपमन्यु अशीं होतीं त्यांचीं नांवें. ज्ञानार्जन करावयाला आलेल्या शिष्यांकडून सेवा करवून घ्यावयाची, त्यांची सत्त्वपरीक्षा पाहावयाची व त्यांच्या अंतःकरणांत खरी तळमळ आहे असें आढळलें, तरच त्याला विद्या शिकवावयाची. अशी होती प्राचीन काळच्या गुरूची विद्यादानाची पद्धत. आरुणि पांचाळ या आपल्या शिष्याला याच हेतूनें एक दिवस धौम्यऋषींनीं आपल्याजवळ बोलाविलें, व ते त्याला म्हणाले—

"बाळा आरुणि, आज आपल्या रानांत जें शेत आहे ना, त्याला पाणी लावावयाचें आहे." मळ्यांतलें पाणी काल्व्यांतून शेतांत वाहात होतें, पण तें जोरदार वाहणारें पाणी कांहीं केल्या शेतांत सांठवणें कठीण होतें. आरुणीनें शेताच्या खालच्या मेरेवर कांहीं दगड उभे केले व पाणी थांबविण्याचा प्रयत्न केला, पण थोड्याच वेळांत त्या मातीच्या बांधाला भगदाड पडलें व पाणी वाहून जाऊं लागलें. आरुणीला काय करावें तें सुचेना. अखेर तो स्वतःच त्या बांधाच्या भगदाडांत झोंपला व त्यामुळें पाणी बऱ्याच प्रमाणांत अडून राहिलें. प्रवाहाचें अर्धें पाणी शेताकडे गेलें. अशा रीतीनें सूर्योदय झाल्यावर शेतावर गेलेला आरुणि, सूर्य मावळला तरी त्या शेताच्या बंधाऱ्यांतील पाण्यांतच झोंपून राहिला होता. गुरूच्या आज्ञेचें पालन करीत होता तो. आश्रमांत परत जावें तर शेतांतलें सर्व पाणी वाहून जाऊन गुरूची आज्ञा मोडल्यासारखें होईल या भीतीनें आरुणि होता तिथेंच राहिला. तिकडे शिष्यवत्सल धौम्यमुनींना आरुणीची काळजी

वाढूं लागली. काळोख पडला तरी आरुणि परत आला नाहीं, हें पाहून मुनि स्वतः शेतावर गेले व शेतांत पाणी खूप सांठविलेलें दिसतांच त्यांना फार आनंद झाला. पण आरुणि कुठें दिसेना. त्याला वाघानें तर खाल्लें नाहीं ना, असांहि दुःखद विचार धौम्यमुनींच्या मनांत चमकून गेला. अखेर त्यांनीं आरुणीला मोठ्यानें हांक मारली. तेव्हां त्यांना शेताच्या खालच्या बांधाकडून आवाज आला. त्यांनीं त्या ठिकाणीं जाऊन पाहिलें तों आरुणि पाण्याच्या प्रवाहांत झोंपून पाणी अडवीत आहे हें दृश्य त्यांना दिसलें. तिथूनच त्यानें ओ दिली होती. तें पाहून धौम्यऋषींना गहिंवर आला. आरुणीच्या थोर गुरुभक्तीमुळें त्यांना संतोष वाटला व त्यांनीं आरुणीला पाण्यांतून बाहेर यावयाला सांगितलें.गुरूची आज्ञा होतांच आरुणि पाण्यांतून बाहेर आला व त्यानें भक्तिपूर्वक धौम्यऋषींना नमन केलें. त्याला प्रेमभरानें पोटाशीं धरून धौम्यऋषींनीं त्याला आशीर्वाद दिला व तत्क्षणीं त्या आरुणी पांचाळाला दिव्य ज्ञानाचें स्मरण झालें. तो विद्यावंत व ज्ञानी झाला व श्रीगुरूंनीं निरोप देतांच, सर्व वेदशास्त्रें व व्याकरण याचें ज्ञान मिळून तो आपल्या घरीं परत गेला.

त्यानंतर कांहीं महिने गेले. पेरलेलें शेत पिकावयाला झालें.तेव्हां धौम्यऋषींनीं बैद नांवाच्या दुसऱ्या शिष्याची सत्त्वपरीक्षा पाहण्याचें ठरविलें, व त्याला जवळ बोलावून शेताची राखण करावयाला जाण्यास सांगितलें. शेताची राखण करून, धान्य पूर्ण पिकल्यावर कापून घरीं आणण्याची कामगिरी गुरूनें त्याला सांगितली होती. त्याप्रमाणें शेत पिकेपर्यंत बैद शिष्यानें अहोरात्र कष्ट करून गुरूच्या शेताची राखण केली व शेत पूर्ण पिकतांच त्याची कापणी करून एक मोठी रास घातली व गुरूंना सांगायला गेला. तेव्हां गुरूंनीं संतुष्ट होऊन एका गाड्यांतून तें धान्य घरीं आणावयाला सांगितलें. त्या गाडीला रेडा जुंपला होता. शेतावर पोचल्यावर दोन खंडी साळीचें भात त्यानें गाडीवर भरलें व रेडा गाडीला बांधून

त्याला हाकूं लागला. त्या रेड्याला एवढें जड ओझें ओढणें जड जाऊं लागलें. तेव्हां त्या वैद शिष्यानें स्वत:लाच गाडीला जुंपून घेतलें व रेड्या-बरोबर आपणही धान्याची गाडी ओढूं लागला; पण वाटेंत तो रेडा चिख-लांत रुतला, म्हणून बैदाला फार चिंता वाटूं लागली. तेव्हां रेडा सोडून देऊन गाडा चिखलांतून बाहेर ओढून काढला व त्यानें आपल्याला एक-ट्यालाच गाड्याला जुंपून घेतलें. त्याचे गाडा ओढतांना प्राण कंठांत आले. एवढ्यांत धौम्यमुनि स्वत: त्याला उशीर झाला म्हणून शोधीत तेथें आले. बैदाला तशा विकल अवस्थेंत गुरूवरील निष्ठेमुळें गाडा ओढतांना पाहून त्यांचा जीव तुटला व त्यांनीं त्याला गाडीच्या जोखडांतून सोडवून प्रेम-भरानें आलिंगन दिलें व त्यालाहि वर देऊन सर्व विद्या शिकविली. यथा-वकाश तो दुसरा शिष्य बैदही गुरूची परवानगी मिळतांच आपल्या घरीं परत गेला.

आतां तिसरा शिष्य बाळ उपमन्यु तेवढा त्यांच्या जवळ होता.त्याचीहि परीक्षा बघावी असें ठरवून धौम्यमुनि त्याला म्हणाले—

• • •

## बाळ उपमन्यूची गोष्ट

“ बाळ उपमन्यु, तूं उद्यांपासून रोज आमचीं गुरें रानांत चरायला घेऊन जात जा. ”

“ गुरुजी ठीक आहे. उद्यांपासून मी रोज रानांत जाईन. ” उपमन्यू म्हणाला.

त्याप्रमाणें कांहीं दिवस तो उपमन्यु रोज गुरें चारावयाला रानांत घेऊन जाऊं लागला. एक दिवस धौम्यऋषींच्या असें लक्षांत आलें कीं, उपमन्यु रोज लवकर परत येतो. त्याला अति आहाराची सवय होती, म्हणून त्याला विद्येंत स्थिर गति नव्हती. हें जाणून मुद्दामच गुरूनें त्याला हें अवघड काम सांगितलें होतें. त्यामुळें उपमन्यूनें, " गुरुजी, मला फार भूक लागते म्हणून संध्याकाळीं लवकरच गुरें घरीं परत आणतों. " असें उपमन्यूनें सांगतांच गुरु म्हणाले,

" उपमन्यु, असें नाहीं चालावयाचें. रोज सूर्य मावळेपर्यंत गुरें चारायला पाहिजेत. नंतरच त्यांना घरीं आण. लवकर घरीं आणलेलें मला नाहीं चालावयाचें ! "

" गुरुजी, मला क्षमा करा. यापुढें मी कधीं सूर्यास्त झाल्याशिवाय घरीं परत येणार नाहीं ! " असें उपमन्यूनें गुरूला आश्वासन दिलें.

त्या प्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं उपमन्यु रानांत गेल्यावर, दुपारीं त्याला भूक लागली. तेव्हां गुरें नदीतीरावर चरत असतांना, उपमन्यूनें स्नान केलें व जवळच्याच ब्राह्मणांच्या घरीं भिक्षा मागून आणली व यथेच्छ भोजन केलें.त्यामुळें सूर्यास्त होईपर्यंत गुरें राखावयाला त्याला उत्साह आला. उपमन्यूला रोज रानांत जातांना कांहीं खावयाला बरोबर देत नसतांनाहि तो संध्याकाळीं परत येतांना अगदीं थकून कसा जात नसे, याचें धौम्यमुनींना आश्चर्य वाटलें. एक दिवस त्यांनीं त्याबद्दल उपमन्यूला विचारतांच, तो प्रामाणिकपणें धौम्यगुरूंना म्हणाला, " गुरुजी, मी दररोज दुपारीं रानांत भिक्षा मागतों व माझी भूक भागवितों. त्यामुळें मला गुरें राखायला तजेला वाटतो. "

" अरे उपमन्यु, हें बरोबर नाहीं. भिक्षा मागतोस ती उद्यांपासून आश्रमांत माझ्याकडे आणून दे व मी देईन तेव्हांच तूं अन्न सेवन करावयाचें ! "

उपमन्यूनें त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं दुपारीं भिक्षा मागितली व ती धौम्यमुनींकडे घरीं नेऊन पोंचविली व परत रानांत गेला. त्याला तर आतां कडकडून भूक लागली होती. गुरें नदीकांठीं चरतच होतीं. तेव्हां उपमन्यूला एक युक्ति सुचली व त्यानें दुसऱ्या पांच घरीं भिक्षा मागितली व ती आपण जेवला, तेव्हां कुठें त्याला जरा बरें वाटलें व तो मग आनंदानें घरीं गेला. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर धौम्यमुनींना संशय आला तेव्हां त्यांनीं उपमन्यूला त्याबद्दल विचारतांच, त्यानें दुसऱ्यांदा भिक्षा मागीत असल्याचें कबूल केलें. तेव्हां अतिशय चिडून धौम्यऋषि त्याला म्हणाले, " अरे उपमन्यु, तूं कसला गुरुभक्त ! मला दिल्याशिवाय दुसऱ्यांदां भिक्षा मागून ती जेवतोस हें बरें नव्हे. दुसरी भिक्षा मागतोस तीहि परत आणून दे घरीं."

" गुरुजी, केवळ भुकेमुळें माझ्या हातून हा प्रमाद घडला. तरी मला क्षमा करावी."

त्याप्रमाणें दुसऱ्या दिवसापासून उपमन्यु त्याप्रमाणें दोनदां भिक्षा मागून ती परत घरीं आणून देऊं लागला, पण घरीं परततांना सायंकाळीं त्याचे प्राण भुकेनें कासावीस होऊं लागले. त्यामुळें पुढील दिवशीं रानांत गेल्यावर दुपारीं दोन वेळची भिक्षा आश्रमांत पोंचवून आल्यावर, भुकेनें व्याकुळ झालेला उपमन्यु चिंतामग्न बसला असतांना, रानांत वांसरें गायींचें दूध पीत होतीं, तीं त्यानें पाहिलीं. वांसरें दूध पीत असतांना, त्यांच्या तोंडांतून दूध खालीं सांडत होतें. तें पाहून उपमन्यूला एक कल्पना सुचली व दूध पिण्याला गुरूची मनाई नाहीं असें ठरवून, त्यानें तें वासरांच्या तोंडून खालीं जमिनीवर पडणारें दूध, हाताच्या ओंजळींत धरून तें पोटभर प्यालें, तेव्हां त्या गोड गोरसामुळें त्याची भूक भागली व चेहऱ्यावर भुकेची ग्लानि जाऊन टवटवी वाढूं लागली. धौम्यऋषींना पुनः आश्चर्य

वाहूं लागलें व उपमन्यु दिवसेंदिवस धष्टपुष्ट कसा होत होता,याचें त्यांना नवल वाटलें.

त्यांनीं उपमन्यूला त्याबद्दल विचारतांच वांसरें गायींचें दूध पीत असतांना, जें दूध जमिनीवर गळून पडत असे तें आपण पितों असें त्यानें प्रामाणिकपणें कबूल केलें. तेव्हां धौम्यऋषींना त्याचा फार राग आला व ते म्हणाले—" अरे मूर्खा, उष्टें दूध पिऊन तूं आणखीच मठ्ठ होशील. तेव्हां यापुढें असलें वासरांचें उष्टें दूध पिऊं नको. "

त्याप्रमाणें उपमन्यूनें कबूल केलें व झाल्या अपराधांची क्षमा मागितली. दुसऱ्या दिवशीं रानांत गेल्यावर उपमन्यूचा नाइलाज झाला. त्यानें दोनदां मागितलेली भिक्षा आश्रमांत परत नेऊन दिली व वासरांचें उष्टें दूधहि प्यायला गुरूंनीं मना केलें होतें त्यामुळें भुकेनें त्याचा जीव व्याकूळ झाला. त्यानंतर कांहीं गाई जवळच्याच रुईच्या झाडाजवळून जात असतांना, त्याच्या कांहीं फांद्या मोडल्या व त्यांतून दुधासारखा पांढरा सफेत चीक वाहूं लागलेला उपमन्यूनें पाहिला. त्याला वाटलें भूक भागवायला तो चीक प्यावयाची तरी गुरूंनीं मनाई केलेली नाहीं. त्यामुळें उपमन्यूनें तो रुईचा चीक प्यावयाचें ठरविलें. पानांचा द्रोण करून चीक त्यांत भरून घेत असतांना तो चीक त्याच्या डोळ्यांत उडाला व तो दोन्ही डोळ्यांनीं आंधळा झाला. तरीसुद्धां गुरूंचीं गुरें राखायचा प्रयत्न तर त्याला करावयाचा होताच.त्याच परिस्थितींत चांचपडत तो रानांत भटकत होता.हातांत एकहि काठी नव्हती. तशा परिस्थितींत तो वाटेंत असलेल्या एका ओसाड विहिरींत पडला. विहिरींत पडल्यावरहि त्या उपमन्यूला चिंता लागली होती ती धौम्यमुनींच्या गाईवासरांची. गाईगुरें आतां चुकणार व गुरु आपल्यावर रागावणार याचेंच त्याला भय पडलें होतें. सूर्य अस्ताला गेला तरी गुरें परतलीं नाहींत, म्हणून धौम्यमुनींना काळजी वाटूं लागली. ते स्वतः रानांत गेले. तेथें त्यांना सर्व गाईवासरें दिसलीं. तीं सर्व घराकडच्या रस्त्याला जाण्या-

करितां एकत्र जमत होतीं. बाळ उपमन्यु कुठें दिसेना म्हणून त्या धौम्य-ऋषींनीं उपमन्यूला हांक मारावयाला सुरुवात केली. तेव्हां दूरवरच्या एका खोल दरींतील विहिरींतून उपमन्यूनें ओ दिली. त्या आवाजाच्या रोखानें धौम्यऋषि धावतच गेले व विहिरींत पडलेला उपमन्यु त्यांना आढळला. त्यानें विहिरींतूनच आपली दृष्टि गेल्याचें सांगितलें. तेव्हां त्यांनीं त्या उपमन्यूला अश्विनीकुमारांचें स्तुतिस्तोत्र गाण्यास सांगितलें. अश्विनी-कुमारांनीं त्या स्तुतीनें प्रसन्न होऊन, त्याला एक अपूप दिला व तो खाल्ल्यावर त्याला दृष्टि येईल असें सांगितलें. परंतु धौम्यमुनींच्या पर-वानगीवांचून, कांहींही न खाण्याचा आपला निर्णय त्यानें अश्विनीकुमारांना सांगतांच, त्यांना त्याची गुरुभक्ति पाहून जास्तच आनंद वाटला व त्यांनीं आपल्या कृपाप्रसादानें उपमन्यूची गेलेली दृष्टि परत आणली व उपमन्यूला गुरूसमोर आणून उभें केलें. त्या वेळीं उपमन्यूनें धौम्यमुनींच्या पायांवर लोळण घेतली व तो म्हणाला, “ गुरुमहाराज, मी तुम्हांला न विचारतां भुकेनें व्याकुळ होऊन, रुईच्या झाडाचा चीक प्यावयाला गेलों असतां तो चीक माझ्या डोळ्यांत उडाला व मी आंधळा झालों होतों. त्यामुळें गुरें राखण्याच्या माझ्या कर्तव्यांत कसूर झाली आहे. या चुकीची मला क्षमा करावी. आपलें मन मोठें म्हणून मला शोधायला आलांत. केवळ आपल्या-मुळेंच मला पुन्हां दृष्टि आली. ”

“ बाळ उपमन्यु, ऊठ. तुझ्या भक्तीनें मी संतुष्ट झालों आहें. तुला सर्व शास्त्रांचें ज्ञान माझ्या आशीर्वादानें होईल. ” त्याप्रमाणें होऊन, त्यांचा तिसरा शिष्यहि आपल्या घरीं परतला. धौम्यमुनींनीं त्याला निरोप देतांना म्हटलें, “ बाळ, तुझी कीर्ति सर्व जगांत पसरेल. तुझे पुष्कळ शिष्य होतील. त्यांतला उत्तङ्क नांवाचा शिष्य प्रसिद्ध होईल. तोच तुझ्या पत्नीकरितां जनमेजयराजाच्या पत्नीचीं कुंडलें आणील, व वाटेंत सर्पराजाकडून तीं कुंडलें हिरावून घेतलीं जाऊन, तीं तुझ्या कृपेनें परत मिळवील. पुढें तक्षकाच्या

कृत्याचा सूड उगविण्याकरितां जनमेजयामार्फत तो शिष्य उत्तङ्क सर्पयज्ञ करील. तक्षकाला वांचविण्याकरितां, प्रत्यक्ष इंद्राला भूतलावर यायला लावील. तुझ्यासारख्या गुरूच्या कृपाप्रसादानें उत्तङ्कासारखे तुझे शिष्य, असलीं मोठीं कृत्यें पूर्ण करूं शकतील." ही धौम्यऋषींची भविष्यवाणी ऐकून संतुष्ट मनानें उपमन्यु आपल्या गांवीं परत गेला.

" तेव्हां हे ब्राह्मणा, तूं आपल्या गुरूला सोडून उगीचच अविवेकाच्या प्रभावामुळें इकडे तिकडे हिंडून, आपलें जीवन बरबाद करून घेऊं नकोस."

"गुरुराया, तूं माझें मन साफ केलेंस. माझी चूक मला आतां चांगलीच कळून चुकली आहे. माझ्या हातून घोर पातक घडलें आहे. मी गुरुद्रोही ठरलों आहें. मी गुरूचें मन दुखविलें आहे. सोनें, लोखंड वगैरे धातु तोडले तर पुन्हां सांधतां येतात. परंतु मोतीं फुटलें तर पुन्हां सांधतां येत नाहीं. एकदां का मनें दुखविलीं कीं तीं पुन्हां एकत्र आणण्याकरितां किंवा सांधण्याकरितां फार मोठे प्रयास पडतात. आतां मी गुरूकडे परत कसा जाऊं ? ते मला आश्रय देणें शक्य नाहीं. तेव्हां आतां माझ्या या दुर्दैवी जीवनाचा काय उपयोग ? त्यापेक्षां मी आतां प्राण देईन."

अशा रीतीनें श्रीगुरु नृसिंहयतींना सांगून तो ब्राह्मण खरोखरच पश्चात्ताप होऊन आत्महत्या करावयाला निघाला. गवताला विस्तवाचा स्पर्श झाला कीं तें जळून भस्मसात् होतें,कापराच्या वडीला अग्नि लावतांच ती कापराची वडी पेट घेऊन क्षणांत भस्मसात् होते, त्याप्रमाणें त्या ब्राह्मणाचा अहंकार ताबडतोब जळून जाऊन त्याचें अंतःकरण निर्मळ झालें. खरा पश्चात्ताप झाला असतांना शतजन्मांचीं पापें जळून जातात. त्या ब्राह्मणाला खरोखरच प्राण देण्याच्या निर्धारानें दूर जातांना पाहून, श्रीगुरूंनीं त्याची मनोवस्था ओळखली व नंतर त्या ब्राह्मणाचा पाठलाग

करून त्याला जवळ बोलावण्याकरितां हांक मारली. श्रीगुरूंची हांक ऐकतांच जो ब्राह्मण जीव देणार होता, तो पाठीं परतला व श्रीगुरूंच्या चरणांवर त्यानें लोळण घेतली. तेव्हां श्रीगुरु त्याला म्हणाले," अरे ब्राह्मणा, तुझ्या मनांत खरें वैराग्य उपजलें आहे. तुझें दुष्कृत्य जळून गेलें आहे. आतां तूं एकचित्तानें आपल्या गुरूचें स्मरण कर. गुरुचरणांचें स्मरण करणें, हाच दुरितांचें तिमिर हरण करण्याचा खात्रीचा उपाय. "

" श्रीगुरुराया, मी माझ्या श्रीगुरुचरणांचें स्मरण करतोंच, पण आतां आपणच माझा उद्धार करा. " असें त्या ब्राह्मणाचे सद्गदित बोल ऐकतांच श्रीगुरूंना त्याची दया आली. त्यांनीं त्याच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेवतांच, त्याला सर्व ज्ञानाची प्राप्ति झाली. मग श्रीगुरूंच्या आज्ञेप्रमाणें तो आपल्या गुरूकडे निघाला. तो आपल्या गुरूकडे पोंचतांच, त्याच्या गुरूला संतोष वाटला व त्यानें शिष्याला क्षमा करून, पोटाशीं धरलें. त्या ब्राह्मणाला योग्य मार्ग दाखवून दिल्यावर, श्रीगुरु भिलवडी गांवाला गेले. कृष्णानदीच्या पश्चिम कांठावर हें गांव असून तेथें एक मोठा औदुंबरवृक्ष होता. त्या वृक्षाखालीं श्रीगुरु गुप्तपणें राहूं लागले. त्या भिलवडी गांवीं श्रीगुरु राहावयाला लागल्यापासून त्या स्थानाचा महिमा फारच वाढला.

" यतिराज, आपण थांबलांत कां ? त्या भिलवडीक्षेत्रांत श्रीगुरूंच्या कृपेनें कोणाचा उद्धार झाला, तिथें श्रीगुरूंच्या शक्तीचा कोणाकोणाला अनुभव आला तें सर्व मला जरूर सांगा. मी तें सर्व ऐकायला अगदीं अधीर झालों आहें. "

" ठीक आहे. ऐक तर मग, एका देवीभक्त ब्राह्मणाचा गुरुभक्तीनेंच शेवटीं कसा उद्धार झाला ती गोष्ट.

● ● ●

# देवीभक्त ब्राह्मण गुरुभक्त झाला

कृष्णावेणीच्या तटाकावर, भुवनेश्वरीच्या पश्चिमेला, औदुंबरवृक्षाजवळ श्रीगुरु राहात असतांनाची गोष्ट. श्रीगुरु त्या जागीं गौप्यरूपानें राहात असत. ते विविध रूपें घेऊन भक्तांवर अनुग्रह करण्याकरितां ठिकठिकाणीं हिंडत असत व उदरनिर्वाहाकरितां भिक्षा मागत असत. सर्व जगाचे स्वामी असून मानवी अवतारांत संन्यासवृत्तीचें आचरण करतांना, मानवी संन्याशाप्रमाणें घरोघर भिक्षा मागण्यांत त्यांना संतोषच वाटे. श्रीगुरु प्रथम जरी गुप्त-रूपानें तेथें होते तरी त्यांच्या त्या वास्तव्यानेंहि त्या स्थानाचें माहात्म्य नकळत वाढत होतें. कारण,

> लपवितां दिनकरासी । केवीं लपे तेजोराशी ।
>
> कस्तुरी ठेवितां गौप्येंसी । सुगंध केवीं गोप्य होय ॥ (१७·१२)

श्रीगुरु ज्या ठिकाणीं राहात त्या ठिकाणीं कल्पवृक्षाखालीं बसून मिळावें तसें इच्छिलेलें फळ मिळत असे. त्यानंतर श्रीगुरूंना प्रगट होण्याची वेळ, त्या ठिकाणीं एकदां आली ती अशी—

करवीरक्षेत्रांत एक वेदशास्त्रपारंगत ब्राह्मण होता. तो लोकांना पुराणें वगैरे वाचून दाखवीत असे. गांवांत पंडित म्हणून त्याचा दबदबा होता. मोठा कर्मठ होता तो. ऋग्वेदी नित्यकर्म करण्यांत त्यानें कधीं कसूर केली नाहीं. अशा त्या आचरणशुद्ध ब्राह्मणाचा मुलगा दुर्दैवानें मतिमंद उपजला. सात वर्षांचा झाल्यावर त्याची मुंज करून देण्यांत आली. तो मुलगा एवढा दुर्दैवी निघाला कीं, आईवडिलांचें कृपाछत्रहि फार दिवस त्याला लाभलें नाहीं. तेव्हां तो पोरका झाला व भिक्षा मागून राहू

लागला. इतर वेदपठण दूरच राहो, पण नुसता गायत्रीमंत्रहि त्याला नीट म्हणतां येईना. गांवांतील वेदशाळेंत तो जाऊन बसे. वडिलांच्या पुण्याई-वर त्याला सगळीकडे मान मिळे, परंतु शिकलेलें सारें तो क्षणांत विसरून जाई. वडील ज्ञानवंत तर मुलगा त्या विपरीत, असें लोक त्याला चिडवीत. कोणी त्याला, गळ्यांत धोंडा बांधून बावींत उडी घे, असाहि उपदेश द्यावयाला कचरत नसत. विद्यारूपी चिंतामणि ज्याच्याजवळ नाहीं त्याचा जन्म फुकट. विद्येच्या बळावर, विदेशाहि माणसाला स्वदेशाप्रमाणें होऊं शकतो. वय वाढलें तरी विद्येवांचून मोठेपण नाहीं, श्रेष्ठत्व मिळत नाहीं. राजा सुद्धां विद्वानाला मान देतो. ज्याच्याजवळ इतर धन नाहीं, त्याला विद्या हेंच धन आहे. विद्या शिकावयाचें कारण हेंच आहे. अनेक लोकांचा असा उपदेश ऐकून तो आपल्या उद्धाराचा व विद्या येण्याचा कांहीं उपाय आहे का, असें सर्वांना विचारीत असे. सगळे ब्राह्मण ' पुढील जन्मांत तुला आली तर विद्या येईल,' असें त्याला हंसून सांगत. अशा प्रकारची अवहेलना सहन न होऊन तो ब्राह्मण जीवनाला विटला, वैराग्यवृत्ति त्याचे मनांत बाणली व अरण्यांत जाऊन प्राण द्यावा अशा विचारानें तो निघाला. अरण्यांत गेल्यावर, फिरत फिरत तो भिलवडी गांवीं आला. रात्रीच्या वेळीं, भुकेलेला तो ब्राह्मणाचा मुलगा तेथें पोंचला. जीव द्यावयाचे विचार त्याच्या मनांत घोळत होतेच. त्या वेळीं तो योगायोगानें भुवनेश्वरांतील जगन्मातेच्या मंदिरा-जवळ आला होता. समोर देवीचें देऊळ पाहून तो आंत शिरला. त्यानें देवीला नमन केलें. त्याला संध्या तर येतच नव्हती. स्नान करण्याचेंहि त्याच्या अंगांत त्राण उरलें नव्हतें. त्या देवळापुढेंच तो धरणें धरून बसला. अन्नपाण्यावांचून तीन दिवस त्यानें तसे काढले. तरी अंबाभवानीनें स्वप्नांत येऊन त्याला कांहीं दृष्टान्त दिला नाहीं. देवीनें आपली अशी क्रूर उपेक्षा करावी याचा त्याला राग आला. ज्या देवळांत तो बसला होता, तिथें जवळच एक धारदार दगड पडला होता. त्यानें तो टोंकदार दगड उचलला

व खाड्कन् आपली जीभ तोडून, ती देवीच्या चरणांवर अर्पण केली. विद्या तर येतच नव्हती. मग जिभेच्या तरी काय उपयोग ? असा विचार त्या दिवशीं त्याच्या मनांत घोळत होता. मोठ्या उद्वेगानें अखेर जीभच कापून टाकली त्यानें. एवढेंच करून तो थांबला नाहीं, तर त्यानें देवीच्या मूर्तीपुढें असाहि निश्चय केला,

" हे आईदेवी जगन्माते, तूं माझी कां उपेक्षा केलीस ? उद्यांपर्यंत तुझा कांहींच दृष्टान्त झाला नाहीं, तर माझें डोकें छाटून, तें कमळासारखें उद्यां मी तुझ्या पायांवर वाहीन. ' त्या रात्रीं मात्र त्याला देवीचा दृष्टान्त झाला. त्याला स्वप्नांत देवी सांगत होती—

" अरे बाळा ब्रह्मचाऱ्या, तूं माझ्यावर असा कां चिडतोस ? कृष्णानदीच्या पश्चिमेला त्वरित जा. तिथें औदुंबराखालीं एक महाबळी तापसी तुला बसलेला दिसेल. तो तुझे मनोरथ पुरे करील. " जागा होतांच देवीच्या आदेशाप्रमाणें तो ब्राह्मण, श्रीगुरु होते त्या ठिकाणीं गेला. नदीकांठीं औदुंबराखालीं त्याला देवीनें स्वप्नांत सांगितला होता तसा तापसी दिसला. त्या तपस्व्याचें त्यानें पाय धरले. श्रीगुरूंनीं संतोषानें त्याच्या डोक्यावर हात ठेवला व काय आश्चर्य ! चिंतामणीच्या स्पर्शाप्रमाणें अजब चमत्कार घडला व त्या ब्रह्मचारी बालकाला ताबडतोब जीभ फुटली. मानससरोवरापर्यंत उडत जाण्यांत एखादा कावळा जर यशस्वी झाला तर त्याचा राजहंस होतो असें म्हणतात, त्याप्रमाणें त्या ब्राह्मणाचें झालें. मातीचें सोनें होण्याची किमया गुरुकृपेंत आहे. श्रीगुरुचरणांचा स्पर्श होतांच ब्राह्मणाच्या त्या मुलाला छाटलेली जीभ आली व सर्व वेदविद्या आली. वेदशास्त्र व तर्कभाष्यांत त्याला श्रीगुरूंनीं पारंगत केलें. मूर्ख ब्राह्मण म्हणून त्याला पूर्वीं चिडविणारे लोकच त्याला आतां पालखी घेऊन आले व त्याला मोठ्या आदरानें वाजत-गाजत आपल्या गांवीं घेऊन गेले. कालचा ' ठ ' आज पंडित झाला होता. ही सर्व श्रीगुरुकृपेची महती.

सिद्धमुनींनीं सांगितलेली ही गोष्ट ऐकून नामधारकाला आनंद वाटला व त्यानें श्रीगुरूंचें चरित्र आणखी वर्णन करा, अशी त्यांना विनंति केली. तेव्हां सिद्धमुनि सांगूं लागले, "त्या भिलवडीहून श्रीगुरुनृसिंहसरस्वतींनी त्या मंदमति ब्राह्मणाकरितां प्रगट व्हावें लागल्यावर कांहीं दिवसांनीं पुढला प्रवास चालू केला. ते अनेक तीर्थें हिंडत हिंडत पंचगंगा–कृष्णा-संगमावर वसलेल्या कुरवपुराला आले. शिवा, भद्रा, भोगावती, कुंभगिरी व सरस्वती अशा पांच नद्यांचा पवित्र संगम कृष्णानदीबरोबर या ठिकाणीं होतो. त्याच स्थानाजवळ अमरपूर नांवाचें एक गांव होतें. त्यांत अमरेश्वराचें देवालय असून चौसष्ट योगिनी तिथें राहात अशी ख्याति होती. त्या गांवांत औदुंबराचें एक मोठें झाड होतें. अमरेश्वरतीर्थांत आंघोळ केली तर प्रयागस्नानाचें पुण्य मिळतें अशी ख्याति होती. त्या ठिकाणीं अमित तीर्थें होतीं, तरी कृष्णाप्रवाहांतील आठ तीर्थें विशेष उल्लेखनीय होतीं. तीं म्हणजे कृष्णा नदी पश्चिमाभिमुख वाहते त्या ठिकाणचें शुक्रतीर्थ, औदुंबराजवळील पापविनाशी काम्य व सिद्धवरदतीर्थ हीं तीन तीर्थें, पुढील संगमांतील प्रयागतीर्थ, शक्तितीर्थ, अमरतीर्थ व कोटितीर्थ हीं होत. त्या ठिकाणीं स्वयंभू श्रीगुरु औदुंबराखालीं गौप्यरूपानें राहात होते. भक्तजनांचा उद्धार करावा या हेतूनें एका एका तीर्थक्षेत्रांचें माहात्म्य वाटवीत होते व त्याकरतां वेळोवेळीं प्रगट होत होते. अशाच त्यांच्या अद्भुत चरित्रभागांतली 'मोहरांचा हंडा' ही गोष्ट आहे.

सिद्धमुनींच्या बोलण्यानें नामधारकाचें मन वेधलें गेलें व तो अधिकच लक्ष देऊन ऐकूं लागला.

●●●

98830

# मोहरांचा हंडा

त्या पंचगंगा व कृष्णानदींच्या संगमावरील गांवांत श्रीगुरु रोज भिक्षा मागावयाला माध्यान्हकाळीं जात असत. त्या गांवांत एक वेदाभ्यासक ब्राह्मण होता. त्याची पत्नी पतिव्रता होती. तो सात्त्विक ब्राह्मण कोरडी भिक्षा मागून, विधिपूर्वक आचरण करून जीवन घालवीत असे. त्या ब्राह्मणाच्या घरीं फार विस्तृत वाढलेला घेवड्याचा वेल होता. त्याला पुष्कळ शेंगा आल्या होत्या. त्या शेंगांची भाजी करून त्यावरच बरेचदां तें गरीब दांपत्य आपली गुजराण करीत असे. एवढी गरिबी असूनहि अतिथिपूजेंत त्यानें कधीं खंड पडूं दिला नव्हता. तो ब्राह्मण भक्तिपूर्वक रोज श्रीगुरूंना नैवेद्य दाखवीत असे. एक दिवस श्रीगुरु त्या ब्राह्मणाकडे भिक्षेला गेले व भिक्षेचा स्वीकार करून त्याला म्हणाले, " तुझें दारिद्र्य आतां संपलें. काळजी करूं नको. " असें सांगून परत जातांना, त्यांनीं सर्व अंगणभर जो घेवड्याचा वेल पसरला होता त्याचें मूळ छेदून टाकलें व आपण संगमावर निघून गेले. ते निघून गेल्यावर ब्राह्मणाची बायको व तिचीं मुलें दुःख करूं लागलीं. ती ब्राह्मणस्त्री म्हणत होती—

" पहा हो आमचें काय दुर्दैव आहे ! त्या यतीश्वराला आम्हीं काय उपद्रव दिला होता, म्हणून त्यानें आमच्या तोंडचा घास काढून घेतला ! आम्हीं या घेवड्याच्या शेंगा खाऊन तरी कशीबशी गुजराण करीत होतों. आम्हां गरिबांचा तेवढा आधारमुद्धां दैवानें हिरावून नेला. " त्यावर तो वेदपारंगत ब्राह्मण, आपल्या पत्नीचें सान्त्वन करूं लागला, " अग, असें त्या यतीश्वराला नांवें ठेवणें अयोग्य आहे. आपलें प्रारब्ध असेल त्याप्रमाणें सर्व कांहीं घडतें. सर्व कांहीं ईश्वराधीन आहे. विश्वव्यापक विष्णु नारायण पृथ्वीचा पालनकर्ता आहे. त्यानें किडामुंगीपासून सर्वांच्या

आहाराची व्यवस्था केलेली आहे. ‘पेरावें तसें कापावें’ अशी म्हण आहे. आपलें पूर्वजन्मींचें सुकृत किंवा दुष्कृत असेल त्याप्राणें सर्व कांहीं घडतें. आपलेंच दैव उणें असतांना, इतरांना दोष देण्यांत काय फायदा ? ते यतीश्वर आपल्याकडे भिक्षेला आले, हीच आपणांवर केवढी कृपा झाली त्यांची. त्याबद्दल त्यांच्याविषयीं कृतज्ञता न दाखवितां तूं त्यांना दोष देत आहेस हें अगदीं दोषार्ह आहे. श्रीगुरूंनीं जातांना तुमचें दारिद्र्य फिटलें असा वर दिला आहे ना ? त्यावर दृढ विश्वास ठेव. मी आतां त्या वेलाचें जें मूळ अजून जमिनींत खोलवर गेलें आहे, तेंच खणून टाकतों. म्हणजे पुनः ती वेल वाढायला नको व श्रीगुरूंना ती तोडून टाकण्याचा त्रास व्हायला नको. चल तर आण ती घरांतली कुदळ. आतांच खणून टाकतों तें घेवड्याचें मूळ.”

याप्रमाणें आपल्या बायकोला सांगून, तो ब्राह्मण खणूं लागला. घेवड्याचें मूळ खणीत असतांना, मूळ उपटल्यावर पुन्हां आसपास कुदळीनें प्रहार करतांच, खणादिशीं एका हंड्यावर आघात झाल्यासारखा निनाद झाला व तें काय आहे म्हणून त्या ब्राह्मणानें अधिक खोलवर खणतांच खूप खोल पुरून ठेवलेला एक हंडा त्याच्या हातीं आला. त्यानें तो हंडा घरांत नेला. कुतूहल जागृत झालें होतें. त्या हंड्यांत काय आहे, हें पाहण्याकरितां तो ब्राह्मण अगदीं अधीर झाला होता. त्यानें बंद हंड्याचें तोंड उघडून तो जमिनीवर उपडा केला तेव्हां त्यांतून मोहरा व सोन्याचीं नाणीं यांची एक रास त्या दांपत्यापुढें पडली ! तें निधान म्हणजे एक गुप्त खजिनाच होता. घेवड्याचें मूळ समूळ खणून टाकल्यामुळें त्या ब्राह्मणाला तो मिळाला. भिक्षेला आलेला यतीश्वर, ईश्वरी अवतारच असावा याबद्दल त्या दांपत्याची खात्री पटली व तावडतोब संगमावर जाऊन त्यांनीं श्रीगुरूंची मनोभावें पूजा केली. श्रीगुरु त्यांना म्हणाले, ‘हें नवलविशेष गुप्त ठेवा. लोकांत याचा डांगोरा पिटूं नका. तुमच्या वंशांत अखंड लक्ष्मी नांदेल, परंतु आमची

माहिती इतर लोकांत फोडलीत, तर तुमचें सर्व वैभव जाईल. आम्हांला अजून कांहीं दिवस गुप्तरूपानेंच राहावयाचें आहे. जा तर आपल्या घरीं. सुखानें नांदा. " श्रीगुरूंचा असा वर लाभतांच, तो ब्राह्मण व त्याची पत्नी त्वरित घरीं गेलीं व तें वर्तमान गुप्त ठेवण्याचें त्यांनीं दहादां घोकलें. श्रीगुरूंच्या कृपेनें तीं दोघें सुखानें राहूं लागलीं. "

त्यानंतर सिद्धमुनींना मधेंच थांबवून नामधारक म्हणाला, " मुनिराज, श्रीगुरु औदुंबराखालींच कां राहात असत तें मला प्रथम सांगाल का ? "

" नामधारका, त्या औदुंबराचें माहात्म्यच मी तुला सांगणार होतों, तो तूंच प्रश्न विचारलास. वक्ता व श्रोता यांचें असें जमलें तर कथेला रंग कां चढणार नाहीं ? ऐक तर मग—

• • •

# पृथ्वीवरील एक कल्पवृक्ष

हिरण्यकशिपु नांवाचा एक दैत्य होता. देव, दानव व मानव कोणाकडूनहि आकाशांत, घरांत, घराबाहेर वा कोठेंहि त्याला मृत्यु येणार नाहीं असा वर ब्रह्मदेवानें त्याला त्याच्या भक्तीवर संतुष्ट होऊन दिल्यामुळें, तो फार उन्मत्त झाला होता. त्यानें स्वत:ला अजिंक्य मानणें अगदीं साहाजिक होतें. त्याच्या मुलाचें नांव होतें प्रल्हाद. तो मुलगा मात्र विष्णुभक्त निपजला. त्याचे त्या हिरण्यकशिपूनें फार हाल केले. अनेकदां त्याला ठार मारण्याचे अघोरी प्रयत्नहि त्यानें करून पाहिले, पण देव तारी त्याला कोण मारी ?

अखेर दरवेळीं मृत्युमुखांतून प्रन्हाद सुखरूप परत आलेला पाहून, हिरण्यकशिपु प्रन्हादाला म्हणाला, " काय रे कारट्या, तुझा तो रक्षक देव आहे तरी कुठें ? "

" बाबा, तो चराचरांत सर्वत्र आहे. "

" महालाच्या या खांबांत आहे का ? "

" हो आहे. "

तें ऐकतांच हिरण्यकशिपूनें त्या खांबाला जोरानें लाथ मारली. तेव्हां कडाड् आवाज होऊन वरचा भाग सिंहाचा व खालचा भाग मानवशरीरासारखा अशा रूपांत श्रीविष्णु बाहेर पडले. तोच त्यांचा नरसिंहअवतार. त्यांनीं आपल्या प्रखर नखांनीं हिरण्यकशिपूला त्या महालाच्या उंबरठ्यावर, आपल्या मांडीवर घट्ट पकडून ठेवून, त्याचें पोट फाडून ठार मारलें. अशा रीतीनें भक्त प्रन्हादाला छळणाऱ्या असुराचा वध त्याला मिळालेल्या विचित्र वरावर मात करून श्रीविष्णूनें केला खरा; परंतु त्या दैत्याच्या पोटांत जें कालकूट विष होतें, तें त्या नृसिंहरूपी विष्णूंच्या नखांत भरलें. त्यांच्या नखांचा दाह होऊं लागला. तीं भयंकर तापलीं होतीं. या वेळीं महालक्ष्मीनें, मोठ्या प्रेमभरानें जवळच्याच औदुंबरवृक्षाचीं पिकलेलीं फळें आणलीं व श्रीनृसिंहांना त्या फळांत आपलीं नखें खुपसावयाला सांगितलें. त्या औषधाचा अप्रतिम परिणाम झाला व नृसिंहांच्या नखांचा दाह शांत झाला. उग्ररूप नरसिंह शांत झाला. तेव्हां लक्ष्मीवर विष्णु प्रसन्न झालेच, परंतु त्यांनीं त्या औदुंबरालाहि मोठ्या प्रेमानें आशीर्वाद दिला--

" हे औदुंबरवृक्षा, तुला सदैव फळें येतील. तुझें नांव कल्पवृक्ष असें प्रसिद्ध होईल. तुझें भक्तीनें पूजन करणाऱ्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील. तुझें दर्शन होतांच उग्र विष्णु सुद्धां शांत होईल. ज्यांना मूलबाळ नसेल त्यांनीं तुला नियमित प्रदक्षिणा घालतांच अपत्यप्राप्ति होईल. "

औदुंबराला भूतलावरील कल्पवृक्ष म्हणतात तें यामुळेंच.

●●●

# नदींत स्वर्गीय महाल

श्रीगुरु नृसिंहयति नरसिंहमंत्राची उपासना करतांना औदुंबराखालीं असत. ते स्वतः नरसिंहाचेच अवतार. त्यामुळें मागील अवतारा-प्रमाणेंच औदुंबराची शीतलता अजूनहि त्यांना आवडत होती. अमरेश्वर-सान्निध्यांत राहात असतांना, माध्यान्ह काळीं चौसष्ट योगिनी तेथें येऊन श्रीगुरूंची पूजा करीत व नंतर त्यांना आपल्या मंदिरांत घेऊन जात. त्यांच्या-कडून श्रीगुरु पुन्हां औदुंबराखालीं परत येत. त्या वेळीं श्रीगुरुयति गांवांत भिक्षा मागायला जात नसत. त्यामुळें सदासर्वकाळ अरण्यवासांत राहणारा तो यति जिवंत तरी कसा राहतो, याचेंच सर्वांना आश्चर्य वाटूं लागलें.एखाद्या इसमाला पाळतीवर ठेवून तो यति दुपारच्या वेळीं काय करतो हें बघावें,असें ठरविण्यापर्यंत लोकांच्या कुतूहलाची मर्यादा गेली. त्याप्रमाणें कांहीं ब्राह्मण लोक माध्यान्हसमयीं श्रीगुरूंचा अंत पाहावयाला संगम-स्थानावर गेले; परंतु त्या ब्राह्मणांच्या मनांत अचानक भीति निर्माण झाली व मग मदोन्मत्त झालेले ते विप्र मदरहित होऊन परतले. त्या वेळीं एक गंगानुज मात्र आपल्या शेताची राखण करीत होता. त्यानें कांठावरून श्रीगुरूंना पाहिलें. योगिनी नदींतून पूजेला आल्यावर, श्रीगुरु पाण्यांतून पुढें जाऊं लागतांच, नदीचें पाणी दुभागांत होऊन, श्रीगुरूंना वाट मिळाली. त्यानंतर चौसष्ट योगिनींसह ते गंगेंत मध्यापर्यंत चालत गेले व तिथें भिक्षा

करून नंतर ते परत आले. नदीच्या पाण्यांतून वाट मिळणें व देवकन्यांकडून पूजा होणें या गोष्टी पाहून त्या वेळीं आपल्या शेतांतून तें सर्व दृश्य पाहणारा तो गंगानुज आश्चर्यचकित झाला व श्रीगुरु हे परमेश्वराचेच अवतार आहेत याबद्दल त्याची खात्री पटूं लागली. पुनः दुसऱ्या दिवशीं त्या प्रकाराची नीट परीक्षा घेण्याचें त्यानें ठरविलें. ठरल्याप्रमाणें माध्यान्हकाळीं श्रीगुरु नदीवर आले. नदीच्या पाण्यांत त्यांनीं पाऊल टाकतांच पाणी द्विभाग झालें व नदीच्या मधोमध रस्ता तयार झाला. त्यांच्या पाळतीवर असलेल्या गंगानुजानेंही त्यांच्या मागोमाग जाण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें गेल्यावर त्याला नदीच्या प्रवाहांत एक रत्नखचित गोपुरांनीं युक्त असलेलें अनुपम नगर दिसूं लागलें. दुसरी अमरावतीच होती जणूं काय ती! श्रीगुरूरूपी सूर्य उगवतांच सारे लोक आरती घेऊन आले व त्यांनीं श्रीगुरूंची षोडशोपचारांनीं पूजा केली. श्रीगुरूंनीं आपल्यामागून आलेल्या त्या गंगानुजाला विचारलें,—" काय रे, तूं कां आलास येथें ? "

" स्वामी, मी सहजच आपल्या दर्शनाला आलों आहें. हे यतिराज, तूंच गिरिजारमण शंकर आहेस. तूंच त्रिमूर्ति आहेस. तुझ्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान मायामोहामुळें मला झालें नाहीं, परंतु आतां मला आपण उद्धरावें. मी आपणाला शरण आलों आहें. "

" अरे गंगानुजा, आजपासून तुझें दैन्य संपलें व ऊर्जितावस्था चालू झाली. तुझ्या मनांतल्या सर्व कामना पुऱ्या होतील. पण ही सर्व हकीगत कोणाला सांगूं नकोस. ज्या दिवशीं या रहस्यांतलें अवाक्षर कोणाला सांगशील त्याच दिवशीं या जगाचा तूं निरोप घेशील हें लक्षांत ठेव. "

" मुनिराज, मी कोणालाहि हें वर्तमान सांगणार नाहीं. " असें बोलून श्रीगुरूंबरोबरच तोहि परत कांठावर आला. ती दिव्य नगरी लुप्त झाली व नदीचें पाणी पुन्हां पूर्ववत् वाहूं लागलें. त्याचे दोन भाग होऊन

वाट तयार झाल्याचा मागमूसहि तिथें राहिला नव्हता. कांठावर परत आल्यावर श्रीगुरु औदुंबराखालील आपल्या नित्य वसतिस्थानाकडे गेले व तो शेतकरी आपल्या शेतांत गेला. त्या दिवशीं शेताची देखभाल करतांना त्याला एक विचित्र वेल एका ठिकाणीं दिसली. ती वेल उपटून टाकावी म्हणून त्यानें प्रयत्न केला; परंतु तिचीं मुळें खोलवर गेलीं होतीं. त्यामुळें हातानें ती उपटतां येईना. कुदळ आणून खणतांच त्याच जागीं त्याला जमिनींत पुरलेला, संपत्तीनें भरलेला हंडा मिळाला. त्यानें तो निधि मिळतांच श्रीगुरूंकडे धांव घेतली व त्या दिवसापासून तो श्रीगुरूंचा निस्सीम भक्त झाला. तो गरीब ब्राह्मण आतां श्रीमंत झाला होता तरी श्रीगुरु-कृपेचा त्याला लाभलेला निधि फार मोठा होता. एकदां त्यानें काशी व प्रयाग हीं क्षेत्रें पाहण्याची उत्सुकता श्रीगुरूंना दाखविली, तेव्हां पंचगंगा-संगम म्हणजे दक्षिणेकडील काशीपुर व कोल्हापुर हेंच दक्षिण प्रयाग असें सांगून, प्रत्यक्षांत त्रिस्थळी दाखविण्याचें आश्वासनहि दिलें व व्याघ्राजि-नावर आपण बसून त्या ब्राह्मणाला तें वाघाचें कातडें मागून घट्ट पकडावयाला सांगितलें. तेव्हां योगप्रभावानें ते आकाशांतून संचार करीत लगेच म्हणजे सकाळींच प्रयागला गेले. तिथें स्नान करून माध्यान्हीं विश्वनाथाचें दर्शन काशीक्षेत्रांत घेऊन, पुढें गया या तीर्थक्षेत्रालाहि त्याला घेऊन गेले. मनो-वेगानें जाणाऱ्या त्या श्रीगुरूंना स्थलकालाच्या मर्यादेचें कसलें बंधन! सूर्यास्त होण्याच्या सुमाराला त्रिस्थळी यात्रा आटपून अमरेश्वरला परतसुद्धां आले ते. थोडीफार कीर्ति प्रगट झाली आहे, तेव्हां आतां अमरेश्वराहून गुप्त व्हावें असा विचार श्रीगुरूंनीं नंतर केला. त्या गंगानुजानें श्रीगुरूंचीं स्तुति-स्तोत्रें गायिलीं व मनोवेगानें जाण्याचा अनुभव घेऊन तो घरीं परतला. चौसष्ट योगिनींना श्रीगुरूंनीं दुसऱ्या दिवशीं, मध्यान्हीला त्या पूजेला आल्या असतांना, ती सर्व हकीगत सांगून गुप्त होण्याचा निश्चय सांगतांच त्यांनीं त्यांचे पाय धरले व श्रीगुरूशिवाय जगणें म्हणजे यमदूतांना

बोलविणें, अशी आपली स्थिति असल्याचें विनविलें. तेव्हां आपण औदुंबरावर नेहमीं राहूं, कधीं वाटेल तेव्हां माझ्या भेटीची इच्छा झाली कीं औदुंबराकडे जात जा,' असा दिलासा श्रीगुरूंनीं त्यांना दिला तेव्हां कृष्णानदीच्या पश्चिम तीरावरील खमरपूर या स्थानीं जो औदुंबर आहे तिथेंच रोज पूजेला जाण्याचें त्या चौसष्ट योगिनींनीं ठरविलें. त्या ठिकाणीं योगिनींनीं श्रीगुरूंची पूजा केली. त्या औदुंबराखालीं जप किंवा अनुष्ठान करणाऱ्याचें पाप, ताप, दैन्य, भीति, आधि, व्याधि व क्लेश सर्व कांहीं दूर होईल असा आशीर्वाद श्रीगुरूंनीं दिला व ते तेथून निघून गाणगापूरला प्रगट झाले ती औदुंबरवृक्षाची महती ऐकून नामधारकाचें कुतूहल जागृत झालें. व त्या ठिकाणीं औदुंबरोपासनेचें फल श्रीगुरु तेथून गाणगापूरला गेल्यावर कोणाला मिळालें असें त्यानें सिद्धमुनींना विचारिलें. तेव्हां अमित अशा महिम्यांपैकीं एखादीच गोष्ट सांगण्याचें ठरवून, सिद्धमुनींनीं त्या नामधारकाला मेलेला मुलगा जिवंत झाल्याची गोष्ट सांगितली.

## मुलगा जिवंत झाल्याची गोष्ट

शिरोळगांवची गोष्ट. त्या गांवांत एक सदाचारसंपन्न वेदपारंगत ब्राह्मण राहात होता. त्याची पत्नीहि शांत व सुस्वभावी होती. त्या दोघांना संसारांत इतर सुखें असलीं तरी, झालेलीं मुलें जन्मल्यावर लगेच मरत. याचें त्यांना अपरंपार दुःख होत असे. त्या ब्राह्मणाला पांच मुलगे झाले परंतु उपजतांच ते पांचहि पंचत्व पावले होते. त्या दोघां पतिपत्नींनीं अनेक देवांची

आराधना केली, पण मुलांना वांचविण्यांत त्यांना यश आलें नाहीं. तेव्हां विद्वान् पंडितांना त्याबद्दल त्यांनीं विचारलें. ज्योतिष्यांच्या मताप्रमाणें पूर्व-जन्मींचा कांहीं दोष त्यांना बाधत होता. ते म्हणाले,

" जे लोक स्त्रियांचे गर्भपात करतात ते तामसी लोक, गोहत्या करणारे, परद्रव्याचा अपहार करणारे, हे सगळे पुढील जन्मांत निपुत्रिक होतात, किंवा त्यांना झालेलीं अपत्यें वांचत नाहींत व जन्मानंतर अल्पावधींतच मरण पावतात. हे ब्राह्मणा, तूं शौनक गोत्रांतील एका ब्राह्मणाकडून पूर्वजन्मीं, कांहीं कर्ज घेतलें होतेंस. त्या ब्राह्मणानें तें परत मागितलें, तरीसुद्धां तूं तें फेडलें नाहींस. त्या ब्राह्मणाला फार दुःख झालें. तो ब्राह्मण फार लोभी होता. दिलेलें कर्ज परत येत नाहीं याची त्यानें हाय खाल्ली व शेवटीं आत्महत्या करून जीवनाचा अंत करून घेतला. तो ब्राह्मण पिशाच्च झाला आहे व आतां या जन्मीं मागील जन्माचें वैर साधण्याकरितां, तुझ्या स्त्रीचा गर्भपात करून किंवा जन्मतः तुझ्या मुलांना मृत्यु आणवून आपली पराकाष्ठा करीत आहे. तुम्हीं आपल्या पूर्वकर्माचीं फळेंच भोगीत आहांत. "

विद्वानांचें तें बोलणें ऐकून, त्या ब्राह्मणाची बायको त्यांच्या पायां पडली व झाल्या गोष्टींवर उपाय आहे का, असें तिनें विचारिलें. तेव्हां ज्योतिषी म्हणाले, —

" जेव्हां मागील जन्मांत तो तुम्हांला कर्ज देणारा ब्राह्मण जीव देऊन मेला, तेव्हां त्याचें क्रियाकर्महि न झाल्यामुळें त्याला जी पिशाचयोनि प्राप्त झाली आहे, त्याचा उद्धार होण्याकरितां मरणानंतर करावयाचीं त्याचीं सोळा कृत्यें करून त्याच्याच गोत्रांतील एखाद्या ब्राह्मणाला शंभर नाणीं दान द्या. अशा रीतीनें उपाय करून कृष्णानदीच्या कांठीं एक महिना उपवास करून राहा. पंचगंगासंगमांत पुष्कळ तीर्थें आहेत. त्या ठिकाणीं औदुंबर

वृक्षहि आहे. त्या पापविनाशी तीर्थांत स्नान करून, श्रीगुरुचरणांवर अभिषेक करून, औदुंबरवृक्षाची पूजा करून व त्याला प्रदक्षिणा घालून ब्राह्मणभोजन घाला व मग पुन: काम्यतीर्थांत स्नान करा व श्रीगुरूंची मनोभावानें पूजा करा. असें व्रत एक महिना आचरण केलेंत कीं तुमचे दोष फिटतील व तुमचे मुलगे शंभर वर्षें जगतील."

इतर सर्व विधिपूर्वक आचरण करणें जमलें असतें, पण शंभर नाणीं दान देणें कितपत जमेल याविषयीं त्या ब्राह्मणाच्या बायकोला काळजी वाटूं लागली. तिनें मोकळेपणानें त्या ज्योतिषी पंडितांना तसें सांगतांच त्यांनी श्रीगुरूंची निर्मळ मनानें सेवा केली, तरीसुद्धां पापें दूर होतील असें तिला सांगितलें.

हें ऐकतांच ती द्विजपत्नी ताबडतोब श्रीगुरु होते त्या ठिकाणीं गेली. सात वेळ संगमावर स्नान करून औदुंबराला प्रदक्षिणा घातल्या व पुन: काम्यतीर्थांत स्नान करून श्रीगुरुचरणांचें पूजन केलें. त्या चरणांना नमन करून प्रदक्षिणा घातल्या. अशा प्रकारें तीन दिवस त्या निष्ठावंत स्त्रीनें गुरुसेवा केली, तेव्हां चौथ्या रात्रीं तिच्या स्वप्नांत एक ब्राह्मण आला व म्हणाला,

"माझी शंभर नाणीं परत दे. तुझ्या नवऱ्यानें कर्जाऊ घेऊन फेडलीं नाहींत. अजून तरी तें कर्ज फेड. नाहीं तर तुझा जीव घेईन व तुझा वंश जगांत पुढें वाढूं देणार नाहीं. कशाला चालवलें आहेस उपास-तापास? फुकट आहेत ते सारे. जोंपर्यंत माझी वासना राहिली आहे, तोंपर्यंत तुझा मी असाच छळ करणार. हा तुला ठार मारतों..."

"धांवा हो धांवा! मला कुणी तरी वांचवा!" असें ओरडत ती औदुंबराआड लपली. तिथें तिला श्रीगुरु दिसले. त्यांच्यापाठी ती भीतीनें

लपली. श्रीगुरूंनीं तिला अभय दिलें व ते त्या ब्रह्मसमंधाला म्हणाले—
" काय रे, या बाईला कां मारतोस ? "

" गुरुमहाराज, मागील जन्मीं हिनें व हिच्या यजमानांनीं माझें कर्ज घेऊन तें फेडलें नाहीं, म्हणून मी आत्महत्या केली होती. त्यामुळें ही स्थिति झाली माझी. आपण सर्वांवर कृपा करतां मग माझ्या या शत्रूंविषयीं आपण कां असें पक्षपात दाखवीत आहांत ? "

"अरे ब्रह्मपिशाच्च्या, तूं माझ्या भक्तजनांना कां उपद्रव देतोस ? यापुढें जर का यांच्या वाटेला गेलास तर भयंकर शिक्षा करीन. "

" गुरुराया, तर मग हें घोर पिशाच्च्याचें जिणें टाळून माझा उद्धार कसा होईल तें तरी मला सांगा. "

" ठीक आहे. ही गरीब बाई जें कांहीं मनोभावानें देईल त्याचाच, कर्जाची फेड म्हणून स्वीकार कर. हें जर तुला पटत नसेल, तर तूं इथून निघून जा. माझी ही प्रतिज्ञा नीट ऐकून घे.

रक्षीन आपुल्या भक्तासी । अभीष्ट चिंती वंशोवंशीं ॥
पुनरपि जरी पाहेंयेसी । तरी शिक्षा करूं जाण पां " ॥२०.५६॥

" अहो स्वामि, आज तुमचे चरण दृष्टीला पडले यामुळें मी धन्य झालों. आपला निरोप मी कसा घेऊं ? आपण सांगाल तसें वागावयाला मी तयार आहें. मला माझा उद्धार व्हावा असें वाटत आहे. "

" ठीक आहे तर मग. ह्या ब्राह्मणस्त्रीनें तुझें क्रियाकर्म केल्यावर, दहाव्या दिवशीं तुला गति मिळेल. "

" बरं आहे. " असें म्हणून ब्रह्मपिशाच्च दूर गेल्यावर त्या बाईला श्रीगुरु म्हणाले,

"त्या ब्राह्मणाच्या नांवानें अष्टतीर्थांत दहा दिवस स्नान कर. औदुंबराला पाणी घाल. त्यानंतर तुला जेवढें देतां येईल तेवढें धन, त्या ब्राह्मणाच्या नांवानें दान दे. तुझें ब्रह्महत्येचें पातक फिटेल. यापुढें तुझीं मुलें जगतील व तुला सुख देतील."

इतकें होतें आहे तोंच त्या ब्राह्मणस्त्रीला जाग आली व त्या अद्भुत स्वप्नाची ती पुनःपुनः आठवण करूं लागली. श्रीगुरूंनीं स्वप्नांत सांगितलेल्या गोष्टींवर दृढ विश्वास ठेवून, तिनें त्याप्रमाणें दहा दिवस निष्ठेनें आचरण केलें, तेव्हां तिचा ब्रह्महत्येचा दोष गेला व ब्राह्मणाला गति मिळाली. अकराव्या दिवशीं रात्रीं त्या ब्राह्मणस्त्रीला पुनः एकदां श्रीगुरुनाथांचें दर्शन झालें. दोन नारळ देऊन, त्यांनीं तिची ओटी भरल्याचें तिनें पाहिलें. श्रीगुरूंनीं दिलेला, "संतानप्राप्ति होऊन तुझा वंश वाढेल" असा आशीर्वाद कानांवर रेंगाळत असतांनाच तिला एकदम जाग आली. त्या दांपत्यानें त्यानंतर श्रीगुरूंची आराधना केली. पुढें त्या ब्राह्मणस्त्रीला मुलगा झाला. आईवडिलांचा आनंद गगनांत मावेना. पहिलीं मुलें उपजत मेलीं होतीं. हा मुलगा तरी जगला होता. तो वाढूं लागला व दिवसेंदिवस आईवडिलांच्या डोळ्यांचें पारणेंहि फिटूं लागलें. मुंज करण्याचें वय होतांच त्यांनीं मोठ्या हौशीनें मुलाची मुंज करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सर्व तयारी केली, मुंजीचा दिवसही ठरला. परंतु मुंजीच्या आदल्या दिवशीं दुपारीं माध्यान्ह वेळीं त्या मुलाला एकाएकीं आजार झाला. दुखणीं तसें बघितलें तर सर्वच वाईट व दुःखकारक, पण त्यांतही धनुर्वाताचा रोग फार भयंकर! आणि तो धनुर्वातच त्या मुलाला झाला. त्याचे सर्व अवयव वांकले. तो भयानक भेसूर दिसूं लागला. याप्रमाणें तीन दिवस त्या मुलाला फार कष्ट झाले व अखेर चौथ्या दिवशीं रात्रीं आईवडिलांना दुःखांत टाकून त्या मुलानें प्राण सोडले.

तेव्हां त्याच्या आईनें मोठा आकांत केला. तिनें डोकें आपटून घेतलें. ती जमिनीवर क्षणभर निश्चेष्ट पडली होती. जाग येतांच तिनें पुन: हंबरडा फोडला. डोळ्यांतले अश्रु खळतच नव्हते. मुलाच्या प्रेताला तिनें छातीशीं कवटाळून धरलें होतें. ती ओरडत होती, रडत होती.

" अरे माझ्या बाळा, तूं कसा रे मला सोडून गेलास ? आम्हांला सोडून एकटाच कसा जातोस ? किती गुणी होता माझा बाळ ! किती गोड बोलायचा तो ! दिसायला राजबिंडा, म्हणून रोज दृष्ट काढावयाची मी तुझी. मला पांच मुलगे झाले, पण तुझ्या वेळीं गर्भारपणापासून मला मुलगा होणार अशीं लक्षणें वाटून उत्साह वाढत होता. श्रीगुरूंनीं वर दिला होता. त्यामुळें माझ्या मनाला हें मूल वांचेलच, असा तुझ्या वेळीं विश्वास होता. त्याप्रमाणें आज इतकीं वर्षें आम्हांला ळळा लावलास व आज अचानक सोडून जाणें तुला बरें दिसलें का ? अनेकदा झालेला पुत्रशोक तुझ्याकडे पाहून मी विसरलें होतें. बाळ, तुझ्याबरोबर मीसुद्धां आतां देवाघरीं येतें. "

लोकांनीं त्या स्त्रीची खूप समजूत घातली.

" देव, दानव किंवा ऋषींनाहि होणारें टाळतां आलें नाहीं. विधिलिखित अटळ आहे. हरिहरांचे अवतार झाले तेहि अमरपट्टा घेऊन आले नाहींत, मग आपण तर माणसेंच आहोंत ना ? "

लोकांचें हें सांत्वनपर बोलणें तिच्या मनाला पटत नव्हतें. ज्याच्यावर दु:खाचा आघात होतो त्याला तत्त्वज्ञान पटणार कसें ? तिच्या पतीनेंहि तिला धीर दिला; पण तिला मात्र एकसारखें तें मागचें स्वप्न आठवत होतें व मनांतल्या मनांत श्रीगुरूंना ती त्याचा जाब विचारीत होती, "अहो श्रीनृसिंहसरस्वति, मला दोन मुलगे होऊन ते सुखानें नांदतील असा वर तुम्हीं दिला होतात ना? तुम्हीच माझे वर देणारे म्हणून वरदापित आहांत. आतां मी

या मुलाच्या प्रेताबरोबर प्राण दिला कीं तुम्हांला माझ्या हत्येचें पाप लागेल. देवा, मी तुमच्यावर विश्वास ठेवला म्हणून मला असें गांजलेंत? तूं सत्य-संकल्प आहेस अशा विश्वासानें होतें, तर तूंच, माझा बाळ मेला तरी, कांहीं करीत नाहींस. आतां तुला विश्वासघातकी तरी कसें म्हणूं? तूं तर त्रैमूर्तींचा अवतार आहेस. ध्रुवबाळाला वर देणारे तुम्हीच! बिभीषणाला राज्यपद मिळवून दिलेंत तें आपणच. मग माझीच अशी निष्ठुर उपेक्षा कां केलीत? औदुंबरस्नानाचा महिमा मोठा म्हणून अनेक लोक तिथें उपासना करतात.मीहि तसें केलें होतें, तरी तूंच आमचा घात केलास अशी तुझीच अपकीर्ति जगांत पसरेल व पुढें तुझा भक्त होतांना कोणा-लाहि विचार पडेल. माझें उदाहरण ऐकून त्यांचाहि तुझ्यावर भंरवसा बसणार नाहीं. मी ब्रह्मपिशाच्चाच्या भयानें आपणाकडे आलें होतें. आपण मला अभय दिलेंत आणि आतां माझा मुलगा नेलात, म्हणजे वाघाला भिऊन गाईनें एखाद्याच्या आश्रयाला जावें तर त्यानेंच तिचा प्राण घ्यावा तशी अवस्था झाली माझी. एखादा भक्त देवळांत पूजेला जावा व तें देऊळच कोसळून त्याखालीं तो गाडला जाऊन मरावा तशांतलाच हा प्रकार!" अशा प्रकारें रात्रभर ती ब्राह्मणस्त्री शोक करीत होती. सकाळीं उजाडतांच इतर ब्राह्मण जमले व गंगेवर अंत्यसंस्कार करण्याकरितां त्या ब्राह्मणाच्या मुलाचें प्रेत नेऊं लागले, तर तिनें तें प्रेत पोटाशीं धरून पुन: एकदां हंबरडा फोडला व लोकांना म्हणाली, "या प्रेताबरोबर मला पण अग्नि-प्रवेश करावयाला देणार असलात, तरच मी प्रेत ताब्यांत देईन. माझ्या बाळाबरोबर मोठ्या आनंदानें मी चिरनिद्रा घेईन!" लोक त्यावर तिला नांवें ठेवूं लागले.

"काय मूर्ख बाई आहे! मुलाबरोबर कोणी स्वत:ला जाळून घेतलेलें ऐकिवांत नाहीं आमच्या. शिवाय आत्महत्येचें पातक आणखीच भयानक. तर चल हो दूर. आम्हांला उशीर होतो आहे. असें जगाविपरीत कधीं

घडलंय् ? मरण काय कोणाला चुकलें आहे ? आज ना उद्यां आपण सर्व जाणारच आहोंत !"—परंतु लोकांचें तिनें कांहीं एक ऐकलें नाहीं. दोन-प्रहर दिवस वर आला तरी ती बाई प्रेत सोडीना. त्यामुळें लोक खोळंबून राहिले होते. तितक्यांत तिथें एक ब्रह्मचारी आला व त्यानें तिला खूप उपदेश केला.

" अहो सिद्धमुनि, मी ओळखलें आहे तो ब्रह्मचारी कोण असावा तें. स्वतः नृसिंहसरस्वतीच आले असावेत त्या ठिकाणीं. होय ना ? "

" नामधारका, तूं अगदीं बरोबर ओळखलेंस. तुझ्या मनांतील गुरुभक्ति पाहून आनंद वाटतो मला. तर मग पुढें काय झालें तें आतां ऐक. जे कोणी यापुढील कथाभाग भक्तिपूर्वक श्रवण करतील त्यांना कसलीहि आधि किंवा व्याधि बाधणार नाहीं व त्यांना शंभर वर्षांचें पूर्ण आयुष्य लाभेल, या माझ्या सांगण्यावर विश्वास ठेव. कारण तें एक अनुभवलेलें सत्य आहे. "

" अहो सिद्धमुनि, मलाहि पूर्णायुष्य मिळावें अशी इच्छा आहे. तर मग सांगा ना ती परमपवित्र अघटित कथा. "

• • •

# ' मेलेला मुलगा जिवंत केला '

त्या ठिकाणीं आलेल्या त्या ब्रह्मचाऱ्यानें परोपरीनें सांगून त्या ब्राह्मण-स्त्रीचें समाधान करण्याचा प्रयत्न केला.

" अहो बाई, तुम्हांला एवढें दुःख वाटणें हें साहजिक आहे. पण मुलाचें प्रेत अंत्यसंस्कार करायलाहि तुम्ही देत नाहीं, हें बरोबर नाहीं.

शिवाय गेल्या जन्मीं आपण कोण होतों व या जन्माला कुठून आलों तें आपणाला समजतें का ? मरणानंतर कुठें जाणार हें तरी कुठें समजतें आहे आपल्याला ? पंचमहाभूतांचे गुण मायापाशांत वेष्टून देह ही भ्रांति निर्माण करतात. त्याला मुख्य कारण कर्म हेंच आहे. एखाद्यानें चोरी केली कीं त्याला शिक्षा होते. त्या वेळीं त्या चोराला तुरुंगांत पाहून व त्याची खडतर शिक्षा पाहून आपणाला दुःख वाटतें का ? आपण उलट म्हणतों कीं, असल्या चोराला असेंच शासन मिळालें पाहिजे. अगदीं तसेंच आपण जें या जन्मांत भोगतों तें सारें पूर्वकर्मांचें फळ असतें.

जैसी गुणाची वासना । इंद्रियें तयाधीन जाणा ।
मायापाशीं वेष्टोन । सुखदुःखें लिप्त करिती ॥ २१·९ ॥

त्यामुळें ज्ञानी मनुष्य जन्माचा आनंद व मरणाचें दुःख करीत नाहीं. पाण्यावर बुडबुडे येतात व ते लगेच नाहींसे होतात, तसेंच या मनुष्यदेहाचें आहे. कोणी उपजत, तर कोणी बालपणीं, कोणी ऐन तारुण्यांत तर कोणी म्हातारपणीं मरण पावतात; परंतु अमरपट्टा घेऊन कोण आलें आहे ? तूंच विचार कर. तुला आतांपर्यंत कोटि जन्म लाभले असतील. त्या त्या वेळीं तुझे कोणकोण नातेवाईक होते हें तुला आठवतें का आतां ? त्यांच्याविषयीं तेव्हां वाटणारा स्नेह, माया व प्रेम आतां कोठें गेलें ? जगांत इतर अनेक बालकें मरतात, त्या वेळीं तुला होतो का असाच शोक ? होत नाहीं. याचें कारण मनाची आसक्ति त्या ठिकाणीं नसते. समोरून कोणा तिऱ्हाइताची अंत्ययात्रा जात असली तर ' गेऽला विचारा ! ' एवढेंच म्हणून लगेच दुसऱ्या क्षणीं आपण आपल्या कामांत मग्न होतों; पण तोच मृत्यु आपल्या घरांत झाला तर ? अपरंपार दुःख होतें. म्हणजे, सुख व दुःख किंवा औदासीन्य आपल्या स्वतःच्याच मनावर आहे. ”

" अहो ब्रह्मचारी यति, तुमचें हें सर्व ब्रह्मज्ञान ऐकूनहि माझें मन स्थिर होत नाहीं. माझा बाळ गेला, तो काय असल्या उपदेशामृतानें परत येणार आहे का ? शिवाय,

**प्रारब्ध प्रमाण म्हणों जरी । कां भजावा श्रीहरी ।**

परिससंपर्कें लोह जरी । सुवर्ण न होय कोणा बोल ? ॥२१·३३

आम्ही दैवहीन होतों म्हणून श्रीनृसिंहसरस्वतींना शरण गेलों होतों. त्यांनींच आम्हांला अभय दिलें होतें. आमच्या मुलाला दीर्घायुष्य लाभेल असें त्यांनींच सांगितलें होतें. त्यांचा वर खोटा कसा ठरेल ? "

" अहो बाई, तुमची श्रीगुरूंवर इतकी दृढ श्रद्धा असेल तर, श्रीगुरूंचें सध्या जेथें वास्तव्य असेल तिथेंच प्रेताला घेऊन जा. जिथें तुला वर मिळाला त्या पंचगंगा कृष्णातीरावरील औदुंबराखालीं हें प्रेत ठेव. जा लवकर. "

मुलाचें प्रेत पाठीवर बांधून घेऊन त्या ब्रह्मचाऱ्याच्या सांगण्याप्रमाणें, तें तिनें श्रीगुरुपादुकांजवळ नेऊन ठेवलें. नंतर गुरुपादुकांवर आपलें डोकें आपटून घेतलें. पादुका रक्तानें माखून गेल्या. ब्राह्मणस्त्रीचा आक्रोश चालूच होता. प्रेताचा अंत्यसंस्कार करावयाला आलेल्या ब्राह्मणांचा खोळंबा झाला होता. दुपार टळली. नंतर संध्याकाळ झाली. सूर्यास्तहि झाला. रानांत चोराचिलटांचें भय फार म्हणून अंत्यसंस्कार करावयाला आलेले इतर ब्राह्मण आपापल्या घरीं परतले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुनः त्या ठिकाणीं येऊन प्रेताचा संस्कार करावा असें ठरलें. रात्रीं प्रेताला दुर्गंध सुटला कीं ती द्विजपत्नी आपल्या मुलाचें प्रेत अंत्यसंस्काराकरितां देईल, असा त्यांचा अंदाज होता. आईवडील एकटेच अरण्यांत राहिले. मुलाच्या आजारांत आधीं दोन दिवसांचें जागरण त्यांना झालें होतें. त्यामुळें त्या रात्रीं शोक करतां करतां तीन प्रहर रात्रीं त्या ब्राह्मणपत्नीला झोंप आली. तेव्हां स्वप्नांत

तिला एक जटाधारी साधु दिसला. त्यानें सर्वांगाला भस्म लावलें होतें. वाघाचें कातडें पांघरलें होतें. त्याच्या गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा होत्या. योगदंड व त्रिशूळ हातांत होता. असा तो साधु त्या स्त्रीजवळ येऊन म्हणाला,

" आम्हांला बोल लावून तूं असा आक्रोश कां करीत आहेस ? तुझ्या बाळाला काय झालें आहे ? मला सांग. मी त्या व्याधीवार इलाज करतों."

त्यानंतर आपल्या ( शक्तीनें ) चिमूटभर भस्म काढून तें त्या प्रेताला लावलें. त्या ब्राह्मणस्त्रीला, प्रेताचें तोंड जरा उघडून धरावयाला सांगून त्या यतीनें त्यांत वायु घालतांच त्या प्रेतांत चेतना आली. त्या ब्राह्मणस्त्रीलाहि त्याच वेळीं जाग आली. तिला आपण स्मशानांत, प्रेताला मिठी मारून झोंपलों आहोंत, हें पाहून फार भय वाटलें. दुःखाचा उद्वेग आतां कमी झाला होता. आपण उगाचच देवाला बोल लावला असें तिला वाटूं लागलें. तेवढ्यांत प्रेत जिवंत होऊं लागलें होतें. तिनें झटकन् तें बाजूला काढून ठेवलें. तोंपर्यंत सर्वांगांत जीव येऊन तिचा मुलगा उठूनहि बसला. " आई, मला भूक लागली आहे,खायला दे ना कांहीं तरी ! " असें मुलानें म्हणतांच, त्या आईला संतोष वाटला; पण भयहि वाटलें. त्याला भूतबाधा तर झाली नाहीं ना, असाहि संशय आला तिला. आपल्या यजमानांना तिनें जागें केलें. सर्व वृत्तांत ऐकतांच श्रीगुरूंच्या अगाध शक्तीचें त्या ब्राह्मणालाहि आश्चर्य वाटलें. त्या पतिपत्नीनें औदुंबराला प्रदक्षिणा घातल्या. दत्ताचीं स्तोत्रें म्हणत त्यांनीं रात्र काढली. देवाला प्रथम नांवें ठेविलीं होतीं याचा, त्यांना आतां पश्चात्ताप होत होता. ती ब्राह्मणस्त्री बाळाला घेऊन नदीवर आंघोळ करून आली. पादुकांवरील रक्त धुऊन टाकलें व जवळच्या शमीच्या झाडाच्या पानांनीं व कांहीं रानफुलांनीं तिनें त्या पादुकांची पूजा केली. एवढ्यांत सूर्योदय झाला. गांवांतले लोक प्रेताला संस्कार करण्याकारितां आले. त्यांना मेलेला मुलगा हंसत-खेळत असलेला

पाहून आश्चर्य वाटलें. परंतु श्रीगुरूंच्या स्थानमहिम्याचा अनुभव पटला व त्या सर्वांनीं श्रीगुरूंची आरती केली. सर्व लोक नंतर आनंदानें परत गेले. औदुंबराजवळच्या श्रीगुरुपादुकांचा महिमा त्यानंतर अनेकांना पटला. हृदयव्यथा, गंडमाळा, अपस्मारांसारखे रोगहि श्रीगुरूंच्या पादुकांची पूजा-अर्चा भक्तिभावानें करतांच बरे होऊं लागले."

मागें तुम्हीं निरोपिलें । श्रीगुरु गाणगापुरीं आले ।
पुढें कैसें वर्तलें । विस्तारावें दातारा ॥ २२-६ ॥

ही विनंति ऐकून सिद्धमुनि म्हणाले, "अरे शिष्योत्तमा नामधारका, भक्तांना तारण्याकरितां, कलियुगाच्या प्रभावानें गुप्त झालेलीं अनेक दिव्य तीर्थें, आपण स्वत: तेथें राहून व कांहीं अनुभव दाखवून श्रीगुरूंनीं प्रकट केलीं. अमरजासंगमावर श्रीगुरु राहात होते त्या वेळची एक अद्भुत गोष्ट आतां ऐक.

●●●

## वांझ म्हैस दूध देऊं लागली

"गाणगापुरांत एक ब्राह्मण राहात होता. तो फार गरीब होता. गांवांत शंभर एक घरें होतीं. वैदिक ब्राह्मणाचा गांव अशी गाणगापुराची प्रसिद्धि होती. श्रीगुरु नृसिंहसरस्वती अमरजासंगमावर राहात असतांना, दुपारीं गाणगापुरांत भिक्षा मागावयाला जात असत. त्या गरीब ब्राह्मणाच्या घरीं श्रीगुरुकृपेनें एक दिवस एक चमत्कार घडला. त्या ब्राह्मणाची एक म्हैस होती. ती वांझ असली तरी वेसण घालून, माती वाहून नेण्याकरितां

तिला भाड्यानें तो ब्राह्मण देत असे. बरींच वर्षें त्या म्हशीनें त्या दरिद्री ब्राह्मणाला दूध दिलें नाहीं, पण श्रमाचा थोडाफार पैसा मिळवून दिला. आता मात्र ती म्हातारी झाली होती. तोंडांत दांतांचा पत्ता नव्हता. एक दिवस श्रीगुरुनाथयति त्या दरिद्री ब्राह्मणाच्या घरीं भिक्षेला गेले. तें पाहून बाजूचे सर्व शिष्ट ब्राह्मण आपापसांत कुजबुजूं लागले, "काय विचित्र आहे हा यति. आमच्या घरीं भिक्षेला आला असता तर त्याला आम्ही पंचपक्वान्नें वाढलीं असतीं; पण हा गेला या दरिद्र्याचे घरीं.पाहूं याची काय गंमत होते ती."

त्या गर्विष्ठ ब्राह्मणांना प्रभूची लीला काय माहीत! विदुराच्या घरीं प्रेमानें कण्या खाणारा भगवान् दुर्योधनाच्या राजवाड्यांत कधीं गेला नाहीं. ज्यांची सात्त्विक वृत्ति त्यांच्यावर श्रीगुरूंची प्रीति. श्रीगुरूंनीं भिक्षा मागावयाला जायला व त्याच दिवशीं त्या गरीब ब्राह्मणाची म्हैस कोणी भाड्यानें न नेण्याला एक गांठ पडली होती. वैशाख महिन्याचा कडक उन्हाळा. त्यांतच भर दुपारची वेळ. तो ब्राह्मण भिक्षा मागायला गांवांत गेलेला. घरांत त्याची पत्नी चिंतामग्न बसलेली. एवढ्यांत 'ॐ भवति भिक्षां देहि,' असा सूर तिच्या कानीं आला. ती धांवतच बाहेर गेली. तिनें श्रीगुरूंना पाहतांच त्यांना भक्तिपूर्वक नमस्कार केला व म्हणाली,

"गुरुराया, माझे पति भिक्षा मागून आणायला गांवांत गेले आहेत. ते लवकरच परत येतील. त्यांना चांगलें धान्य भिक्षेंत मिळालें असेल. तोंपर्यंत आपण या आसनावर बसावें. घरांत आपणाला द्यावयाला दुसरें कांहीं नाहीं."

आसनावर बसून श्रीगुरु म्हणाले,

"काय ग बाई, तूं मला दुधाचीच भिक्षा कां वाढीत नाहींस? तुझ्या दारांत ही म्हैस तर बांधलेली आहे. मग दूध वाढतां येण्यासारखें असतांना कांहींच द्यायला नाहीं असें खोटें कां सांगितलेंस?"

" यतिमहाराज, आमची ही म्हैस वांझ आहे. रेडा म्हणून तिला आम्ही पोसतों. कधीं कधीं माती वाहून नेण्याकरितां गांवांतले लोक नेतात तिला. आमच्या योगक्षेमाला थोडाफार हातभार लावीत म्हातारी झाली बिचारी आतां. "

" बाई, ही म्हैस वांझ आहे असें खोटें कां सांगतां ? जा लवकर व दूध काढावयाला बसा. मला दुधाची भिक्षाहि चालेल. "

" ठीक आहे यतिमहाराज. आपण सांगतां आहांत, तर जातेंच मी दूध काढायला. "

ती ब्राह्मणाची विनम्र पत्नी श्रीगुरूंच्या शब्दांवर विश्वास ठेवून, खरोखरच म्हशीचें दूध काढावयाला बसली व म्हशीला पान्हा सुटून तिनें दूध दिलें. दुधाचें भांडें पूर्ण भरलें. तें आश्चर्य पाहून, ते भिक्षा मागायला आलेले यतिराज साधेसुधे नसून ईश्वरी अवतार असावेत, याबद्दल त्या बाईची खात्री पटली. झटपट स्वयंपाकघरांत जाऊन तिनें दूध तापविलें व यतीच्या सांगण्याप्रमाणें ती दुग्धभिक्षा त्यांना वाढायला घेऊन आली. श्रीगुरूंनीं दुग्धप्राशन केलें. नंतर

" तुझ्या घरांत अखंड लक्ष्मी नांदेल. पुत्रपौत्रांचें सुख तुम्ही अनुभवाल. मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें " असा आशीर्वाद देऊन श्रीगुरु संगमाकडे निघून गेले. थोड्या वेळानें ब्राह्मण कोरान्न मागून घरीं परतला. वांझ म्हशीनें दूध दिल्याचें ऐकून तो आश्चर्यचकित झाला. आरती घेऊन पतिपत्नी संगमावर गेलीं व त्यांनीं भक्तिपूर्वक श्रीगुरूंची पूजा केली. अरे नामधारका, ज्याच्यावर श्रीगुरूंची कृपा होते त्याला दैन्य बाधत नाहीं. तो अष्टैश्वर्य भोगतो. "

" अहो सिद्धमुनि, ती वांझ म्हैस कायमची दूध देऊं लागली कीं फक्त त्याच दिवशीं तिनें दूध दिलें ?

" नामधारका, गुरूची कृपा क्षणजीवी नसते. दुसऱ्या दिवशीं त्या म्हशीला भाड्यानें नेण्याकरितां गांवांतले कांहीं लोक आले, तेव्हां ती ब्राह्मणस्त्री त्या म्हशीचें दूध काढीत होती. तें पाहून लोक म्हणाले,

" काय नवल ! कालपर्यंत माती वाहायला ही म्हैस आम्ही नेत होतों. म्हातारी व दंतहीन अशी ही म्हैस वांझ होती. गाभण असल्याची वार्ताहि नव्हती. वासरू न होतांच आज हिला पान्हा फुटला व दूध ही देऊं लागली हें मोठें आश्चर्यच ! "

वांझ म्हशीला दूध आलें ही बातमी, हां हां म्हणतां गांवभर, व राजाच्या कानापर्यंतहि ती हकीगत गेली. तो स्वतः त्या गरीब ब्राह्मणाच्या घरीं गेला. ब्राह्मणानें त्याला घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. संगमावरील संन्याशाचा तो महिमा ऐकून राजा आश्चर्यचकित झाला. आपलें सर्व सैन्य सजवून, मुलांबाळांसह तो मोठ्या थाटामाटानें त्या संन्याशाला भेटावयाला गेला. श्रीगुरूंना पाहातांच त्यानें साष्टांग नमस्कार घातला व नंतर श्रीगुरूंची विविध प्रकारें स्तुति केली. श्रीगुरूंनीं संतुष्ट होऊन त्याला विचारिलें,

" राजा, आम्ही तर तापसी आहोंत. अरण्यांत राहातों. तूं आपल्या सर्व लव्याजम्यासह येथें कां आला आहेस ? "

" भक्तजनांचा उद्धार करण्याकरितां हे नारायणा, तूंच हा अवतार घेतला आहेस. जशी भक्तांची वासना, तशी तुमची मनोभावना अशी तुमची ख्याति आहे. तरी,

> गाणगापुर महास्थान । स्वामी करावें पावन ।
> नित्य तेथें अनुष्ठान । वास करणें ग्रामांत ।। २३·२४ ।।
> मठ करोनि तये स्थानीं । असावें आम्हां उद्धरोनी ।
> म्हणोनि लागे श्रीगुरुचरणीं । भक्तिपूर्वक नरेश्वर ।। २३·२५ ।।

त्या राजाची विनंति श्रीगुरूंनीं मान्य केली व गाणगापुरांत कांहीं दिवस प्रकट होण्याचें ठरविलें. श्रीगुरूंनीं गाणगापुराला जाण्याचें मान्य करतांच, त्यांना पालखींत बसवून मोठ्या समारंभानें राजा गांवाकडे निघाला. मृदंग वाजत होता. टाळांचा निनाद घुमत होता. लोक भजनें गात होते. नागरिकांना ही बातमी कळतांच ते श्रीगुरूंना आरती घेऊन सामोरे आले. गाणगापूरच्या पश्चिम दिशेला एक मोठा अश्वत्थवृक्ष होता. त्या झाडाजवळ एक उजाड घर होतें. त्या घरांत एका बाजूला राहावें असा मानस श्रीगुरूंनीं प्रगट केला. गांवांतील लोक त्यांना संमति देईनात.

" सिद्धमुनि, कांहीं भीति होती कीं काय त्या ओसाड घरांत ? "

" होय नामधारका, त्या उजाड घरांत एक ब्रह्मराक्षस राहात असे. "

" मग श्रीगुरूंना तो दिसला कीं काय ? "

" त्याचीच कथा तर आतां सांगणार आहें तुला मी. "

• • •

# ब्रह्मराक्षसाचा उद्धार

लोक नको म्हणत असतांनाहि श्रीगुरु त्या ओसाड घरांत राहावयाला गेले. तोंच एक भयंकर ब्रह्मराक्षस तिथें आला. श्रीगुरूंनीं त्याच्याकडे पाहतांच, त्यानें हात जोडून त्यांना विनंति केली,

" स्वामि, माझें रक्षण करा. या करुणाजनक अवस्थेंतून माझा उद्धार करा. तुझ्या केवळ दर्शनानें माझें पूर्वकर्म जळून गेलें. आजपर्यंत मी नर-

भक्षक ब्रह्मराक्षसाचें निंदित जीवन घालविलें. यापुढें तरी मला गति मिळो !"

"अरे ब्रह्मराक्षसा, मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें. लवकर संगमावर जा. तिथें स्नान केलेंस कीं पापमुक्त होशील. तुला पुनः जन्म घ्यावा लागणार नाहीं."

त्याप्रमाणें त्या ब्रह्मराक्षसानें करतांच तो मुक्त झाला. त्याचें कलेवर संगमावर पडलें होतें. हा चमत्कार पाहून श्रीनृसिंहसरस्वती हे दत्तप्रभूंचेच अवतार आहेत, याबद्दल लोकांची श्रद्धा दृढतर झाली. त्या ओसाड घराचें सुंदर मठांत रूपांतर झालें. राजा स्वतः रोज त्या मठांत येऊन श्रीगुरूंची पूजा करूं लागला. संगमावर स्नान करावयाला श्रीगुरु निघाले कीं, राजाहि आपल्या सर्व लव्याजम्यासह संगमावर जात असे. संगमावरून मठांत परत यायला दुपार व्हायची. श्रीगुरूंची ही ख्याति सर्वत्र पसरली. कस्तुरीचा सुगंध लपवून थोडाच लपतो ? गाणगापुरापासून जवळच कमसी नांवाचा एक छोटा गांव होता. त्रिविक्रमभारती नांवाचा एक तापसी तिथें होता. तो नृसिंहपूजक होता. मानसपूजा करून नरहरीचें ध्यान करावें तर त्यानेंच अशी त्याची प्रसिद्धि होती. श्रीगुरूंसारख्या एका संन्याशाचा पालखींत बसवून संगमावर स्नानाकरितां जाण्याचा थाट व इतर गोष्टी ऐकून त्रिविक्रमभारती मनांत म्हणत असे,

" हा कसला संन्यासी ! ही सगळी दांभिक वृत्ति दिसते. चतुर्थाश्रमाला हे खेळ शोभत नाहींत."

श्रीगुरूंना त्रिविक्रमभारतीच्या मनांतला हा किंतु दिव्यज्ञानानें कळला.

" त्या त्रिविक्रमभारतीचें पुढें काय झालें, तें मला सांगावें. श्रीगुरुचरित्र ऐकावें तसतसें अधिकच आवडूं लागतें, याचा अनुभव मला प्रत्यक्ष आला. ही सगळी सिद्धमुनि, आपली कृपा आहे."

" नामधारका, तुझ्या सत्र जिज्ञासेचें तें फळ आहे. ऐक तर मग.

# त्रिविक्रमभारतीच्या पराजयाची कथा

त्रिविक्रमभारतीच्या मनांतलें ओळखून, श्रीगुरूंनीं, त्याच्या भेटीला जाण्याचा आपला मानस राजाला सांगितला. श्रीगुरूंची आज्ञा ऐकतांच राजाला फार संतोप वाटला. त्यानें सर्व सैन्य श्रृंगारून त्याबरोबर पाठविलें. विविध वाद्यांच्या गजरांत श्रीगुरु पालखींत बसून त्रिविक्रमभारतीच्या भेटीला निघाले.

तिकडे आपल्या घरांत बसून त्रिविक्रमभारती मानसपूजा करीत होता. दर दिवशीं मनासमोर येणारी नृसिंहमूर्ति प्रयत्न करूनहि आज त्याच्या मनश्चक्षूंसमोर येत नव्हती. आपली पुष्कळ वर्षांची आराधना फुकट गेली असें त्याला वाटलें. तपोवृत्ति निष्फळ ठरली. इतक्यांत त्या त्रिविक्रमभारतीला श्रीगुरु दुरून नदीतीरावरून त्याच्या मानस-पूजेच्या मूर्तींच्या रूपांतच येतांना दिसले. संन्याशांचा एक मोठा समुदा-यच त्याला येतांना दिसला. सर्वच दंडधारी होते. सगळे सारखे दिसत होते. त्रिविक्रमभारतीला तें सर्व पाहून विस्मय वाटला व त्यानें धांवत जाऊन, श्रीगुरुचरणांवर लोळण घेतली. वर उठून बघतो तों सर्वच संन्यासी त्याला एकरूपच दिसूं लागले. लहान-मोठे सारेच एकासारखे दिसत होते ! त्यामुळें त्रिविक्रमभारतीच्या मनांत भ्रांति निर्माण झाली. तो श्रीगुरूंना विनवीत होता,

" हे विश्वव्यापका नृसिंहमूर्ति गुरुराया, तुझें स्वरूप मी आतां ओळखूं तरी कसें ? मला तर सगळे यति सारखेच दिसत आहेत ! मी आतां कोणापुढें नमूं ? कोणाची करुणा भाकूं ? हे त्रिमूर्तिरूप देवा, आपलें निजरूप मला दाखवा. आपलें चिन्मय स्वरूप मला दाखवा. "

श्रीगुरूंना ती त्याची विनवणी ऐकून दया आली. त्रिविक्रमभारतीवर त्यांच्या अमृतदृष्टीचें सिंचन होतांच पुनः सर्व सैन्य वगैरे भेद त्या मुनीला स्पष्ट दिसूं लागले. श्रीगुरु यतिराज त्या मेळाव्यांत स्पष्टपणें त्याला दिसले. श्रीगुरु त्याला म्हणाले,

" अहो मुनि, तुम्ही आमची रोज निंदा करतां. आम्ही दांभिक आहोंत असा तुमचा आरोप आहे ना ? आपण नरसिंहमूर्तीची मानसपूजा करतां. त्या पूजेनें संतुष्ट होऊन मी आलों आहें. तर मग आतां आमचा दांभिकपणा काय आहे तें सांगा पाहूं ! "

" यतिमहाराज, मला आणखी लाजवूं नका हो ! माझ्या मनांतील किल्मिष नाहींसें झालें आहे. मी आपणाला साधासुधा संन्यासी समजलों; परंतु आतां आपणच त्रयमूर्तीचे अवतार आहांत, ही जाणीव दृढमूल झाली आहे. माझ्यासारख्या बालकाला क्षमा करावी.

ज्ञानतारवीं बैसवोनी । करुणा वायु प्रेरोनी ।
पैलथडी निजस्थानीं । पाववी स्वामी कृपासिंधु ॥ २४.३३ ॥
तुझी कृपा होय ज्यासी । दुःख दैन्य कैचें त्यासी ॥
तोचि जिंकील काळासी । परमार्थीं ऐक्य होय ॥ २४.३४ ॥ "

त्रिविक्रमभारती सद्गदित होऊन अशा प्रकारें श्रीगुरूंना आळवीत होता. " देवा, महाभारताच्या गोष्टींत अर्जुनाला आपलें विश्वरूप दाखविलेंत. आज मला त्याचा साक्षात्कार घडविलात. आज प्रयत्न न करतांच मला तुझ्यासारखा रत्नचिंतामणि मिळाला. मी आज कृतार्थ झालों. "

" त्रिविक्रमभारती, तुमच्या भक्तीनें मी संतुष्ट झालों आहें. पुनर्जन्मांतून तुमची सुटका झाली. आतां तुला सायुज्यमुक्ति मिळेल. "

त्रिविक्रमभारतीला असा वर देऊन, त्याला कुमसी गांवांतच ठेवून क्षणाचाहि विलंब न लावतां, श्रीगुरु गाणगपुराला परत आले. नामधारका, असा हा गुरुमहिमा तुला किती म्हणून सांगूं ?

अमृताची आरवंटी । घातली असे वरवंटी ।
ज्ञानीजन प्राशिती घोटी । श्रीगुरुचरित्र कामधेनुदुग्ध ॥२४.४९॥

" अरे नामधारका, त्या त्रिविक्रमभारतीला दर्शन देऊन कृतार्थ केल्या-नंतर श्रीगुरूंच्या माहात्म्याचा अनुभव विदूरनगरांतील राजाला आला. "

" विदूरनगरच्या राजाचें श्रीगुरूंनीं काय केलें ? "

" नामधारका, ती फार मोठी रंजक कथा आहे.

श्रीगुरूंनीं विदूरनगरच्या राजाचें व मदोन्मत्त ब्राह्मणाचें पारिपात्य कसें केलें तें ऐक तर मग.

●●●

# विदूरनगरच्या राजाचें व मदोन्मत्त ब्राह्मणांचें पारिपत्य

विदूरनगरांत त्या काळीं एक यवन राजा राज्य करीत होता. नेहमीं जीवहिंसा करावी, ब्राह्मणांकडून जबरदस्तीनें राजसभेंत वेद म्हणवून घ्यावे असा त्याचा छंद होता. सर्व वेदांचें पठण करणाऱ्याला व वेदचर्चेंत मान्यवंत ठरणाऱ्याला मोठें बक्षीस त्यानें देऊं केलें होतें. द्रव्याची हाव धरून मतिहीन ब्राह्मण त्या यवनराजापुढें वेदशास्त्रें वाचीत असत. यज्ञांतील पशुहत्येचा उल्लेख ऐकून तो ब्राह्मणांना म्हणे,

" तुम्हीं ब्राह्मणलोक यज्ञांत बोकड मारतां, मग आम्हां म्लेंच्छांची जविहिंसक अशी निंदा कां करतां ? "

ब्राह्मणाची निंदा करीत असला तरी योग्यतेनुसार तो त्यांना अपार धनही देत असे. ही वातमी ऐकून देशोदेशींचे वैदिक ब्राह्मण, केवळ पैशाच्या लोभानें, त्या यवनापुढें जाऊन वेदपठण करीत, वेदान्तावर चर्चा करीत व राजाकडून बक्षिसी मिळवीत असत. असा क्रम चालला असतांना, एक दिवस दोन मंदभाग्य ब्राह्मण त्या यवनराजाला भेटावयास गेले. त्यांचे तीन वेदांत प्राविण्य होतें. ते राजाला म्हणाले, " चारी राष्ट्रांत आमच्या-सारखा विद्वान् कोणी नाहीं. आमच्याशीं वाद करणारा कोणी मिळणार नाहीं. जर तुमच्या नगरांत वाद करावयास कोणी तयार असेल तर त्याला ताबडतोब बोलवा ! आम्ही त्याच्याशीं वेदचर्चा करून त्याला जिंकूं. आमचा ज्ञानकंडू शमविणारा अजून तरी कोणी भेटला नाहीं ! "

राजानें नगरांत दवंडी पिटविली व त्या दोन ब्राह्मणांना वेदचर्चेत जो हरवील, त्याला पुष्कळ द्रव्य त्यानें देऊं केलें; परंतु त्या नगरांतील सर्व ब्राह्मणांनीं आपली हार कबूल करून, त्या दोघांचा सन्मान करावा अशी राजाला विनंति केली. तेव्हां राजानें त्या दोन ब्राह्मणांचा फार मोठा गौरव केला. त्यांना वस्त्रेंभूषणें व धन दिलें. हत्तीवर बसवून त्यांची नगरांतून मिरवणूक काढली.

हे ब्राह्मणांचे राजे आहेत. ' झाले बहु, होतिल बहु.... परि यासम हे दोघे ' अशा आरोळ्यांनीं सारें नगर भरून गेलें. असा त्यांचा गौरव दरदिवशीं वाढतच होता. एक दिवस ते राजाला म्हणाले,

" महाराज, आतां आम्हांला निरोप द्यावा. शास्त्रार्थ करण्याची फार मनीषा होती; परंतु तुमच्या राज्यांतला एकहि ब्राह्मण पुढें आला नाहीं. तर आतां राष्ट्रांत सर्व ठिकाणीं फिरून, आम्हीं जयपत्रें लिहून घ्यावयाचें ठरविलें आहे. "

" ठीक आहे. आमच्या राष्ट्रांत गांवोगांव जाऊन जयपत्रें जिंकून आणा. माझे अधिकारी आपल्या या जययात्रेची व्यवस्था करतील व आपण मानमरातबानें दौरा काढा."

राजाच्या आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था झाली व ते दोघे ब्राह्मण ज्ञानांध होऊन, जयपत्रें जिंकीत चालले. हिंडतां हिंडतां ते भीमानदीच्या कांठच्या कुमसी नांवाच्या गांवांत गेले. त्या गांवांतील लोकांनीं त्यांना सांगितलें, 'आमच्या या गावांत त्रिविक्रमभारतीसारखा दुसरा वेदपारंगत ब्राह्मण सांपडणार नाहीं. त्रिविक्रमभारतीला तिन्ही वेद येतात. अनेक शास्त्रांत तो अभिज्ञ असून त्याची कीर्ति गांवभर पसरली आहे.' तें ऐकतांच ते दोघे ब्राह्मण तावडतोब त्रिविक्रमभारतीकडे गेले व त्याला चर्चेला येण्याची किंवा हारिपत्र लिहून देण्याची गळ घातली. तेव्हां तो मुनि त्यांना नम्रपणें म्हणाला,

" अहो वेदशास्त्रपारंगत द्विजदेवांनो, मला तीन कुठले, एकहि वेद येत नाहीं. तुम्हांला कोणी तरी चुकीची माहिती दिली असावी. आम्हांला तीन वेद येत असते तर अरण्यांतर ाहावयाची पाळी आमच्यावर आली असती का? तुमच्यासारखी राजमान्यता लाभून विविध भोग मी भोगले नसते का? तसें नाहीं म्हणून तर हा वनवास पत्करून संन्यास घेतला आहे. तुम्ही कुठे व माझ्यासारखा भिक्षुक तापसी कुठें! तेव्हां जय काय किंवा पराजय काय, मला त्याचा अभिमान नाहीं. आपणासारख्या गाढ्या पंडितांनीं माझ्यासारख्या गरिबाशीं वाद घालण्याची कल्पनाहि मनांतून काढून टाकावी!"

तें ऐकतांच त्या दोन्ही ब्राह्मणांनीं आपल्या भेटीचा हेतु त्याला सांगितला. जयपत्रांचा गठ्ठा त्याला दाखविला व म्हणाले——

येणेपरीं आपणासी । जयपत्र द्यावें विशेषीं ।
अभिमान असल्या मानसीं । करी वाद म्हणताती ॥ २५.४६ ॥

त्रिविक्रमानें परोपरीनें विनवण्या करूनहि ते दोघे ब्राह्मण जयपत्राकरितां हट्ट धरून बसले. तेव्हां गाणगापुराला श्रीगुरूंकडे नेऊन त्यांची खोड मोडावी असें त्या त्रिविक्रमानें मनांत ठरविलें. तो त्या ब्राह्मणांना म्हणाला, 'विप्रहो, माझे गुरु गाणगापुरांत राहतात. त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या समक्षच तुम्हांला जयपत्र तरी देईन किंवा तुमचा ज्ञानकंडु तरी शमन करीन.' यावर ते दोघे ब्राह्मण तत्काळ तयार झाले व पालखींतून निघाले. त्रिविक्रमभारती पायींच पुढें चालत होता. यतीश्वराला चालवून ते मंदभाग्य ब्राह्मण स्वतः सुखासनावर बसले होते. त्रिविक्रमभारतीनें गाणगापुराला पोंचताच, त्या भक्तवत्सल श्रीगुरूंना वंदन केलें. श्रीगुरूंनीं येण्याचें कारण विचारतांच त्या ज्ञानोन्मत्त ब्राह्मणांची सर्व हकीकत त्यानें त्यांना सांगितली. श्रीगुरूंनींहि प्रथमतः त्या दोघां ब्राह्मणांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, तरी ते दोघे ब्राह्मण आपला हेका सोडीनात.

" मग त्या दोन ब्राह्मणांना जयपत्र मिळालें कीं नाहीं ?" नामधारक.

" अरे नामधारका, ते मदोन्मत्त ब्राह्मण श्रीगुरूंना म्हणाले, " आम्ही चारी वेदांत पारंगत आहोंत. आमच्यापुढें सर्वांनीं शरणागति स्वीकारली. हीं पाहा आम्हीं मिळविलेलीं अनेक जयपत्रें. असलें जयपत्र लिहून मागितलें म्हणून तुमच्या या त्रिविक्रमभारतीस राग आला व तो आम्हांला तुमच्याकडे घेऊन आला आहे. तुम्हां दोघां गुरुशिष्यांना कसला वेदान्त येणार ? उगाच वेळ वायां न घालवितां, आम्हांला जयपत्र द्या. आम्हांला अजून अनेक गांवांत संचार करावयाचा आहे. "

" अहो वेदमूर्ति ब्राह्मणांनो, गर्व झाला तर सगळा नाश होतो. देव असो वा दानव, कोणीहि गर्वाच्या दुष्परिणामांतून सुटला नाहीं. गर्व झाल्या-

मुळें मरण ओढवल्याचीं उदाहरणेंहि आहेत. बळीराजा, बाणासुर, लंकानाथ रावण व कौरव यांच्या गोष्टींवरून तरी तुम्हीं बोध घ्यावयाला हवा होता. आपणालाच फक्त वेदान्त समजतो असा तुम्हांला गर्व झाला आहे. वस्तुतः वेद अनंत असून त्यांचा अंत ब्रह्मदेवालाहि लागला नाहीं. तुम्हीं मात्र वेदांचें समग्र ज्ञान झालें असा डांगोरा पिटतां कसे, याचेंच आश्चर्य वाटतें."

"अरे यतिराजा, उगाच मोठमोठ्या गप्पा मारूं नको. एवढी ताकद असेल, तर कर ना आमच्याशीं वेदार्थ."

"ठीक आहे. करतों आम्ही जमेल तितका प्रयत्न. अरे ब्राह्मणांनो, उगाच भ्रमांत कशाला राहातां? प्रत्यक्ष नारायण वेद व्यक्त करण्याकरितां व्यासांचा अवतार घेऊन या भूतलावर आले. त्या व्यासांचे अनेक शिष्य होते. त्यांतलि पैल, वैशंपायन, जैमिनी व सुमंतु हे चार शिष्य प्रसिद्ध होते. वेदव्यास आपल्या शिष्यांना म्हणे, "एक वेद नीट शिकवायवा तर कल्पांत झाला तरी दिवस पुरणार नाहींत, तर चारी वेद तुम्ही वाचणार म्हणतां, तें कसें शक्य आहे?" श्रीव्यासांनीं आपल्या शिष्यांना भारद्वाजऋषींची गोष्ट, हाच मुद्दा नीट पटावा म्हणून तेव्हां सांगितली होती.

पूर्वीं भारद्वाज नांवाचा एक विख्यात ऋषि होता. त्यानें अनेक वर्षें तपश्चर्या केल्यावर त्याला वेदाचे लवलेश समजले. त्यानें पुनः तप केलें तेव्हां ब्रह्मदेव प्रसन्न झाले.

"भारद्वाजा,मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. बोल, तुला काय वर देऊं?"

"ब्रह्मचर्य-आश्रमांतच सर्वहि वेद साद्यंत शिकावेत अशी माझी इच्छा आहे. सर्व वेदान्त मला दाखवा, सर्व वेदविद्या मला शिकवा हाच वर मला पाहिजे आहे."

“ भारद्वाजा, वेद अगणित आहेत. सर्व कांहीं शिकणार म्हणतोस तें कसें शक्य आहे ? तुला नुसते पाहावयाचे असले तर प्रथम ते वेद नुसते दाखवितों. मन निर्मळ करून पाहा. पुढें तुला शक्य वाटलें तर सर्वांचा अभ्यास कर. भारद्वाजा, डोळे मीट. आतां उघड. पहा समोर काय आहे तें. ”

“ व्यासमुनि, मला तर समोर तीन पर्वतप्राय उंचवटे दिसत आहेत.”

“ त्या वेदांच्या राशी आहेत. बघ, आतां एवढे वेद शिकणें जमेल कीं नाहीं तुला तें. ”

तें पहातांच, भारद्वाज ब्रह्मदेवाच्या पायां पडला. समग्र वेद शिकणें ही गोष्ट कशी अशक्यप्राय आहे हें त्याला पटलें होतें. त्यानें ब्रह्मदेवाची क्षमा मागितली. ब्रह्मदेव काय देईल तेवढ्यावर संतुष्ट राहावयाला तयार झाला होता. तो ब्रह्मदेवाला म्हणाला,

वेद देखोनी अमित । भय पावलें चित्त ।
जें कराल तें उचित । तोंचि घेऊं परियेसा ॥ ” २६.२० ॥

‘ ठीक आहे. घे ही तीन मुठी रक्षा. याचा अभ्यास कर. ” त्या तीन मुठींतून तीन वेदांचे मंत्र झाले. ते वेद प्रथम एकत्र होते. ते वेगळे करतांच चार वेद झाले. भारद्वाजाचा त्याचा अभ्यास अजून पुरा झाला नाहीं.

व्यासमुनींनीं आपल्या चार शिष्यांना ही गोष्ट सांगितली. संपूर्ण वेदविद्या शिकणें म्हणजे गगनाला गवसणी घालण्यासारखें. परंतु थोडाफार अभ्यास व्हावा म्हणून चौघांना चार वेद तरी सांगण्याचें त्यांनीं ठरविलें. जेवढें जमेल तेवढें तरी शिकवा, अशी चारही शिष्यांनीं व्यासांना मनापासून विनंति केली. तेव्हां व्यासमुनींनीं पैल नांवाच्या शिष्याला बोलावून त्याला ऋग्वेद सांगितला. पैलाच्या विनंतीवरून व्यासमुनींनीं ऋग्वेदाचे भेदाभेद त्याला सविस्तर सांगितले. त्यांतील प्रमुख विषय असा होता:

ऋग्वेदाचा उपवेद आयुर्वेद आहे. ऋग्वेदाचें मानवी स्वरूप असें आहे: ऋग्वेद अत्रिगोत्राचा असून त्याची देवता ब्रह्मा. गायत्री हा त्या वेदाचा छंद. वर्ण तांबडा. डोळे कमलदलासारखे. कंबुकंठी मान. कुंचल्याएवढ्या मिशा. द्विजरत्नांत श्रेष्ठ अशी ही ऋग्वेदाची मूर्ति डोळ्यांपुढें आणावी. ऋग्वेदाच्या श्रावका, श्रवण, षट्कर्माच्या दोन, दंड व इतर ५ अशा बारा शाखा आहेत. आश्वलायनी, शांखायनी, शाकला, बाष्कला व मांडूक्य या उरलेल्या पांच शाखा. त्या बारा शाखांत आश्वलायनशाखा तेवढी आतां विख्यात व उपलब्ध आहे. " अहो मदोन्मत्त ब्राह्मणांनो, एका ऋग्वेदाचे इतके भेद व्यासमुनींनीं सांगितले आहेत.

त्यानंतर वैशंपायन नांवाच्या आपल्या दुसऱ्या थोर शिष्याला व्यासमुनींनीं यजुर्वेद सविस्तर सांगितला. यजुर्वेदाचा उपवेद धनुर्वेद. यजुर्वेदाचें गोत्र भारद्वाज, आधिदैवत रुद्र व छंद त्रिष्टुप्. याचा देह कांहींसा स्थूल. आपलें कपाळ हातांत धरलेलें आहे असा व सोनेरी रंगाचा, मनोहर, पिंगट डोळ्यांचा, तांबूस पांढऱ्या शरीरकांतीचा, असें यजुर्वेदाचें मानसिक ध्यान करावें. यजुर्वेदाचे शाहाऐंशीं ( ८६ ) भेद त्यानंतर व्यासमुनींनीं सविस्तर सांगितले.

[ यजुर्वेदाचा सविस्तर ऊहापोह श्रीगुरूंनीं जसा वेदव्यासांनीं पूर्वी केला होता तसा वैशंपायनशिष्याजवळ केला. ऋग्वेदाचा मात्र त्या मानानें फारच संक्षिप्त उल्लेख आहे. ]

व्यासमुनींनीं सामवेद सांगितला तो जैमिनी नांवाच्या शिष्याला. सामवेदाचा उपवेद गांधर्ववेद हा आहे. छंद नित्यस्रग्वी असून, शुचिर्भूत, वस्त्रप्रावरणयुक्त, क्षौमदंती, चर्मधारक, हातांत दंड असलेला, आकर्णनयन, सुवर्णासारखी कांति, सूर्यासारखा तेजस्वी असें सामवेदाचें मानसिक ध्यानस्वरूप आहे. या सामवेदाच्या शाखा असंख्य असून, त्यांत

निदान एक हजार तरी प्रमुख आहेत. त्याचे सर्व भेद एका नारायणावांचून कोणाला माहीत नाहींत.

चौथा शिष्य सुमंत याला व्यासमुनींनीं चौथा म्हणजे अथर्वण वेद सांगितला. त्याचा उपवेद म्हणजे मंत्रशास्त्र. त्याचें गोत्र बैजान, आधिदैवत इंद्र व छंद अनुष्टुप् आहे. तो फार प्रखर असून क्रूर आहे. त्याचा रंग काळा आहे. त्याचे नऊ भेद आहेत. ते म्हणजे—पैपल, दातनाम, प्रदांत, स्तोता, औता, ब्रह्मदालव व सोनळी, शानकेदवल व चरणविद्या.

अशा रीतीनें व्यासमुनींनीं वेदज्ञान प्रकट केलें. पूर्वी या भरतखंडांत फार पुण्यवान् लोक होते; पण आतां या कलियुगांत ब्राह्मणांनीं आपलें कर्तव्यकर्म सोडलें. ते म्लेंच्छांना वेदार्थ सांगूं लागले. अरे मदोन्मत्त ब्राह्मणांनो, तुम्ही त्यांतलेच आहांत. तुम्ही आपली आपण स्तुति करतां. या त्रिविक्रमयतीजवळ जयपत्र मागतां. आतां तरी माझा उपदेश ऐकून परत जा."

श्रीगुरूंनीं इतकें सविस्तर वेदव्याख्यान केल्यावरहि त्या मंदमति ब्राह्मणांना उमज पडली नाहीं व त्यांनीं शास्त्रचर्चा करण्याचा आपला विचार कायम असल्याचें सांगितलें.

श्रीगुरूंनीं त्या मदोन्मत्त ब्राह्मणांचा गर्व कसा हरण केला ती यापुढील सुरसकथा ऐका.

• • •

# गर्वाचें घर खालीं

त्या दोन पंडित ब्राह्मणांनीं श्रीगुरूंना म्हटलें,

" वाद करतां कीं जयपत्र लिहून देतां तें सांगा. शुष्क उपदेश पुरे झाला. "

हें ऐकतांच श्रीगुरूंना सात्त्विक संताप आला. सापाच्या पेटाऱ्याला कुरतडणारा उंदीर किंवा दिव्यावर झडप घालणारा पतंग हे दोघे आपलाच घात करून घेतात तसेंच होतें गुरुद्रोह्याचें. तीच गत श्रीगुरूंपुढें ताठ्यानें उभें राहाणाऱ्यांची. ते दोघे ब्राह्मण श्रीगुरूंजवळ बसले असतांना, त्या वेळीं त्यांना दुरून जाणारा एक वाटसरू दिसला. ते शिष्यांना म्हणाले," जा रे, त्या माणसाला बोलावून आणा इकडे. "

" आज्ञा गुरुदेव. "

तो वाटसरू जवळ आल्यावर श्रीगुरूंनीं त्याला विचारलें, " तूं कोण ? कुठला ? कोणत्या जातींत जन्म झाला, हें सर्व आम्हांला सांगतोस का ? आमचें कांहीं काम आहे तुझ्याजवळ. "

" श्रीगुरुराया, तुम्ही कृपेचे सागर आहांत म्हणून माझ्यासारख्या क्षुद्र माणसाला बोलावून त्याचा गौरव केलात. मी आहें मांग. गांवाबाहेर राहतों. माझी कसली जात वा पात ! "

श्रीगुरूंनीं आपली अमृतमय दृष्टि त्याच्यावरून फिरविली. लोखंडाला परीस लागला कीं त्याचें सोनें व्हावयाला कितीसा अवकाश ? आपल्या शिष्याजवळ एक काठी देऊन, तिनें जमिनीवर धुळींत सात रेषा काढण्यास त्याला सांगितलें. त्याप्रमाणें रेषा काढून झाल्यावर, ते त्या मांगाला म्हणाले, ' तूं आतां ही एक एक रेषा ओलांडावयाची आहे. चल तर मग, पहिली

रेषा ओलांडून ये." ते मदोन्मत्त विप्र हा सर्व प्रकार कुतूहलानें पाहात होते. त्या माणसाला श्रीगुरूंनीं त्यानंतर विचारलें, " सांग, कोणत्या कुळांत तूं जन्मलास. बघ आठवतें का ? " " हो आठवलें. मी पूर्वीं किरात-वंशांत जन्मलों होतों. माझें नांव तेव्हां वनराखा होतें." दुसरी रेषा ओलांडतांच आणखी पुष्कळ गोष्टींचें ज्ञान त्याला झालें. तें त्यानें सांगतांच, श्रीगुरूंनीं तिसरी रेषा ओलांडावयाला त्याला सांगितलें. तेव्हां तो सांगूं लागला,

" त्यानंतर मी गंगापुत्र झालों. माझें वास्तव्य गंगाकिनारीं होतें. " त्यानें चौथी रेषा ओलांडली, तेव्हां तो सांगूं लागला, "सध्यां मी शूद्र जातींत जन्मलों आहें. आपल्या शेतावर कामाला चाललों होतों तोंच आपण मला बोलाविलेंत." पांचवी रेषा उल्लंघन केल्यावर, " पुढें माझा जन्म वैश्य वंशांत होणार आहे. तेव्हां माझें नांव सोमदत्त असेल." असें त्या शूद्रानें सांगितलें व सहाव्या रेषेपलीकडे गेल्यावर, " मी त्यापुढील जन्मांत क्षत्रियजातींत जन्मणार आहें. माझें नांव त्या वेळीं गोदावरी असेल." असें भविष्य सांगून सातवी रेषा ओलांडली. त्या वेळीं तो म्हणाला, " आतां मी ब्राह्मण झालों आहें. माझें नांव अध्यापक आहे. माझा वेदशास्त्र व व्याकरणग्रंथांचा सखोल अभ्यास झाला आहे. "

" अहो वेदमूर्ति, आपण जर वेदशास्त्रपारंगत आहांत तर या इथें दोन वैदिक ब्राह्मण आले आहेत. त्यांचेजवळ चर्चा करतां का ? " असें विचारून श्रीगुरूंनीं रक्षा मंत्रवून त्याच्या सर्वांगावर प्रोक्षण केलें. श्रीगुरूंच्या हाताचा स्पर्श होतांच पतिताला ज्ञान आलें. तो पतित असूनहि वेदशास्त्रें म्हणून दाखवूं लागला. वाद करावयाला आलेले दोघे ब्राह्मण फार भयभीत झाले. त्यांची जीभ लुळी पडली. कानांनीं त्यांना कांहीं ऐकूं येईनासें झालें. त्यांच्या छातीची धडधड वाढली. ते थरथरा कांपूं लागले. श्रीगुरुचरणांवर त्यांनीं लोळण घेतली व ते श्रीगुरूंची प्रार्थना करूं लागले, " हे जगन्नायका,

आम्ही गुरुद्रोह केला आहे. आजपर्यंत अनेक ब्राह्मणांचा धिक्कार केला. आम्हांला क्षमा करावी. तुमच्या कृपेनें गवताच्या काडीचा पर्वत होईल तर कोपानें पर्वतहि क्षणार्धात भस्मसात् होईल. "

" अहो ज्ञानगर्विष्ठ ब्राह्मणांनो, तुम्ही त्रिविक्रममहामुनीला त्रास दिलात. अनेक ब्राह्मणांची निंदा केलीत. तुमच्या हातून इतरहि पुष्कळ दोष घडले. तेव्हां आपल्या कर्मांचें प्रायश्चित्त म्हणून तुम्ही ब्रह्मराक्षस व्हाल ! "

" श्रीगुरुनाथ, ब्रह्मराक्षस झाल्यावर आमचा उद्धार कसा होईल तें आपण सांगावें अशी आमची विनंति आहे. "

" तुम्हांला बारा वर्षें ब्रह्मराक्षसाचें जिणें जगावें लागेल. अशा रीतीनें तुमचें पाप शुद्ध झाल्यावर, एके दिवशीं एक ब्राह्मण येईल व तो तुम्हांला पुढचा मार्ग दाखवून तुमचा उद्धार करील. "

नंतर श्रीगुरूंना वंदन करून ते ब्राह्मण गंगातीरावर गेले. तेथें असह्य हृदयशूलानें त्यांना मृत्यु आला. श्रीगुरूंनीं सांगितलें होतें त्याप्रमाणें ते ब्राह्मण ब्रह्मराक्षसें झाले. बारा वर्षांनीं त्यांना गति मिळणार होती.

इकडे पतिताचा पंडित झालेला तो शूद्र श्रीगुरूंना विचारीत होता. " मी जर पूर्वीं ब्राह्मण होतों तर मग आतां शूद्र कां झालों ? माझ्या हातून कोणते महादोष घडले होते ? मी महेशाचा कोप ओढवून घेतला होता का ? "

" ठीक आहे. ऐक तर मग तुझें पूर्ववृत्त. विप्रस्त्री व शूद्र यांच्यापासून होणारी उत्पत्ति चांडाळ या नांवानें ओळखली जाते. ही झाली प्रत्यक्ष जन्माची गोष्ट; परंतु असा चांडाळजन्म कां येतो याचीं स्थूलमानानें कारणें अशीं सांगतां येतील. आईवडिलांचा त्याग करणारा, कुलदेवता सोडून अन्य देवतांची पूजा करणारा, नेहमीं खोटें बोलणारा, पैसे घेऊन मुलीचें लग्न करणारा, शूद्र स्त्रीशीं संग करणारा, बैलावर बसून फिरणारा,

सत्कृत्यें, सज्जन व तीर्थक्षेत्रांची निंदा करणारा, गुरुनिंदा करणारा, परद्रव्य व परस्त्री यांचा अपहार करणारा, हे सर्व पुढील जन्मीं चांडाळजातींत जन्म पावतात."

"स्वामी, एकदां घडलेलें पाप फिटण्याचा कांहीं उपाय नाहीं का ?"

"हो आहे. पश्चात्ताप होय ज्यासी । पाप नाहीं सर्वथा ॥२८.७९॥

पापमुक्त होण्याकरितां अनेक प्रायश्चित्तें व व्रतें धर्मशास्त्रांत सांगितलीं आहेत. पुण्यतीर्थांत दहा स्नानें, सुवर्णदान, ह्याप्रमाणेंच गायत्रीमंत्राचा दहा हजार जप—ज्याला गायत्रीकृच्छ्र म्हणतात—तोहि प्रायश्चित्त म्हणून सांगितला आहे. एकदां जेवून राहावें हें प्राजापात्य कृच्छ्र. तीन दिवस उपास करून श्रीगुरुचरणांचें स्मरण करावें. त्याचप्रमाणें अतिकृच्छ्र, अपर्णकृच्छ्र, चांद्रायणव्रत, तसेंच तीर्थकृच्छ्र हे सुद्धां प्रायश्चित्तविधि आहेत. गायत्रीमंत्राचा तीर्थक्षेत्रांत सहस्र जप किंवा कोटि जप केला असतां त्याचें पुण्य फारच मोठें आहे. पुरुषसूक्त व वामनसूक्त यांचें पठणहि पुण्यप्रद आहे. पंचगव्य प्राशन केलें असतां अज्ञानानें ( नकळत ) घडलेल्या दोषांचें पाप फिटतें. या पंचगव्यांतील गोमूत्र निळ्या गाईचें, शेण काळ्या गाईचें, दूध तांबू गाईचें, दहीं पांढऱ्या गाईच्या दुधाचें व तूप कपिला गाईच्या दुधाचें असावें. असे हे प्रायश्चित्तविधि सांगावे तितके थोडे.

अरे शूद्रा, पूर्वजन्मीं तूं ब्राह्मण होतास; पण आईवडील व गुरूंचा द्वेष केलास म्हणून तुला हा चांडाळाचा जन्म आला. तर आतां एक महिनाभर संगमावर स्नान कर. त्यामुळें तुझे दोष जातील."

त्या पतिताला श्रीगुरूंचें दर्शन झाल्यापासून, एका अवर्णनीय सुखाचा लाभ झाला. एखाद्या उपाशी गाईला सुंदर चराऊ कुरण दिसलें, तर तें सोडून ती दुसरीकडे जाईल का ? तसेंच त्या शूद्राचें झालें. तो आतां घरीं जावयाला तयार नव्हता. श्रीगुरुचरणांपाशींच बसून राहिला होता. तेवढ्यांत

त्याची बायको व मुलगा तिथें आलीं. पत्नी पायाला स्पर्श करावयाला येतांच त्या शूद्रानें तिला रागानें दूर सारलें. तो तिला मारावयालाहि धांवला. तेव्हां त्याची स्त्री दुरूनच वंदन करून श्रीगुरूंना म्हणाली, "अहो, माझे पति मला अंतरले. मी आतां काय करूं ? हे मला सोडून जाणार, तर आमचें पालनपोषण कोण करणार ? आपण यांना कांहीं उपदेश करा नाहीं तर मुलांबाळांसह मी प्राण देईन, ही गोष्ट तरी सहन करा."

"अरे शूद्रा, तूं आपल्या घरीं जा. ही तुझी बायको आमच्यावर काय आरोप करीत आहे ऐक. तुला पुत्रकलत्रांचा त्याग केल्याचा दोष लागेल.

या संसारीं जन्मोनियां । संतोषावें इंद्रियां ।
मग पावे धर्मकार्या । नाहीं तरी गति नसे ॥ २८·१७३ ॥

वैराग्य वाटत असेल तर, एक तर प्रथम लग्न करूं नये व केलेंच तर पत्नीचा त्याग करणें यासारखें मोठें पातक नाहीं."

"गुरुराया, ज्ञान झाल्यावरहि मी जातिहीन अशा नातेवाइकांत परत कसा जाऊं ? मी आतां पतित किंवा शूद्र राहिलोंच नाहीं. माझा पुनर्जन्मच झाला आहे. त्यामुळें या पुत्रकलत्रांचा व माझा काय संबंध ?"

श्रीगुरूंनीं विचार केला. त्या शूद्राच्या अंगाला लावलेलें भस्म या सर्वाला कारणीभूत आहे, हें त्यांच्या लक्षांत आलें. एखाद्या लोभी ब्राह्मणाकडून याचें भस्म पुसून टाकलें तर याचें ज्ञान नाहींसें होऊन हा परत मायापाशांत गुरफटेल, असा उपाय त्यांना सुचला. त्याप्रमाणें अशा ब्राह्मणाला शिष्यांनीं बोलावून आणतांच, त्या शूद्राला स्नान घालण्याची आज्ञा श्रीगुरूंनीं त्याला केली. त्याप्रमाणें, त्या लोभी ब्राह्मणानें त्या ज्ञानसंपन्न शूद्राला स्नान घालतांच, त्याच्या अंगाला लागलेलें भस्म धुऊन गेलें. भस्माचा लेप धुतला गेला व ज्ञानहि लुप्त झालें. त्या शूद्राचें मन पुनः अज्ञ झालें व आपल्या बायकोमुलांना पाहतांच, तो त्यांच्याकडे धांवत गेला

व 'काय काम आहे ?' असें त्यांना विचारूं लागला. तो शूद्र लगेच श्रीगुरूंना वंदन करून आपल्या बायकामुलांबरोबर परत गेला.

• • •

# भस्माचा प्रताप

श्रीनृसिंहयतींनीं मदोन्मत्त विप्रांचें गर्वहरण एका शूद्राकडून करविलें. पतिताला भस्म लावतांच तो ज्ञानी झाला. त्यानें वेदान्तचर्चा चतुर्वेदी ब्राह्मणांहून उत्तम केली; परंतु भस्म धुऊन जातांच तो पुनः शूद्र झाला व आपल्या बायकामुलांच्या मायेंत गुरफटला हें पाहून त्रिविक्रममुनि या श्रीगुरूंच्या परमभक्ताला भस्माच्या त्या जादूचें नवल वाटलें. त्याची जिज्ञासा पाहून श्रीगुरूंनीं त्याला भस्माचा महिमा सांगितला. सिद्धमुनींकडून तो नामधारकाला ऐकावयाला मिळाला.

" कृतयुगांत वामदेव नांवाचा एक योगी होऊन गेला. तो मोठा ब्रह्मज्ञानी होता. रागलोभासारखे कठीण शत्रु त्यानें ताब्यांत ठेवले होते. सर्वांगाला भस्म फांसून तो जटाधारी निरिच्छ मुनि सर्व जगभर हिंडत असे. वल्कलें हा त्याचा पोषाख. पृथ्वीवर संचार करतां करतां, एकदां तो क्रौंचारण्यांत पोंचला. त्या ठिकाणीं एक महाभयंकर नरभक्षक ब्रह्मराक्षस राहात असे. वामदेवमुनि त्या अरण्यांत पोंचले तेव्हां त्या ब्रह्मराक्षसाला फार भूक लागली होती. बरेच दिवसांचा तो उपाशी होता. करकरा दांत खात तो वामदेवांना खायला धांवला. वामदेव जरासुद्धां न घाबरतां तसेच शांतपणें उभे राहिले. ब्रह्मराक्षसानें त्यांना घट्ट पकडतांच, वामदेवांच्या

अंगावरील भस्म त्याच्या शरिराला लागलें. दिव्य भस्माच्या प्रभावानें त्या ब्रह्मराक्षसाला पूर्वजन्मींचें ज्ञान झालें. त्याचें पातक जळून गेलें. ब्रह्मराक्षस ब्रह्मज्ञानी झाला. अमृत प्यायला मिळालें तर माणसाचा देव व्हावा तसें झालें त्याचें. वामदेवांना त्यानें नमन केलें. आपला उद्धार करण्याची विनंति त्यानें त्यांना करतांच, कोण, कुठला वगैरे तपास वामदेवांनीं केला. त्या ब्रह्मराक्षसाला गेल्या पंचवीस जन्मांच्या घटनांची स्मृति झाली होती.

यवनदेशांत तो राज्य करीत होता. प्रजेचा दुवा घेण्याऐवजीं लोकांना दुःख देऊन त्यांच्या शिव्याशापांचा तो धनी झाला होता. विषयसुखाची त्याला फार मोठी चटक होती. दररोज नवीन स्त्रीचा उपभोग घेण्यांत त्याला अभिमान व आनंद वाटावयाचा. त्याच्या अंतःपुरांत अगणित स्त्रिया एकाकी जीवन कंठीत होत्या. त्या असहाय व पतित स्त्रियांचे शाप त्याला रोज मिळायचे; पण चलतीचे दिवस होते. त्याला त्याची पर्वा नव्हती. कांहीं स्त्रियांना संतोषानें, कांहींना फूस लावून, कांहींना विकत घेऊन, अशा रीतीनें दररोज एक नवीन स्त्री त्या यवनराजाच्या विषय-लालसेला बळी पडत होती. त्याच्या अन्तःपुरांत सर्व जातींच्या कुमारी, सुवासिनी, विधवा व वेश्या अशा शेंकडों स्त्रिया एकदांच त्याच्या सह-वासाची जबरदस्ती होऊन, कवडीमोलाचें आयुष्य घालवीत होत्या. इतकें होऊनहि त्या यवनराजाची तृप्ति झाली नाहीं. विषयसेवन व मदिरापान यांत त्याचा वेळ जावयाचा. या सर्व स्वच्छंदी वागण्याचा दुष्परिणाम अटळ होता. कांहीं वर्षांनीं त्या यवनराजाला क्षयरोग झाला. परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या व त्याचें राज्य शत्रूंनीं जिंकिलें. अत्यंत हालांत त्या यवनराजाचा मृत्यु झाला. मरणानंतर त्याला यमदूतांनीं नरकांत टाकलें. देवांचीं दहा सहस्र वर्षें त्यानें नरकवास भोगला. नंतर त्याला प्रेतवंशांत जन्म आला. त्याच्या अंगाला एक हजार जननेंद्रियें लागलीं होतीं. त्या अवस्थेंत शेंकडों वर्षे अन्नान्नदशेंत फिरल्यावर पुनः यमलोकांत त्याची

रवानगी झाली. त्यानंतर त्याला वाघाचा जन्म आला. त्या दुसऱ्या जन्मांतहि अनेक जीवांची हत्या त्याच्या हातून घडली. तिसऱ्या जन्मांत अजगर व नंतर लांडगा, गांवांतलें डुक्कर, सरडा, कुत्रा, कोल्हा, रोहिहरण, उंट, माकड, सांबर, मुंगूस, कावळा, रानकोंबडा, आंधळा गाढव, मांजर, बेडूक, कांसव, मासा, चोरटा उंदीर, घुबड यांचे जन्म त्याला आले. त्यानंतर चोविसाव्या जन्मांत तो हत्ती झाला होता. आतां ब्रह्मराक्षस हें त्याचें पंचविसाव्या जन्मांतलें रूप होतें. त्या ज्ञानी झालेल्या ब्रह्मराक्षसाला आपला उद्धार वामदेवांच्या अंगावरील भस्माच्या प्रभावानें झाला हें कळलें. त्यानें वामदेवांना त्याबद्दल अधिक माहिती सांगण्याची विनंति केली. तेव्हां वामदेवांनीं स्वतः पाहिलेली एका द्रविड ब्राह्मणाची गोष्ट त्याला सांगितली.

• • •

## एका द्रविड ब्राह्मणाची कथा

द्रविड देशांत एक ब्राह्मण होता. त्यानें एका शूद्रेशीं लग्न करून सर्व आचारविचारांना हरताळ फासला होता. नातेवाइकांनीं त्याला वाळींत टाकलें होतें. पोट भरावयाची पंचाईत पडूं लागली, तेव्हां त्यानें चोरीचा धंदा सुरू केला. दुसऱ्या शूद्र स्त्रियांना त्यानें आपलेंसें केलें. एक दिवस चोरीच्या निमित्तानें एका शूद्राच्या घरीं त्यानें हल्ला करून, त्या घरांतील स्त्रीशीं लगट सुरू केली. त्या शूद्रानें अत्यंत क्षोभ येऊन त्याला ठार मारलें. त्या ब्राह्मणाचें प्रेत, गांवाबाहेर एका निर्जन स्थळीं ओढून टाकलें व तो

शूद्र सूड घेतल्याच्या समाधानांत घरीं परतला. गांवांतला एक कुत्रा भस्माच्या ढिगाऱ्यावर लोळून, त्याच वेळीं रानांत गेला. त्याला प्रेताचा वास येतांच तो त्या प्रेतावर जाऊन बसला. त्या कुत्र्याच्या पोटाला लागलेलें भस्म त्या प्रेताला लागलें. त्या ब्राह्मणाचा मृत्यु झाल्यावर यमदूत त्याला मारीत मारीत नरकांत नेत होते. तेवढ्यांत शिवदूत त्या प्रेताजवळ आले. भस्मांकित अशा त्या प्रेतांतील जीवात्म्याला यमदूत नेत होते असें पाहतांच, शिवदूत त्या यमदूतांवर चाल करून गेले. यमदूतांनीं त्या ब्राह्मणाच्या जीवात्म्याला सोडून दिलें व तेथून शिवदूतांच्या भीतीनें पलायन केलें व यमलोकांत जाऊन यमधर्माला ते आपलें गाऱ्हाणें सांगूं लागले,

" महाराज, एका घोर पापी माणसाला आम्ही, त्याच्या मृत्यूनंतर नरकांत आणीत होतों तोंच शिवदूत आम्हांला मारावयाला आले.त्यांना भिऊन आम्ही आपल्या पायांशीं आलों आहोंत. यापुढें आम्ही भूतलावर कधींहि जाणार नाहीं. आम्हीं आपलें काम आजपर्यंत चोख करीत होतों. जोंपर्यंत शिवदूतांचा बंदोबस्त झाला नाहीं, तोंपर्यंत आम्हांला रजा द्यावी. "

यमधर्म अत्यंत संतप्त झाले. लगेच कैलासावर जाऊन शिवदूतांना यमदेवानें त्या कृत्याचा जाब विचारला.

" आमच्या दूतांना नाहक तुम्ही त्रास कां दिलात ? "

" यमराज, तो ब्राह्मण पापी होता हें मान्य; परंतु त्याच्या प्रेताला भस्म लागल्यामुळें तो पुनीत झाला व श्रीशंकरांच्या आज्ञेप्रमाणें आम्हीं त्याला तुमच्या दूतांच्या हातून सोडविलें.

' भस्मांकित नरासी । दोष न लागती परियेसी ।
तो योग्य स्वर्गासी । म्हणोनि सांगती शिवदूत ॥ २९·९६ ॥

" असें असेल तर तुमचा दोष नाहीं. मी सर्व कांहीं समजावून सांगतों माझ्या दूतांना. "

यमधर्म आपल्या राज्यांत परत जाऊन आपल्या दूतांना म्हणाले,

" अरे, यापुढें अशी चूक करूं नका. जे लोक भस्मांकित असतील, त्यांनीं अनेक पापें केलीं असलीं तरी त्यांना नरकांत आणूं नका.

' रुद्राक्षमाळा ज्यांच्या गळां । असेल तिलक त्रिपुंड्टिळा

त्यातें तुम्ही नातळा । आज्ञा असे श्रीशिवाची ॥ २९-१०० ॥

वामदेवांनीं त्या मुक्त झालेल्या ब्रह्मराक्षसाला भस्माच्या प्रतापाची ही गोष्ट सांगितली. त्या ब्रह्मराक्षसानें तो यवनराजा असतांना अनेक पापें केलीं होतीं; परंतु एक तळें बांधून तें वापरण्याची परवानगी ब्राह्मणांना दिली होती. त्या एका पुण्यकर्माचें फळ म्हणून, पंचवीस जन्मांनंतर त्याची ब्रह्मराक्षसस्वरूपांत असतांना वामदेवांशीं भेट झाली, याचेंहि ज्ञान त्याला आतां झालें होतें. त्यानें विनंति केली म्हणून वामदेवांनीं भस्म कसें धारण करावें,भस्ममंत्र,श्रीशंकराचें कैलासावरील निवासस्थान व त्याचें प्रभावी व्यक्तिमत्त्व याचें सविस्तर वर्णन त्याला सांगितलें. नुसतें भस्म मिळून चालत नाहीं. त्याला श्रीगुरूंच्या हातांचा स्पर्श व्हावा लागतो. गुरुकृपा व त्यांचा वरदहस्तस्पर्श यांचा महिमा फार मोठा आहे. त्रिविक्रमभारतीला हा भस्माचा महिमा श्रीगुरूंकडून ऐकावयाला मिळाला.नामधारकाचें भाग्य थोर; त्याला सिद्धमुनींनीं तो सांगितला.

त्रिविक्रमभारतीला बोध झाल्यावर पुढें श्रीगुरुचरित्रांत काय काय चमत्कार घडले तें ऐकायला नामधारक उत्सुक होता. सिद्धमुनींना त्याची ती उत्कंठा पाहून आनंद वाटला व ते श्रीगुरुचरित्राची कथा पुढें सांगूं लागले.

● ● ●

# गोपीनाथाची गोष्ट

गाणगापुरांत श्रीगुरूंचा महिमा दिवसेंदिवस वाढत होता. अनेक लोकांचे मनोरथ श्रीगुरु पूर्ण करीत होते. असे दिवस चालले होते. माहूर नांवाच्या गांवांत एक ब्राह्मण होता. त्याचें नांव गोपीनाथ. तो चांगला सधन होता. घरांत कांहीं कमी नव्हतें. खायची प्यायची ददात नव्हती. त्याला फक्त एकच दुःख होतें. त्याचीं मुलें लहानपणींच मरत. नांवारूपाला एकहि मूल येईना. तेव्हां त्यानें आपल्या पत्नीसह श्रीदत्तात्रेयांची आराधना चालू केली. त्या आराधनेनंतर त्यांना एक मुलगा झाला. भक्तिभावानें त्यांनीं त्याचें नांव दत्त ठेविलें. घरांत पैसे खूप होते. त्या एकुलत्या एका मुलावर आईवडिलांची फार माया होती. तीं दोघें त्याचे फार लाड करीत असत. दत्त पांच वर्षांचा झाल्यावर त्याची मुंज मोठ्या थाटानें झाली व बाराव्या वर्षींच गोपीनाथ ब्राह्मणानें त्याचें लग्न लावून दिलें. आईवडिलांना घरांत सूनबाई आणण्याचा फार आनंद वाटला. सूनबाईचें वयहि बारा वर्षांचें होतें. त्यामुळें एकाच वयाचीं तीं नवराबायको फार शोभून दिसत. दत्ताची बायको दिसायला फार देखणी होती, स्वतः तोहि सुंदर होता. त्यांची जोडी रति-मदनासारखी दिसायची. एकमेकांच्या सुखद सहवासांत चार वर्षें केव्हां गेलीं, हेंहि त्या दोघांना समजलें नाहीं. वयाला सोळा वर्षे पूर्ण झाल्यावर, एक दिवस दत्ताला कांहीं व्याधि जडली. अनेक औषधें करूनहि त्याला बरें वाटेना अन्नावर त्याची वांछाच जाईना. तो नेहमीं उपाशी राहूं लागला. दत्त उपाशी राहिला कीं, त्याची पत्नीहि उपास करी. तिचें आपल्या पतीवर निस्सीम प्रेम होतें. आपल्या यजमानांना जें औषध द्यायची तें आपणहि ती प्यावयाची. अशा प्रकारें तीन

वर्षे लोटलीं तरी त्या ब्राह्मणाची व्याधि बरी झाली नाहीं. त्याची पतिव्रता स्त्री पतीचें चरणतीर्थ पिऊनच कालक्रमणा करीत होती. तीन वर्षांनंतर दत्ताच्या अंगाला भयंकर दुर्गंध येऊं लागला. मग वैद्यसुद्धां त्याच्याजवळ जायला तयार होईना. त्याची बायको मात्र त्याला क्षणभर विसंबत नसे. आपली सून व मुलगा यांचे ते असह्य कष्ट पाहून गोपीनाथाला व त्याच्या पत्नीला फार दुःख होई. त्यांची सून मात्र आपला नवरा जेवढे घास जेवील तेवढेच घास आपण जेवीत असे. सगळ्या नातेवाइकांनीं, प्रत्यक्ष सासुसासऱ्यांनीं दत्ताजवळ जाऊं नको, त्याचा रोग तुला होईल असें तिला सांगितलें. परंतु ती सती डगमगली नाहीं. पतिसेवा तिनें निष्ठेनें चालूच ठेवली. दोघांच्या आईवडिलांकडे खूप धनदौलत होती, पण दत्ताचा रोग पैशानें बरा होण्या-सारखा नव्हता. सर्वच गोष्टी पैशानें मिळतात, हा भ्रम आहे. कांहीं बाव-तींत मानव असहाय व निराधार आहे. त्याला जेवढें नशिबांत असेल तेवढें भोगावेंच लागतें.

अनेक जप, अनुष्ठानें, मंत्रविद्या, महाहवन, ब्राह्मणभोजनें त्या दोघांच्या आईवडिलांनीं केलीं. अनेक वैद्यांचीं औषधें देऊन झालीं. ज्योतिष्यांना विचारून त्यांनीं कुलदेवतेला नवस बोलला, परंतु त्यांच्या मुलाची व्याधि बरी होईना. दत्ताच्या आईवडिलांना, वैद्यांनीं आशा सोडतांच अपरंपार दुःख झालें. एकुलत्या एक मुलाची ती दीनवाणी व व्याकुळ अवस्था पाहून त्यांच्या हृदयाला घरें पडत. दत्त त्या अवस्थेंतहि आपल्या आईवडिलांचें सांत्वन करीत असे. आपल्या बायकोची समजूत घालण्याचाहि त्यानें खूप प्रयत्न केला. “ प्रिये, तूं माझी किती सेवा करतेस. माझ्याकरितां किती ग तूं श्रम करतेस ? कां असा आपला जीव शिणवितेस ? मी तुझा पूर्वजन्मींचा वैरी होतों कीं काय न कळे. तुझें सारें जीवन माझ्याकरितां वरबाद झालें. मी आतां फार दिवसांचा सोबती नाहीं. मी हें जग सोडून गेल्यावर, आमच्या घरीं राहिलीस तरी मुलीसारखी वागवतील तुला माझे आईवडील.

नाहीं तर तूं आपल्या माहेरीं जाऊन राहा. माझ्या अंगाला यापुढें स्पर्श करूं नको. तूं किती सुंदर आहेस. नाहीं तर तुलाहि रोग होईल."

" प्राणेश्वरा, तुम्ही पुन: असें बोललात तर मी प्राणत्याग करीन. नका हो माझा असा अव्हेर करूं. जिथें तुमचा देह, तिथेंच माझा भाव. यांत तिळमात्र संदेह करूं नका. मी तुमच्या समागमेंच येणार आहें. तुमच्याबरोबर माझेंहि शरीर लोकांना दहन करावें लागेल. "

लेक-सुनेचा हा संवाद ऐकून गोपीनाथ व त्याची पत्नी यांना दु:खानें मूर्च्छा आली व तीं दु:खानें आक्रोश करूं लागलीं. सासू रडूं लागतांच सूनबाईनें तिला धीर दिला.

" सासूबाई, आपण कांहीं चिंता करूं नका. शिवशंकर माझ्या पतींना खचित वांचवतील. लोकांकडून मला असें कळलें आहे कीं, नरसिंहसरस्वती नांवाचे श्रीगुरु गाणगापुरांत राहतात. त्यांच्या दर्शनानें असाध्य रोग बरे होतात. आम्हां दोघांना त्यांच्या दर्शनाला पाठविलेंत, तर तो एक उपाय करून पाहावा, असें मला वाटतें. "

" ठीक आहे. सूनबाई, तुला असें वाटत असलें, तर जरूर घेऊन जा दत्ताला त्या मुनींच्या दर्शनाला. बघूं या ह्या उपायानें तरी बरें वाटतें का त्याला. "

सासूसासऱ्यांनीं अशा रीतीनें आपली संमति दिली. एक डोली करून त्या रोग्याला आंत बसविलें. डोलीबरोबर त्याची सूनबाई पायींपायींच गाणगापुराला जात होती. गाणगापुराला पोचल्यावर तिला कळलें कीं श्रीगुरु संगमावर गेले होते. लगेच ती पतिव्रता संगमावर जाण्याचा निश्चय करून आपल्या पतीजवळ आली, तोंच प्रवासाचा शीण होऊन तिच्या पतीचे प्राण गेले. त्या पतिव्रतेनें पतिनिधनानंतर दु:खानें हंबरडा फोडला. ती स्वत:ला ठार मारण्याकरितां सुरी शोधूं लागली. तेव्हां गांवांतील लोकांनीं तिला अडविलें. तिनें देवाजवळ भांडावयाला सुरुवात केली.

" अरे देवा, हें दुःख मला कां दिलेंस ? माझे प्राण प्रथम कां हिरावून नेले नाहींस ? देवळांत जावें तर तिथेंच पडून प्राण जावा. उन्हाळ्यांत मोठेंसें झाड पाहून त्याच्या शीतल छायेंत बसावें, तर तें झाडच अंगावर पडावें. उन्हाळ्याच्या तापानें गांजून जाऊन गंगेंत उडी मारावी तर नेमकें सुसरीच्या तोंडांत पडावें. वाघाच्या भीतीनें एखादी गाय पळून जावी व ती नेमकी खाटकाच्या तावडींत सांपडावी अगदीं तसेंच, मी आईवडिलांना, सासूसासऱ्यांना सोडून माझ्या पतीची व्याधि बरी होईल या आशेनें, त्यांना येथें गाणगापुराला आणलें. श्रीनृसिंहसरस्वतींचें दर्शन होण्यापूर्वींच माझ्या पतीचे प्राण जावेत, ही फसवणूक नाहीं तर काय म्हणावयाचें ? "

लोकांनीं तिची अनेक प्रकारें समजूत घातली, परंतु कांहीं केल्या तिचें सान्त्वन होईना. तिनें आपल्या नशिबाला नांवें ठेविलीं. पतीला करुण शब्दांत आळविलें. असा तिचा आक्रोश चालला असतांना, तिथें एक भस्मांकित जटाधारी आला. रुद्राक्षांचीं भूषणें अंगावर, हातांत त्रिशूळ असा त्याचा साज होता. त्या जटाधाऱ्यानेंहि त्या पतिव्रतेची खूप समजूत घातली, " गंगेला पूर आल्यावर अनेक प्रकारचीं लाकडें वाहून येतात. दुसऱ्या लाटेबरोबर पुनः तीं इतस्ततः फांकतात, तसेच हे आपले मानवी जीवनांतील संबंध आहेत. पाण्यावर फेंस असतो तसें आपलें आयुष्य क्षणभंगुर आहे. तर तुला, मला, देवांनासुद्धां मृत्यु चुकला नाहीं. तेव्हां आतां शोक आवर. "

" अहो यतिराया, आपण मला असा उपदेश करतां तर मग मी कशी वागूं तें सांगा. पतीशिवाय पत्नीला कोणती गति आहे ? "

" तुला स्त्रियांचे आचारधर्म मी जरूर सांगेन. या बाबतींत लोपामुद्रेची गोष्ट फार उद्बोधक आहे. "

● ● ●

# लोपामुद्रेची गोष्ट

काशीक्षेत्रांत अगस्ति नांवाचा एक मोठा ऋषि राहात होता. त्याच्या बायकोचें नांव होतें लोपामुद्रा. त्या महाज्ञान्याच्या अनेक शिष्यांत विंध्य पर्वत हा एक प्रसिद्ध शिष्य होता. त्या विंध्याचलावर अपूर्व वनें होतीं. एकदां ब्रह्मर्षि नारद हिंडत हिंडत त्या पर्वतावर गेले. विंध्याचलानें त्यांचें स्वागत केलें. आतिथ्याचा स्वीकार केल्यावर नारदमुनि म्हणाले, " विंध्यपर्वता, तुझें वैभव पाहून मन प्रसन्न झालें, पण. .. "

" पण काय, महामुने ? "

" या वैभवांत एकच कमतरता आहे. तुझा प्रताप त्या मेरुपर्वता-सारखा नाहीं. त्यामुळें तुझ्या या स्थानाचें महत्त्व वाढत नाहीं. "

" महामुने, मी कोणत्या दृष्टीनें त्या मेरूहून कमी आहें ? "

" अरे विंध्यपर्वता, मेरुपर्वताची उंची कुठें व तुझी उंची कुठें ! "

" ठीक आहे. हा पहा मी उंच वाढतों. "

विंध्यपर्वत चुरशीनें वाढत होता. तो इतका उंच वाढत गेला कीं सूर्यमंडळाचें भ्रमणहि आतां अशक्य झालें. विंध्यपर्वताचीं शिखरें सूर्याच्या उंचीहून अधिक उंच झालीं. त्या वेळीं सूर्य उत्तरेकडे होता. त्याला दक्षिण दिशेला येतां येईना. सगळीकडे अंधार भरून राहिला. विंध्य-पर्वताच्या दक्षिण भागांतील ऋषिमुनींचीं यज्ञयागादि कर्में अडून राहिलीं. सगळे ऋषि इन्द्राला शरण गेले. इन्द्रानें ब्रह्मदेवाला जाब विचारला. ब्रह्मदेवानें अगस्तिऋषीच या संकटांतून सोडवूं शकतील असें सांगितलें. विंध्यपर्वत अगस्तिऋषींचा शिष्य आहे. तो आपल्या गुरूचें दर्शन होतांच त्यांना वांकून नमस्कार करील, तेव्हां गुरूनें जर त्याला वाढूं नको अशी आज्ञा,

केली तर तो जरूर ऐकेल. " हा ब्रह्मदेवाचा सल्ला सर्वांना पटला. त्याप्रमाणें सर्व देव व ऋषि अगस्तींच्या आश्रमांत गेले. त्यांनीं अगस्तींची स्तुति केली. नंतर ते लोपामुद्रेविषयीं म्हणाले, " अरुंधती, सावित्री, अनसूया, लक्ष्मी, पार्वती, मेनका, ध्रुवाची आई सुनीता, संज्ञा, स्वाहा या सर्व पतिव्रता आपल्यापरीनें मोठ्या होत्या. परंतु या लोपामुद्रेची सर कोणाला येणार नाहीं. " त्या वेळीं इतर देवांनीं, पतिव्रतेचीं लक्षणें काय, असें विचारलें. त्यावर बृहस्पति म्हणाले, " जी स्त्री पतिव्रता असते, ती पति जेवल्यावर त्याच्या पानांतील उरलेलें अन्न प्रसाद म्हणून भक्षण करते; पतीच्या आज्ञेवांचून त्याच्यासमोर बसत नाहीं. पतीची कधींही अवज्ञा करीत नाहीं. त्याच्या संमतीशिवाय दानधर्म करीत नाहीं. पति हाच श्रीहरि समजून मनोभावें त्याची पूजा करते. पति झोपल्यानंतर आपण झोपते. पतीला नांवानें हांक मारीत नाहीं. पत्नीनें नवऱ्याला नांवानें हांक मारली तर त्याचें आयुष्य कमी होतें. सकाळीं नवरा उठण्यापूर्वीं उठून ती सडासंमार्जन करून घर मंगल करते. आपला पति घरीं असला तरच पतिव्रतेनें शृंगार करावा. पति बाहेरगांवीं गेला असला तर थाटमाट कशाला ? नवरा रागानें बोलला तरी बायकोनें उलट बोलूं नये. नवरा बाहेरून आल्यावर, सगळीं कामें बाजूला ठेवून पतिव्रतेनें सामोरें जावें. "

लोपामुद्रा अशा प्रकारच्या नियमांचें पालन करीत असे. ती अगस्तिऋषींना सोडून नगरांत उत्सव असला तरी जात नसे. तीर्थक्षेत्रें किंवा मंगल कार्यांनाहि पतीशिवाय ती जात नसे. पतिव्रता होणें वाटतें तितकें सोपें नाहीं. कुलस्त्रीनें उखळ किंवा उंबरठ्यावर बसूं नये. नग्नपणें स्नान करूं नये. पतीबरोबर वाद घालूं नये, पतीच्या आवडीप्रमाणें वागावें. त्याच्या आवडीचीं वस्त्रेंप्रावरणें घ्यावीं. नवऱ्याचें मन उद्विग्न असलें तर पत्नीनें शृंगार करूं नये. आपल्याला कांहीं हवें असलें तर तें मुलांकडून सांगावें. आपल्या

नवऱ्याला जेवढें मिळेल तवेढ्यांत समाधान मानावें. शेजाऱ्याच्या घरीं सारखें जाऊं नये.

श्रीगुरुदेव तीर्थें समस्तीं । श्रीगुरु जाणावा आपुला पती ।

ऐसा निश्चय ज्यांच्या चित्तीं । पतिव्रता त्याचि जाणा ॥२१·९२॥

त्या लोपामुद्रेच्या अंगीं हें सर्व होतें. बृहस्पतीनें कुलस्त्रीचे आचारधर्म सांगितल्यावर, दुर्दैवानें पतिनिधन आधीं झालें तर स्त्रीनें कसें वागावें हें सांगितलें.

" पति दूर देशीं असतांना वारले, तर सहगमन कसें करणार ? पतिनिधनाच्या वेळीं स्त्री गरोदर असेल किंवा घरांत तान्हें मूल असेल तर तिनें काय करावें ? " असा देवांचा व ऋषींचा प्रश्न ऐकून बृहस्पति म्हणाले,

" आपण विचारलेंत त्या अवस्थेंत स्त्रीनें सती जाऊं नये. तसें सहगमन केलें तर तें पाप ठरतें. अशा स्त्रीनें विधवा-जीवन कंठावें. विधवांनीं केशवपन करावें. व्रतस्थ राहावें. चांद्रायणव्रत करावें. आपण सुवासिनी असतांना ज्या गोष्टींची आवड वाटत असे अशा वस्तु ब्राह्मणांना दान द्याव्या. वैशाख महिन्यांत पाण्याचा घट दान द्यावा. कार्तिकांत दीपदान करावें. पतिनिधनानंतर मुलाच्या आज्ञेंत राहावें. "

बृहस्पतीनें केलेलें विवरण ऐकून व आपल्या पत्नीची स्तुति ऐकून अगस्तिमुनि संतुष्ट झाले व त्यांनीं देवांची विनंति मान्य केली. ते दक्षिणेकडे जातांच, उंच वाढलेला विंध्याचल त्यांच्या पायांवर विनम्र झाला. 'मी दक्षिणेकडून परत उत्तर भारतांत जाईपर्यंत तूं असाच पडून राहा !" असें आपल्या शिष्याला सांगून अगस्ति दक्षिणेकडे गेले. ते तिथेंच राहिले व त्यामुळें विंध्यपर्वताची उंची कमी झाली व सूर्याचें भ्रमण सुरू होऊन सर्व ऋषिजनांचे दैनंदिन कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडूं लागले.

" अहो बाई, ऐकलीत ही लोपामुद्रेची गोष्ट ?"

" हो ऐकली. माझे पति दूरदेशीं असतांना निवर्तले नाहींत. ते माझ्याजवळ आहेत. त्यामुळें आपल्याच सांगण्याप्रमाणें, हे महामुने, मी आतां आनंदानें सती जायला तयार आहें. तसा माझा निश्चयच ठरला आहे. "

" अहो बाई, तुम्हीं श्रीगुरूंच्या दर्शनानें पतीला आरोग्य लाभेल या इरायानें आलांत ना ? मग मला वाटतें, सती जाण्याआधीं तुम्हीं त्या श्रीगुरूंचें दर्शन घ्यावें. मी हें मंतरलेलें भस्म देऊन ठेवतों. तें कपाळावर लावा. हे चार रुद्राक्षमणि आहेत, ते प्रेताच्या कानावर दोन व कंठावर दोन बांधून मग प्रेताचें दहन करा. त्या आधीं तुम्हीं गुरुदर्शनाला जा. त्या वेळीं रुद्रसूक्त म्हणून ब्राह्मण श्रीगुरूंचे पाय धुतील. तें चरणतीर्थ घेऊन या आपल्या देहावर व या प्रेतावर तें भक्तिपूर्वक शिंपडा व मग सुवासिनींना दान देऊन, ब्राह्मणांना पुष्कळ दक्षिणा देऊन मगच सहगमन करा, अशी माझी सूचना आहे. "

" ठीक आहे. महायति, आपल्या सांगण्याप्रमाणें करीन मी सगळें. "

त्याप्रमाणें सर्व कांहीं झालें व तिनें सती जायची तयारी केली. गांवांतल्या लोकांचा तिनें निरोप घेतला व सासूसासऱ्यांना ही बातमी सांगूं नका, नाहीं तर तीं जीव देतील अशी विनंति केली. प्रेताचे सर्व विधिसंस्कार झाल्यावर, दहनापूर्वी ती पतिव्रता श्रीगुरूंच्या दर्शनाला गेली. तिनें श्रीगुरूंना आळविलें. " गुरुराया, तुझी कीर्ति ऐकली म्हणून गाणगापूरला आलें. माझ्या पतीला चांगलें आरोग्य लाभलें. मला चांगले पुत्र झाले. हें मोठें नवल झालें म्हणायचें ! माझे मनोरथ खूप पुरे केलेत.आतां तुझी कीर्ति घेऊन परलोकांत जाणार आहें. त्या आधीं तुझ्या दर्शनाला आल्यें आहें.

" अष्टपुत्रा अखंड सौभाग्यवती भव, " असा श्रीगुरूंनीं तिला आशीर्वाद दिला. तो आशीर्वाद ऐकून आसपासचे लोक हंसूं लागले. त्यांनीं श्रीगुरूंना वस्तुस्थिति सांगितली. तेव्हां श्रीगुरु म्हणाले, " लोकहो, हिचें

सौभाग्य दृढ आहे. आपण हिचा पति वारला म्हणतां ? आणा तर त्याचें प्रेत माझ्याजवळ. त्याचा प्राण केव्हां गेला तें तरी मी पाहतों. "

" ठीक आहे, " असें म्हणून कांहीं लोकांनीं तें प्रेत श्रीगुरूंपुढें आणून ठेविलें. श्रीगुरूंनीं त्या प्रेताचे दोर तोडून वर पांघरलेला कपडा दूर काढून ठेवायला सांगितला. त्या वेळीं चार ब्राह्मणांनीं रुद्रसूक्त म्हणून श्रीगुरूंचे पाय धुतले. " तें चरणतीर्थ त्या प्रेताच्या अंगावर प्रोक्षण करा." असें श्रीगुरूंनीं सुचविलें. त्याप्रमाणें लोकांनीं केल्यावर श्रीगुरूंनीं अमृतदृष्टीनें त्या प्रेताकडे पाहतांच, तें प्रेत उठून बसलें ! चारचौघांत आपण नागवे बसलेले पाहून त्या ब्राह्मणाला लाज वाटूं लागली. आपल्या बायकोला बोलावून, आपणांला कुठें आणलें, इतके लोक जमले तरी मला कां उठविलें नाहींस, असे प्रश्न तो ब्राह्मण विचारूं लागला. तेव्हां, त्या पतिव्रतेनें सर्व हकीगत त्याला सांगितली. तेव्हां श्रीगुरूंच्या त्या प्रभावानें आनंदित झालेल्या एका ग्रामवासियानें आणलेलें वस्त्र परिधान करून, आपल्या पत्नीसह त्या दत्त ब्राह्मणानें श्रीगुरूंच्या चरणांवर लोळण घेतली. आपल्या कृतकर्माप्रमाणेंच इहलोकीं आपणांला सुखदुःख किंवा आयुष्य मिळतें हें निश्चित, असा सिद्धांत माहीत असणारा तेथें जमलेल्यांतला एक ब्राह्मण श्रीगुरूंना वादांत अडविण्याच्या विचारानें म्हणाला,

वेदशास्त्रें पुराणें । बोलताती सनातनें ।

ब्रह्मलिखित सत्य जाणें । न ढळेवि हें वाक्य निरंतर ॥३२.१८२॥

या ब्राह्मणाचा अपमृत्यु घडला नव्हता. त्याला विधिलिखिताप्रमाणें मृत्यु आला असतांना, आज ब्रह्मलिखित खोटें कसें ठरलें ? "

" अरे कुतर्कमति ब्राह्मणा ,

पुढील जन्माच्या आयुष्यासी । उसनें घेतलें परियेसा ॥३२.१८५

या ब्राह्मणाच्या पुढच्या जन्मांतील आयुष्यांतलीं तीस वर्षें आम्हीं उसनीं घेतलीं व त्याला या जन्मांत तेवढें आयुष्य वाढविलें आहे. त्यामुळें नियतीच्या चक्रांत मूलत: तसा बदल झाला नाहीं."

श्रीगुरूंचें हें उत्तर ऐकून सर्व पंडित तटस्थ झाले व श्रीगुरूंना साष्टांग नमस्कार करून ते आपापल्या घरीं परतले. इकडे त्या जिवंत झालेल्या दत्त ब्राह्मणाची व्याधि पूर्ण बरी झाली,त्याचें शरीर तेज:पुंज झालें.त्या पतिपत्नींनीं खूप दानधर्म केला व आपल्या गांवांतील आपल्या नातेवाइकांकडे तीं त्या दिवशीं राहायला गेलीं.

त्यानंतर श्रीगुरु सूर्यास्ताच्या सुमारास मठांत परत आल्यावर, पुढें काय अद्भुत चमत्कार घडला तें, सिद्धमुनींच्या तोंडून ऐकायला नामकरणी अगदीं अधीर झाला होता. त्याचें श्रीगुरुचरित्रावरील आत्यंतिक प्रेम पाहून सिद्धमुनींनीं आपली गोष्ट पुढें सांगितली.

" दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो दत्त ब्राह्मण व त्याची पत्नी श्रीगुरूंच्या दर्शनाला आलीं व त्या ब्राह्मणाच्या पत्नीनें, शोक करीत असतांना, भेटलेल्या जटाधारी मुनींबद्दल श्रीगुरूंना सांगितलें. प्रेताच्या अंगावर बांधायला दिलेल्या रुद्राक्षांचें माहात्म्य जाणून घेण्याची उत्कंठा त्यांना लागून राहिली होती. त्यांनीं त्याबद्दल श्रीगुरूंना विचारतांच श्रीगुरु म्हणाले, " रुद्राक्षांचा महिमा फार मोठा आहे. तो थोडक्यांत सांगणें कठीण.

> ' ज्यांचे गळां रुद्राक्ष असती । त्यांचीं पापें दुरावती ।
> त्यांसी होय सद्गती । रुद्रलोकीं अखंडित ॥ ३३-२१ ॥

रुद्राक्षमाळेनें जे जप करतात त्यांना अमितज्ञान प्राप्त होतें.

गळ्यांत एकशेंआठ रुद्राक्षांची माळ धारण करून उपासना केली तर रुद्रपुत्राप्रमाणें सामर्थ्य प्राप्त होतें याविषयीं काश्मीरच्या भद्रसेनराजाची कथा प्रसिद्ध आहे.

# राजा भद्रसेन

काश्मीरचा राजा भद्रसेन याला **सुधर्म** नांवाचा एक गुणवान् मुलगा होता. त्या राजाच्या मंत्र्याचा मुलगा राजकुमाराच्याच वयाचा होता. त्याचें नांव होतें **तारक**. सुधर्म व तारक यांची दाट मैत्री होती. दोघांचा विद्याभ्यास एकत्र झाला. दोघे एकाच जागीं खेळावयाचे. ते दोघे कुमार वाढूं लागले. मोठे झाल्यावर इतर अलंकारांचा त्याग करून ते रुद्राक्षांच्या माळा गळ्यांत घालूं लागले. राजाराणींनें खूप सांगितलें, पण त्यांना इतर दागदागिन्यांचें आकर्षण जरासुद्धां वाटेना. असे दिवस चालले होते. एकदां पराशरऋषि राजा भद्रसेनाला भेटायला आले. त्यांचें यथायोग्य स्वागत केल्यावर राजानें राजकुमाराची व मंत्रिपुत्राची स्थिति त्यांना सांगितली.

" या तरुण वयांत इतकें वैराग्य यांना कसें आलें ? "

" राजा भद्रसेना, या तुझ्या मुलाची व मंत्र्याच्या मुलाची जन्मकहाणी फार विचित्र आहे. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहतांच त्यांचें पूर्वायुष्य मला स्पष्टपणें दिसूं लागलें आहे. "

" महामुने, सांगा तर तो पूर्वेतिहास आम्हांला. "

" राजा भद्रसेना, ऐक तर मग आपल्या मुलाचें पूर्वायुष्य.

नंदिग्राम नांवाचें एक नगर होतें.त्या नगरांत एक अतिशय सुंदर वेश्या होती. तिच्या मुखचंद्राकडे पाहून चंद्रालाहि लाज वाटायची. त्या वेश्येचें घर सोन्याचें होतें. सुवर्णाच्या पादुका ती घालीत असे. तिच्या घरांतील पलंग रत्नखचित होते. घरांत असंख्य माणकें व अगणित संपत्ति होती. गोठ्यांत खूप गुरेंढोरें होतीं. तिच्या घरापुढें एक मोठा नाट्यमंडप बांधलेला होता. त्यांत ती रोज मोठ्या आनंदानें नृत्य करीत असे. त्या

मंडपांत तिनें आपला छंद म्हणून एक कुक्कुट व मर्कट पाळलें होतें. ( श्रीमंतांच्या अनेक शोकांतलाच तो एक होता. ) त्या कोंबड्याची व माकडाची देखभाल मोठ्या प्रेमानें ती वेश्या करीत असे. त्यांच्या गळ्यांत रुद्राक्ष बांधून त्यांना ती सदाशिव म्हणत असे. एक दिवस शिववृत्तीं नांवाचा एक वैश्य तिच्या घरीं आला. तो व्यापारी मोठा धनिक होता. त्याच्या गळ्यांत रुद्राक्षमाळ होती. कपाळावर भस्माचा टिळा होता. त्याच्या डाव्या हातावरलि कंकणावर एक रत्नखचित लिंग होतें. त्याचे किरण चंद्रकिरणाप्रमाणें सगळीकडे पसरले होते. त्या वैश्याला पाहतांच. त्याचें स्वागत करून त्या चतुर नायिकीनें त्याला आपल्या घरीं नेलें. नाट्यमंडपांत त्याला बसवून त्याच्यासमोर तिनें विविधप्रकारें नृत्य केलें. त्या वाण्याजवळील तें देदीप्यमान लिंग त्या वेश्येच्या मनांत फार भरलें. आपल्या सखीला ती म्हणाली,

" जर तें रत्नखचित लिंग तो मला देईल, तर मी त्याची तीन दिवस कुलस्त्री म्हणून राहायला तयार आहें. मी पद्मिनी आहें. त्याला त्या रत्न-खचित लिंगाच्या मोबदल्यांत मनसोक्त रतिसुख तीन दिवस देईन. द्रव्य घेऊन तें लिंग द्यायला तो वाणी तयार असला तर तसा करार ठरवा. " त्याप्रमाणें त्या वेश्येच्या मैत्रिणींनीं त्या शेटजीला विचारलें. तेव्हां शेटजी म्हणाले, " तुमची मुख्य मालकीण, माझी तीन दिवस पतिव्रतेप्रमाणें सेवा करायला तयार असली तर मी हें मनोहर रत्नलिंग द्यायला तयार आहें, पण मला तुमच्या मालकिणीशीं याविषयीं बोलावें लागेल. " रतीसारखी सुंदर वेश्या लगेच त्याच्याजवळ आली व वांकून नमस्कार करून तिनेंहि आपली इच्छा सांगितली.

" तुम्ही पतिव्रता म्हणून माझ्याजवळ तीन दिवस राहायला तयार झालांत पण तुम्हांला अनेक पुरुषांचा सहवास घडतो. तुम्ही नेहमीं व्यभि-

चार करतां. तुमचें मन एका पुरुषावर स्थिर नाहीं, अशा स्थितींत तुम्ही माझी अट कशी पुरी करणार ?"

"अहो शेटजी, मी दिलेला शब्द जरूर पाळीन. मी इतर वेश्ये'सारखी नाहीं. तीन दिवस तुमच्याखेरीज इतर सर्व पुरुषांना मी परपुरुषांप्रमाणें मानीन."

"या रत्नालिंगावर हात ठेवून तशी शपथ घ्या !"

"ठीक आहे. चंद्रसूर्यांना साक्षी ठेवून, आजपासून तीन दिवस मी तुमची पत्नी झाल्यें आहें. या रत्नलिंगाची शपथ !"

"सुंदरि, तुझ्या या निश्चयानें मी संतुष्ट झालों आहें. हें बांधतों मी रत्न-खचित लिंग असलेलें कंकण तुझ्या हातांत. हें रत्नखचित लिंग माझ्या प्राणाचेंच प्रतीक समजून याची काळजी घे. हें हरवलें तर मी माझा प्राण देईन !"

"शेटजी, मी या रत्नखचित लिंगाचें जिवापाड रक्षण करीन. आपण कांहीं काळजी करूं नका !"

त्यानंतर सूर्य अस्ताला गेल्यावर त्या वेश्येनें शेटजींना महालांत नेलें. सुखासनावर बसल्यावर ते शेटजी म्हणाले, "विषयसुखाचा आस्वाद घेतांना हें रत्नखचित लिंग हातावर बांधूं नको. तें दुसरीकडे नीट ठेवून ये !"

त्याप्रमाणें त्या वेश्येनें रत्नखचित मंडपांतील एका मधल्या खांबाच्या कपाटांत तें रत्नखचित लिंग ठेवलें व ती शेटजींना स्वर्गसुखाचा लाभ देण्याकरितां प्रामाणिकपणें त्यांच्याकडे परत महालांत गेली. तास दोन तास त्यांनीं शृंगारसुख अनुभविलें नसेल तोंच उजाडायच्या सुमारास नाट्यमंडपाला मोठी आग लागली. त्या वेश्येच्या नोकरचाकरांनीं तिला बाहेर झालेल्या हाहा:काराबद्दल सांगतांच, शेठजीसह ती महालांतून बाहेर धांवली. पाहतात तर सारा नाट्यमंडप जळून बेचिराख झाला होता. त्यांत

बांधलेल्या कुक्कुट-मर्कटांची आहुति अग्नीनें घेतली होती. त्या वेश्येला आपल्या लाडक्या प्राण्यांचा असा अंत झाला हें पाहून अपरंपार दुःख झालें. त्या वैश्याचें तें रत्नखचित लिंग त्याच नाट्यमंडपांत होतें, हें आठवतांच तिच्या दुःखाला व शोकाला अंतच राहिला नाहीं. त्या वाण्याला रत्नखचित लिंग त्या आगींत जळल्याचें कळतांच, त्यानें जीव देण्याचें ठरविलें. त्या उफाळत्या आगींत आणखी लांकडें टाकून, त्यानें स्वतः त्यांत उडी टाकली. सगळे लोक नवल करूं लागले. त्या वेश्येनें त्या वाण्याबरोबर सहगमन करण्याचें ठरविलें. तीन दिवस त्याची कुलस्त्री म्हणून राहाण्याचा करार तिनें टरविला होता. गांवांतल्या ब्राह्मणांना बोलावून, तिनें सती जाण्याचा आपला निश्चय त्यांना, सांगितला. वेश्येला पतिव्रताधर्म बाधत नाहीं असा पोक्त सल्ला अनेकांनीं तिला दिला, परंतु ती वेश्या आपल्या वचनाची किंमत ओळखत होती. अग्निकुंड पेटलें होतें. इतर सर्व विधि करून, ब्राह्मणांना पुष्कळ धनदौलत दान करून तिनें सूर्याला नमस्कार केला. त्यानंतर अग्निकुंडांत तिनें उडी घालतांच, एक अद्भुत चमत्कार घडला. पंचमुखी दशभुज शंकर त्या कुंडांतून वर आले. नंदीवर बसलेल्या जटाधारी, भस्मांकित शंकरांच्या प्रभावानें अग्निकुंडांतील अग्नि शांत झाला होता. त्या वेश्येला बाहेर काढून, सदाशिव तिला म्हणाले, " तुझी सत्त्वपरीक्षा पाहण्याकरितां मीच वैश्यरूपानें तुझ्या घरीं आलों होतों. तुझ्या एकवचनीपणानें मी संतुष्ट झालों आहें. तें रत्नखचित लिंग स्वयंभू आहे. त्याला अग्नि काय जाळणार ? आग वगैरे सारी कांहीं माझी माया होती. आतां काय मागशील तो वर मी तुला देईन. "

" परमेश्वरा, मला माझ्या दासदासींसह मुक्त करा. मला सदैव तुमच्याजवळ स्थान द्यावें. "

तिच्या विनंतीप्रमाणें सर्वांना कैलासांत नेण्याकरितां विमान आलें व सर्वांचा उद्धार झाला.

ही कथा सांगून पराशरऋषि म्हणाले, " राजा भद्रसेना, त्या नाटय-मंडपांत जो रुद्राक्षमाळा घातलेला माकड जळून मेला तो तुझ्या राणीच्या पोटीं जन्माला आला. त्याच्या मित्राचा-कोंबड्याचा पुनर्जन्म मंत्र्याच्या घरीं झाला आहे. पूर्वजन्मींच्या संस्कारांचा प्रभाव मोठा असतो. त्याप्रमाणें या दोघांच्या मनांत रुद्राक्षमाळेविषयीं अपरंपार आकर्षण टिकून राहिलें आहे. यांनीं न कळतांनाहि पूर्वजन्मांत रुद्राक्ष धारण केले, त्या पुण्याईचें फळ यांना या जन्मांत राजकुळांत जन्म मिळून मिळालें आहे. "

" अहो पराशरमुनि, आपण त्रिकालज्ञ आहांत. माझ्या मुलाचें व मंत्र्याच्या कुमाराचें पूर्वजन्मांतील वृत्त आपण सांगितलेंत. आपण यांचें भविष्यहि सांगितलेंत तर फार उपकार होतील. आम्हांला आपण सांगितलेली अद्भुत कथा ऐकून फार उत्कंठा लागून राहिली आहे."

" राजा भद्रसेना, याबद्दल तूं मला कांहीं विचारूं नयेस हें चांगलें. मला वाटतें मी आतां येथून जावें."

" महामुने, भविष्य कसेंहि असलें तरी तें ऐकण्याची आमची तयारी आहे. आपण संकोच न बाळगतां खुशाल सांगा. "

" राजा, ऐक तर मग. तुझ्या राजकुमाराचें आयुष्य अवघें बारा वर्षांचें आहे. त्यांतलें आतां फक्त सात दिवस उरले आहेत. आजपासून आठव्या दिवशीं तुझ्या मुलाला मृत्यु येणार आहे. "

हें भविष्य ऐकतांच भद्रसेन राजा मूर्च्छित पडला. राजाला मंत्र्यानें व इतरांनीं मोठ्या सायासानें सावध केलें. पराशरऋषींना त्याचा आक्रोश पाहून त्याची दया आली. राजानें त्या अपमृत्यूवर उपाय विचारतांच ते म्हणाले, " राजा, असा धीर सोडूं नकोस. काळाला जिंकावयाचाहि एक उपाय आहे तो तुला मी सांगतों. रुद्राध्यायांत तो उपाय सांगितला आहे.

रुद्रजप केला असतां सर्व पातकें जळून जातात. रुद्राध्यायाचें सार थोड-क्यांत तुम्हांला सांगतों. तें नीट लक्षांत ठेवा.

जसें पेरावें तसें उगवतें, हें निश्चितच; परंतु गुरूची सेवा करून त्याची कृपा संपादन केली असतां, सर्व कर्मांचा परिहार होऊं शकतो. गुरुभक्त, भवसागर लीलया तरून जातात. काम, क्रोध, लोभ, मद व मत्सर हे मनुष्याचा घात करतात. गुरुपत्नीशीं व्याभिचार, दारू पिणें, पुत्रवध, आईचा खून व ब्रह्महत्या हीं पांच महापातकें असून त्यांच्याबरोबर इतरहि उपपातकें यमानें भूतलावर पाठविलीं आहेत. परंतु रुद्रजपाला हीं सर्व पापें घाबरतात. यमधर्मानें एकदां त्याबद्दल ब्रह्मदेवाकडे तक्रार केली.

" अहो विरिंचि भगवान्, आपण या रुद्रजपाचें महत्त्व भूतलावर इतकें वाढवलें तरी स्वस्थ कसे ? यमलोक ओस पडला आहे. नरक शून्य पडले आहेत. सगळे लोक शिवोपासना करून सुखी झाले आहेत. रुद्राध्यायाचें हें मोठें भयंकार अस्त्र मानवांच्या हातांत देऊन, त्यांना पापमुक्त होण्याचा हमखास उपाय आपण त्यांच्या हातांत दिला आहे. "

" यमा, तुझ्या दूतांना सांग कीं, रुद्रजपी असला तरी सर्वांनाच सारखें वागवूं नका. भक्ति नसतांना, दुर्मदानें रुद्रजप करणारे अज्ञानी तामसी लोक तुमच्याच अधिकारक्षेत्रांत येतील. निजून जप करणारे असेच शासनाला पात्र होतात. जे लोक भक्तिभावानें रुद्राध्याय वाचतात त्यांनाच फक्त तुझ्या दूतांना शासन करतां येणार नाहीं.

म्हणून हे राजा, आपल्या राजकुमाराकडून दहा हजार रुद्रजपासह अभिषेक भक्तिपूर्वक करव म्हणजे तो दहा हजार वर्षें राज्य करून इंद्राप्रमाणें अपार कीर्ति संपादन करील. शंभर ब्राह्मण बोलावून आजपासून शंकरावर अभिषेक सुरू कर. "

भद्रसेनराजानें त्याप्रमाणें सात दिवस शंकरावर अभिषेक करविला. सात दिवस पुरे झाल्यावर, ठरल्या वेळीं राजकुमार जमिनीवर निश्चेष्ट पडला.

तेव्हां प्रत्यक्ष रुद्र तेथें प्रकट झाले. त्यांनीं यमदूतांना शासन केलें. त्या कुमारावर मंत्राक्षता टाकतांच, यमदूताचे पाश त्याला बांधूं शकले नाहींत व राजपुत्र तात्काळ सावध झाला. राजाला व सर्वांनाच फार आनंद वाटला. तेवढ्यांत, नारदमुनि भद्रसेन राजाच्या दरबारीं आले.

" कांहीं विशेष वर्तमान पाहिलें का ?" असें विचारतांच, नारदमुनि म्हणाले,

" आज महामृत्यूच्या दूतांबरोबर, यमदूत तुझ्या मुलाला बांधून न्यायला येत असतांना भेटले होते; परंतु जरा वेळानें ते भयभीत होऊन पळून जातांना पाहतांच मला आश्चर्यच वाटलें. शिवदूत त्यांचा पाठलाग करीत होते. यमधर्मानें वीरभद्राकडे जाऊन शिवदूतांच्या त्या कृत्याचा जाब मागितला. तेव्हां वीरभद्र म्हणाला, " भद्रसेनराजाच्या मुलाला दहा हजार वर्षें आयुष्य असतांना, बारा वर्षांनींच यमदूत त्याला आणूं लागले म्हणून त्यांना शासन करावें लागलें आम्हांला. "

" पण चित्रगुप्ताच्या हिशोबाप्रमाणें त्याला बारा वर्षेंच आयुष्य आहे, असें मला चांगलें आठवतें. "

" बोलवा तर मग चित्रगुप्ताला. "

चित्रगुप्तानें आपली वही आणून दाखविली. त्यांत भद्रसेनाच्या मुलाचें आयुष्य बारा वर्षेंच लिहिलें होतें, हें खरें होतें, परंतु त्याला एक सुधारणाहि जोडली होती त्याप्रमाणें प्रथम बारा वर्षें मुदत असली, तरी ती आतां दहा हजार वर्षें वाढविली आहे, अशी ताजी टीप होती. ती वाचून यमाला आपली चूक उमजली व वीरभद्राला वंदन करून यमधर्म मुकाट्यानें परत गेला. मी तुझ्याकडे येत असतांना, वाटेंत भेटला होता तेव्हां त्यानेंच मला हें सर्व वर्तमान सांगितलें." नारद व पराशर निघून गेले. राज्यांत आनंदो-

त्सव झाला. सर्व लोक सुखांत मग्न झाले, परंतु भद्रसेनराजाला मात्र रुद्रा-व्यायाच्या महिम्याचा कधींहि विसर पडला नाहीं.

मेलेल्या ब्राह्मणाला जीवदान दिल्यावर, त्या प्रमाणें रुद्राक्षधारणाचें माहात्म्य या गोष्टीद्वारें श्रीगुरूंनीं सांगितलें. त्यानंतर त्या पतिव्रतेनें निरोप घेतांना, स्वतःला कांहीं मंत्र जप करण्याकरितां सांगा, अशी श्रीगुरूंना विनंति केली तेव्हां.

श्रीगुरु म्हणती तियेसी ।। स्त्रियांस काय उपदेशीं ।
पतिभक्तीविणें काय त्यांसी । उपदेशासी देऊं नये ।। ३५·६ ।।

स्त्रियांना उपदेश दिला तर मंत्राला विघ्न निर्माण होतें. या बाबतींत शुक्राचार्यांची गोष्ट प्रसिद्धच आहे.

• • •

# देवयानी व संजीवनी

" श्रीगुरुराया, शुक्राचार्यांची गोष्ट काय आहे ?

" बाई, पूर्वीं एकदा देवदैत्यांचें युद्ध चालू होतें. दैत्यांचे गुरु शुक्राचार्य, दैत्यवीर रणांत मृत्युमुखीं पडले कीं, त्यांना एक मंत्र म्हणून जिवंत करीत. त्या मंत्राचें नांव होतें संजीवनी विद्या. त्यामुळें इंद्रानें युद्धांत कितीहि पराक्रम गाजविला तरी तें सर्व व्यर्थ ठरत असे. त्यामुळें इंद्राचें वज्र निष्प्रभ ठरलें. तेव्हां इंद्रानें कैलासांत जाऊन शंकरांकडे तक्रार केली. तेव्हां महादेवांनीं नंदीला म्हटलें,

" अरे नंदी, तावडतोब जाऊन त्या शुक्राचार्याला धरून आण. "

" आज्ञा स्वामी, " असें म्हणून नंदीनें तावडतोब शुक्राचार्याला तोंडांत धरून शिवाजवळ आणलें. तेव्हां शंकरानें शुक्राचार्याला मंत्रशक्तीनें शासन केलें. दैत्य-सैन्यांत एकच आकांत माजला. अशा रीतीनें अनेक दिवस शुक्राचार्य शिवाच्या उदरांत राहिला होता. तो एकदां मूत्रद्वारांतून, संधि सांपडतांच निसटून गेला. शंकरांना त्याचा तोंपर्यंत विसर पडला होता. त्यामुळें शुक्राचार्य शरीरांतून निसटला हें त्यांच्या लक्षांतच आलें नाहीं. पूर्वी त्याचें शुक्र नांव होतें पण परमेश्वराचे उदरांतून बाहेर पडला म्हणून त्यालाच भार्गव असें नांव पडलें. त्यांनीं पुनः संजीवनी विद्या जपून दैत्य सैन्याला जिवंत करावयाला सुरुवात केली.

इंद्रानें बृहस्पतीला बोलविलें. एखादी युक्ति शुक्राची विद्या हरण करण्याकरितां शोधून काढण्याची जबाबदारी बृहस्पतीवर पडतांच, त्यानें आपला मुलगा कच याला संजीवनीविद्या हरण करून आणण्याकरितां शुक्राचार्यांकडे पाठविलें. कचानें एका ब्राह्मणकुमाराचा वेष घेतला व शुक्राचार्यांकडे जाऊन तो म्हणाला,

" आपली कीर्ति ऐकली म्हणून विद्याभ्यासासाठीं आपणांकडे आलों आहें. आपण भक्तवत्सल आहांत. मला आश्रय द्याल याबद्दल खात्री वाटते." शुक्राचार्यांची कन्या देवयानी, हिच्या मनांत तो ब्राह्मणकुमार प्रथमदर्शनींच भरला होता. तिनें आपल्या वडिलांची मनधरणी करून कचाला शिष्य म्हणून ठेवून घ्यावयाला भाग पाडलें. दैत्यांनीं कचाचें सोंग ओळखलें. ते त्याला मारावयाला टपून बसले होते. एकदां समिधा आणायला कच रानांत गेला असतांना, दैत्यांनीं त्याला ठार मारलें. सूर्यास्त झाला तरी कच परत आला नाहीं म्हणून देवयानीचा जीव कासावीस झाला. तेव्हां तिनें शुक्राचार्यांना गळ घातली. शुक्राचार्यांनीं मनोज्ञानानें खरी परिस्थिति ओळ-

खली. संजीवनीमंत्र जपून कचाला पुन: जिवंत केलें. अशा रीतीनें कचाला एकदां जविदान मिळालें तरी, दैत्यांनीं कचाला पुन्हां ठार मारिलें. त्याच्या हाडांची पूड दाही दिशांना फेंकून दिली. सूर्यास्त झाला. काळोख पडला. तरी कच परतला नाहीं. देवयानी रडूं लागली. तिनें जेवावयाचें नाकारलें तेव्हां पुन: एकदां शुक्राचार्यांनीं कचाला जिवंत केलें. तिसऱ्या वेळीं दानवांनीं एक भयंकर कट रचला. एकादशीच्या दिवशीं कचाला बाहेर नेऊन मारिलें व त्याला जाळून त्याची राख दारूंतून दैत्यांनीं शुक्राचार्यांना प्यावयाला दिली. देवयानीच्या विनंतीवरून, अंतर्ज्ञानानें पाहतांच शुक्राचार्यांना कच आपल्याच पोटांत आहे असें कळलें. ते देवयानीला म्हणाले,

" बाळे, आतां मात्र माझा नाइलाज आहे; कचाला जिवंत करायचा तर संजीवनी मंत्र म्हटला पाहिजे. मी तो मंत्र म्हटला कीं कचाला, तो पाठ होईल. तो जिवंत होईल तो माझें पोट फोडूनच. तुला तुझा प्रियकर मिळेल; पण पिता कायमचा अंतरेल ! "

" पण कचाला संजीवनी विद्या आली, की तो त्या मंत्राच्या सामर्थ्यावर, बाबा, तुम्हांला परत जिवंत नाहीं का करणार ?"

" मुली, तें सारें खरें पण त्यानें जिवंत नाहीं केलें तर ? देवांना संजीवनीमंत्र कळेल व दैत्यांचा पराजय मग अटळ ठरेल ! "

" तर मग तो मंत्र मला शिकवा. म्हणजे मीच तुम्हांला जिवंत करीन."

" बाळे, यांत दोन गोष्टी विसरलीस. एक तर तुला मंत्र शिकवायचा म्हणजे कच माझ्याच उदरांत आहे. त्यामुळें मंत्र घटकर्णी होईल व त्याचें सामर्थ्यच नष्ट होईल. शिवाय स्त्रियांना मंत्र शिकवूं नये या शास्त्रवचनाच्या तें विरुद्ध होईल. "

" ठीक आहे बाबा, मंत्र तुम्हांला जास्त प्रिय आहे तर तो आपणाजवळ ठेवा. मी मात्र कचाशिवाय जिवंत राहूं शकणार नाहीं. कचाशीं

लग्न करून, तुमची जन्मभर सेवा करावी अशीं सुखस्वप्नें मी पाहात होतें. आतां भंगलीं सारीं स्वप्नें. संपल्या साऱ्या आशा. तुमच्या लाडक्या देवयानीचा हा तुम्हांला शेवटचाच प्रणाम."

देवयानी बेशुद्ध पडलेली पाहून शुक्राचार्यांना फार दुःख वाटलें. मुलीवर त्यांची फार प्रीति होती. त्यांनीं देवयानीला सावध केलें व तिला तीन वेळां उच्चारून मंत्र शिकविला. देवयानीचा मंत्र पाठ झाला तसाच तो कचानेंहि आत्मसात् केला. तो शुक्राचार्यांचें पोट फोडून बाहेर पडला. देवयानीनें मंत्र जपून शुक्राचार्यांना जिवंत केलें. लगेच कचानें हात जोडून शुक्राचार्यांना विनविलें, " मला येथें असुरांपासून क्षणोक्षणीं भीति आहे. तेव्हां आतां मला निरोप द्यावा."

शुक्राचार्यांनीं त्याचें सोंग तेव्हांच ओळखिलें होतें. त्यांनीं निराशेनें हंसत हंसत त्याला निरोप दिला. परंतु देवयानीनें त्याची वाट अडविली. " कचा, माझा किती रे अंत पाहतोस? माझें तुझ्यावरलें प्रेम शब्दांनींच बोलून दाखवावयाला पाहिजे का? आतां तरी माझा पत्नी म्हणून स्वीकार कर!"

" गुरुकन्ये देवयानी, तुझी माया वेडी आहे. तूं माझें इतके दिवस संरक्षण केलेंस. मला जीवदान मिळवून दिलेंस त्याबद्दल मी तुझा आमरण आभारी व कृतज्ञ राहीन पण लग्नाविषयीं मला गळ घालूं नको. कारण ती गोष्ट आतां सर्वथैव अशक्य आहे. तूं गुरुकन्या मला भगिनीसारखी आहेस. माझे प्राण वांचविलेस म्हणून आतां तर तूं माझ्या आईसारखी आहेस."

" अरे कचा, तूं चांगलाच कपटी आहेस. माझ्या मनींच्या आशा भंग केल्यास. जा, तुझी विद्यासुद्धां वृथा होईल. संजीवनीविद्येचा तुला कांहीं उपयोग होणार नाहीं."

" देवयानी, मला तूं उगीचच शाप दिलास. तुलाहि ब्राह्मणकुळांतील कोणीहि वर वरणार नाहीं, असा मी तुला शाप देतों. तुझे वडील ब्रह्मज्ञानी असून मृत्युसंजीवनी त्यांना माहीत होती. परंतु तुला ती विद्या शिकविल्यामुळें तो संजीवनी मंत्र यापुढें चालणार नाहीं. "

कच स्वर्गांत निघून गेला. इंद्रभुवनांत आनंदीआनंद झाला. शुक्रांचा संजीवनीमंत्र मात्र एका स्त्रीला शिकविल्यामुळें फुकट गेला व दैत्य-सैन्यांत घोर निराशा पसरली.

" हे पतिव्रते, म्हणून तुला कांहींहीं मंत्र नको, पतिसेवा हाच तुझा मंत्र असे मी म्हणालों. "

" गुरुराया, असें जरी असलें तरी मला तुमची चरणसेवा हेंच व्रत वाटत आहे. तुझ्या चरणीं माझी भक्ति राहील असें तूं कर ! "

" ठीक आहे. तुमचें मन स्थिर होण्याकरितां, तुम्हां उभयतांना एक व्रत सांगतों. सोमवाराचें व्रत तुम्हीं दोघांनीं करा. सोमवारीं दिवसा उपवास करून रात्रीं भोजन करावें. वैदिक तंत्रानें विधिपूर्वक शंकराची पूजा करावी. हें व्रत गृहस्थ, ब्रह्मचारी, कन्या, सुवासिनी किंवा विधवा—कोणीहि करावें. "

स्कंदपुराणांत या सोमवारव्रताच्या माहात्म्याबद्दल एक कथा आहे.

• • •

# सीमंतिनीची गोष्ट

आर्यावर्तांत पूर्वी एक राजा होऊन गेला. त्याचें नांव होतें चित्रवर्मा. सगळी पृथ्वी आपल्या बाहुबळावर त्यानें जिंकली. परंतु ती सारी जिंकलेली संपत्ति कर्मकांडांत वाटून टाकली. राजा व राणी यांना सर्व सुखें होतीं परंतु त्यांना अजून पुत्रप्राप्ति झाली नव्हती, एवढेंच काय तें वैगुण्य होतें. मुलाकरितां त्या उभयतांचा जीव आसुसला होता. मुलगा व्हावा या हेतूनें तीं राजाराणी दोघेंहि शिवोपासना करीत होतीं. अनेक वर्षें उपासना केल्यावर राणीला गर्भ राहिला.योग्य काळीं राणी प्रसूत झाली; परंतु मुलाऐवजीं छत्तीस लक्षणी सुंदर अशी मुलगी त्यांना झाली. तिचें नांव त्यांनीं सीमंतिनी असें ठेविलें. सीमंतिनी लक्ष्मीसारखी गुणवान्, उमेसारखी लावण्यपूर्ण व जानकीसारखी पतिव्रता होईल असें भविष्य ज्योतिष्यांनीं वर्तविलें.आपल्या पतीसह ती दहा हजार वर्षें राज्यसुख भोगील असेंहि भविष्य त्यांनीं सांगतांच, चित्रवर्मा राजाला फार आनंद वाटला. त्या ज्योतिष्यांना व ब्राह्मणांना त्यानें पुष्कळ दानें दिलीं. राजसभेंत गोडबोल्या ज्योतिष्यांचें असें कौतुक चाललें असतांना, एक गरीब ब्राह्मण ज्योतिषी उठून उभा राहिला. त्यानें कोणाची भीति न बाळगतां, खणखणीत आवाजांत राजाला सांगितलें, “ राजा, माझें भविष्यकथन ऐक. इतर पंडितांनीं आपआपलें मत तुला सांगितलें आहेच. पण माझ्या गणिताप्रमाणें, राजकन्या सीमंतिनीला चौदाव्या वर्षीं विधवापण येईल. ”

तो ब्राह्मण आपलें स्पष्ट मत सांगून निघून गेल्यावर, राजसभेंत मोठाच हाहाःकार उडाला. राजाला मूर्च्छा आली.प्रधानानें राजाला कसेंबसें सावध केलें व नंतर त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तो प्रसंग होऊन गेला, परंतु राजाराणीच्या मनाला कायमचा हृद्रोग लागला. सीमंतिनीच्या

बाल्लीला पाहतांना त्या स्पष्टवक्त्या ज्योतिष्याचें मत आठवून त्यांच्या आनंदावर विरजण पडत असे. सीमंतिनी वाढत होती. ती सात वर्षांची झाली असतां, एके दिवशीं तिला आईवडिलांच्या बोलण्यावरून,ती विचित्र भावी घटना होणार असल्याचें कळलें. त्या काळीं सातव्या वर्षी मुलीच्या लग्नाचें बघावयाला लागत.सीमंतिनीला आपलें दारुण भविष्य कळतांच तिनें याज्ञवल्क्यऋषींची पत्नी मैत्रायणी हिला बहुमानपूर्वक बोलावून घेतलें. आगतस्वागत केल्यावर सीमंतिनीनें आपलें सौभाग्य स्थिर करण्याचा उपाय तिला विचारिला.

" बाळे सीमंतिनि, तुझा दृढनिश्चय पाहून मला आनंद झाला. तूं उमा-रमणाला शरण जा. सोमवारव्रत कर."

सोमवारव्रताची सविस्तर माहिती सीमंतिनीनें मैत्रायणीकडून विचारून घेतली. राजकन्या नियमानें ते व्रत आचरण करूं लागली. अशीं कांहीं वर्षे गेलीं. राजानें सीमंतिनीचा विवाह करण्याचें ठरविलें. तिच्या प्राक्तनांत असेल तसें होईल, त्याकरितां लग्न करावयाचें ठेवूं नये असा सर्वांचा निश्चय ठरला व सगळीकडे दूत रवाना झाले. नलराजाच्या वंशांतील इंद्रसेन राजाचा मुलगा चित्रांगद याची निवड सर्वांना मान्य झाली. एका शुभ मुहूर्तावर सीमंतिनी चित्रांगद राजकुमाराची पत्नी झाली. लग्नसोहळा मोठ्या थाटामाटांत पार पडला. सीमंतिनीला चौदावें वर्ष लागून कांहीं महिने झाले होते. त्या वेळीं इतर वऱ्हाड्यांना निरोप दिला. परंतु चित्रवर्माराजानें जांवईबापूंना एक महिनाभर मोठ्या प्रेमानें राहवून घेतलें. दिवस मोठ्या मजेंत जात होते. एक दिवस राजकुमार चित्रांगद कालिंदी नदीवर जलक्रीडा करायला गेला होता. बरोबर सर्व सैनिकहि होते. चित्रांगदाबरोबर त्याचे खास शरीररक्षक नौकेंत चढले. नौका किनाऱ्यावरून सुटली. मंगल वाद्यांचा गजर झाला. कालिंदी नदींत विहार करतांना फार मौज वाटत होती. यमुनाजळीं असे खेळ चालले

असतांना चित्रांगद बसला होता ती राजनौका यमुनानदीच्या पाण्यांतील एका भोवऱ्यांत सांपडली. कोणाचें कांहीं चालण्याच्या आंतच ती नौका बुडाली. सगळीकडे एकच आकांत उडाला.

नेमकी त्याच दिवशीं सीमंतिनी चित्रांगदाबरोबर जलविहाराला गेलेली नव्हती. तिला हें वर्तमान कळतांच ती धांवतच नदीवर गेली. यमुनेच्या डोहांत नौका बुडाली होती. तिथें ती गेली व शोक करूं लागली. राजाच्या अंत:पुरांतील अनेक स्त्रिया बेशुद्ध पडल्या. स्वत: चित्रवर्मा राजा मूर्च्छित पडला. सीमंतिनीला आपलें सर्व तपाचरण फुकट गेल्यासारखें वाटलें. सोमवारव्रताचा प्रभाव पडेल, असें तिला वाटलें होतें. चौदाव्या वर्षी वैधव्य येणार, हें भविष्य टळावें म्हणून, तिनें आज सात वर्षें शिवव्रत आचरण केलें होतें. याज्ञवल्क्याच्या पत्नीनें आपली फसवणूक तर केली नाहीं ना, असेंहि तिच्या दु:खी मनांत जरूर आलें.सीमंतिनीच्या पाठोपाठ मंत्री वगैरे यमुनातीरावर आले होते. सीमंतिनीनें गंगाप्रवेश करून आपल्या जीविताचा अंत करण्याचा निश्चय बोलून दाखवितांच, सर्वांनीं तिला बोध केला. अनेक नावाड्यांनीं यमुनेंत उड्या मारल्या व चित्रांगदाचें शरीर सांपडतें का पाहूं लागले.

यमुनेच्या पात्रांत सगळीकडे शोधूनहि कांहीं तपास लागला नाहीं, सीमंतिनीला राजवाड्यांत परत नेऊन चित्रवर्म्यानें तिचें कसेंबसें सान्त्वन केलें. परंतु चित्रांगदाचे सेवक परत जाऊन त्यांनीं इंद्रसेनराजाला हा वृत्तान्त सांगताच, तो नगरांत आल्यावर त्याचें सान्त्वन करणें चित्रवर्म्याला सर्वथैव अशक्य झालें. इंद्रसेनराजानें मुलाचें प्रेत सांपडेपर्यंत तरी व्याहयांकडे राहावयाचें मान्य केलें. तिकडे नातेवाइकांनीं या व्याकुळ स्थितीचा फायदा घेऊन इंद्रसेनाचें राज्य हिरावून घेतलें. कांहीं महिने वाट पाहून चित्रांगदाचें प्रेतहि सांपडलें नाहीं तेव्हां इन्द्रसेन आपल्या राणीसह

आपल्या राज्यांत परत जातांच, त्या कपटी शत्रूंनीं त्या उभयतांना दुर्गांत डांबून टाकलें. आधींच पुत्रशोक, त्यांतच तें कारावासाचें दुःख.

इकडे चित्रवर्माराजानें सीमंतिनीची परोपरीनें समजूत घालण्याचा प्रयत्न केला. "बाळे, आम्हांला तुझ्याशिवाय दुसरें कोण आहे ? तूंच आमची एकुलती एक मुलगी. तुला लग्नाचें नुसतें गालबोट लागलें आहे. एक वर्ष असें व्रतस्थ काढलेंस तर धर्मज्ञ पंडित कांहीं मार्ग शोधून काढणार आहेत."

"बाबा, जशी तुमची मर्जी. मी यापुढें शिवव्रतांत सारें आयुष्य घालविण्याचें ठरविलें आहे."

सीमंतिनी मनोभावानें तें सोमवार व्रत आचरण करीत राहिली.

तिकडे चित्रांगदाची नौका बुडाल्यावर, तो तो पाताळांत सर्पराज वासुकीच्या नगरांत पोंचला. खोल पाण्यांतील त्या अद्भुत नगरांतील नागकन्या नदीतीरावर आल्या होत्या. त्यांनीं चित्रांगदाला बेशुद्ध अवस्थेंत, नदीकाठीं पडलेला पाहून, तात्काळ आपल्या घरीं नेलें. अमृत प्यावयाला देऊन सावध केलें. नंतर त्यांनीं तक्षकाला त्या चित्रांगदाबद्दल कळविलें. चित्रांगद पाताळनगरीची रचना पाहून आश्चर्यचकित झाला होता. वासुकीच्या दरबारांत नेतांच, सभेंत सारे सर्प वलयाकार बसलेले पाहून त्याला थोडी भीतीच वाटली.

सिंहासनावर सर्पराज बसला होता. रूपयौवनयुक्त हजारों नागकन्या तक्षकाची सेवा करण्याकरितां उभ्या होत्या.

"कुठून आणलात या मानवाला ?"

"महाराज, नदीकाठांवर बेशुद्ध पडला होता हा."

"याचा परिचय ?

"महाराज, हे राजकुमार स्वतःच करून देतील."

" ठीक आहे. अतिथि, तुम्ही करून द्या आपला परिचय या सभेला. "

" महाराज, मी इंद्रसेनराजाचा पुत्र. माझें नांव चित्रांगद. चित्रवर्मा राजाच्या मुलीशीं—राजकन्या सीमंतिनिशीं—माझा विवाह झाला. विवाह-सोहळा संपल्यावर थोडे दिवस सासऱ्याकडे राहिलों होतों. काल जलक्रीडा करावयाला यमुनेच्या डोहांत आलों असतांना, नाव बुडाली. त्यानंतर मला शुद्ध आली तेव्हां, मी या सुंदर ललनांच्या घोळक्यांत होतों. त्यांच्याकडून आपलें नांव समजलें. सर्पराज, आपली भेट पूर्वपुण्याईनें आज मला झाली. आज मी धन्य झालों. "

" चित्रांगदा, भिऊं नको. आम्ही तुला अभय देतों. आम्ही तुला सर्व प्रकारची मदत करूं. तुमच्या घरीं तुम्हीं कोणत्या दैवताची पूजा करतां ? "

" तक्षकमहाराज,

सकळ देवांचा देव । नाम ज्याचें सदाशिव ।
वामांगीं उमा अपूर्व त्यालागीं पूजितों ॥३५-२०७॥

त्या शिवशंकरांचें वर्णन करणें माझ्या बुद्धीच्या पलीकडचें आहे. "

" चित्रांगदा, आतां तर तूं मला अधिकच जवळचा वाटतोस. माझ्या सदाशिवप्रभूचा तूं भक्त. तुला मी पाताळाचें राज्य देतों. येथेंच विविध भोगांचा आनंद घेत दिव्य जीवन तूं जगावेंस. येथें ना मृत्यूचें भय ना रोगराईचें. "

" महाराज, आपलें मन मोठें आहे. आपण दाखवीत असलेल्या या कृपादृष्टीबद्दल मी फार आभारी आहें. परंतु मी माझ्या वडिलांचा एकुलता एक मुलगा आहें. चौदा वर्षांची माझी शिवभक्त बायको, लग्नानंतर लगेच वैधव्य आलें म्हणून प्राणत्यागही करील. आईवडील माझ्या मृत्यूमुळें जीव देतील. त्यांच्या हत्येचें पातक मला लागेल. आपलें दुर्भिळ दर्शन मला झालें आहेच. तरी येथें अधिक राहण्याचा आग्रह आपण मला करूं नये. "

" चित्रांगदा, तुझ्या या कृतज्ञ व प्रेमळ स्वभावामुळें आम्ही अधिकच खूश झालों आहोंत. माझें स्मरण केलेंस कीं तुझे मनोरथ पूर्ण होतील. "

त्या सर्पराजानें अनेक सुंदर नागकन्या, रत्नें, माणकें व कल्पवृक्षांचीं फळें देऊन त्या चित्रांगदाचा सन्मान केला.त्याला भरपूर अमृत प्यावयाला दिलें व नंतर आपली चतुरंग सेना त्याच्याबरोबर देऊन त्याला कांहीं दिवसांनीं निरोप दिला. तक्षकानें दिलेल्या एका ऐटबाज घोड्यावर बसून राजपुत्र चित्रांगद मनोवेगानें निघाला होता. ज्या ठिकाणीं बुडाला होता त्याच ठिकाणीं त्याचा घोडा बाहेर पडला. त्याच्याबरोबर एक नागकुमार होता. त्या दिवशीं सोमवार होता. सीमंतिनी आपल्या मैत्रिणींसह नदीवर स्नानाला आली होती.

" अग सख्यांनो,नदींतून कोणी तरी वर येतांना दिसलें का तुम्हांला?"

" सीमा,अग असेल कोणी राक्षस.मायावी रूपें घेऊन पृथ्वीवर संचार करावयाचा व लोकांना फसवायचें ही त्यांची रीत."

" अग पण नीट पाहा ना जरा ! घोड्यावर स्वार होऊन येणारा हा स्वार नदींतून वर आला सुद्धा. कुठे जातोय् कुणाला माहीत ! हा सुवास येतोय् तो त्याच्या गळ्यातल्या पुष्पमालांचाच असावा. याला पूर्वी कधीं-तरी पाहिला असावा असें वाटतें आहे. माझ्या प्राणनाथांसारखें याचें रूप आहे. "

सीमंतिनीला जशी राजकुमार चित्रांगदाची ओळख पटत चालली होती तशीच त्यालाहि आपल्या पत्नीची ओळख पटत होती. तिच्या गळ्यांत मोत्यांचा हार नव्हता.हळदीकंकण हातांत नव्हतें.त्यानें नदीतीरावर उतरून सीमंतिनीला जवळ बोलाविलें व विचारिलें,

" बाई, आपण कुठल्या देशांतल्या ? आपलें नांव काय ? आपले पति काय करतात ? आपण या बालवयांत एवढ्या म्लान कां दिसतां ? "

" मैत्रिणींनो, यांना तुम्हींच सांगा माझी सारी कथा. "

" सीमंतिनी, सांगतों आम्ही यांना सारें कांहीं.अहो अतिथि, हिचें नांव सीमंतिनी. हिचा पति चित्रांगद. तो मदनासारखा सुंदर होता. लग्नानंतर एक दिवस जलक्रीडा करण्याकरितां, इथेंच यमुनाजळांत आला असतांना नौका बुडाली व तेव्हांपासून ही आमची मैत्रीण वैधव्यदुःख भोगीत आहे. वडिलांनी शपथच घातली म्हणून तिनें जलसमाधि घेतली नाहीं. सोमवारचें व्रत आचरण्यांत हिचें तारुण्य चाललें आहे. हिच्या सासऱ्याची स्थिति दुःखद आहे. त्यांना व त्यांच्या पत्नीला नातेवाइकांनीं कारावासांत टाकलें आहे. त्यांचें सर्व राज्य हिरावून, त्या वृद्धाच्या दुःखावर डागण्या देत आहेत ते कपटी नातेवाइक. तुम्ही आम्हांला हिची माहिती विचारलीत; तर मग, आपण कोण आहांत तें आतां सांगा आम्हांला. एवढ्या स्नेहानें विचारणारे आपण गन्धर्व, देव, किन्नर किंवा जादूगार तर नाहीं ? "

सीमंतिनी एवढ्यांत आपल्या पतीची आठवण होऊन मूर्च्छित पडली. चित्रांगदानें शोक आवरला. सीमंतिनीला सावध केलें व म्हणाला, " मी तुझ्या पतीला पाहिलें आहे. शिवव्रताच्या प्रभावामुळें तीन दिवसांत ते तुला भेटतील. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव. "

सीमंतिनीचा त्याच्या आश्वासनावर विश्वासच बसेना. ती त्या परकी इसमाला आणखी कांहीं विचारणार तोंच, चित्रांगद घोड्यावर स्वार होऊन वासुकीपुत्रासह दूर निघून गेला होता. तो आपल्या नगराबाहेर उतरला व तक्षकाच्या मुलाला त्यानें वैऱ्यांकडे निरोप घेऊन पाठविलें. शत्रूंना तो निरोप पोंचतांच, त्यांत कांहीं दैवी जादूटोणा असावा असें वाटून ते फार घाबरले. आपले प्राणहि धोक्यांत आहेत असें वाटून ते चित्रांगदाला शरण आले.त्याआधीं इंद्रसेन व त्याच्या राणीला बंदिवासांतून सोडवायला ते विसरले नव्हते.आईवडिलांना चित्रांगदाची भेट होतांच आनं-

दाच्या अतिरेकानें त्यांना मूर्च्छा आली. नागकुमारानें अमृत शिंपून त्यांना सावध केलें. चित्रांगदानें तक्षकाच्या मुलाचा मोठा सत्कार केला. पाताल-नगरींतील दिव्य वस्तु आईवडिलांना दाखविल्या. इंद्रसेनराजाला आपल्या सुनेची आठवण आली. सीमंतिनीच्या सोमवारव्रताच्या प्रभावानेंच चित्रांगदाला जीवदान मिळालें याबद्दल त्याची मनोगत खात्री पटली होती. लगेच त्यानें चित्रवर्मा राजाकडे ही आनंदाची बातमी कळविण्याकरितां जासूद रवाना केले.पुन: एकदा चित्रांगद मोठें वऱ्हाड घेऊन चित्रवर्म्याच्या नगरांत गेले व प्राणप्रिया सीमंतिनीशीं त्यांचें पुनर्मीलन झालें. त्यानें पाताळांत मिळालेल्या अपूर्व गोष्टी सीमंतिनीला भेट दिल्या. त्यानंतर सीमंतिनी सोमवारचें व्रत अधिकच विश्वासानें आचरण करूं लागली."

त्या पतिव्रतेला व कोडांतून बऱ्या झालेल्या व पुनर्जीवित झालेल्या तिच्या पतीला श्रीगुरूंनीं हें अतिसुखद सोमवाराचें व्रत आचरण करावयाला सांगून निरोप दिला. तें दांपत्य माहूरला आपल्या घरीं पोंचतांच, त्यांच्या सासू-सासऱ्यांना फार आनंद झाला. गोपीनाथ ब्राह्मणानें गांवांत मोठा उत्सव केला. श्रीगुरूंची कीर्ति सगळीकडे पसरली. श्रीगुरुचरित्राची ही अमृताची मेजवानी मिळूनही, नामधारकाची पूर्ण तृप्ति झाली नाहीं. श्रीगुरुचरित्राची गोडी अशी अवीट आहे.

• • •

# ‘ परान्नं प्राणसंकटम् ! ’

श्रीगुरु गाणगापुरांत होते तेव्हांची गोष्ट. सिद्धमुनि सांगत असत; व त्यांचा शिष्य नामधारक श्रीगुरूंच्या त्या अद्भुत कथा ऐकण्यांत मग्न होत असे. श्रीगुरूंचें माहात्म्य गाणगापुरांत वाढत होतें. त्या गांवांत एक वेद-विद्यापारंगत ब्राह्मण राहात होता. तो कधींहि परान्न घेत नसे. खोटें बोलत नसे. रोज कोरडी भिक्षा मागून आणावी व धर्मनिष्ठ आचरण करून मिळेल तें खाऊन, आल्या-गेल्याच्या सेवेंत वेळ घालवावा, असा होता त्याचा नित्यक्रम. त्याची बायको मात्र तापट स्वभावाची व लोभी होती. गाणगा-पुरांत राहून केवळ मीठभात खाऊन राहावें लागतें या आपल्या स्थितीचें तिला मनस्वी दुःख होत असे. मिष्टान्न जेवणाची संधि येत असूनहि, त्याचा फायदा आपणाला मिळत नाहीं याचेंच तिला फार दुःख होई. गाणगापुरांत बाहेरगांवचे यात्रिक येऊन ब्राह्मणभोजन घालीत. त्या गरीब ब्राह्मणानें दुसऱ्याकडे न जेवण्याचें व्रत घेतलें होतें त्यामुळें त्याच्या बायकोला गोड-धोड खायला मिळणें कठीण झालें होतें. शेजारणी तिला रोज जेवणावळींचीं रसभरित वर्णनें सांगत. बुंदीचे लाडू, जिलब्या, अनरसे, साखरभात अशा अनेक पक्वान्नांचीं फक्त नांवेंच तिला ऐकायला मिळत. आपले यजमान दरिद्री ते दरिद्री; पण पंचपक्वान्नें जेवायची फुकटची संधिसुद्धां आपल्याला लाभूं देत नाहींत याचें तिला मनस्वी दुःख होई. असे दिवस चालले असतांना, एक दिवस एक मोठा श्रीमंत ब्राह्मण गाणगापुरांत आला. त्यानें सहस्रभोजन घालावयाचें ठरवून त्याप्रमाणें गांवांतील सर्व ब्राह्मण-दांप-त्यांना आमंत्रण दिलें. त्या गरीब ब्राह्मणाच्या पत्नीलाहि आमंत्रण मिळालें. ती आपल्या यजमानांना म्हणाली,

" ऐकलं का ?-आज सहस्रभोजनाचें खास आमंत्रण आहे. मी इतके दिवस कधीं म्हटलें का ? पण आज त्या श्रीमंत बाईनीं फारच गळ घातली म्हणून तुम्हांला आग्रह करतें आहें. जाऊं या का आपण आज त्या समाराधनेंत जेवायला ? "

" असें बघ, माझें परान्न न घेण्याचें व्रत आहे, हें तुला माहित आहे ना ? मग मी कसा येऊं ? फार तर तूं एकटीच जा . माझी त्याला परवानगी आहे. "

" जशी आपली आज्ञा. " असें सांगून व निदान आज तरी पंचपक्वान्नें खायला मिळणार या आनंदांत ती आपण येणार म्हणून व्यवस्थापकांना सांगायला गेली.

" अहो बाई, तुम्ही एकट्या येणार म्हणतां; पण आम्हीं तर दांपत्यभोजन घालणार आहोंत. तुमचे यजमान बरोबर आले तरच तुम्हांला जेवायला मिळेल. नाहीं तर आमचा नाइलाज आहे. "

" बरं; मी जाऊन विचारतें माझ्या घरीं. "

ती बाई घरीं न जातां श्रीनृसिंहगुरूंकडे गेली. आपले यजमान परान्न घ्यावयाला कधींच तयार होणार नाहींत हें तिला पक्कें ठाऊक होतें.त्यामुळें श्रीनृसिंहसरस्वतींकडून त्यांची समजूत घालतां येईल या आशेनें ती त्यांच्याकडे गेली होती.

" स्वामी, माझ्या पतींना फक्त आजचा एकच दिवस परान्न घ्यायला सांगितलेंत तर माझ्यावर फार अनुग्रह होईल. तुमचेंच फक्त ते ऐकतील, असें मला वाटतें. "

" अहो बाई, ठीक आहे. बोलावून आणा तुमच्या पतीला. "

त्या ब्राह्मणस्त्रीनें लगबग घरीं जाऊन आपल्या पतीला श्रीगुरूंकडे नेलें. तेव्हां श्रीगुरु त्याला म्हणाले,

" अरे ब्राह्मणा, तुझ्या पत्नीच्या मनांत मिष्टान्न जेवायची वासना आहे. तर मग तूं सहस्रभोजनांत जेवणाचें आमंत्रण कां स्वीकारीत नाहींस? आपल्या धर्मपत्नीला नेहमीं असें असंतुष्ट ठेवणें बरें नाहीं. तूं आज तरी त्या सहस्रभोजनांत जेवायला जाण्याचें कबूल कर. "

" श्रीगुरु, तुमची आज्ञा जो पालन करणार नाहीं, त्याला स्वर्गप्राप्ति नाहींच, पण महादुःख मात्र नक्की मिळतें. माझा परान्न न घेण्याचा नियम आहे हें माहीत असूनहि, आपण मला जेवायला जायला सांगत आहांत, म्हणून मी याचा स्वीकार करतों. "

त्या गरीब ब्राह्मणाच्या पत्नीला फार आनंद झाला. आपल्या पतीसह ती जेवावयाला गेली. त्या धनिक माणसानें आपल्या वडिलांचें नांव उच्चारून, त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ब्राह्मणभोजन घालीत असल्याचें प्रार्थनेंत म्हटलें. ब्राह्मणांचीं पानें मांडलीं जात होतीं. मिष्टान्नांचे ढीग वाढले जात होते. त्या गरीब बाईला केव्हां एकदां जेवावयाला प्रारंभ करतात असें होऊन गेलें होतें. अखेर शेवट ' हरहर महादेव ' अशी गर्जना झाली. सारेजण जेवायला बसले. त्या ब्राह्मणस्त्रीनें पहिला घांस घेण्यापूर्वीं आपल्या बाजूला दृष्टि टाकली, तों काय आश्चर्य ! तिच्या दोन्ही बाजूंना कुत्रीं व डुकरें जेवत असल्याचें तिला दिसलें. समोर पाहिलें तरी तेंच दृश्य, पाठीं पाहिलें तरी चिखलांत लोळून बरबटलेलीं डुकरें आपल्या पाठीं जेवण भुरकीत आहेत असें तिला दिसलें. तिनें डोळे पुसले. दृष्टिभ्रम असेल असें तिला वाटलें; फक्त तिचे पति तेवढे तिला मनुष्य स्वरूपांत दिसत होते, पण इतर सर्व कुत्रे व डुकरें. तिला फार खंत वाटली. पानावरून उठून ती तशीच बाहेर पडली. आपल्या पतीला तिनें ती सर्व हकीगत सांगितली. तेव्हां त्या ब्राह्मणानें म्हटलें,

" केवळ तुझ्यामुळें माझ्यावर हा प्रसंग ओढवला. परान्न म्हणजे कुत्रे-डुकरांचें उष्टेंच तें ! आतां यावर उपाय म्हणजे श्रीगुरूंचें दर्शन. चल आतां श्रीगुरूंकडे. "

तीं नवराबायको श्रीगुरूंकडे गेलीं व त्यांनीं सर्व प्रकार त्यांना सांगितला. तेव्हां श्रीगुरु त्या बाईला म्हणाले,

" परान्नाचें सुख कळलें ना ? रोज रोज आपल्या पतीला दुखवीत होतीस, आज तुझे मनोरथ झाले ना पुरे ? "

" स्वामी, मला क्षमा करा. माझ्या पतींनाहि परान्नाचें पातक लागूं देऊं नका. यापुढें मी कधींहि असला वेडा हट्ट धरणार नाहीं. "

पत्नीच्या या विनंतीला दुजोरा देत तो ब्राह्मण म्हणाला, "गुरुराया, माझें परान्न न घेण्याचें व्रत मोडलें. मी दोषी आहें. "

" अरे ब्राह्मणा, आपल्या कुलस्त्रीची वासना तूं पुरविलीस. आतां तिची तृप्ति झाली. पुनः कधींहि तिला परान्नाचा मोह वाटणार नाहीं. तुझें परान्न न घेण्याचें व्रत मोडलें नाहीं असें मी सांगतों. अरे, प्रत्येक व्रतानुष्ठानाला मानवी सद्भावनेनें थोडीफार मुरड घालावीच लागते. तशी मुरड घातली नाहीं तरच तें पाप होतें. "

" गुरुराया, परान्न कुठें व केव्हां घेतलें तरी चालेल ? "

" एखाद्या ब्राह्मणाचें धर्मकृत्य एका ब्राह्मणाकरितां अडलें असलें, तर खुशाल तेथें जेवावयाला जात जा. आपल्या गुरुगृहीं जेवायला संकोच नसावा. वैदिक ब्राह्मणाच्या घरीं, आपली सासुरवाडी आजोळ या ठिकाणीं जेवल्यास तें परान्न होत नाहीं. फार तर या सर्व ठिकाणीं जेवून आल्यावर गायत्रीजप करावा.

" श्रीगुरुराया, ज्या घरीं अन्न घेणें पाप अशीं घरें कोणतीं ? "

" जे कोणी आईवडिलांना राबवून घेतात, धनलोभी आहेत, अत्यंत कोपिष्ट, संपत्तीचा ज्यांना गर्व आहे, अशा व इतर पापाचरण करणाऱ्यांकडे अन्न सेवन करूं नये. "

" श्रीगुरुराया, हें जेवणाविषयीं झालें. ब्राह्मणाचें आदर्श आचरण कसें असावें तें मला सांगावें. "

" अरे ब्राह्मणा, पूर्वी पराशरऋषींनीं जो आचारधर्म ऋषींना सांगितला तोच मी तुला सांगतों. सकाळीं उठल्यावर परमेश्वराचें चिंतन करावें. नंतर शारिरिक शुद्धि केल्यावर स्नान करावें.स्नान करतांना पवित्र तीर्थांची आठवण करावी. शारीरिक शुद्धतेविषयीं शक्य तेवढी काळजी घ्यावी. भस्म धारण केलें असतां एक प्रकारचें पावित्र्य मनाला वाटतें. तेव्हां उपासकानें भस्म धारण करावें. तसेंच रुद्राक्षांची माळ गळ्यांत धारण करावी. या सर्व ब्राह्य गोष्टींमुळें पवित्र आचरणाची बोंचणी उपासकाला सदैव राहील. गायत्री आदि मंत्रांचा गुरूकडून अनुग्रह घेऊन जप करावा. चारहि आश्रम यशस्वी रीतीनें आचरावेत. सकाळ, दुपार व सायंकाळीं परमेश्वराची आठवण करावी, तीच खरी संध्या. "

श्रीगुरूंनीं सविस्तरपणें सांगितलेला आचारधर्म ऐकून तो ब्राह्मण आपल्या पत्नीसह घरीं परत गेला. त्यानें श्रीगुरूंच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचें ठरविलें.

त्यानंतर श्रीगुरूंच्या आयुष्यांत घडलेली आणखी एक अद्भुत घटना सिद्धमुनींना आठवली. ती त्यांनीं नामधारकाला सांगितली.

● ● ●

# तिघांपुरतें अन्न, जेविले सहस्र ब्राह्मण

भेट म्हणून आणलेलें धन, शिष्यांना परत देऊन त्यांतून ब्राह्मणभोजन घालावें असें श्रीगुरूंनीं सांगितलें होतें. त्याप्रमाणें रोज जेवणावळी होते असत. एक दिवस यात्रिकांबरोबर भास्कर नांवाचा एक ब्राह्मण श्रीगुरूंच्या मठांत आला. त्याचें गोत्र काश्यप होतें. देह अतिशय क्षीण झाला होता; परंतु श्रीगुरूंचें दर्शन घडावें या उत्कंठेनें तो आला होता. श्रीगुरूंना त्यानें साष्टांग नमस्कार घातला. भक्तजन त्या दिवशीं समाराधना घालीत होते. श्री-गुरूंनीं त्या वृद्ध ब्राह्मणाला जेवावयाला राहायला सांगितलें. त्या म्हाताऱ्यानें बरोबर तीन माणसांना पुरेल एवढा शिधा आणला होता. आपल्या फाटक्या पंचांत नीट बांधलेला तो शिधा त्यानें मठांत नेऊन ठेवला. मनांत मात्र एक दिवस आपण त्या शिध्याचा स्वयंपाक बनवून श्रीगुरूंना भिक्षा वाढण्याचा निश्चय त्यानें ठरविला होता. त्या दिवशीं तो समाराधनेंत जेवला. दुसऱ्या, तिसऱ्या दिवशीं असे रोजच त्याला भक्त जेवायला बोलावीत. तो आपण आणलेला शिधा उशाशीं घेऊन झोपत असे. सगळे लोक त्याला हंसत असत; " एकाला नाहीं धड पुरणार एवढा शिधा तर जवळ आहे आणि बाता मारतो आहे एक दिवस आपणहि मोठी समाराधना घालणार. " अशी टीका त्याच्यावर होत होती. एक दिवस श्रीगुरूंनीं ही त्या गरीब ब्राह्मणाची निंदा ऐकली. असेच तीन महिने लोटले. तेव्हां एक दिवस त्या गरीब ब्राह्मणाला श्रीगुरूंनीं बोलाविलें व म्हटलें.

" अहो भटजी, आज आम्हीं तुमच्याकडे भिक्षा मागणार आहोंत. लवकर स्वयंपाक तयार करा."

श्रीगुरूंचे हे बोल ऐकून त्या वृद्ध ब्राह्मणाला फार आनंद वाटला. याच क्षणाची तो वाट पाहात होता. जवळच्या थोड्याफार पैशांतून त्यानें

दोन शेर तूप आणलें व दोन भाज्या, भात असा स्वयंपाक त्यानें शुचिर्भूतपणें तयार केला. त्या वेळीं इतर शिष्य श्रीगुरूंजवळ आले व म्हणाले,

" श्रीगुरुराया, आज मिष्टान्न समाराधना घालावयाची आमची पाळी होती. हा कोण ब्राह्मण मधेंच आला ?"

" शिष्यांनो व इतर ब्राह्मणजनहो, तुम्ही आतां घरीं जाऊं नका. दुपार झाली आहे. नदीवर आंघोळ करून या व आज येथेंच जेवण करा. "

इतर ब्राह्मणांना वाटलें, मठांतील साहित्यावर आजचें जेवण होणार असेल. एवढ्यांचें जेवण तयार व्हायला फार वेळ लागणारच. म्हणून ते नदीवरच वेळ काढीत राहिले. श्रीगुरूंनीं त्या वृद्ध ब्राह्मणाला त्यांना बोलवायला पाठविलें. तो त्यांना सांगूं लागला,

" ब्राह्मणजनहो, लवकर मठांत चला. श्रीगुरु तुमच्याकरितां जेवणाचे खोळंबले आहेत. "

" अहो दरिद्रीमहाराज, एवढ्यांचें जेवण म्हणजे काय चेष्टा आहे ? अजून जेवणाला फार उशीर असेल. तूं एवढेंसें शिजविलें आहेस त्याची श्रीगुरूंनाच एकट्यांना भिक्षा वाढ जा. "

त्या वृद्ध ब्राह्मणानें ते इतर ब्राह्मण आपली थट्टा करतात, ते लवकर परत यायला तयार नाहींत, असें श्रीगुरूंना सांगितलें. तेव्हा श्रीगुरूंनीं दुसऱ्या एकदोन शिष्यांना पाठवून त्या सर्व ब्राह्मणांना बोलावून आणलें व म्हणाले, " अहो, आज हा वृद्ध ब्राह्मण समाराधना घालणार आहे, तेव्हां लवकर पानें घ्या. सहकुटुंब जेवावयाला यायचें हो सर्वांनीं !"

" अहो वृद्ध भटजी, या सर्वांना आपण तशी विनंती करा म्हणजे यांची खात्री पटेल. "

" ठीक आहे. अहो ग्रामस्थ विद्वज्जनहो, आज मी समाराधना घालणार आहें. आपण सर्वांनीं सहकुटुंब जेवावयाला या. लवकरच पानें वाढतों. "

" अहो भटजी, चार हजार ब्राह्मणांना जेवण घालायचें म्हणजे काय चेष्टा वाटली तुम्हांला ? अहो, आमच्या वांटणीला एक शीत तरी येईल का तुमच्या स्वयंपाकांतलें ? असें असतांना आम्हांला आमंत्रण सांगायला तुम्हांला लाज नाहीं वाटत ? मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते तसें तुझें झालें आहे. "

तेव्हां त्यांतले कांहीं वृद्ध ब्राह्मण म्हणाले, " अहो ब्रह्मवृंदांनो, अशी क्रूर थट्टा नका हो करूं या गरीब ब्राह्मणाची. श्रीगुरूंनीं सांगायला सांगितलें, तसें ह्यानें आपणांला विनविलें आहे. "

" ठीक आहे. मग पाहूं याच याची सत्त्वपरीक्षा. चला सारेजण; पत्रावळी मांडूं या. "

असें म्हणून सर्व ब्राह्मण पत्रावळी घेऊं लागले. इकडे त्या वृद्ध ब्राह्मणानें श्रीगुरूंची पूजा केली व मनःपूर्वक भक्ति केली. तेव्हां श्रीगुरूंनीं संतुष्ट होऊन पानें मांडायला सांगितलीं व शिजविलेला सारा स्वयंपाक स्वतः-जवळ आणून ठेवावयाला सांगितला. त्यानंतर श्रीगुरूंनीं आपल्या छाटी-खालीं तें सर्व अन्न झांकून ठेवावयाला सांगितलें व त्यांनीं आपल्या कमंडलूंतील पाण्यानें त्यावर प्रोक्षण केलें. त्यानंतर सर्व भांडीं पूर्ण न उघडतांच एका बाजूनें सर्व पदार्थ काढून घेऊन पानांवर वाढावयाला नेण्यास सांगितलें. तो ब्राह्मण उत्साहानें वाढूं लागला आणि मग आश्चर्य असें घडलें कीं जितकें अन्न सर्व वाढपी भरून नेत तेवढें पुनः त्या भांड्यांत पूर्ण भरलेलें असे ! तुपाची लोटी ओतून न्यावी व परत यावें तों लोटी पुनः तुपानें भरलेली ! जें जें मागतील तें तें त्या सर्व ब्राह्मणांना वाढतांच ते आश्चर्यचकित झाले.

नको नको म्हणेपर्यंत त्यानें सर्वांना वाढलें. सर्व ब्राह्मण जेवून उठल्यावर श्रीगुरूंनीं त्यांना त्यांच्या बायकामुलांना बोलावून आणावयाला सांगितलें.

तेव्हां ज्यांच्या कुटुंबांतील सर्व माणसें सुद्धां जेवायला आलीं, त्यांनाहि तें जेवण पुरलें. इतकेंच नव्हे तर आणखी उरलेंच होतें. तेव्हां गांवांतल्या सर्व शूद्रांना व इतरेजनानांहि जेवावयाला बोलाविलें व ते सारे पोटभर जेवून दुवा देत गेले. गांवांत हिंडून आतां कोणीहि उपाशी नाहीं ना याची खात्री करून घेण्याकरितां लोक पाठविले व शेवटीं कोणीहि जेवायचा राहिला नाहीं तेव्हां उरलेलें अन्न पाहत तों त्या ब्राह्मणानें केलें होतें तेवढेंच तें होतें. असें पाहून त्या ब्राह्मणाला आश्चर्य वाटलें. तें सर्व अन्न जलचरांना खायला घाला असें श्रीगुरूंनीं सांगितलें. हें सर्व झाल्यावर श्रीगुरूंनीं त्या गरीब ब्राह्मणाला आशीर्वाद दिला. त्याचें दारिद्र्य दूर झालें. सगळे लोक आश्चर्यचकित झाले. चारांपुरतें अन्न शिजविलें असून त्यांत हजारों ब्राह्मण जेवले याचा सर्वांना अचंबा वाटला. ही सर्व श्रीगुरूंचीच किमया असावी, याबद्दल अनेकांची खात्री पटली. पांडवांचें सत्त्वहरण होऊं नये म्हणून दुर्वासांना शिष्यगणांसह तृप्त करणाऱ्या श्रीकृष्णाची त्यांना आठवण झाली. ते मनांत विचार करीत होते.

नव्हे हा जटी ईश्वर। केवीं केलें अन्न पूर।
होतें तीन अडीच शेर। चारी सहस्र जेविले केवीं ॥३८.७९॥

अशा रीतीनें श्रीगुरूंची कीर्ति चारी दिशांना पसरत होती. त्यांनीं भक्तांवर केलेली कृपा तशीच अभिलक्षणीय असे. त्यांच्या वरदानानें एका साठ वर्षे वयाच्या वांझ बाईला मुलगा झाल्याचें आश्चर्य घडलें.ती कथाहि अशीच रोचक आहे.

●●●

# साठाव्या वर्षी पुत्रप्राप्ति

आपस्तंभशाखेच्या शौनकगोत्रांत जन्मलेला सोमनाथ नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीचें नांव होतें गंगा. ती पतिव्रताशिरोमणि होती. गाणगापुरांत मोठ्या भक्तिपूर्ण मानानें धर्माचरण करीत तीं पतिपत्नी आपलें आयुष्य घालवीत होतीं. त्यांच्या जीवनांत एकच मोठें न्यून होतें. म्हणजे त्यांना मूलबाळ नव्हतें. गंगाबाईचें ऐन तारुण्य मुलाचीं सुखस्वप्नें पाहण्यांतच गेलें. तारुण्याचा मोहोर निराशेनेंच करपला. मग पन्नाशी उलटली तेव्हां तर तिची वांझ म्हणूनच सर्व गाणगापुरांत प्रसिद्धि झाली. आणखी दहा वर्षे अशींच लोटलीं. आतां गंगाला साठ वर्षे पुरीं झालीं होतीं. ती रोज पतिसेवा निस्सीमपणें करी व नित्यनेमानें श्रीगुरुदर्शनाला जात असे. दरदिवशीं श्रीगुरूंना नीरांजन ओंवाळून त्यांची आरती करी. तेव्हां एक दिवस त्यांनीं स्मितपूर्वक तिची मनोभावना विचारली.

" गुरुराया, पुत्राशिवाय गृहस्थांना गति नाहीं. ' जिच्या पोटीं नाहीं फळ, तिचा जन्म निष्फळ' असें सर्व शास्त्रें सांगतात. आम्हांला मुलगा नाहीं हेंच शल्य माझ्या मनांत सलत आहे. दररोज मी गंगास्नानाला जातें तेव्हां आपापल्या बाळांना घेऊन शेजारणी येतात. त्यांना पाहिलें कीं माझ्या मनांत कालवाकालव होते.

जळो माझें वक्ष:स्थळ । कडे घ्यावया नाहीं बाळ ।<br>
जन्मोनियां संसारीं निष्फळ । नव्हे पुरुष अथवा सती ॥ ३९·१७ ॥

आतां माझ्या वयाला साठ वर्षे झालीं. ज्या घरांत बाळ नाहीं तें घर अरण्यासारखेंच उजाड ! निपुत्रिकाला अधोगति मिळते

म्हणतात. तेव्हां त्या अधोगतींतून मला व माझ्या पतींना वांचवा व पुढील जन्मीं तरी मी पुत्रवती व्हावें असा मला आशीर्वाद द्या."

" अग वृद्धे, पुढील जन्माचें कोण जाणणार ? पुढल्या कशाला, याच जन्मांत तुला एक मुलगा व एक मुलगी होईल."

" श्रीगुरुराया, तुमचें वचन हाच जणुं शुभ शकुन. तो मी गांठीला बांधलाच आहे. माझ्या वयाला साठ वर्षे झालीं आहेत. माझी मासिक पाळीही बंद झाली आहे. त्यामुळें आपण आशीर्वाद थोडा घाईनें तर दिला नाहींत ना, असें भय वाटतें. पुत्रप्राप्तीकरितां मी आतांपर्यंत नाना प्रकारचीं व्रतें केलीं. तीर्थयात्रा केल्या. मनोभावें अनेक दैवतें पुजलीं. कोणी म्हणाले, अश्वत्थाला प्रदक्षिणा घाल. तेव्हांपासून सातत्यानें पिंपळाचे पार झिजविण्यांत जन्म गेला. आता स्वामी नरहरि, तुम्हीं प्रसन्न होऊन, याच जन्मांत मला पुत्रप्राप्ति होईल, असा आशीर्वाद दिला आहे, तर तो तरी खोटा ठरणार नाहीं असें मी मानतें. माझी केवळ समजूत घालण्याकरितां सान्त्वन म्हणून आपण हें सांगितलें नाहीं ना ?"

" बाई, तूं केलेली अश्वत्थवृक्षाची सेवा फुकट जाणार नाहीं. मी जें सांगितलें तें सत्य होईल यावर विश्वास ठेव. दररोज अमरजासंगमा-वरील अश्वत्थवृक्षाखालीं मी रोज अनुष्ठान करीत असतों. नित्य नियम म्हणून तेथें येऊन आमची दोघांची सेवा एकनिष्ठपणें कर. जिथें अश्वत्थवृक्ष तिथें माझाहि वास असतो. अश्वत्थाचा महिमा फार मोठा आहे."

" श्रीगुरुराय!, मला तो महिमा सविस्तर सांगा."

" ठीक आहे. ऐक तर मग ब्रह्मांडपुराणांतली ही माहिती. एकदां ब्रह्मदेवाचे मानसपुत्र देवर्षि नारदमुनि भूतलावर संचार करतांना, एका आश्रमांत थोडा वेळ थांबले होते. त्यांना अर्घ्य-पाद्य दिल्यावर तेथील ऋषींनीं

अश्वत्थवृक्षाचें माहात्म्य सांगा, असा त्यांना आग्रह केला. तेव्हां ब्रह्मदेवानें त्यांना सांगितलेला अश्वत्थवृक्षाचा महिमा नारदमुनींनीं इतर ऋषींना सांगितला.

अश्वत्थवृक्षाच्या मुळाशीं ब्रह्मा, मध्यभागीं हृषीकेश, अग्नि व रुद्र, तर दाक्षिण शाखेवर शूलपाणि राहतात. ॐकाररूपी ब्रह्म त्या वृक्षावर सामावलेलें आहे.

अकार शब्द मूल स्थान । स्कंदशाखा उकार जाण ।
फलपुष्प मकारवर्ण । अश्वत्थ ऐसा ओंकाररूपी ॥ २९·५५ ॥

इतर सर्व देवहि या वृक्षावर भावरूपानें वास करतात.

या वृक्षाची उपासना करण्याचा विधि असा आहे: आषाढ, पौष किंवा चैत्र महिन्यांत शुक्र अस्तंगत असतांना व चंद्रबळ नसलेल्या दिवशीं या व्रताचा प्रारंभ करूं नये. या तीन महिन्यांखेरीज इतर कोणत्याहि महिन्यांत, चांगला दिवस पाहून अश्वत्थाची उपासना चालू करावी. सोमवार, मंगळवार व शुक्रवार या दिवशीं व संक्रातीच्या दिवशीं, इतर दुर्दिनीं व अपराण्ह काळीं अश्वत्थाला स्पर्श करूं नये.हें व्रत करतांना खोटें बोलणें, जुगार खेळणें, परनिंदा वगैरे वर्ज्य करून, सकाळीं मौन धरून प्रसन्न चित्तानें सचैल स्नान करावें व मग निर्मळ वस्त्र नेसून गंगायमुनेच्या पाण्याचे कलश भरून आणावेत व त्यांची पूजा करावी. आपली मनांतील इच्छा उच्चार करावी, नंतर ते कलश घेऊन सात वेळां पाणी आणून अश्वत्थ वृक्षाला स्नान घालावें. यानंतर पुन: स्नान करून या वृक्षाला पाणी घालावें व पुरुषसूक्त म्हणून शोडषोपचारें पूजा करावी. श्रीविष्णूचें ध्यान करावें व त्या वृक्षावर वस्त्र किंवा सूत गुंडाळावें. प्रदक्षिणा घालावी. सहस्रनाम म्हणत हजार प्रदक्षिणा घालाव्या किंवा मौन धरून अशा प्रदक्षिणा घालाव्या. प्रदक्षिणा घालतांना सावकाश चालावें.

चाले जैसी स्त्री गर्भिणी । कीं उदककुंभ घेऊनी ।

तैसी पहा मंद गतीनी । प्रदक्षिणा करावी परियेसा ॥३९·७९॥

शनिवारीं अश्वत्थ वृक्षाजवळ बसून मृत्युंजयजप केला तर अपमृत्यु टळेल. अशी उपासना करणाऱ्यांचें दैन्य, पाप व ताप दूर होऊन अक्षय सुखाची त्यांना प्राप्ति होते. शनिपीडा असणाऱ्यांनीं—

" कोणस्थको रौद्र यमश्च बभ्रुः कृष्णः शनिः पिंगल एव मंदः ।

नित्यं स्मरेत् व्याहरते च पीडां तस्मै नमस्ते रविनंदनाय ॥३९-८९॥

या मंत्राचा जप करावा.

गुरुवारीं अमावास्येला अश्वत्थाच्या छायेंत जलस्नान केल्यानें ब्रह्महत्येसारख्या खडतर पापांतूनहि मुक्ति मिळते. अश्वत्थाची स्थापना करणें व त्याच्या छायेंत महायज्ञ करणें, पारण्याच्या वेळीं धेनुदान देणें यामुळेंहि महदैश्वर्य प्राप्त होतें. "

गंगाबाईनें श्रीगुरूंचा उपदेश ऐकला व त्याप्रमाणें तिनें रात्रंदिवस अश्वत्थवृक्षाची सेवा सुरू केली. तिसऱ्या रात्रीं तिला स्वप्नांत दृष्टान्त झाला.

" गाणगापुरला जा. तिथें श्रीगुरुनाथ आहेत. त्यांना भक्तिभावानें सात प्रदक्षिणा घाल व ते तुला जें कांहीं देतील तें भक्षण कर. "

असा दृष्टान्त झाल्यावर तिला जाग आली. तिनें दुसऱ्या दिवशीं अश्वत्थाची सेवा केली व नंतर मोठ्या भक्तिपूर्वक गाणगापुरला मठांत जाऊन श्रीगुरूंना नमन केलें. श्रीगुरूंनीं तिला भोजन करून जावयाला सांगितलें. जातांना तिला दोन फळें दिलीं व विधिपूर्वक पारणें करून तीं खावयाला सांगितलें.लवकरच कन्या व पुत्र दोघांचाही लाभ होईल असा आशीर्वादहि दिला.

त्यानंतर सोमनाथ व गंगा यांचे दिवस उपासनेंत जात असतांना, एक महिन्यांत ती अद्भुत घटना घडली व वांझ समजल्या जाणाऱ्या गंगाबाईला

दिवस गेले. ती गर्भार आहे हें ऐकून, ग्रामस्थांना आश्चर्य वाटलें. नवव्या महिन्यानंतर, एका शुभ दिवशीं गंगाबाईला कन्यारत्नाचा लाभ झाला. तिनें ती मुलगी श्रीगुरूंच्या पायीं घालून आणली व पुत्रप्राप्तीची इच्छा पुन: एकदां बोलून दाखविली. तिच्या कन्येचें लक्षण फार उत्तम आहे असें सांगून श्रीगुरूंनीं त्या गंगाबाईला मुलाविषयीं एक कोडें घातलें.

श्रीगुरु म्हणती तियेसी ॥ पुत्र व्हावा कैसा तुजसी ॥
योग्य पाहिजे वर्षे तीसी । अथवा मूर्ख शतायुषी पैं॥३९·१५७॥

" श्रीगुरुराया, मला मुलगा व्हावयाचा तो सद्गुणी व योग्य असाच व्हावा असा माझा मानस आहे, परंतु त्या अल्पायुषी मुलाला पांच पुत्र व्हावे एवढी मात्र इच्छा पुरी करावी. "

पुढें श्रीगुरूंच्या वरदानाप्रमाणें तिला मुलगा झाला. तो मोठेपणीं वेदशास्त्रपारंगत झाला. त्याची ख्याति सगळीकडे पसरली. अशा रीतीनें श्रीगुरुकृपेनें साठ वर्षे वयाच्या वांझ बाईलासुद्धा पुत्रप्राप्ति झाली. ज्याच्या त्याच्या निर्धाराप्रमाणें परमेश्वर त्याला वर देतो व त्याची मनोकामना पूर्ण करतो. "

नामधारकानें ही सुरस कथा ऐकली व श्रीगुरुचरित्रमाहिमा आणखी सांगा, अशी श्रीसिद्धिमुनींना त्यानें विनंती केली. तेव्हां श्रीगुरूंनीं आपलें निवेदन पुन: सुरू केलें.

श्रीगुरु गाणगापुरांत राहात होते त्या वेळची गोष्ट. आपस्तंभशाखेचा गार्ग्य गोत्रांत जन्मलेला एक इसम त्यांना भेटावयाला आला. त्याचें नांव होतें नरहरि. सर्वांगावर कोड फुटलें होतें त्याच्या. श्रीगुरूना वंदन करून तो म्हणाला,

" गुरुराया, मला वांचवा हो. या भयंकर कोडामुळें माझें सर्व जीवन दु:खी झालें आहे. सारे ब्राह्मण माझी निंदा करतात. सकाळीं उठून माझें

दर्शन झालें, तरी लोक नाकें मुरडतात. या कुष्ठरोगांतून बरें व्हावें म्हणून आतांपर्यंत मी अनेक तीर्थयात्रा केल्या, व्रतें केलीं, अनेक देवांची उपासना केली. सारें सारें व्यर्थ ठरलें. तुमच्यावरच आतां माझी सारी भिस्त आहे. आपण टाकलेंत तर जीवनाचा अंत करण्याचा निश्चय ठरविला आहे."

"अरे ब्राह्मणा, पूर्वजन्मांत तुझ्याकडून महादोष घडले त्यामुळें या जन्मांत तुझ्या अंगावर कोड फुटलें आहे. त्या पूर्वपापांचें परिमार्जन करण्याकरितां मी सांगतों तसें कर."

श्रीगुरु एवढें बोलत आहेत तोंच चार वर्षांचा जुना औदुंबराच्या लांकडाचा ओंडका घेऊन एक मनुष्य तेथें आला. तें पाहतांच श्रीगुरु नरहरीला म्हणाले,

"नरहरि, हें या माणसानें आणलेलें औदुंबराचें हें लाकूड घे व संगमावर जाऊन भीमानदीच्या कांठीं हें जमिनींत रोवून ठेव. मग स्वतः संगमांत स्नान कर. अश्वत्थाची पूजा कर व पुनः एकदां स्नान करून या तूं रोविलेल्या शुष्क काष्ठाला मनोभावानें स्नान घाल. असें नियमानें करीत रहा. ज्या दिवशीं या शुष्क काष्ठाला पालवी फुटेल त्या दिवशीं तुझे सर्व दोष जातील व तुझें अंग कोडांतून मुक्त होईल."

श्रीगुरूंच्या त्या बोलावर त्या नरहरि ब्राह्मणानें दृढविश्वास ठेविला. तें शुष्क काष्ठ घेऊन तो संगमावर धांवत गेला व श्रीगुरूंनीं सांगितल्याप्रमाणें सर्व गोष्टी करून, त्या सुक्या लाकडाला नियमानें पाणी घालूं लागला. सात दिवस त्यानें उपवासहि केला. त्याला त्या शुष्क काष्ठाला पाणी घालतांना पाहून संगमावर येणारे लोक त्याची चेष्टा करीत. श्रीगुरूंनीं त्याची थट्टा केली, असें ते म्हणत, पण नरहरीचा निर्धार कायम होता. त्याचा हा सात दिवस निराहार राहून चाललेला प्रयत्न, श्रीगुरूंना शिष्यांनीं सांगितला. त्या नरहरीचें भावबळ पाहून श्रीगुरूंना संतोष वाटला. ते शिष्यांना म्हणाले,

जैसा भाव अंतःकरण। तैसी सिद्धि पावेल ॥ ४०·४० ॥
गुरुवाक्य शिष्यासी कारण ॥ सर्वथा न होय निर्वाण।
जैसें भक्ताचें अंतःकरण ॥ तैसी सिद्धी पावेल ॥४०·४१॥

या गुरुभक्तीच्या माहात्म्याविषयीं स्कंदपुराणांत, सूतानें ऋषीश्वरांना सांगितलेली कथा या वेळीं मला आठवली."

" गुरुराया, आम्हांला सांगा ना ती कथा. " भक्तांची ही नम्र विनंति ऐकून श्रीगुरूंनीं ती सुंदर कथा त्यांना सांगितली.

●●●

# धनंजयाची कथा

' मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ।
यादृशीं भावनां कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ॥ ४०·४९ ॥

पांचाळ नगरांत सिंहकेत नांवाचा राजा होता. त्याच्या एकुलत्या एक मुलाचें नांव होतें धनंजय. राजकुमार धनंजयाला शिकारीचा फार नाद होता. एक दिवस शिकार करतां करतां, एका निर्मनुष्य अरण्यांत राजकुमार वाट चुकला. त्याला फार तहान लागली. पण पाणी कुठेंच मिळेना. सोबत दोनचार भिल्ल लोक होते. त्यांनीं सुद्धा खूप तपास केला, पण व्यर्थ. एका शबराला मात्र कांहीं वेळ हिंडल्यावर एक पडकें शंकराचें देऊळ जवळपास आढळलें. त्या ठिकाणीं एक भेगाळलेलें शिवलिंग पडलें होतें. तें शिवलिंग हातांत घेऊन शबर निरखून पहात होता. इतक्यांत स्वतः राजपुत्र इतर शबरांसह तेथें आला. त्या शबरानें राजपुत्राला पाहतांच विनंति केली,

" राजकुमारा, या शिवलिंगाची पूजा करावी असें माझ्या मनानें घेतलें आहे. "

" ठीक आहे. अरे भिल्ला, हें लिंग चांगलें आहे. खुशाल कर त्याची पूजा. "

" राजपुत्रा, मी पडलों अडाणी भिल्ल. लिंगपूजेचा विधि मला माहीत नाहीं. तर तुम्हीच माझे गुरु व्हा व मला या शिवलिंगाची पूजा कशी करूं तें सांगा. "

" अरे शबरा, हें पाषाणलिंग तूं घरीं ने. त्याची पानें व फुलें घालून पूजा कर. तुझी पत्नी आहे ना ? मग दांपत्यानें पूजा करा. हें लिंग म्हणजेच शंकर असा निर्धार करा. त्याची पूजा करून धूपदीप—नैवेद्य दाखवा. नैवेद्याला मात्र स्मशानांतलें भस्म दररोज ताजें आण व तें दाखवून, प्रसाद म्हणून कांहीं भाग तुम्हीं खा. आणि इतर जें जें कांहीं तुम्ही खाल तें तें या देवाला अर्पण करा. "

" राजपुत्रा, तुझे माझ्यावर फार फार उपकार झाले आहेत. तें पहा या शिवालयाजवळच एक तळें दिसत आहे. त्याचें पाणी पिऊन आपली तहान भागवूं या व मग आपण राजधानीला परत जाऊं या. "

त्याप्रमाणें सर्वजण परतले. त्या शबरानें मात्र त्या भग्न शिवलिंगाची मनोभावें पूजा करण्याचा निर्धार केला होता. राजकुमारानें सांगितल्याप्रमाणें त्या नवरा-बायकोंनीं त्या शिवलिंगाची पूजा सुरू केली. दररोज तो भिल्ल स्मशानांत जायचा व ताजें चिताभस्म शिवलिंगाच्या पूजेकरितां आणायचा. अनेक दिवस असा क्रम चालला होता. पुढें एक दिवस असा उजाडला कीं, त्या दिवशीं त्या गांवांत कोणीच मेलें नाहीं. त्यामुळें गांवांतल्या सर्व चिता थंडगार पडल्या होत्या. शबराचा तर ताजें चिताभस्म पूजेला वाहण्याचा नियम होता. त्यानें आसपासच्या अनेक गांवांत फिरून पाहिलें,

पण व्यर्थ ! गुरुवचनाचें पालन करण्याचें व्रत मोडणार या दुःखानें तो शबर वेडपिसा झाला. कारण,

श्रीगुरूंचें वाक्य जो न करी । तो पडेल रौरवघोरीं ।
तयातें पाप नाहीं दुरी । सदा दरिद्री होय नर ॥ ४०·७६ ॥

हें तत्त्व त्या शबराच्या मनावर बिंबलें होतें. त्यानें सरतेशेवटीं प्राणत्याग करण्याचा निश्चय ठरविला. त्याची पत्नी आपल्या पतीचें मनोगत जाणून म्हणाली,

" नाथ, आपण एवढी कसली चिंता करतां ? मी देतें तुम्हांला चिता-भस्म. मला घरांत कोंडून ठेवा व बाहेरून आग लावून द्या. आपण खूप लाकडें जमविलीं आहेत ना ? तींच लावा माझ्या चितेला. मग तें ताजें चिताभस्म ईश्वराच्या पूजेला वापरावें आपण. "

" अग प्रिये, हें भयंकर कृत्य मी कसें करूं ? तुझे पंचप्राण निघून गेल्यावर माझ्या जीवनांत काय उरेल ? शिवाय तुझे प्राण घेण्याचें निष्ठुर कृत्य मी कसें करूं शकेन ? तूं दिसावयाला तर मदनाची मंजिरी आहेस. अजून मुलाबाळांना अंगाखांद्यावर खेळवायचें आहे तुला. संसार-सुखाला आतां तर कोठें प्रारंभ झाला आहे तुझ्या. तुझ्या आईवडिलांनीं केवढ्या भरंवशानें तुला माझ्या स्वाधीन केलें होतें. तुला दहन केलें तर मला स्त्रीहत्या वगैरे महापातकें लागतील. पुण्यसाधन करतांना महापाप मात्र पदरीं पडेल व भगवान् शंकर रुष्ट होतील. "

" नाथ, मी तुमची अर्धांगी आहें. तुमचें व्रत मोडलें तर तुम्ही प्राण-त्याग करणार. मग माझ्या आयुष्याची काय किंमत ? शिवाय माझा देह हा कधीं तरी मृत्युमुखीं पडणारच ना ?

' कधींतरी शरीरासी । नाश असे परियेसी ।
ऐसें कार्यकारणासी । देह आपुला समर्पीन ॥ ४०·८२ ॥

नाथ, हें शरीर म्हणजे एक स्वप्न आहे. गंगेवरचा जणूं काय क्षणजीवी असा तो फेस आहे. मी तुमचाच देह आहें. शिवाय,

' जें जें उपजे भूमीवरी । तें तें नाश पावे निर्धारीं ।

माझा देह संकल्प करी ॥ ईश्वरार्पित होईन ॥ ४०·९५ ॥'

शिवाय मी तुमची लाडकी आहें ना ? मग मी मागेन तें तुम्ही मला नाहीं देणार ? "

" प्रिय, मी तुला काय देऊं ? तूं सांगशील तें देतों. "

" हं, मग वचन द्या, माझी इच्छा पुरी कराल असें. "

" हें घे वचन. "

" नाथ, मग मला ईश्वरार्पण करा व मी मघाशींच सांगितलें त्याप्रमाणें याच घराजवळ माझें दहन करा व तें चिताभस्म वाहा श्रीशंकरांना. "

" प्रिये, तुझी धन्य आहे. तूं मला वचनांत पकडलेंस. ठीक आहे. जशी श्रीशंकरांची इच्छा. "

त्या शबरानें मोठ्या कष्टानें दुःख आवरलें. हुंदके देत देत आंसवें गिळीत त्यानें आपल्या प्रियपत्नीची जिवंतपणें आपल्या हातानें चिता पेटविली. ती चिता भडकली. शबरानें ' श्रीशिवशंकर जयशिवशंकर ' असा जयघोष सुरू ठेवला. थोड्या वेळानें त्या सुंदर शबरीची स्मृति उरली ती चिमूटभर राख ! ती घेऊन त्या शबरानें महादेवाच्या त्या लिंगाची भक्तिपूर्वक पूजा केली पूजा झाली कीं प्रसादाचें ताट आपल्या बायकोच्या हातांत देण्याचा त्याचा नित्याचा सराव होता आज आपली पत्नी जिवंत नाहीं हे तो क्षणभर विसरला व नेहमींप्रमाणें त्यानें पत्नीला हांक मारली. तों काय आश्चर्य ! त्याची बायको त्याच्या समोर आली. तिनें प्रसाद मागितला व तो घेऊन ती घरांत गेली. शबराचा आपल्या डोळ्यांवर विश्वास

बसेना. घराला त्यानें आपल्या हातानें आग लावली होती. मग तें घर तर पूर्ववत् होतें. आपल्या पत्नीच्या चितेंतील भस्म आतांच त्यानें श्रीशंकरांना वाहिलें होतें. ती पत्नीहि पूर्वींहूनहि मोहकरूपानें त्याच्या हातून प्रसाद घेऊन घरांत गेली होती. त्यानें आपल्या पत्नीला पुन्हा हांक मारून तें सत्यच होतें ना, याचा पडताळा घेतला व श्रीशंकराच्या मायेनें व कृपेनें हें सर्व घडलें हें त्या नवराबायकोच्या लक्षांत आलें. त्या दोघांनीं धांवत जाऊन त्या शिवलिंगाला साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां गिरिजारमण शूलपाणी स्वतः प्रकट झाले. त्यांच्या पायांवर त्या पतिपत्नींनीं लोटांगण घातलें. 'पांच कोटि वर्षें संसारसुख व राज्यपद भोगून अखेर स्वर्गवासाचें भाग्य मिळेल,' असा श्रीशिवशंकरांनीं त्यांना वर दिला व ते गुप्त झाले."

श्रीगुरूनीं ही भावपूर्ण कथा आपल्या इतर शिष्यांना सांगितली व त्या शुष्क काष्ठाला श्रद्धेनें व गुरुभक्तीनें पाणी घालणाऱ्या त्या ब्राह्मणाला अशीच सिद्धि मिळेल असें सांगितलें. पुढें एक दिवस श्रीगुरु स्वतः संगमावरून परत येतांना, त्या ब्राह्मणाचें व्रत कसें काय चाललें आहे तें पाहावयाला गेले. हातांत गंगाजळ भरलेला कमंडलु होता. त्या शुष्क काष्ठावर आपल्या कमंडलूंतलें थोडें गंगाजळ त्यांनीं प्रोक्षण केलें आणि नवल घडलें! त्या शुष्क काष्ठाला भराभर पालवी फुटली व तेथें एक मोठा औदुंबरवृक्ष विराजमान झाला. त्याच्या छायेंत उभ्या असलेल्या त्या ब्राह्मणाच्या अंगावर कोडाचें नांवहि नव्हतें. एक तेजःपुंज भक्त श्रीगुरूंच्या पदकमलांवर लीन झाला होता.

कोडासारख्या दुष्टसाध्य रोगांतून संपूर्ण बऱ्या झालेल्या त्या नरहरीच्या तोंडांतून आपोआप श्रीगुरु–स्तुति शब्दाकार होऊन बाहेर पडूं लागली. सद्गुरूंचें महास्तोत्र रचण्याचा मान त्याला मिळाला.

[ 'इंदुकोटितेजकीर्ण....',असा प्रारंभ असलेलें हें स्तोत्र. त्यांत श्रीगुरु-स्तुतिपर आठ श्लोक असून नवव्या श्लोकांत हें स्तोत्र रोज नियमानें म्हणणाऱ्यास काय फळ मिळतें तें सांगितलें आहे.]

त्यानंतर श्रीगुरु मठांत परत गेले. सर्व लोकांची श्रीगुरूंवरील श्रद्धा अधिकच वाढली. श्रीगुरूंनीं त्या शिष्याला आपल्याजवळ बोलावून त्याचा फार मोठा गौरव केला. ते त्या शिष्याला म्हणाले, " आजपासून तुझें नांव योगेश्वर ठेविलें आहे. आमच्या सर्व शिष्यांत तूं थोर आहेस. तुला सर्व ऐहिक सुखें प्राप्त होऊन तुझ्या वंशाचीहि भरभराट होईल. तुला तीन मुलगे होतील. त्यांतील एकजण माझी फार मोठी सेवा करील." श्रीगुरूंनीं त्या शिष्याला मंत्रोपदेश दिला व अशा रीतीनें भयंकर पीडा देणाऱ्या कोडासारख्या दुर्धर रोगापासून सद्गुरूंवरील अढळ निष्ठेमुळें व भक्तीमुळें तो ब्राह्मण बरा झाला.

नामधारकाच्या मनांत ही गोष्ट ऐकून त्यापुढील श्रीगुरुचरित्र ऐकण्याची उत्कंठा अधिकच वाढली.

" अहो सिद्धमुनि, माझ्या पूर्वजांनीं सुद्धां श्रीगुरूंची सेवा केली होती असें मला समजलें आहे. ती सेवा त्यांनीं कोणत्या प्रकारें केली तें मला सांगाल का ? आपण नेहमीं श्रीगुरूंच्या सान्निध्यांत होतात. आपणाला सर्व शिष्यांची माहिती असणारच."

"अरे नामधारका, वोसर नांवाच्या गांवांत तुझ्या पूर्वजांची व श्रीगुरूंची भेट झाली होती, हें मी पूर्वींच तुला सांगितलें होतें. तुझ्या सायंदेव नांवाच्या पूर्वजावर श्रीगुरूंची फार प्रीति होती. त्या सायंदेवानें श्रीनृसिंह-सरस्वतींचा महिमा ऐकला होता.मनांत फार आनंदित होऊन तो गाणगापुराला आला. त्यानें मठांत जाऊन श्रीगुरूंचें दर्शन घेतलें. त्यांना साष्टांग

नमस्कार घातला. आपल्या डोक्याला श्रीगुरूंची पदधूलि लावली व त्यांची भक्तिपूर्वक स्तुति केली.

" श्रीगुरुराया, तुमचें दर्शन झालें. माझे पितर आज कृतार्थ झाले. तुमच्या पदकमळांचें गुणवर्णन करावयाला माझ्यासारख्या पामराची शक्ति कितीशी पुरी पडणार ? तुम्ही सगुण, साकार परब्रह्मच आहांत याची जाणीव मला झाली आहे. तुमच्या कमंडलूंत अमृत भरलें आहे. त्यांतील पाणी शिंपडल्यावर प्रेतहि जिवंत झाल्याचें लोकांनीं पाहिलें आहे. तुमच्या हातांतील दंड शरण आलेल्याचा रक्षक, तर दुरितदैन्याचा निवारक आहे. तुमच्या गळ्यांतील रुद्राक्षमाळा पावन झाली आहे. सर्वांगाला भस्माची उटि आहे. आपलें आसन म्हणून वाघाचें कातडें मोठ्या डौलानें विलसत आहे. तुमची अमृतदृष्टि म्हणजे चंद्रदर्शन तर क्रूरदृष्टि म्हणजे सूर्याचेंच स्वरूप. हे नरसिंह जगद्गुरू, तूंच संहारिक रुद्र. तूंच रक्षक विष्णुभगवान्. तुमच्या आतांपर्यंतच्या अलौकिक चरित्राची आठवण ताजी आहे.

वांझेसी कन्यापुत्र देसी । शुष्क काष्ठा जीव आणिसी ।
दुहविली वांझ माहिषी । अन्न पुरविलें ब्राह्मणा ।। ४१·२८ ।।
विष्णुमूर्ति तूंचि जाण । त्रिविक्रमभारती ऐसी खूण ।
साक्ष दिधली अंतःकरण । विश्वरूप दाखविलें ।। ४१·२९. ।।
म्हणविले वेद पतिताकरवीं । अपार महिमा झाला पूर्वीं ।
नरहरीअवतारमूर्ति बरवी । आलेती भक्त तारावया ।।४०·३०।।

सायंदेवानें केलेली स्तुति ऐकून श्रीगुरु म्हणाले—

" सायंदेवा, तूं माझ्याविषयीं जें कांहीं वर्णन केलेंस त्यामुळें माझें मन संतुष्ट झालें आहे. तूं आतां संगमावर जाऊन स्नान कर. त्यानंतर अश्वत्थ-वृक्षाची पूजा कर व माझ्या पंक्तीला महाप्रसाद घेण्याकारितां तावडतोब मठांत परत ये. "

सायंदेवानें त्याप्रमाणें केलें. श्रीगुरूंच्या पंक्तीला बसून जेवण्याचा बहुमान त्याला मिळाला. भोजनानंतर श्रीगुरूंनीं सायंदेवाच्या वैयक्तिक जीवनाबद्दल तपास केला.तेव्हां सायंदेवांनीं प्रेमळपणें आपला परिचय करून दिला.

" उत्तरकांची नांवाच्या गांवांत मी राहतों. मुलगे, भाऊ असा परिवार आहे. जो तो संसारयातनेंत बुडालेला. माझ्या मनांत मात्र श्रीगुरूंची सेवा करीत जीवन घालवावें असें आलें आहे. "

" सायंदेवा, माझी सेवा करणें फार कठिण काम. आम्ही आज अरण्यांत तर उद्यां गांवांत राहाणारे. तुम्हांला माझ्याबरोबर हिंडतांना फार कष्ट पडतील याचा विचार केलात का ?"

" श्रीगुरुराया, माझा अव्हेर करूं नका. जो कोणी गुरूची सेवा करील तो भवसागरांतून पार पडेल. श्रीगुरुनाथा, आपणच चार पुरुषार्थ सफल करणारे आहांत. आपलें कृपाछत्र असल्यावर यमदूतांचें नांवच नको."

" ठीक आहे. तुझ्या चित्तांत जर एवढी दृढ भक्ति आहे, तर तूं या सेवाव्रताचा अंगिकार कर."

अशा रीतीनें श्रीगुरूंची अनुज्ञा मिळतांच सायंदेव मनोभावानें श्रीगुरूंची सेवा करूं लागला. सेवाव्रतांत तो मग्न असतांना, तीन महिने केव्हां गेले हेंहि त्याला समजलें नाहीं. त्यानंतर एकदां श्रीगुरूंनीं फक्त सायंदेवाला बरोबर घेतलें व ते संगमावर गेले. सायंदेव भोळा होता;पण त्याची भक्ति दृढ होती. श्रीगुरु सायंदेवाजळ दिवसभर अश्वत्थवृक्षाखालीं सुखसंवाद करीत बसले होते. एवढ्यांत सूर्य मावळला. श्रीगुरूंनीं भक्ताची परीक्षा पाहण्याचें ठरविलें. त्यांनीं आपल्या योगसामर्थ्यानें मोठें वादळ सुरू केलें. त्यांत पाऊसहि मुसळधार पडावा अशी योजना केली. झाडें मुळासकट उन्मळून पडतील कीं काय अशी भीति वाटूं लागली. सायंदेवानें श्रीगुरूंना

वृक्षाच्या निवाऱ्याला नेलें व त्यांच्यावर आपलें उपरणें धरून त्यांना पावसाचा त्रास होऊं नये, असा तो आटोकाट प्रयत्न करूं लागला. स्वतः ओलाचिंब झाला होता. याप्रमाणें बराच वेळ मोठा पाऊस पडला. कांहीं वेळानें पाऊस थांबला, पण फार जोराची थंडी पडली. तेव्हां श्रीगुरु सायंदेवाला म्हणाले, " थंडी फार वाजत आहे. मठांत जाऊन विस्तव घेऊन ये, म्हणजे शेकोटी करूं. पण एक लक्षांत ठेव,जातांना आजूबाजूला पाहूं नको. सरळ जा व तसाच परत ये. "

" ठीक आहे, श्रीगुरुराया, हा मी निघालों. " सायंदेव निश्चयानें निघाला खरा, पण वाटेंत तर भयाण अंधार होता. अंदाजानें खुणा मनांत आठवून जाऊं लागला असतांना मुसळधार पाऊस पडूं लागला. त्याच्या हृदयांतील भक्तीची ज्योत व चमकणारी वीज त्याला मार्गदर्शन करीत होती. अशा परिस्थितींत सायंदेव गाणागापुराच्या वेशीपाशीं गेला व द्वारपाळाला त्यानें हांक मारिली. पहारेकऱ्यानें विस्तव आणून दिला. तो भांड्यांत नीट घेऊन ताबडतोब सायंदेव संगमाकडे निघाला. परत जात असतांना त्याच्या मनांत विचार आला.

" श्रीगुरूंनीं उजव्या व डाव्या बाजूला बघूं नको असें कां बरें सांगितलें असावें ? पाहावेंच एकदां काय आहे दोन्ही बाजूंना. ' त्याप्रमाणें सायंदेवानें दक्षिणेकडे पाहिलें तों त्याला एक मोठा नाग दिसला तेव्हां तो भिऊन उत्तर दिशेच्या बाजूनें पळाला व तिथें पाहिलें. तर तिथेंहि एक अद्‌भुत असा फार मोठा नाग होता. दोघांहि नागांना पांच फणा होत्या. ब्राह्मणाच्या बाजूनें तेहि सळसळत पुढें पुढें जात होते. सायंदेव आतां मात्र मनांतून घाबरला होता. वाट चुकून रानांतून भीतीनें तो धावत होता. श्रीगुरूंचें स्मरण एकसारखें करीत होता सायंदेव. जोरानें धांवल्यामुळें त्याला धांप लागली होती. संगमाजवळ पोंचतांच त्याला एक अपूर्व दृश्य दिसलें.

संगमावर हजारों दिवे प्रज्वलित झाल्याप्रमाणें पसरले होते. अनेक ब्राह्मण वेदघोष करीत होते. परंतु जवळ जाऊन पाहतो तों एकटे श्रीगुरूच फक्त त्याला दिसले. सारा अंधेर एकदम नाहींसा झाला. पौर्णिमेचा चंद्र आकाशांत विलसत होता.सायंदेवानें आणलेला विस्तव पेटविला.श्रीगुरूंना पाहतांच त्याचें भय नाहींसें झालें होतें. त्याच्याबरोबर आलेले ते दोन्ही साप श्रीगुरूंना वंदन करून निघून गेले. त्यानंतर श्रीगुरु सायंदेवाला म्हणाले,

" अरे, एवढा घाबरलास कशाला ? तुझें रक्षण करावयाला आम्हींच ते दोन साप पाठविले होते. बघितलेंस ना, गुरुभक्ति किती कठीण असते तें ? तेव्हां पुन्हा एकदां विचार करून मग काय तें ठरव. "

" गुरुराया, माझें मन स्थिर होण्याला गुरुभक्तीचा प्रकार मला सांगा. मी तुमच्याजवळच राहण्याचा निश्चय केला आहे. "

" बरें आहे.ऐक तर मग.पूर्वीं एकदां कैलासाशिखरावर शंकर पार्वतीसह बसले होते. तेव्हां पार्वतीनें गुरुभक्ति कशी असावी, असा प्रश्न शंकरांना विचारला. तेव्हां महादेवांनीं तिला एक गोष्ट सांगितली.

ब्रह्मदेवाचा दृश्य अवतार म्हणजे त्वष्टा ब्रह्मा. त्याचा मुलगा अतिशय सुंदर होता. त्या मुलाची मुंज यथावकाश झाली व वडिलांनीं त्याला विद्याभ्यास करण्याकरितां गुरूंच्या घरीं ठेविलें. त्या मुलानेंहि गुरूची अनन्यभावानें सेवा केली. अशीं अनेक वर्षें लोटलीं. त्यानंतर एकदां मोठा पाऊस पडला. गुरूंच्या पर्णकुटींत फार पाणी गळलें. तेव्हां त्याचे गुरु त्याला म्हणाले,

" शिष्योत्तमा,पानांच्या झोंपड्याची हीच अवस्था.दरवर्षीं जीर्ण होतात. तर कधींच न मोडणारें, दिसावयाला सुंदर व मनोहर असें एक छानसें घर माझ्याकरता तूं बांधावेंस अशी माझी इच्छा आहे. " गुरूंचें हें मागणें

ऐकतो आहे, तोंच गुरुपत्नी त्याला म्हणाली, " बाळ, मलापण एक गोष्ट हवी आहे. ती म्हणजे एक बहुरंगी, माझ्या मापाची पण विणलेली किंवा शिवलेली नाहीं अशी चोळी. अशी चोळी मला त्वरित आणून दे."

तेवढ्यांत गुरूचा मुलगा म्हणाला, " बरें का रे शिष्योत्तमा, पाण्यावरून चालतां येईल अशा खडावा मला आण. त्या माझ्या पायाला ठीक झाल्या पाहिजेत."

गुरूंची मुलगीहि तेवढ्यांत तेथें आली व म्हणाली, " शिष्या, मला उंच तानवडे घेऊन ये, खेळावयाला. एक घरकुलहि आण. तें घरकुल एका खांबावर आधारलेलें असावें. तें हस्तिदंताचें बनवलेलें असलें तर फारच उत्तम. तें मी जाईन तेथें माझ्याबरोबर आलें पाहिजे. नेहमीं नवीन दिसावें. त्या घरांत जेवण करण्याकरतां सुंदर मडकीं पण आण हं ! त्यांत जेवण शिजवायला शिकव मला. अशीं भांडीं आण कीं ज्यांना विस्तवावर ठेवूनहि काजळी धरणार नाहीं. हें सारें नीट लक्षांत ठेवून करशील ना ?"

" गुरुराया, गुरुमाते, गुरुपुत्रा आणि गुरुकन्ये, तुमच्या सर्वांच्या आज्ञेप्रमाणें मी जरूर करीन. मला आतां निरोप द्यावा."

त्वष्टा ब्रह्माचा तो मुलगा तेथून महा अरण्यांत गेला. त्याला फार काळजी लागून राहिली होती. " साध्या पत्रावळी लावतां येत नाहींत, तर मला हें सर्व कसें काय जमणार ?" असा विचार त्याला अस्वस्थ करीत होता. त्यानें एकाग्र मनानें श्रीगुरूंचें स्मरण केलें. श्रीगुरूंचाच धांवा केला, " गुरुराया, आतां मी काय करूं ? कोणाचा आधार आहे मला ? ह्या सर्व गोष्टी लगेच केल्या नाहींत तर माझे गुरु मला बोल लावतील. गुरु शाप देतील, म्हणून त्या वेळीं सर्व गोष्टी आणण्याचें मी कबूल केलें होतें. आतां काय करूं ? जीव देण्याशिवाय दुसरा उपायच नाहीं."

अशा चिंतामग्न अवस्थेंत अरण्यांत दमलाभागला असतांना त्या शिष्याला एक अवधूत भेटले. त्या अवधूतस्वामींनीं त्याला सर्व हकीगत

विचारिली. त्यानेंहि ती सर्व मनमोकळेपणें त्यांना सांगितली व कृपादृष्टि करण्याची त्यांना विनंति केली. तेव्हां ते अवधूत म्हणाले,“ बाळ, मी तुला अभय दिलें आहे. आतां चिन्ता करूं नको. काशीच्या विश्वेश्वराची आराधना कर. त्यानें तुझे सगळे मनोरथ पूर्ण होतील. विष्णूला तिथेंच पृथ्वीच्या पालनाचा वर मिळाला. ब्रह्मदेवाला सृष्टि रचण्याचा वर तिथेंच मिळाला. उपमन्यूला दुधाचा समुद्र देणारा देव त्या ठिकाणींच राहतो. आनंदकानन हें तेथील विख्यात स्थान. सर्व इच्छा तिथें पूर्ण होतात. ”

“ अवधूतस्वामी, तें आनन्दकानन कुठें आहे ? त्या काशीपुराला मला कोण नेईल ? आपणच मला तिथें न्याल का ? मी तुमच्या बालकासारखा आहें. ”

“ ठीक आहे. नेईन मी तुला काशीला. तुझ्यामुळें मलाहि त्या काशी-क्षेत्राचें दर्शन घडेल. चल तर मग. आपणाला मनोवेगानें जावयाचें आहे. मीट डोळे. हं. आतां उघड. बघ आपण आलों सुद्धां काशीपुरींत !”

“ स्वामी, या काशीक्षेत्रांत आणलेंत, पण मला या यात्रेचा क्रम माहीत नाहीं. तोहि सांगावा आपणच. ”

शिष्यानें अशी विनंति करतांच त्या अवधूतस्वामींनीं त्याला काशीयात्रेचा विधि बारीकसारिक तपशिलासह सांगितला. वाराणसी तीर्थक्षेत्राची यात्रा, दक्षिणमानसयात्रा, उत्तरमानसयात्रा व पंचक्रोशीची यात्रा असे काशीयात्रेचे चार प्रमुख भाग. त्यांचें वर्णन करतांना तेथील लहानलहान तीर्थांचीं नांवें त्या अवधूतस्वामींनीं सांगितलींच, पण एक प्रकारचा भौगोलिक नकाशाच त्या शिष्यासमोर शब्दरूपानें साकार केला. [ काशी-यात्रेचें हें प्रदीर्घ जंत्रीवजा वर्णन श्रीगुरुचरित्र, अध्याय ४१ व ४२ मध्यें आहे. जिज्ञासूंनीं तें मुळांतूनच वाचावें. ] त्वष्टा ब्रह्मयाच्या पुत्रानें तो सर्व प्रदीर्घ यात्राविधि केवळ त्या गुरूंच्या कृपेमुळेंच पुरा केला. अवधूत-

स्वामींचा आशीर्वाद त्याला मिळाल्यामुळें काशीयात्रा पूर्ण होऊन भगवान् शंकर त्याच्यावर प्रसन्न झाले व त्या शिष्याचे गुरु व त्यांचीं कुटुंबीय मंडळी यांनीं जें जें मागितलें होतें तें तें सर्व त्या शिष्याला दिलें. त्या सर्व वस्तु घेऊन तो शिष्य परत आपल्या गुरूंकडे गेला व त्यांना त्या वस्तु देऊन त्यानें गुरुचरणांवर मस्तक ठेवून नम्रपणें वंदन केलें."

त्या वेळीं गुरूंच्या डोळ्यांतून आनंदाश्रु ओघळूं लागले. त्यांनीं प्रेम-भरानें शिष्याला पोटाशीं धरलें, 'तुला अष्टसिधि प्राप्त होतील' असा आशीर्वाद देऊन, अचंद्रार्क असें नवें नांव त्याला ठेविलें. असा आहे गुरुभक्तीचा महिमा. श्रीशंकरांनीं त्यानंतर पार्वतीला गुरुमाहात्म्य आणखी स्पष्ट करून सांगितलें. ज्याचा एकनिष्ठ भाव त्याला मंगल व इच्छित गोष्टींचा काय अभाव? श्रीगुरूवांचून सिद्धि नाहीं, हें तत्त्व विशद करतांना ते म्हणाले,

'यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाश्यन्ते महात्मना ॥" ४२.१२६॥

श्रीगुरूंनीं सायंदेवाला हा गुरुमहिमा सांगितला. तेवढ्यांत रात्र संपली व सूर्योदय झाला. गुरुकृपेच्या ज्योतीनें जणुं काय चिंतारूपी अंधकाराचा विनाश झाला होता. सायंदेवानें संतोष पावून श्रीगुरूंना नमस्कार घातला. तो म्हणाला, "श्रीगुरुराया, आपण काशीयात्रेची पद्धति मला सांगितलीत त्या वेळीं, जागृतींत असो वा सुषुप्तींत, मी तुमच्याबरोबर ती सर्व यात्रा केल्याचें मला स्मरण होत आहे." त्यावेळीं सायंदेवानें केलेलें स्तोत्र, नामधारका, तुला ऐकावयाचें आहे ना? ऐक तर मग. नंतर

आदौ ब्रह्मत्वमेकमेव जगतां......पासून वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम्। पासूनचे नऊ श्लोक सिद्धमुनींनीं म्हणून दाखविले. ॥ ४२·३६ ४४ ॥

सायंदेवा, असें स्तोत्र करून, श्रीनृसिंहसरस्वती म्हणजेच विश्वनाथ असल्याचा अनुभव आल्याचें सांगितलें. तेव्हां श्रीगुरु त्याला म्हणाले, " सायंदेवा तुला काशी दाखविली. तुझ्या पुढील एकवीस पिढ्यांना त्या यात्रेचें फळ मिळेल. तूं आमचा परम भक्त आहेस; पण जर आमच्याजवळ राहणार तर म्लेंच्छांना वंदन करूं नको. जा. तुझ्या बायकोला व मुलांना मला भेटावयाला घेऊन ये. "

हें ऐकून सायंदेव आपल्या कलत्रपुत्रांना आणावयाला गेले व त्यांना आणून श्रीगुरूंना साष्टांग नमस्कार घालावयाला लावला. नंतर श्रीगुरूंना स्तुतिसुमनें वाहिलीं. ' हे चंद्रमौलि, तुझें करावें आख्यान तर आमचें बळ आहे लहान. चकोराला चंद्राचें दर्शन झाल्यावर आनंद होतो तसाच, तुझ्या दर्शनानें मला झाला आहे. चिंतामणीच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें व्हावें, जंबुनदांत पडलेल्या मातीचें सोनें व्हावें, मानससरोवराला पोहोंचल्यावर कावळ्याचा हंस व्हावा तसेंच तुझ्या दर्शनानें माझ्या जीवनाचें सार्थक झालें. गंगा पापहारक, चंद्र तापहारक व कल्पतरू दैन्यहर असला तरी श्रीगुरूची सर त्यांना नाहीं. कारण गुरु नुसत्या आपल्या कृपादृष्टीनेंच पाप, ताप व दैन्य या तिन्हींचा नाश करतो. गंगा पापं शशीतापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च गुरुर्हरति दर्शनात् ॥४२·१६७॥"

त्यानंतर सायंदेवानें कानडी भाषेंत अनेक रागांत श्रीगुरूंचें गुणगायन केलें ( ४२·१७२ ते १८० ). सायंदेव सहकुटुंब श्रीगुरुदर्शनाला आला होता. तो दिवस भाद्रपद शुक्ल चतुर्दशी हा होता. सायंदेवाला चार मुलगे होते. त्यांना श्रीगुरूंच्या पायांवर ठेविलें. त्याचा ज्येष्ठ मुलगा नागनाथ. याच्या डोक्यावर श्रीगुरूंनीं वरदहस्त ठेविला. त्या नागनाथाची वंशवेल वाढेल व दुसऱ्या पत्नीलाहि चार पुत्र होऊन ते सुखानें नांदतील असा आशीर्वाद श्रीगुरूंनीं त्याला दिला. पण म्लेंच्छाला वंदन

केलेंस तर तुझ्या जिवाला हानि आहे, असा आदेशहि दिला. त्या वेळीं श्रीगुरूंनीं सायंदेवाला संगमावर स्नान करून यायला सांगितलें व नंतर सर्व ब्राह्मणांना अनंताची पूजा करावयाची आज्ञा केली. त्यावर सायंदेव म्हणाले, " गुरुराया तूंच आमचा अनंत; तुमच्या चरणांची सेवा हेंच आमचें अनंताचें व्रत. "

" सायंदेवा, कौंडिण्य नांवाच्या महामुनींनीं हें प्रख्यात अनंतव्रत पूर्वीं केलें होतें. "

" गुरुराया, तर मग त्या व्रताची संपूर्ण माहिती आपणच आम्हांला सांगा. "

" ठीक आहे, ऐका तर मग या अनंतव्रताची कथा.

• • •

# अनंतव्रताची गोष्ट

पंडूचा पुत्र युधिष्ठिर याला हें अनंतव्रत आचरण केल्यामुळें राज्याची पुनःप्राप्ति झाली. युधिष्ठिर कौरवांशीं जुगार खेळतांना आपलें सारें राज्य गमावून बसला. त्यानंतर कौरवांनीं घातलेल्या अटीप्रमाणें द्रौपदीसह बारा वर्षें वनवास त्याला पत्करावा लागला. त्या अरण्यवासांतहि युधिष्ठिर नेहमीं श्रीहरीचें ध्यान करीत असे. त्यांतच कौरवांनीं पांडवांचें सत्त्व हरण करावयाला दुर्वासऋषींना पाठविलें होतें. पण भगवान् श्रीकृष्णाच्या कृपेनें त्याहि दिव्यांतून पांडव पार पडले होते. त्यांनीं त्या वेळीं अनेक तीर्थयात्रा केल्या, विविध व्रतांचें आचरण केलें. त्यांचे ते कष्ट पाहून एकदां भगवान्

श्रीकृष्ण युधिष्ठिरापुढें प्रगट झाले. त्यांना आलेले पाहतांच धर्मराजानें त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें. आपल्या जटेचे केस सोडून त्यानें श्रीकृष्णाच्या पायांची धूळ झाडली. विधिवत् पूजा केली. त्यानंतर युधिष्ठिरानें श्रीकृष्णाची विविध प्रकारें स्तुति केली. श्रीकृष्ण हाच अनंतनारायण. दुष्टांचा निग्रह व साधुजनांच्या संरक्षणाचा आग्रह असा त्याचा बाणा. आपणावर श्रीकृष्णाची कृपा असूनहि, अरण्यवासाचे कष्ट अनुभवावे लागतात, याचें युधिष्ठिराला आश्चर्य वाटत होतें. धर्मराजानें श्रीकृष्णानें पांडवांची अशी उपेक्षा कां केली असा प्रश्न विचारतांच अर्जुन, भीम, नकुल, सहदेव व द्रौपदी यांनींहि त्या प्रश्नाला दुजोरा दिला. आपलें गमावलेलें राज्य परत मिळावें असें पांडवांना फार वाटत होतें. तेव्हां श्रीकृष्णाला त्यांची दया आली व त्यानें व्रतांमध्यें उत्तम व्रत, अशा या अनंतव्रताची माहिती पांडवांना सांगितली.

श्रीकृष्ण म्हणाले, " पंडुपुत्रांनो, ऐका. मी सर्वांच्या ठिकाणीं वास करतों. माझेंच नांव अनंत. मी भूमीवरील दुष्टांचा नायनाट करावा म्हणून वसुदेवकुलांत जन्म घेतला. जगांतील चराचर सृष्टि माझेंच स्वरूप आहे. हें व्रत भाद्रपद शुक्ल चतुर्दशीला आचरण केलें असतां, गेलेलें राज्यहि परत मिळतें. हें व्रत पूर्वीं कोणी केलें होतें तेंच प्रथम सांगतों. सुशीलेची गोष्ट आहे ती.

● ● ●

# सुशीलेची गोष्ट

कृतयुगांतील गोष्ट. वसिष्ठगोत्रांत सुमंतु नांवाचा एक ब्राह्मण होता. भृगूची मुलगी दीक्षा त्याची पत्नी. त्या दोघांच्या मनाचा विरंगुळा म्हणजे त्यांची मुलगी सुशीला. ती भक्तिपूर्ण मनानें सर्व कामें करीत असे. रांगोळी काढण्यांत तर ती फारच निष्णात होती. असे आनंदाचे दिवस चालले होते. त्यानंतर सुमंतूची बायको दीक्षा मरण पावली. सुमंतूला भार्यावियोगाचें फार दुःख झालें. तरी, संसारांतील अपुरा राहिलेला गृहस्थधर्म पुरा आचरण करावा या हेतूनें त्यानें दुसरें लग्न केलें. त्या दुसऱ्या पत्नीचें नांव होतें कर्कशी. नांवाप्रमाणेंच तिनें लग्नानंतर घरांत भांडणें करावयाला सुरवात केली. आपला नवरा व सावत्र मुलगी यांच्याशीं तिचा दररोज कांहीं झगडा ठरलेलाच. असें घरांतील वातावरण गढूळ झालें होतें. त्यानंतर सुशीला वयांत आली तेव्हां तिच्या लग्नाची सुमंतूला फार काळजी लागून राहिली. मनांत इच्छा होती तेंच घडलें. प्रभुइच्छा ! कौंडिण्य नांवाचे ऋषि एकदां त्याचेकडे आले. सुमंतूनें त्यांना सुशीलेबद्दल विचारलें. कौंडिण्याचा होकार मिळतांच, लगेच सुमंतूनें विधियुक्त कन्यादान केलें. जांवईबापू आषाढ व श्रावण महिना असे दोन महिने सासऱ्याकडेच राहिले. परंतु सासूबाईचा दुस्त्रास पाहून कौंडिण्यानें दुसऱ्या एखाद्या आश्रमांत जाण्याची आज्ञा मागितली. सुमंतूला फार दुःख झालें. त्याच्या मनांत विचार आला,

“ मी ही केली दुसरी नारी । झाली माझी येथें वैरी । या पापिणीला केलें जवळ, कन्या मात्र झाली दुर्मिळ ।। आतां माझी खात्री पटली कीं,
शांत पत्नी नाहीं ज्याचे घरीं । तयासी अरण्य नाहीं दुरी ।।४३·६०।।

कौंडिण्यऋषींनीं आपल्या सासऱ्याची समजूत घातली. दोन तापसी एकत्र राहिले तर धर्महानि होते, असा शास्त्राधार सबब म्हणून पुढें केला. सुमंतु ब्राह्मणानेंहि मोठ्या दुःखानें त्यांना जाण्याची परवानगी दिली. परंतु आणखी बारा दिवस राहून त्रयोदशीला जावें असा आग्रह केला. त्याप्रमाणें कौंडिण्यानें मान्य केलें. सुमंतु ब्राह्मणाच्या मनांत मुलगी दूर जाणार म्हणून कांहीं गोडधोड करावें असें होतें. परंतु त्यानें तांदूळ, गहूं मागतांच कर्कशी घरांत धांवली. तिनें दार लावून घेतलें व उंबरठ्यावर एक मोठा दगड आडोसा म्हणून ठेवला. सुशीलेनें कशीबशी वडिलांची समजूत घातली.ती न जेवतांच जावयाला निघाली.सुमंताला फार दुःख झालें. त्यानें स्वयंपाकघरांत जाऊन पाहिलें. तिथें फक्त गव्हाचा कोंडा होता. तोच मुलीला देऊन त्यानें जांवई व मुलीला निरोप दिला.

सुशीला व कौंडिण्य रथांत बसून दूर निघालीं. वाटेंत दुपार झाली. बारा वाजण्याच्या सुमाराला कौंडिण्यऋषि, वाटेंत लागलेल्या नदीवर अनुष्ठान करावयाला गेले. सुशीला आजूबाजूची निसर्गशोभा पाहात होती. तोंच तिला एक बायकांचा घोळका दिसला. त्यांनीं लाल रंगाच्या साड्या नेसल्या होत्या व त्या चतुर्दशी नांवाच्या व्रताची वेगवेगळी पूजा करीत होत्या. सुशीला तें पाहून, त्यांच्याजवळ जाऊन म्हणाली,

" काय हो सुवासिनींनो, तुम्हीं हें कोणतें व्रत करीत आहांत ?"

" बाई, या व्रताचें नांव अनंतव्रत. हें केलें तर मनांतील सर्व इच्छा पुऱ्या होतात.

" मग मला पण सांगा ना, हें व्रत कसें करावयाचें तें."

" ठीक आहे. एक तर. हें व्रत भाद्रपद शुद्ध चतुर्दशीला करावयाचें. तांबड्या कापडाच्या सुताचा अनंत करावा. त्याला नदीवर घेऊन जावें. विधिपूर्वक स्नान करून, चांगलें पवित्र वस्त्र परिधान करावें. हळदी-

कुंकूं लावावें मग दोन नवीन तांब्ये आणावे व त्यांत पाणी घालून तें गंगायमुनेचें तीर्थ आहे असें मानावें. त्यांत पांच प्रकारांची पालवी व रत्नें घालावीं, मग षोडशोपचारानें पूजा करावी. नानाप्रकारें आरती करून गंगायमुनेला संतुष्ट केल्यावर दर्भाच्या गांठीच्या शेषाची पूजा करावी. दोन्ही तांब्यांवर नवीन वस्त्रें ठेवून अष्टदल कमलाची आकृति त्यावर काढावी. त्या कलशांपुढें शंखपद्म विविध रांगोळ्या काढाव्यात. दर्भाचा शेष पुजावा.विष्णूच्या शेषशायीरूपाचें ध्यान करावें.सात फडांचा शेष. त्याच्याजवळ नेहमीं विष्णूचें वास्तव्य असतें म्हणून त्याला अनंत हें नांव पडलें. शंख, पद्म उजव्या हातांत आहेत तर सुदर्शनचक्र व गदा डाव्या हातांत. अशा पिंगलाक्ष चतुर्भुख मूर्तीचें ध्यान, ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' या मंत्रानें करावें. नवीन दोरा आणून मग ध्यान करावें. ' अनंत गुणरत्नाय ' हा मंत्र म्हणून नवा दोरा कलशावर ठेवावा व पुरुषसूक्त म्हणून सांगोपांग पूजा करावी. ' संसारे....' वगैरे मंत्र म्हणून उजव्या हातांत तो दोरा बांधावा. विष्णु भगवान् हाच दाता असें म्हणून गहूं व तूप याचें वायन द्यावें. त्याबरोबर एखादें फळ, आपूपादि पक्वान्न, विडा व दक्षिणा ब्राह्मणाला द्यावी. अर्धा त्याला देऊन अर्धा प्रसाद आपण घ्यावा. असें चौदा वर्षें व्रत करावें आणि त्यानंतर चौदा कलश तांब्ये दान द्यावेत. ब्राह्मणभोजन घालून भक्तिपूर्वक उद्यापन करावें. चारी पुरुषार्थही या व्रतानें साध्य होतील. ''

योगायोगानें त्याच दिवशीं चतुर्दशी होती. सुशीलेला त्या बायकांनीं पूजा करावयाला बोलाविलें व तिनेंहि तें व्रत त्यादिवशीं मोठ्या श्रद्धेनें केलें. तिच्याही हातावर अनंताचा सेतु त्यांनीं बांधला होता. तिच्याजवळ गव्हाचा कोंडा होता त्यालाच अर्धा सुशीलेनें वाण म्हणून दिला व त्या सर्व स्त्रियांना वंदन करून रथाकडे परत गेली. तेवढ्यांत कौंडिण्य ऋषीही आपलें अनुष्ठान आटपून तेथें परत आले व त्यांचा रथ पुढें चालला होता.

वाटेंत अमरावती नांवाचें नगर लागलें. तोंच त्या गांवांतले लोक त्यांना सामोरे आले व कौंडिण्याचा, आपला नवा राजा म्हणून जयजयकार करूं लागले. त्या नवरावायकोचा राजाराणी म्हणून मोठा बहुमान झाला. अचानक राज्यलाभ होऊन असे बरेच दिवस गेल्यावर, एकदा सुशीलेच्या दंडावर बांधलेला तांबडा दोरा कौंडिण्याच्या दृष्टीस पडला. त्याला वाटलें: तो कांहीं वशीकरण मंत्राचा दोरा असावा. पण सुशीलेनें प्रामाणिकपणें मागें झालेली सर्व हकीगत आपल्या नवऱ्याला सांगितली. आपला त्वरित अभ्युदय अनंतव्रत आचरण केल्यामुळेंच झाला याबद्दल तिला खात्री वाटत होती. तें ऐकून ऋषीला फार राग आला. त्यानें तो अनंताचा दोरा सुशिलेच्या दंडावरून खसकन ओढला व जवळच असलेल्या विस्तवांत टाकला ! राज्यपदादि वैभव मीं अनंतव्रतानें नाहीं तर स्वतःच्या तपाचरणानें मिळवलें होतें, असा अभिमान त्याला झाला. सुशिलेनें कसाबसा तो अनंताचा दोरा बाहेर काढला व दुधात टाकून ठेवला. या दुर्वर्तनामुळें कौंडिण्याचें सर्व ऐश्वर्य ताबडतोब नष्ट झालें.नगरांत सारे शत्रु झाले. गाई, अलंकार व कपडालत्ता चोरांनीं चोरून नेला. कौंडिण्याचे घर आग लागून नष्ट झालें. रमानायकाची अवकृपा होतांच सर्व वैभव गेलें. कौंडिण्याला आतां मात्र पश्चात्ताप झाला. अनंतदेवच आपल्यावर रागावला आहे याची त्याला खात्री पटली. त्यानेंही त्या अनंतदेवाचा साक्षात्कार होईपर्यंत, त्या देवाचें दर्शन होईपर्यंत जेवणखाण, जलप्राशन या सर्वांचा त्याग करण्याचें ठरविलें. सुशिलेला घेऊन तो एका घोर अरण्यांत गेला. तोंडानें ‘ अनंत, अनंत ’ असा जप चालूच होता. रानांत भटकत असतांना त्या कौंडिण्याला आंब्याचें एक मोठें झाड दिसलें. त्या झाडावर आंबे खूप होते, परंतु एकहि कीटक किंवा पक्षी त्या झाडाचा आश्रय घेत नव्हता. ब्राह्मणानें त्या झाडाला अनंतदेवाचा पत्ता विचारिला, तो पण त्या झाडाला माहीत नव्हता. उलट

कौंडिण्याला अनंत भेटला तर त्यानेंच त्या स्थळाची माहिती आपणाला सांगावी अशी झाडानें विनंति केली. कांहींसें पुढें गेल्यावर कौंडिण्याला पाडसासह फिरणारी एक गाय दिसली. ती हिरव्यागार गवतांतून हिंडत होती, परंतु तिला तें गवत खातां येत नव्हतें. त्यानंतर भेटला एक मोठा बैल. त्याला गवताचा एकहि घास खातां येत नव्हता. त्यालाहि अनंताचा ठावठिकाणा माहीत नव्हता. उलट त्यालाच तो पाहिजे होता. आणखी पुढें गेल्यावर एकमेकांना जोडलेलीं दोन सुंदर तळीं त्या कौंडिण्याला दिसलीं. त्यांत कमळें फुललीं होतीं. परंतु हंस वगैरे पक्षी त्यांत विहार करीत नव्हते. त्या दोन्ही तळ्यांचा पक्ष्यांनीं जणूं काय त्याग केला होता.

तसाच पुढें भटकत जात असतांना एक गाढव व एक हत्ती त्याला भेटला. ते त्या कौंडिण्याजवळ एकहि शब्द बोलले नाहींत. त्या वेळीं तहान व भुकेनें व्याकुळ झालेला तो ब्राह्मण 'अनंत-अनंत' असा जप करीत जमिनी-वर कोसळला. तेवढ्यांत एक म्हातारा ब्राह्मण त्याच्याजवळ येऊन त्यानें त्या कौंडिण्याला शुद्धीवर आणलें व अनंतदेवाचें दर्शन घडवून देतों असें सांगितलें. कौंडिण्याला फार आनंद झाला. दुप्पट उत्साहानें तो त्या वृद्ध ब्राह्मणाबरोबर जाऊं लागला. त्या म्हाताऱ्या ब्राह्मणानें त्याला एका गुहेंत नेलें. तिथें एक अपूर्व नगर पाहतांच कौंडिण्याला नवल वाटलें. त्या ब्राह्मणानें कौंडिण्याला एका रत्नखचित सिंहासनावर बसविलें व आपलें खरें स्वरूप प्रकट केलें तो स्वतः अनंतदेवच होता. कौंडिण्यानें त्या देवाच्या पायांवर डोकें ठेवलें व अत्यंत लीनपणें नमस्कार करून त्या अनंतदेवाची त्यानें स्तुति केली, ' हे गोविंदा, श्रीवत्सला, सच्चिदानंदा, तुझ्या नुसत्या स्मरणानें सारे दोष नाहींसे होतात. हे गोविंदा, मला क्षमा कर. तुझे पाय मला आज दिसले. माझें जीवन आतां कृतार्थ झालें. या तुझ्या पायांजवळच आतां मी भुंगा होऊन गुंजारव करीत राहीन. ''

" कौंडिण्या, तुझ्या स्तुतीनें मी संतुष्ट झालों आहें. तुला मी तीन वर देतों. तुला धर्माचरणाची प्रवृत्ति होईल. तुझें सारें दारिद्र्य दूर होईल व तुला अखेर वैकुंठांत कायमचें राहायला मिळेल. "

" प्रभु, आपण दिलेल्या या तिन्ही वरदानांचा मी प्रेमानें स्वीकार करतों. मी इकडे येत असतांना कांहीं चमत्कारिक गोष्टी दिसल्या. त्यांचें रहस्य आपण मला सांगाल का ? "

" अरे कौंडिण्या, तुला प्रथम जो वृक्ष दिसला तो पूर्वी एक वेदशास्त्र-पारंगत ब्राह्मण होता. तो उन्मत्तपणानें व गर्वानें आपल्या शिष्यांना वेद-विद्या शिकवीत नसे. त्या पापाचें फळ म्हणून तो आतां असलें झाड झाला आहे.

"त्यानंतर तूं जी पाडसासह गाय पाहिलीस ती, पूर्वी कोणी तरी ब्राह्मणाला दान दिलेल्या निष्फळ भूमीचें सध्यांचें रूप आहे. तूं जो बैल पाहिलास, तो पूर्वजन्मीं एक मोठा श्रीमंत ब्राह्मण होता. त्यानें कधीं दान करून पुण्यसंचय केला नव्हता. त्यामुळेंच आतां त्याची अशी व्यवस्था झाली आहे.

"त्यानंतर तुला दिसलेलीं दोन सरोवरें म्हणजे पूर्वजन्मींच्या दोन बहिणी. त्यांनीं दुसऱ्याचें दान आपापसांतच वाटून घेतलें होतें. त्यापुढें दिसलेला गाढव म्हणजे तुझा राग व हत्ती म्हणजे तुझ्या मनांतील मद. जेव्हां पश्चात्तापानें तुझें मन शुद्ध झालें, तेव्हां तुला जो वृद्ध ब्राह्मण भेटला तो मीच होतों. वाटेंत तुला भेटलेल्या त्या सर्व दुःखी जीवांना मी मुक्त केलें आहे. जा आतां परत. संपूर्ण ऐश्वर्य भोग व शेवट स्वर्गप्राप्ति करून घे. तुला स्वर्गांत कायमचें स्थान मिळेल व नक्षत्रांत पुनर्वसु नक्षत्र हें तुझें अधिष्ठान होईल. "

अनंतदेवाचा असा वर मिळतांच कौंडिण्य आनंदानें परत गेला. त्याला पुनः राज्यप्राप्ति झाली. अनेक वर्षें राज्य करून अखेर तो स्वर्गांत गेला.

अशी ही अनंतव्रताच्या माहात्म्याची कथा श्रीकृष्णानें युधिष्ठिराला सांगितली. ती ऐकून युधिष्ठिरानेंहि तें अनंताचें व्रत केलें. त्यामुळें पुढें लवकरच पांडवांना आपलें राज्य परत मिळालें.

सायंदेवाला ही गोष्ट सांगून श्रीगुरु म्हणाले, " सायंदेवा, असें आहे हें अनंताचें उत्तम व्रत. तूं स्वतः त्याचें आचरण कर व तुझ्या सर्वांत मोठ्या मुलालाहि तें दे. कौंडिण्यानें हें व्रत आचरण केलें व त्याला सर्व सुखांची प्राप्ति झाली. सायंदेवा, माझें गोत्रहि कौंडिण्य आहे. तेव्हां माझ्याकरितांहि तूं हें व्रत कर. "

श्रीगुरूंच्या आज्ञेप्रमाणें सायंदेवानें तें अनंतव्रत केलें. आरत्या, गायन, वादन यांनीं त्या व्रताच्या उपासनेला शोभा आली. ब्राह्मणभोजन घातलें. श्रीगुरूंना संतोष वाटला. त्यांनीं त्याला आपल्या घरीं जाण्याकरितां निरोप दिला. सायंदेवानेंहि आपल्या मुलांना आपला ठावठिकाणा कळविला व परत येऊन जन्मभर श्रीगुरूंची सेवा करीत राहिला. नामधारका, तुझ्या पूर्वजांनीं अशा रीतीनें श्रीगुरूंची सेवा केली होती. त्यांच्यावर श्रीगुरु नृसिंहसरस्वती प्रसन्न झाले, होते. अशा परमपवित्र भाविक पूर्वजांचा वारसा तुला मिळाला आहे. नामधारका, तूं धन्य आहेस. "

श्रीगुरुचरित्राची गोडीच एवढी अवीट कीं, इतक्या कथा ऐकूनहि नामकरणीचें मन आणखी ऐकायला तहानलेलें होतें. नामकरणीची विनंति व सिद्धमुनींची कथनपद्धति, असा संगम होतांच आणखी एक सुरस कथा शब्दबद्ध झाली.

• • •

# घरबसल्या श्रीशैलयात्रा

श्रीगुरूंचे अनेक शिष्य होते. त्यांत एक विणकर होता. त्याचें नांव होतें तंतुक. तो मनोभावानें श्रीगुरूंची भक्ति करीत असे. दिवसभर संसाराचें काम करीत असे, पण श्रीगुरूंच्या अंगणाचा केर काढावयाचा नेम त्यानें अंतरविला नाहीं, अशी त्याची भक्ति चालली होती. अनेक दिवस गेले. त्यानंतर एके वर्षी शिवरात्रीचें व्रत आलें. तेव्हां त्या तंतुकाचे आईवडील व इतर नातेवाईक यात्रेला निघाले. शिवरात्रीला श्रीशैलपर्वताची यात्रा करावी, असा तेथील लोकांचा श्रद्धापूर्ण विश्वास होता. तंतुक मात्र यात्रेला गेला नाहीं. श्रीगुरु हेच आपले मल्लिकार्जुन, श्रीगुरु हेच आपले श्रीशैलपर्वत अशी त्याची दृढ श्रद्धा व निष्ठा होती. श्रीगुरूंचे चरण सोडून दुसरीकडे जायला तो तयार नव्हता. गांवांतले सगळे लोक यात्रेला गेले. तंतुक एकटाच मठांत राहिलेला पाहून श्रीगुरु त्याला म्हणाले,

" तंतुका, तूं कां नाहीं यात्रेला गेलास ? "

" श्रीगुरुराया, तुमच्या चरणींच माझी यात्रा आहे. तिथेंच सारीं तीर्थें निवास करतात. चालत्या बोलत्या अशा देवाची ओळख न पटल्यामुळें बिचारे अज्ञ लोक मूक अशा दगडाच्या देवाचें दर्शन घ्यावयाला धांवतात. तुमचे चरण हें दैवत माझें, असतां माझ्या घरीं, कशाला जाऊं मी यात्रे तरी ?"

" तंतुका, ठीक आहे. जशी तुझी मर्जी. "

या संवादानंतर माघ वद्य चतुर्दशी उजाडली.

श्रीगुरु संगमावर होते. तंतुक दुपारीं स्नानाला गेला. त्यानें शिव-रात्रीचा उपवास केला होता. संगमावर स्नान करून, श्रीगुरूंना त्यानें

वंदन केलें व तसाच हात जोडून भक्तिपूर्वक त्यांच्या समोर उभा राहिला. तेव्हां श्रीगुरु त्याला म्हणाले, " तुझे सारे नातेवाईक यात्रेला गेले. तूं एकटाच राहिलास. तूं श्रीपर्वत पूर्वी कधीं पाहिला आहेस का ? "

" गुरुराया, तुमच्याचरणांशिवाय मी दुसऱ्या कुठल्याच यात्रेला अद्याप गेलों नाहीं. "

" ठीक आहे. बाळ तंतुका, असा माझ्याजवळ येऊन बस. मी तुला आज श्रीपर्वताचें दर्शन घडविणार आहें. डोळे मीट व माझ्या पादुकांना घट्ट पकडून ठेव. "

तंतुकानें तसें करतांच, क्षणार्धांत मनोवेगानें श्रीगुरु यात्रेला निघाले व पाताळगंगेच्या तीरावर पोंहोचले सुद्धां. तेथें तंतुकाला क्षणभर झोंप लागली होती. परंतु थोड्याच वेळांत जागा होऊन पाहतो तों, श्रीपर्वतावर आपण आहोंत असें त्याला दिसलें. आपण स्वप्नांत तर नाहीं ना असेंहि त्याला वाटलें. तेव्हां श्रीगुरु म्हणाले, " अरे, असा गोंधळांत काय पडलास ? जा लवकर, क्षौरविधि उरकून घे व स्नान करून देव-दर्शनाला जा. "

तंतुक स्नानाकरितां गेला. तिथें त्याला आपले आईवडील, भाऊबंद, ग्रामस्थ असे सर्व लोक भेटले. तंतुकालाहि तिथें पाहून ते म्हणाले, " काय रे तंतुका, तूं कुठल्या जवळच्या रस्त्यानें आलास ? आम्हांला वाटेंत भेटला कसा नाहींस ? एकटा यायचें ही काय रीत झाली ? "

" आई, बाबा, तुम्हांला मी अगदी खरें सांगतों सारें. आज दुपारीं आम्हीं निघालों. श्रीगुरूंबरोबरच आलों. येथें यायला अवघी एक घटका ( सुमारें वीस मिनिटें ) लागली आम्हांला. "

" चल चल, सपशेल खोटें सांगतोस ! अहो, हा आपल्या बरोबरच लपतछपत आला असावा. "

तंतुकानें त्यावर कांहींच वादविवाद घातला नाहीं. त्यानें क्षौर केलें, आंघोळ केली व फुलें, अक्षता व बेलाचीं पानें घेऊन तो पूजेला गेला. त्यानें शिवलिंगाची पूजा सुरू केली तोंच, त्या शिवलिंगाच्या ठिकाणीं त्याला श्रीगुरूंचीच मूर्ति दिसली ! त्याला मनांत फार आश्चर्य वाटलें. त्यानें मनोभावानें पूजा केली. सगळे लोक पूजा करीत होते. श्रीगुरु त्या पूजेचा स्वीकार करीत होते. श्रीगुरुमूर्ति स्वतःच शंकर होते तर ! तंतुकानें पूजा केली व प्रसाद घेऊन तो श्रीगुरूंजवळ परत गेला. श्रीगुरूंनीं त्याला विचारलें, " काय रे तंतुका, आज येथें राहाणार कीं गांवाला परत जाणार ? "

"स्वामी, तुमच्या प्रश्नाचें उत्तर देण्याआधीं मी आज एक नवल पाहिलें तें सांगतों. सगळे लोक देवळांत जाऊन तुमचीच पूजा करीत होते. शिवलिंगाऐवजीं तुम्हींच स्वतः तिथें बसला होतात, याचा साक्षात्कार आज मला झाला. श्रीगुरु, आपणांतच जर इतर सर्व देव आहेत, तर हे सगळे लोक इतके कष्ट सोसून एवढ्या दूरवर कशाला येतात ?

'तुझें आहे तुजपाशीं' असें असून गांव सोडून येथें येतात. सगळ्या लोकांना मूढपणामुळें तुझा महिमा कळत नसावा. तरी हे सारे लोक येथें असल्या तीर्थक्षेत्रांत कां येतात, तें मला सांगाल का ? "

" माझ्या आवडत्या भक्ता तंतुका, तुझा प्रश्न फार मार्मिक आहे. तुझें म्हणणें एका अर्थी बरोबर असलें तरी तें पूर्ण सत्य नाहीं. ईश्वर सर्वत्र आहे. तरी प्रत्येक स्थानाचा म्हणजे जागेचा, कांहीं विशिष्ट महिमा असतो आणि त्याकरितां लोक त्या त्या स्थानाला भेट देतात. "

" स्वामी, तुम्हीं स्वतःच परब्रह्म असून स्थानमहिम्याचें वर्णन करतां, त्याची स्तुति करतां हें कसें काय ? या श्रीशैलपर्वताचा मोठेपणा काय आहे तें मला सांगाल का ? "

" बाळा तंतुका, जरूर सांगतों. स्कंदपुराणांतील गोष्ट आहे. त्या गोष्टी-वरून माघ वद्य चतुर्दशीला या स्थानाला कां महत्त्व आलें तें कळेल तुला.

• • •

# विमर्षण राजाची गोष्ट

किरात देशांत फार वर्षांपूर्वी विमर्षण नांवाचा एक राजा होऊन गेला. तो फार शूर होता. सर्व शत्रूंवर विजय मिळवून त्यानें आपलें राज्य बळकट केलें होतें. पारधीला जाण्याचा त्याला छंद होता. मांसभक्षण, मदिरापान व ललनाचे भोग यांचेंहि त्याला व्यसन होतें. तरी ईश्वराची पूजाहि तो भक्तिभावानें करीत असे. दररोज पूजा करावयाचाच, परंतु शिवरात्रीला माघ वद्य चतुर्दशीला तो फार मोठा उत्सव करीत असे. शिवोपासनेंत त्या दिवशीं तो रंगून जाई, तल्लीन होऊन भजनांत नाचेहि. विमर्षणराजाच्या पत्नीचें नांव होतें कुमुद्वती. राणी कुमुद्वती सुशील व गुणशाली होती. तिला आपल्या पतीच्या वर्तनाचें मोठें नवल वाटे. शेवटीं एक दिवस धीर करून ती राजाला म्हणाली, " प्राणेश्वरा, माझी एक विनंति आहे. माझ्या प्रश्नाबद्दल आपण मला क्षमा करावी, पण बरेच दिवस माझ्या मनांत एक कोडें आहे.आपण दुराचारी आहांत.खाण्यापिण्यांत बंधनें पाळीत नाहीं, परदारेचा संग तर निरंतर करताच आहांत. असे एका बाजूला आपण आहांत छंदीफंदी, विलासी; तरी पण भक्ति करतां ईश्वराची. ही भक्ति करण्याची बुद्धि आपणाला कशी सुचली ? प्राणनाथा, माझ्यावर न रागावतां हें गूढ मला समजावून द्याल का ? "

" प्रिये, छान प्रश्न विचारलास. तुझ्या या प्रश्नामुळें मला माझ्या पूर्वजन्मांतील घटनांची आठवण झाली. तीच तुला सांगतों. ऐक तर मग नीट लक्ष देऊन.

पंपा नांवाच्या नगरांत पूर्वीच्या जन्मीं मी कुत्र्याच्या रूपांत जगत होतों. शिवरात्रीचा दिवस होता तो. त्या नगरांत एक शंकराचें देऊळ होतें. सगळे लोक त्या दिवशीं देवळांत पूजा करावयाला जमले होते. मीहि गांवभर हिंडत हिंडत तिथें गेलों. कांहीं खायला मिळेल का शोधीत होतों. सगळे लोक मोठ्या उत्साहानें पूजा करीत होते. गाभाऱ्यांत जाऊन आरती करीत होते, प्रदक्षिणा घालीत होते. काय गंमत आहे ती पाहावी या हेतूनें मी देवळाच्या दारांत उभा राहिलों. मला पाहतांच, " अरे, हा पहा देवळांत कुत्रा शिरला आहे !" असें म्हणत लोक काठ्यांनीं व धोंड्यांनीं मला मारण्याकरितां धांवले. मी बाहेर पोवळींत सटकलों, पण तिथून बाहेर जाण्याला वाट सांपडेना. जीवनाची हांव मोठी होती. जीव राखावा म्हणून देवळासभोंवार पळालों. योगायोगानें ती सव्य प्रदक्षिणा झाली. असा तीनदा इकडून तिकडे धांवत गेलों. तीन प्रदक्षिणा घडल्या. अखेर घाबरून देवळांत शिरलों. शिवपूजा पाहिली. लोकांनीं दरवाजा अडवला होता. मला अनेक शस्त्रांनीं ते मारीत होते. अखेर तशाच घायाळ मृतप्राय स्थितींत लोकांनीं मला देवळाबाहेर ओढून टाकलें. त्या दिवशीं उपवास घडला होताच. अखेर कांहीं उष्टेंहि खायला न मिळून माझें मरण ओढवलें. त्या शिवरात्रीच्या दिवशीं घडलेला उपवास व प्रदक्षिणा या पुण्याईचें फळ म्हणजे माझा राजाच्या वंशांत जन्म झाला. कालांतरानें मला राज्यपदाचा लाभ झाला. मागील जन्मांत मी त्या शिवमंदिरांत अनेक दिवे लाविलेले पाहिले होते. त्या पुण्याईनेंच हें पूर्वजन्माचें स्मरण झालें. आतां माझ्या दुराचाराबद्दल सांगायचें तर पूर्वजन्मींचा श्वानभावहि या जन्मांत चालू राहिला आहे. कुत्रा सर्वभक्षक असतो. त्याला

भोगलालसेच्या बाबतींत विधिनिषेध नसतो, तोच स्वभाव मी राजा झालों तरी टिकून राहिला आहे. पूर्वजन्मींचे संस्कार असे टिकून राहतात."

"स्वामी, आपण आपल्या पूर्वजन्माची हकीगत सांगितलीत त्यावरून आपलें म्हणणें सयुक्तिक वाटतें. आतां मी मागील जन्मीं कोण होतें तें सर्व मला सविस्तर सांगावें!"

"अग ज्ञानवंत प्रिये, ऐक. पूर्वजन्मीं तूं कपोती कबूतर होतीस. दाणे खाणें शोधायला एकदा गेली होतीस. तुला मांसाचा एक गोळा पडलेला दिसला. तो तूं चोंचींत धरलास व आकाशांतून उडत होतीस. तें एका घारीनें पाहिलें व तिनें त्या मांसाच्या गोळ्यासाठीं तुझा पाठलाग चालू केला. आपलें भक्ष्य वांचविण्याकरितां तूं वनांत पळालीस. जवळच श्रीगिरिपर्वत होता. तिथे तूं गेलीस. ती घार पाठोपाठ आली म्हणून तूं तेथील देवळाचे आवारांत शिरलीस व घार पाठी लागल्यामुळें तिला चुकविण्याकरितां देवळाच्या घुमटासभोंवार चकरा मारल्यास. त्याच प्रदक्षिणा ठरल्या. शेवटीं तुला थकवा आला. तूं देवळाच्या शिखरावर वसलीस. तोंच त्या घारीनें येऊन तुला चोंचीनें टोंचून बेजार केलें व मांसाचा गोळा घेऊन गेली. त्या दिवशीं तुला उपास घडला व तुला मरण आलें. त्या प्रदक्षिणेच्या पुण्यामुळें तूं या जन्मीं राणी झालीस."

"प्राणप्रिया, आपणाला केवढें अतींद्रिय ज्ञान प्राप्त झालें आहे! आपण सांगतां त्याप्रमाणें मी यापुढें ईश्वराची पूजा जरूर करीन. पूर्वजन्मींचें सांगितलेंत तसें पुढील जन्मांत आपण दोघें कोण होणार तेंहि सांगाल का?"

"अग पतिव्रते, ऐक. ती सारी माहिती मी तुला जरूर सांगतों.

यापुढील पहिल्या जन्मांत मी सिंधुदेशाचा राजा होईन. तुझा जन्म सृंजय देशांतील पवित्र राजवंशांत होईल व माझ्याशींच तुझा विवाह होईल.

त्यापुढील जन्मांत मी सौराष्ट्र देशाचा राजा होईन. कलिंग-राजवंशांत जन्म घेऊन, तूं माझीच पत्नी होशील.

त्यानंतरच्या जन्मांत मी गांधारदेशाचा राजा असेन. मगधराज-कुळांत जन्म घेऊन तूं माझीच प्राणेश्वरी होशील.

त्यापुढील म्हणजे सांप्रतचा घरून पांचव्या जन्मांत मी अवंती देशाचा राजा असेन, तर दशार्णवराजकुळांत जन्मलेली राजकन्या होऊन तूं माझीच बायको होशील.

सहाव्या जन्मांत, मी अनंत नांवाचा राजा होईन,तर ययातीची मुलगी होऊन तूं माझीच प्रिया होशील.

सातव्या जन्मांत माझा जन्म पांड्य देशांतील राजघराण्यांत होईल. माझ्यासारखा रूपसंपन्न तेव्हां जगांत कोणी नसेल. सर्व गुणी, ज्ञानी, सूर्यासारखी कांति व चंद्रासारखें मुख, मदनाचा अवतार वाटावा अशा माझें नांव पद्मवर्ण असेल. तुझा जन्म त्या वेळीं वैदर्भकुळांत होईल. तूं सोन्याच्या पुतळीसारखी सौंदर्याची राणी होशील. तुझें नांव सुमति असेल व स्वयंवरांत मी तुला जिंकीन. मग खूप वर्षें राज्य करीन. दर महिन्याला यज्ञ करीन. सर्व देश जिंकीन. मंत्रशास्त्र शिकेन. देवाब्राह्मणांची पूजा करीन व अखेर म्हातारपण आल्यावर मुलाला राज्य देऊन, अगस्त्यऋषींच्या आश्रमांत तुझ्यासह जाईन. तिथें ब्रह्मज्ञानाचा उपदेश मिळून अखेर मला मोक्ष मिळेल. मरण येतांच आपण दोघेंहि विमानांत बसून स्वर्गांत जाऊं."

असा शिवरात्रिव्रताचा व शिवपूजेचा महिमा आपल्या पत्नीला सांगून राजा विमर्षणानें श्रीशैल्यपर्वताची यात्रा शिवरात्रीच्या दिवशीं केली. त्या राजाराणीला मागें सांगितल्याप्रमाणें सात जन्मीं राज्यपद लाभलें व शेवटीं स्वर्गप्राप्ति झाली. तंटुका, तुला आतां गुरुमुखांतून हें ज्ञान मिळालें आहे. तरी गाणगापुरांत भीमा नदीच्या तीरावर कल्लेश्वर हें शिवाचें स्थान आहे. त्या

कल्लेश्वराचीच मल्लिकार्जुनासारखी पूजा करून मग संगमावर जा. अशा रीतीनें कल्लेश्वर हाच मल्लिकार्जुन आहे असें समजून अहर्निश पूजा कर. "

" गुरुराया, माझी अशी कां बरें चेष्टा करतां ? माझी आतां आणखी परीक्षा काय बघतां ? मल्लिकार्जुनाची पूजा करावयाला गेलों होतों तेथें तुम्हींच दिसलांत. सर्वत्र तूंच एकटा व्यापून राहिला आहेस, तर मग कल्लेश्वराची पूजा कर असें मला कां सांगतां ? "

" बरं आहे तंतुका, इकडे ये. माझ्या पादुका हातांत धर. हं, मी आतां तुझे डोळे झांकतों हं.नीट घट्ट धर माझे पाय. उघड आतां डोळे. बघ, आपण परत आलों देखील संगमावर. "

तिकडे गाणगापुरांतले कांहीं भक्त श्रीगुरूंना शोधीत होते. संगमावर दुपारीं त्यांना पाहिल्याचें कांहींना आठवत होतें. गाणगापुरांत शोधाशोध चालू होती. श्रीगुरु संगमावर गेले व त्यांनी तंतुक शिष्याला गांवांतील मठाकडे पाठविलें. तंतुकाबरोबर शिष्यांना निरोप पाठविला होता त्यांनीं. तंतुक गांवांत गेल्यावर, श्रीशैल्यात्रेला न गेलेले गांवांतील कांहीं लोक त्याला भेटले. दुपारीं तंतुकाला त्याच्या घरांत त्यांनीं पाहिला होता. ' क्षौर वगैरे -कां केलेंस ?' असें त्यांनीं विचारतांच तंतुकानें श्रीशैलयात्रेला जाऊन आल्याचें त्यांना सांगितलें. त्यांचा विश्वासच बसेना. तंतुकानें प्रसाद व अंगारा त्यांना दाखविला. त्या लोकांना तें सर्व खोटेंच वाटत होतें. तंतुकाला शपथ घेऊन सांगायला सांगतांच, त्यानें श्रीगुरूंबरोबर वायुवेगानें गेल्याचें सांगितलें. ' श्रीगुरु संगमावर थांबले व मी इकडे मठांत शिष्यांना बोलाविण्याकरितां आलों आहे. श्रीगुरु आज संगमावरच राहणार आहेत, असें तंतुकानें सांगतांच कोणाला तें खरें वाटलें, कोणाला थाप वाटली. तंतुक मठांत गेला त्यानें सर्व शिष्यांना श्रीगुरूंचा निरोप सांगितला. सर्व मिळून संगमावर गेले. श्रीगुरूंची पूजा केली. पंधरा दिवसांनीं यात्रेला गेलेले लोक परत आले. त्यांना इतर लोकांनीं विचारतांच, तंतुकाला

श्रीशैलपर्वतावर आपण भेटल्याचें त्यांनींहि सांगतांच, भक्तांना अपार आनंद झाला. संशय घेणाऱ्यांचीं तोंडें उतरलीं.

" नामधारका, श्रीगुरूचा महिमा असा अपरंपार आहे. श्रीगुरुचरित्राचें गुणगान म्हणजे अमृतपान. "

" सिद्धमुनि, आपलें भाग्य थोर. आपण स्वतः श्रीगुरूंचें चरित्र पाहिलेंत, परब्रह्म डोळ्यांनीं बघितलेंत. त्या चरित्राचें अमृतपान आपल्याच कृपेनें मला झालें. हें श्रीगुरुचरित्र ऐकून माझें सारें दैन्य दूर झालें. मी सुखसागरांत पोहत आहें. श्रीगुरु त्या दिवशीं संगमावरच राहिले होते असें आपण सांगितलेंत. त्यानंतर पुढें काय झालें तें सांगा ना!"

•••

# नंदीनाम्याचें कोड बरें झालें

नंदीनामा नांवाचा एक ब्राह्मण होता. दुर्दैवानें त्याच्या सर्वांगावर पांढरें कोड फुटलें होतें. कोड बरें व्हावें म्हणून त्यानें अंबातुळजापुरला जाऊन देवीची आराधना संपूर्ण तीन वर्षें केली. तीन वर्षें उपासतापास करून शरीर कष्टविलें. तेव्हां एके दिवशीं रात्रीं त्याला स्वप्नांत देवीचा संदेश मिळाला.'चंदलापरमेश्वरीच्या देवळांत जा.' अशी देवीची आज्ञा झाली होती. त्याप्रमाणें त्या ठिकाणीं जाऊन नंदीनाम्यानें सात महिने पुरश्चरण व उपवास केला. नानापरीनें तो देह झिजवीत होता. तेव्हां एके दिवशीं रात्रीं अचानक त्या ब्राह्मणाला स्वप्नांत दृष्टान्त झाला.

" अरे ब्राह्मणा, तूं गाणगापुराला जा. तिथें त्रिमूर्तींचा अवतार श्रीपाद-जगद्गुरु मानवी रूपांत राहतात. तिथें गेल्यावर तुझें शरीर चांगलें होईल. "

त्यावर ब्राह्मण म्हणाला, " आई देवी, छान केलेंस. मला दुसरीकडे जायला सांगणार होतीस, तर मग मला सहा महिने तरी कशाला कष्ट ध्यायला लावलेंस ? जगन्माता तुळजाभवानीचा निरोप घेऊन तुझ्याजवळ आलों. तुला दैवत मानलें आणि आतां तूं देवी असून मला मनुष्याकडे रोगमुक्तीसाठीं पाठवावेंस ना ? हें काय तुझें देवपण झालें ? माझेंच भाग्य खोटें. त्यांत तुझा तरी काय दोष ? मी सात महिने उपाशी राहिलों, आणि आज तूं देवी असून एका मनुष्याकडे मला जावयाला सांगावें ना ? फुकट गेले माझे कष्ट. "

असें बोलून तो थांबला नाहीं, तर त्यानें पुनः एकदां त्याच देवीपुढें प्राणांतिक पुरश्चरण करण्याचा निर्धार केला. देवीच्या कृपेनें रोगांतून मुक्त तरी व्हावें, नाहीं तर प्राण सोडावे असा निश्चय त्यानें केला होता. नंदी-नाम्याची श्रीगुरूंकडे जाण्याची तयारी नव्हती. देवांना न जमणारें मान-वाला कसें जमेल असा संशय होता त्याच्या मनांत. नंदीनामा चंद्रला परमेश्वरीपुढें धरणें धरून बसला. तेव्हां त्याला पुनः एकदां पूर्वीसार-खेंच स्वप्न पडलें. इतर भक्तांनाहि त्याच अर्थाचें स्वप्न पडलें होतें. सगळे भोपी मिळून त्या ब्राह्मणाची समजूत घालूं लागले. ते त्या ब्राह्मणाला म्हणाले, " अरे नंदीनाम्या, आमच्या देवीचा नाहक छळ करूं नको. देवीच्या निरोपाप्रमाणें ताबडतोब जा गाणगापुराला. जर जाणार नसलास तर आम्ही तुला जबरदस्तीनें बाहेर घालवून देऊं. आम्हांला तशी देवीची आज्ञा झाली आहे. "

इतका स्पष्ट इशारा मिळतांच नंदीनाम्यानें नमतें घेतलें. पारणें करून व देवीची पूजा करून तो गाणगापुराला गेला. मठांत तपास केल्यावर

शिष्यांकडून श्रीगुरु संगमावर गेले असल्याचें त्याला समजलें. आदल्या दिवशीं शिवरात्रीचा उपवास होता. त्याचें पारणें करावयाला श्रीगुरु तेव-ढ्यांत मठांत परत येण्याची वेळ झाली होती. म्हणून भक्तांनीं त्या ब्राह्मणाला मठाबाहेर थांबवून ठेवलें. तेवढ्यांत श्रीगुरु मठांत परत आले. ' अंगावर पांढरें कोड फुटलेला एक ब्राह्मण तुमच्या दर्शनाकरतां आला आहे, ' असें भक्तांनीं सांगतांच श्रीगुरु म्हणाले, "मला माहीत आहे. पण त्या ब्राह्मणाच्या मनांत संदेह आहे. माझ्यावर त्याची श्रद्धा नाहीं. मनांत संशय ठेवून तो येथें आला आहे, हेंहि माझ्या लक्षांत आलें आहे. असो. जा, त्या ब्राह्म-णाला मठांत बोलावून आणा माझ्यासमोर." त्याप्रमाणें नंदीनाम्याला एका भक्तानें आंत नेलें. त्यानें अंगणांत जातांच दुरूनच श्रीगुरूंना पाहून जमि-नीवर लोळण घेतली व श्रीगुरूंपुढें लोटांगणें घालूं लागला. तेव्हां श्रीगुरु त्याला म्हणाले, ' काय रे ब्राह्मणा, मनांत किंतु बाळगून कां आलास ? देवीजवळ जायचें सोडून, रोग बरा व्हावा म्हणून माझ्यासारख्या एका मनुष्याकडे कशाला आलास ? मनांत संशय धरला कीं कार्यसिद्धींत व्यत्यय येतो, खरें ना ? " हें ऐकतांच श्रीगुरूंच्या दिव्यत्वाची साक्ष त्या ब्राह्मणाला तत्काळ पटली व त्यानें श्रीगुरूंची विनवणी सुरू केली.

" गुरुराया, आतां खूण पटली. आतां क्षमा करा. मी आतांपर्यंत तमोगुणानें आंधळा झालों होतों. आज स्वामींच्या दर्शनानें शुद्ध झालों. अज्ञानानें वेढिला गेलों व परब्रह्माला विसरलों.मी पापी आहें. मला तुमच्या स्वरूपाचें रहस्य कळलें नव्हतें. आतां मी तुम्हांला शरण आलों आहें. आपण नृसिंहसरस्वती म्हणजेच भक्तजनांचा आधार, शरण आलेल्यांना वज्रपंजर, अशी तुमची प्रसिद्धि आहे. आज माझ्या डोळ्यांचे मनोरथ पूर्ण झाले. माझे डोळे तुमचें रूप पाहून धन्य झाले. "

' तूं भक्तजना कामधेनु । मनुष्यदेहीं अवतरोनु ।
तुझा पार न जाणें कवणू । त्रैमूर्ती तूंचि होसी ॥ ४५·३७ ॥

ज्याप्रमाणें सगराकरितां गंगा जगाला पावन करावयाला पृथ्वीवर आली तसेंच आपण भक्तांना तारावयाला पृथ्वीवर या मनुष्याच्या रूपांत अवतार घेतला त्याहे. अहिल्या दगड होऊन पडली होती; पण प्रभु रामचंद्रांच्या पायांचा स्पर्श होतांच दिव्य देहाची प्राप्ति तिला पुनः झाली. तसा माझाहि आपण उद्धार कराल ना ?

माझे लग्न वगैरे झाल्यावर, हे भयंकर कोड माझ्या अंगावर फुटलें. तेव्हां माझी बायको हा संसर्गजन्य रोग आहे या भयानें माहेरींच जाऊन राहिली. आईबापडिलांनीं सुद्धा माझा त्याग केला. अपरिमित दुःख होऊन मी संसार सोडून निघालों तो तुळजापुराला गेलों. तेथें तीन वर्षे उपासतापास केले. माझें पाप फार होतें. तें तिच्याकडून दूर होणारें नव्हतें, म्हणून दृष्टान्त देऊन मला तिनें, ' चंदलापरमेश्वरी येथें जा, ' असें सांगितलें. मग मी तिथें गेलों. सात महिने अपरंपार कष्ट सोसले. तिथें दृष्टान्त झाला त्याप्रमाणें अखेर आपणांकडे आलों आहें. मी दैवहीन आहें. मला पाहतांच, सारे लोक घालवून लावतात. देवांना माझा उबग आला तर मनुष्याची काय कथा ? कोडी म्हणून माझें तोंड पाहावयालाहि कोणी तयार नाहीं. म्हणून आतां मरणच माझा मित्र. तरी आतां निरोप द्या, म्हणजे मी जाऊन जीव देतों. देवीनें जसें आशा लावून ठेवून मला अखेर लोंबविलें, तसें मात्र करूं नका. त्वरित काय तें सांगा. मला बरा करणार नसलात तर तसें स्पष्ट सांगा. आतां जास्त निरर्थक कष्ट सोसण्याचें त्राण माझ्यांत उरलें नाहीं. आपण आशा नाहीं म्हणालांत, कीं मी जीविताचा नाश करावयाला मोकळा झालों. ”

ही सर्व निर्वाणीची विनवणी ऐकून श्रीगुरूंनीं स्मित केलें व सोमनाथ नांवाच्या आपल्या भक्ताला बोलावून सांगितलें,

“ सोमनाथा,या ब्राह्मणाला घेऊन संगमावर जा. तेथें त्वरा करून संकल्प सांगून, पुष्करजीवनांत स्नान घाला व मग अश्वत्थवृक्षाला प्रदक्षिणा घाल-

वून त्याचीं हीं पहिलीं वस्त्रें दूर टाका व त्याला नवीन वस्त्रें नेसवून तावडतोब माझ्याकडे घेऊन या. ”

त्याप्रमाणें सोमनाथानें त्या नंदीनाम्याला तावडतोब संगमावर नेलें. संकल्प सांगून स्नान घातलें. स्नान करून येतांच त्या ब्राह्मणाच्या अंगाचा रंग पालटला व पिंपळाला प्रदक्षिणा घालतांच सर्वांग सोन्यासारखें तेजस्वी झालें. त्याचीं जुनीं वस्त्रें जिथें टाकलीं तिथली जमीन खारटाण झाली. नवीन कपडे घालून, सोमनाथाबरोबर नंदीनामा मठांत परत गेला. जातांच त्यानें श्रीगुरूंच्या पायांवर डोकें ठेवून नमस्कार केला व पादुकांवर लोळण घेतली. कृतज्ञता, आनंद, समाधान, दुःखापासून सुटका, रोगनिवृत्तीचा संतोष हे सारे भाव त्याच्या तोंडावर उमटले होते. त्याचबरोबर श्रीगुरूंविषयीं संशय घेतल्याबद्दलचा पश्चात्तापहि स्पष्ट दिसत होता. श्रीगुरूंनीं त्याला विचारिलें, “ काय रे ब्राह्मणा, तुझी मनोकामना पुरी झाली ना ? आपलें सर्व अंग एकदां नीट न्याहाळून पाहा बरें !”

ब्राह्मणानें त्याप्रमाणें पाहतांच बाकी कोड बरें झालें होतें, फक्त मांडीवर मात्र थोडें शिल्लक होतें असें त्याला दिसलें. तेव्हां तो ब्राह्मण घाबरला व श्रीगुरूंना म्हणाला – “ तुमची कृपादृष्टि झाल्यावर हें थोडेंसें कोड तरी कां उरलें ? आतां पूर्ण कृपा करावी आपण. ”

“ अरे ब्राह्मणा, तूं मनांत संशय धरून आलास, त्याचा हा परिणाम. आतां याला एकच उपाय, तो म्हणजे माझें अपार कवित्व करून माझी स्तुति निरंतर करीत जा, म्हणजे तुझी उरलेली व्याधि नष्ट होईल. ”

“ स्वामिमहाराज, माझी तयारी आहे. पण मला लिहावयाला व वाचायलाहि येत नाहीं. तर काव्य कसें काय रचूं ? मी मंदमति आहें. काव्याची पद्धति मला माहीत नाहीं. काव्यव्युत्पत्तीचा मला ना लवलेश. तेव्हां आपणच आतां उद्धार करावा. ”

" ठीक आहे.ब्राह्मणा,तोंड उघड व जीभ बाहेर काढ." असें श्रीगुरूंनीं त्या ब्राह्मणाला सांगितलें व त्याच्या जिभेवर थोडीशी विभूति किंवा भस्म टाकलें. तत्काळ त्या ब्राह्मणाला ज्ञानप्राप्ति झाली. एखाद्या दिव्य प्रेरणेनें भारल्याप्रमाणें त्याच्या तोंडून श्रीगुरूंची स्तुति शब्दरूपानें साकार झाली.

" गुरुराया, मी अज्ञान आहें. तुझें स्तोत्र रचण्याएवढी माझी कुठली शक्ति ? हा संसार म्हणजे मायाजाळ.चौऱ्याशीं लक्ष योनींत जन्म घेऊनहि तुझें नांव आठवलें नाहीं. मी आतांपर्यंत अनेक योनींत, अनेक जातींत जन्म घेतला. या जन्मांत ब्राह्मणाच्या कुळांत जन्म झाला इतकेंच काय तें. या मनुष्यदेहांतहि उच्च कुळांत जन्म लाभण्याची दुर्मिळ संधि लाभूनहि मी त्या संधीचा फायदा घेऊं शकलों नाहीं. मानवाचा किंवा इतर जन्म येणें म्हणजे तरी काय तर खालील गोष्टींचा क्रमशः आविर्भाव.

' मातेचें शोणित पित्याचें रेत । संपर्क झाला जननीगर्भांत ।
जैसें सुवर्ण असे कढत । दिवस पांच बुद्बुदाकार ॥ ४५·७२ ॥

त्यानंतर पंधरा दिवसांनीं एकरस होऊन, एक महिन्यानें त्याचा पिंडदेह तयार होतो. दुसऱ्या महिन्यांत गर्भारपणीं आईच्या पोटांत असलेल्या त्या पिंडाला डोकें व पाय फुटतात व त्यानंतर तीन महिन्यांत सर्व अवयव पुरे होतात. शरिराचीं नऊ दारें तयार होतात. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पांच तत्त्वें एकरूप होतात व शेवटीं त्या पिंडांत प्राण येतो. पांचव्या महिन्यांत कातडी व केंस येतात. सहाव्या महिन्यांत श्वासोच्छ्वास सुरू होतो.सातव्या महिन्यांत कान,जीभ व नाक येऊन चरबी व मेंदू हे दृढ होतात. अशा प्रकारें तो जीव नऊ महिने मातेच्या गर्भांत कष्ट काढतो. आईनें फार उष्ण, खारट, कडू असें खाल्लें कीं त्याचा परिणाम तिच्या गर्भांतील जिवावरहि होतो. त्या गर्भाची तळखळी होते. तें दुःख त्या जीवात्म्याला कोणाला सांगतांहि येत नाहीं. तेव्हां मायेनें वेढलेल्या अशा

त्या जीवात्म्याला परमेश्वराची आठवण कुठली व्हायला ? बरें, त्या नरकवासांतून सुटका झाल्यावर तरी प्राण्याला सद्बुद्धि सुचते का ? तेंहि नाहीं. जन्म होतांच विधिलिखित कपाळावर लिहिलें जातें. अर्धें आयुष्य झोपेंतच जातें.उरलेल्या अर्ध्या आयुष्याचे तीन भाग:बालपण, तारुण्य व म्हातारपण. लहानपणांत तर कांहींच समजत नाहीं. पाळण्यांत मलमूत्राच्या खातेऱ्यांत तो प्राणी लोळत असतो. आपलीच विष्ठाहि खाल्ली तरी त्याची खंत नसते त्या बालकाला. एखादे वेळीं त्या मुलाचें वस्तुतः पोट दुखत असतें तेव्हां त्याला भूक लागली असावी म्हणून दूध पाजतात, तर दुसऱ्या वेळीं खरी भूक लागली असतांना पोटबीट दुखत असावें या संशयानें त्या लहान मुलाला औषध पाजतात. मग तसेंच भुकेलेल्या त्या मुलाला पाळण्यांत घालून झोके देतात. मूल रडतच असतें. कांजी, तेल तोंडांत घाल, भस्म लाव, मंत्रवलेला ताईत बांध असें सारें कांहीं आई करीत असते, पण आपल्या बाळाला भूक लागली आहे हें मात्र लक्षांत येत नाहीं कधीं कधीं. वरें,त्या बाळाला तर बोलतां येत नसतें.आई त्याला पाळण्यांत घालते. पांघरुणांत एखादा विंचू असतो, तो त्या बाळाच्या पाठीला चावतो. बाळ जोरानें रडूं लागला कीं 'अरे उगी उगी 'रडूं नको' असे म्हणत आई मग त्याला दूध पाजायला घेते. पण विंचू चावल्यामुळें वेदना होतच असतात. भुकेचें दुःख त्या वेदनांपुढें फिकें पडतें; पण याची कोणाला दाद नसते. आईने आंबट, तिखट, खारट फार खाल्लें व बाळाला दूध पाजलें कीं बाळाला खोकला येतो. मग नाना तऱ्हेचीं औषधें त्याला घालतात. त्याचे डोळे आले आहेत असें वाटून कुंकू व मिठाचें पाणी घालतात.असे अपार कष्ट बारा वर्षें भोगून प्राणी लहानाचा थोर होतो. तरी त्या प्राण्याला श्रीगुरूंचें स्मरण होत नाहीं. त्यापुढील बारा वर्षें तारुण्याचा अनुभव जीवात्म्याला येतो त्या वेळीं मदनदेवाचा प्रभाव त्याच्यावर असतो. एखादा पतंग उन्मत्तपणें जसा दीपशिखेवर झडप घालतो, तसा मनुष्यप्राणी कामोपभोगांवर

झडप घालतो. त्याला तारुण्यांत, आईवडील, गुरु यांची जाणीव राहात नाहीं. तो सगळ्यांची निंदा करूं लागतो. अभिलाषा धरतो तो फक्त बायकांचा. स्त्रीचें कुलशील, काळवेळ याचाहि तो विचार करीत नाहीं. ब्राह्मणाची निंदा कर, म्हाताऱ्यांची थट्टा कर, हा त्याचा छंद होतो. विषयोपभोगांत तो चूर होतो. गळाला लागलेला मांसाचा तुकडा खाण्याकरितां धडपडणारा मासा जसा प्राणाला मुकतो, तसाच जीव तारुण्यांत मदनबाणानें विह्वल होऊन, इंद्रियांच्या आधीन होतो. नानाजातींच्या स्त्रियांचा स्वीकार, परद्रव्याचा अपहार, सिद्ध-महंतांची निंदा असा त्याचा जीवनक्रम होतो. त्याच्या डोळ्यांवर धुंदी चढलेली असते. असें होतां होतां जीवाला म्हातारपण येतें.

म्हातारपणीं शरीर थकतें, दमा लागतो. कफ होतो. बायकामुलांना त्या प्राण्याचा उबग येतो. ( म्हातारपणापर्यंत शिल्लक राहिले असले तर केंस, काळ्याचे पांढरे होतात) दांत पडल्यामुळें अन्न नीट चावतां येत नाहीं. कानांनीं नीट ऐकूं येत नाहीं. डोळ्यांनीं दिसत नाहीं.

अशा रीतीनें झोपेंत अर्धें आयुष्य व उरलेलें अर्धें बालपण, तरुणपण व म्हातारपण यांत परमेश्वराचें स्मरण व ध्यान न करतांच जातें व अखेर मृत्यूच्या पाशांत सांपडून दुसऱ्या जन्माचा फेरा पुन: त्याच क्रमानें प्राणी भोगूं लागतो. ”

नंदीनाम्यानें आपलेंहि असेंच झालें होतें असें सांगून आपल्या स्तुतिस्तोत्रांत क्षमेची याचना केली व इतर लोकांना उद्देशून म्हणाला, “ लोकहो, गवतावर अग्नीची एक ठिणगी पडल्यावर जसें गवत भस्मसात् होतें, तसेंच माझें पाप गुरुकृपेनें जळून गेलें आहे. हे श्रीगुरु म्हणजे साक्षात् परब्रह्म आहेत. मी पूर्वीं केलेलें पाप आज यांच्या दर्शनानें नाहींसें झालें. श्रीगुरूंच्या चरणांची सेवा म्हणजे देवपूजा. ब्रह्मदेवानें

कपाळावर लिहिलेलें दुष्ट भाकीताहि, श्रीगुरुचरणांवर मस्तक ठेवतांच बदलून उलट चांगलेंच भविष्य त्या जागीं लिहिलें जातें. हे नृसिंहसरस्वतीयति म्हणजे कामधेनु आहेत. त्यांची भक्ति करा म्हणजे इहलौकिक सुखें मिळून अखेर वैकुंठप्राप्ति होईल. ह्या माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा. तुम्हांला या श्रीगुरूंच्या पूजेनें सुख मिळेल हें सत्यच मी त्रिवार सांगत आहें. "

नंदीनाम्याच्या त्या स्तुतीनें श्रीगुरु संतुष्ट झाले व भक्तांना म्हणाले, "आजपासून याला कवीश्वर ही पदवी मीं दिली आहे. याच नांवानें याला यापुढें हांक मारा." श्रीगुरूंचे हे बोल ऐकतांच कवीश्वर त्यांच्या पायां पडला. त्याचें मांडीवर उरलेलें कोडहि बरें झालें होतें. नंदीनामा ( म्हणजे आतांचा कवीश्वर ) श्रीगुरूंची सेवा करीत गाणगापुरांतच राहूं लागला. त्याची ख्याति सर्वत्र झाली. त्यानें अपरिमित काव्यें रचिलीं. चारी राष्ट्रांत त्याची प्रसिद्धि झाली. त्यानें अनेक लोकांना काव्य शिकविलें. त्यानंतर नृसिंह नांवाचा एक दुसरा कवीहि श्रीगुरूंचा शिष्य झाला. तीहि अशीच एक आकर्षक घटना आहे." हें ऐकून नामधारक म्हणाला,

"अहो सिद्धमुनि, ती सुरस कथा मला सांगा. मला ती ऐकण्याची फार उत्कंठा लागून राहिली आहे."

•••

# ' उमजला स्वरूप नरकेसरी '

सिद्धमुनींनी तेव्हां त्याला पुढील गोष्ट सांगितली.

श्रीगुरूंच्या एका भक्तानें आग्रह धरला म्हणून ते त्याच्या गांवीं एकदां गेले होते. त्या गांवाचें नांव होतें हिपरगें. भक्तानें गांवांत मोठा समारंभ केला.मोठ्या बहुमानपूर्वक व मनःपूर्वक त्यानें श्रीगुरूंची पूजा केली. हिपरगें गांवांत कल्लेश्वराचें ( म्हणजे शंकराचें ) एक देऊळ फार प्रसिद्ध होतें. नरकेसरी नांवाचा ब्राह्मण त्या कल्लेश्वराची मनःपूर्वक सेवा करीत असे. गणपति, सूर्य, देवी, शंकर व विष्णु या पांच देवांची काव्यात्मक स्तुति तो मनोमन करीत असे, परंतु वाणीनें मात्र कल्लेश्वराशिवाय दुसऱ्या कोणत्याहि देवाचें नांव घेत नसे. एकाग्र निष्ठा ठेवून तो शिवोपासना करीत असे. त्याला गांवांतले लोक त्या दिवशीं म्हणाले, " अहो कविराज नरकेसरी, आपली काव्य रचण्याबद्दल फार ख्याति आहे, तर श्रीगुरूंवर एखादें काव्य करा. त्या योगानें तुमच्याकडून गुरुस्मरण होईल ! " त्यावर नरकेसरी म्हणाला, " मी माझी जीभ कल्लेश्वराला विकली आहे.

स्तुतीच तर करावयाची देव अपार, तर मानवाचा काय पार !
स्तुति करावी देवाची, तिथे नराची स्तुति काय म्हणून करूं ? "

नरकेसरी त्यानंतर देवपूजा करावयाला गेला. पूजा केल्यावर त्या दिवशीं त्याला ताबडतोब झोंप आली. दररोज पूजा करून, तो शिवस्तुतिपर रोज नवीन स्तोत्र रचून तें म्हणत असे, पण त्या दिवशीं मात्र त्याला भयंकर झोंप आली. देवळांत तो झोंपला असतांना, त्याला एक विचित्र स्वप्न दिसलें. त्या स्वप्नांत त्यानें श्रीगुरूंना कल्लेश्वराच्या देवळांतील शिवलिंगावर बसलेले पाहिलें. दुसरें आश्चर्य म्हणजे तो स्वतः

श्रीगुरूंची पूजा करीत होता. स्वप्नांतले ते श्रीगुरु त्याला विचारीत होते, ' कारे बाबा ? माणसावर तुझी भक्ति नाहीं ना ? मग आतां आमची पूजा कां करतो आहेस ? " त्यानंतरहि नरकेसरी षोडशोपचारांनीं स्थिरमनानें श्रीगुरूंची पूजा करीतच होता. अशा आशयाचें तें स्वप्न संपतांच नरकेसरीला जाग आली. त्याला मनांत फार विस्मय वाटला. नृसिंहसरस्वती हे परमेश्वरी अवतार आहेत असें त्याला वाटूं लागलें. आपण त्यांची उगीचच निंदा केली याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला व त्या श्रीगुरूंची प्रत्यक्ष भेट घ्यावी असा निश्चय करून तो श्रीगुरूंकडे गेला. त्यानें श्रीगुरूंपुढें लोटांगण घातलें व अनेक प्रकारें विनवणी केली. कल्लेश्वर म्हणजे श्रीगुरूच याची साक्ष त्याला पटली होती. कांहीं विशेष तप, अनुष्ठान न करतां श्रीगुरुदर्शनाचें निधान त्याला लाभल्यामुळें तो धन्य झाला होता, असें त्यानें बोलून दाखविलें. तेव्हां श्रीगुरु म्हणाले, " रोज आमची निंदा करतोस आणि आज तुझ्या मनांत एकदम हा माझेविषयींचा भक्तिभाव कसा काय उत्पन्न झाला ? " नरकेसरीनें लीनपणें उत्तर दिलें,

" स्वामि, मी अज्ञानरूपी अंधकारांत होतों. श्रीकल्लेश्वराची मी आजपर्यंत एकनिष्ठपणें पूजा केली. त्याच पूजेचें फळ म्हणून तुमची भेट झाली. आज देवळांत पूजेनंतर मला झोंप आली होती. तेव्हां पडलेल्या स्वप्नांत मीं तुमचीच पूजा केली. शिवलिंगावर आपणच बसलां होतात. आतां माझें अन्तःकरण स्थिर झालें आहे. म्हणून आपल्या शिष्यवर्गांत मलाहि आतां प्रवेश देऊन उपकृत करावें." असें म्हणून त्यानें पुनः एकदां प्रत्यक्षांत श्रीगुरूंची पूजा केली व पुष्कळ प्रकारांनीं नवीनस्तोत्रांनीं त्यांची स्तुति केली.

श्रीगुरु त्यावर म्हणाले, " लोकहो, हें नवल ऐकलेंत ? मीं प्रत्यक्ष येथें असतांना यानें स्वप्नांत मला पाहून एवढें सुंदर काव्य केलें. " श्रीगुरूंनीं त्या ब्राह्मणाला वस्त्रें वगैरे देववून बहुमान केला. नरकेसरीनें शिष्य होण्याची इच्छा प्रगट करतांच श्रीगुरु म्हणाले,

" आमच्याहून कल्लेश्वर श्रेष्ठ आहे. त्याचीच रोज पूजा करीत जा. आम्ही सदैव तिथेंच राहातों. "

" स्वामी, आपण प्रत्यक्ष समोर असतांना, अपूर्व अशा त्या कल्लेश्वराची मी कशाला पूजा करूं ? मी आपलीच मूर्ति त्या ठिकाणीं पाहिली होती. "

" ठीक आहे. तुझी निष्ठा असेल तर चल आमच्याबरोबर गाणगापुराला. "

श्रीगुरूंची आज्ञा मिळतांच तो नरकेसरी आनंदानें गाणगापुराला गेला व श्रीगुरूंच्या सेवेंत मन लावून अनेक उत्तमोत्तम भक्तिपर काव्यें त्यानें रचिलीं. अशा रीतीनें पूर्वीच्या गोष्टींतला कवीश्वर व हा नरकेसरी दोघेहि महाकवि श्रीगुरूंची भक्ति करीत त्यांच्याजवळ राहूं लागले. श्रीगुरु गाणगापुरांत असतांना घडलेली आणखी एक रोचक व बोधक घटना सिद्धमुनींना आठवली. नामधारक चातकाप्रमाणें ती कथा ऐकायला आतुर होता.

• • •

# श्रीगुरु एक, झाले अनेक

श्रीगुरूंचा मुक्काम गाणगापुरांत असतांनाची गोष्ट. दिवाळीचा सण होता. श्रीगुरूंचे सात पट्टशिष्य होते. त्या प्रत्येकाला श्रीगुरु आपल्या घरीं भिक्षेला यावेत असें मनापासून वाटत होतें. प्रत्येकानें दुसऱ्याच्या नकळत श्रीगुरूंना खास आग्रहपूर्वक निमंत्रण केलें होतें. ते सात भक्त निरनिराळ्या सात गांवचे राहणारे होते. त्यामुळें श्रीगुरूंनीं त्यांना विचारिलें,

" शिष्यांनो, तुमच्या मनांतील भावना मी समजू शकतों. पण मला एकाच भक्ताकडे येणें शक्य होईल. सगळ्यांच्या घरीं येणें कसें जमणार याचा विचार करा. या दिवाळीला एकाचे घरीं, मग पुढील वर्षीं दुसऱ्याकडे येऊं. तेव्हां मी आधीं कोणाकडे येऊं तें तुम्हींच आपापसांत ठरवा. आम्हीं तर शिष्याच्या सांगण्याबाहेर नाहीं. तेव्हां तुम्हींच माझा कार्यक्रम ठरवा."

ते सात शिष्य मग एकत्र जमले व त्यांच्यांत वाद सुरू झाला. प्रत्येक जण म्हणे, आपल्या घरींच श्रीगुरु प्रथम यावे. त्यांचा तो वादविवाद मिटण्याचीं चिन्हें दिसत नव्हतीं. प्रत्येकजण आपलेंच म्हणणें खरें करूं पाहात होता. तेव्हां श्रीगुरु त्यांना म्हणाले, " अरे असें भांडण काय करतां ? आम्ही तुम्हां सातांचेहि गुरु आहोंत. तुमच्यापैकीं एकाकडे आम्ही येऊं. " तेव्हां सारेजण म्हणाले, " महाराज, आपण श्रीमंत-गरीब हा भेद करूं नका. सगळ्यांना सारखेंच पाहा. दुर्बल म्हणून अव्हेर केलात तर गंगेंत प्राणार्पण करूं.श्रीकृष्णभगवान् विदुराच्या घरीं जात असत. पण कौरवेश्वर दुर्योधन याच्या मंदिरांत जात नसत. आम्ही सारेजणच तुमचे दास आहोंत. कोणालाच उदास करूं नका. आपणच निर्णय घ्या. आपण सांगाल तसें आम्ही करूं. " सातहि जणांनीं साष्टांग नमस्कार घालून पुनः एकदां श्रीगुरूंना आपल्या घरीं येण्याची विनंति केली. तेव्हां श्रीगुरु म्हणाले, " शिष्योत्तमांनो, कांहीं काळजी करूं नका. मी तुमच्या सर्वांच्याहि घरीं येईन. अगदीं बिलकुल चिंता करूं नका. शपथेवर सांगतों हें. " त्यावर प्रत्येकजणानें वेगवेगळी गळ घातली. कुणालाच भरंवसा वाटेना. तेव्हां श्रीगुरूंनींहि एक युक्ति केली. त्यांनीं सातहि शिष्यांना बाहेर जायला सांगून, मागाहून प्रत्येक शिष्याच्या कानांत, " दिवाळीला मी तुझ्याकडेच येणार आहें. कोणाला आधीं सांगूं नको हो !" असें सांगून प्रत्येकाच्या मनांत विश्वास निर्माण केला व सातहि शिष्यांना आप-पल्या गांवीं परत पाठविलें. त्या सात शिष्यांना परस्परांना श्रीगुरूंनीं आप-

णाला कानांत काय सांगितलें होतें,याचा पत्ता लागू दिला नव्हता. त्यापैकीं प्रत्येकाला वाटत होतें कीं, फक्त आपल्यावरच श्रीगुरूंची जास्त कृपा आहे. ते आपणाकडेच येणार व इतर सहांना हें रहस्य नंतर कळल्यावर त्यांचा विरस होणार. तिकडे गाणगापुरांतील भक्तांना ही बातमी कळतांच तेहि मठांत येऊन श्रीगुरूंना म्हणूं लागले, " दिवाळीला आपल्या गांवांत राहायचें सोडून, स्वामिमहाराज, आपण भिक्षेला दुसरीकडे जाणार असें ऐकलें आहे. अहो, आम्ही गांवांतले. सणावारीं ग्रामभक्तांकडेच आपण यायला हवें होतें. "

" माझ्या प्रिय भक्तांनो, कां असे रागावतां ? मी गांवांतून बाहेर जाणार नाहीं. आम्ही येथेंच राहूं, जात नाहीं, मग तर नाहीं ना चिंता?"

तें ऐकतांच ग्रामभक्तहि संतुष्ट होऊन गेले. त्या सात भक्तांची श्रीगुरूंनीं केवळ समजूत घातली असावी असें त्यांना वाटलें. श्रीगुरूंनीं सर्वांना येतों म्हणून सांगितल्यावर, धनत्रयोदशीचा दिवस उजाडला. श्रीगुरु ठरल्याप्रमाणें त्या सातहि शिष्यांकडे त्या दिवशीं भिक्षेला गेले व गांवांतहि होते ! सातही गांवें गाणगापुराहून फार दूर होतीं. तरी श्रीगुरूंना काय अशक्य होतें ? त्यांनीं वस्तुतः आठ रूपें घेतलीं होतीं. समोरासमोर ठेवलेल्या आरशांत आपलीं अनेक प्रतिबिंबें आपण पाहातों तशीं श्रीगुरूंनीं प्रत्यक्षांत आठ सारखीं रूपें घेतलीं होतीं. पण हें रहस्य इतर कुणालाहि माहीत नव्हतें. प्रत्येक शिष्याला आनंद झाला. त्यानें मनोभावानें सेवा केली.गांवांतल्या भक्तांची भिक्षाहि गाणगापुरांत श्रीगुरूंनीं स्वीकारली. दिवाळीचे दिवस आनंदांत गेले. त्यानंतर कार्तिक महिन्याची पौर्णिमा आली. तेव्हां ते सातहि भक्त दीपाराधन करायला गाणगापुराला आपल्या दूरच्या गांवांहून गुरूंजवळ आले. सगळ्यांनीं श्रीगुरूंना नमस्कार केला. ते सारेजण दहा दिवस मठांतच होते. उत्सव चालू होता. प्रत्येक जण मनांत एक रहस्य बाळगून होता. आपणाकडेच श्रीगुरु आले होते, असा अभि-

मान प्रत्येकालाच वाटत होता. अखेर तो बोलून दाखवावा असा मोह एकाला झाला व तें इतरांनीं ऐकतांच इतर प्रत्येकजण म्हणूं लागला, ' हें कसें शक्य आहे ? श्रीगुरु तर माझ्या घरीं आले होते ! वाटलें तर माझ्या गांवीं जाऊन माझ्या कुटुंबांतील इतर लोकांना विचारा.' प्रत्येकाला वाटे दुसरा खोटें बोलतो आहे. पण श्रीगुरु आले होते व प्रसाद दिला होता याची पटण्यासारखी खूण सातहि जणांनीं परस्परांना दाखवितांच त्यांची खात्री पटली. गांवांतले भक्त तें भांडण ऐकून हंसत होते. ते म्हणाले, ' अरे, तुम्ही सारेच खोटें बोलत आहांत.श्रीगुरु दिवाळीच्या दिवशीं येथें गाणगापुरांतच होते. कारण आम्हां सर्वांचे घरीं ते भिक्षेला आले होते. विचारा कोणालाहि गावांत जाऊन.' हें ऐकल्यावर मात्र ते सातहि भक्त मनांत उमगले. त्यांना चटकन श्रीगुरूंच्या दिव्यत्वाची पुन: प्रचीति आली. गांवांतल्या लोकांनाहि तो चमत्कार ऐकून नवल वाटलें. सर्वांचा श्रीगुरूंवर अधिकच विश्वास बसला. अवतारी पुरुषाला आठ रूपें घेणें काय अवघड, हें सर्वांच्या लक्षांत आलें. त्या भक्तांनीं या घटनेवर अनेक भजनें रचलीं. सिद्धमुनि नामधारकाला ही गोष्ट सांगून म्हणाले,

श्रीगुरुसेवा करा हो करा। मारीतसें मी डांगोरा ॥
सांगताती संचराचरा । गुरु तोचि त्रैमूर्ति ॥ ४७·४० ॥

या निर्जल संसारअरण्यांत श्रीगुरुभक्तिरूपी पाणपोई घातली आहे. तें पाणी पिऊन साऱ्यांनीं संतुष्ट व्हावें. अमर व्हावें. [ अजूनहि गाणगापुराला दर्शनाला गेलें असतां, दृढ श्रद्धा व निष्ठा असेल तर मनोकामना पूर्ण होतात, असा अनेक भक्तांचा अनुभव आहे. गाणगापुराला जाऊन, तेथें अद्यापि अमूर्त स्वरूपांत असलेल्या श्रीगुरूंचें दर्शन मनानें ध्यायची संधि दवडूं नका, अशी आग्रहाची विनंति सरस्वतीगंगाधरांनीं केली आहे. ]

सिद्धमुनींच्या मनांत त्यानंतर श्रीगुरूंच्या गाणगापुराच्या वास्तव्यांतलि आणखी एक आश्चर्यकारक घटना आठवली. नामधारकानें त्यांच्या मनां-

तील भाव ओळखले व त्यांना ती गोष्ट सांगण्याची गळ घातली. ती गोष्ट म्हणजे,

• • •

# अवेळीं कापलें शेत

श्रीगुरु गाणगापुराहून रोज अमरजासंगमावर स्नानाला जात असत. तिकडे जाण्याचा रस्ता शेतजमिनींतून जातो. श्रीगुरूंच्या अनेक भक्तांत एक शूद्र जातीचा भक्त होता. त्याचें शेत अमरजासंगमावर जाण्याच्या रस्त्यांतच होतें. त्यामुळें श्रीगुरु संगमावर रोज अनुष्ठानाला जात तेव्हां आपल्या शेतांत उभ्या असलेल्या त्या शूद्र भक्ताला त्यांच्या दर्शनाचा लाभ मिळे. श्रीगुरूंना पाहतांच तो आपल्या शेतांतून धांवत येई व श्रीगुरूंना रस्त्यांतच साष्टांग नमस्कार घालून पुनः आपल्या कामाला जात असे. श्रीगुरु दुपारीं मठांत परत जात असतांनाहि तो पुनः एकदां त्यांना मनोभावानें वंदन करीत असे. श्रीगुरु त्याच्याजवळ कांहींच बोलत नसत. त्याचा नमस्कार करण्याचा क्रम असा अनेक दिवस चालूच होता. एक दिवस श्रीगुरूंना त्याची दया आली. त्यांनीं नित्याप्रमाणें तो शूद्र नमस्कार करायाला येतांच, त्याला विचारिलें, " काय रे बाबा, तूं दररोज एवढे कष्ट कां घेतोस ? तुझ्या मनांत कोणती वासना आहे, ती लवकर सांग. आम्हीं तुझ्यावर संतुष्ट झालों आहोंत. "

" श्रीगुरुराया, माझें शेत उत्तम व अधिक पिकावें याशिवाय माझ्यासारख्या शेतकऱ्याचा दुसरी कोणती इच्छा असणार ? "

" शेतांत काय पेरलें आहेस ? "

" जोंधळा पेरला आहे जी. यंदा पीक तर छान आलें आहे. आपण येऊन एकदां आपली अमृतदृष्टि माझ्या शेतावर टाकावी. तुम्ही सगळ्यांचा प्रतिपाळ करतां; शूद्र म्हणून माझी उपेक्षा करूं नका. "

" ठीक आहे. चल जाऊं तुझ्या शेतांत. "

त्या शूद्राचें शेत पाहून आल्यावर श्रीगुरु त्याला म्हणाले, " मी जें तुला सांगणार आहें तें भक्तिभावानें करणार असलास तर तुला कांहीं सल्ला देतों. "

" स्वामि, गुरुवाक्य हाच माझा आधार. आम्हांला दुसरा मनोभाव नाहीं. तेव्हां आपण सांगाल तसें खात्रीनें करीन. "

" ठीक आहे. मी संगमावर जातों आहें. दुपारीं परत येईपर्यंत तूं हें उभें असलेलें सारें पीक कापून टाक. "

श्रीगुरु इतकें सांगून संगमावर स्नानाला गेले. इकडे त्या शूद्रानें त्यांच्या बोलण्यावर निष्ठा ठेवली व गांवांत जाऊन अधिकाऱ्यांना त्यानें विनंती केली,

" साहेब, मला माझें शेत खंडानें द्या. मी गेल्या वर्षाप्रमाणें खंडाचें धान्य जरूर घालीन. "

" वा रे वा ! यंदा पीक भरघोंस आलें आहे म्हणून उक्तें कंत्राट मागतोस काय ? आम्हांला हें मान्य नाहीं. "

" साहेब, नाहीं म्हणूं नका. गेल्या वर्षाच्या दुप्पट धान्य यंदा खंड म्हणून देईन असें वचनपत्र लिहून द्यायला मी तयार आहें. "

" असें असेल तर आमची तयारी आहे," असें बोलून अधिकाऱ्यांनीं वचनपत्र तयार करून त्याच्यावर त्या शूद्राचा आंगठा घेतला व त्याला त्या वर्षापुरती शेताची मालकी बहाल करून त्या अर्थाचें अधिकारपत्रहि

दिलें. तें अभयपत्र घेऊन तो शूद्र घरीं गेला व आजूबाजूचे लोक जमवून शेतांत घेऊन गेला व अजूनहि कच्चें असलेलें तें शेत कापावयाला प्रारंभहि केला त्यानें. इतर लोक प्रथम शेत कापायला तयार होईनात, पण त्यानें 'तुमचें काय जातें ? माझें शेत आहे, माझी जिम्मेदारी. तुम्हांला मजुरी मिळाली म्हणजे झालें ना ?' असें सांगतांच सारेजण शेत कापूं लागले. ती बातमी गांवांत पसरली. त्या शूद्राची वायको व मुलें 'शेत कापूं नको,' असें त्याला विनवीत होतीं. तेव्हां तो शूद्र दगड घेऊन आपल्या वायकोला तावडतोब मारायला धांवला. श्रीगुरूंच्या वचनाविरुद्ध बोललेलें त्याला खपलें नाहीं. त्याची बायको व मुलें राजद्वारीं जाऊन तेथेंच धरणें धरून वसलीं. त्याची बायको अधिकाऱ्यांना सांगत होती,

"काय सांगूं ? माझ्या नवऱ्याला वेड लागलें हो ! शेत अजून पिकलेंहि नाहीं, तर यांनीं सारें शेत कापून टाकावयाचा सपाटा चालविला आहे. आम्हीं अडवूं लागलों तर आम्हांलाच दगड घेऊन मारायला धांवला. त्या संत महात्म्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवून सारें शेत कापलें. आतां आम्ही पुढें काय खाणार ?"

"आम्हीं कांहीं करूं शकत नाहीं. बाई, हें पाहा त्याला दिलेलें मुखत्यारपत्र. त्यानें गेल्या वर्षाच्या दुप्पट धान्य खंड म्हणून देण्याचें कबूल करून तसा कागदहि करून दिला आहे.तरी पण त्याला सांगावयाला फार तर आम्हीं कोणाला तरी पाठवितों."

त्यानंतर राजाच्या अधिकाऱ्यांनींहि त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण गुरुवचनावर दृढ श्रद्धा असल्यामुळें त्यानें कोणाचेंहि ऐकलें नाहीं. उलट, "अधिकारी जर घाबरत असतील, तर माझीं गुरें मी राजाच्या अधिकाऱ्यांकडे अनामत ठेवावयाला तयार आहें. माझ्या घरांत असलेलें सारें धान्य आणून कोठींत घालतों." असा निरोप त्यानें

पाठविला. तेव्हां राजाच्या अधिकाऱ्यांनीं त्याचा नाद सोडून दिला. इकडे त्या शूद्रानें आपलें संपूर्ण शेत कापलें होतें व तो श्रीगुरु संगमावरून परत केव्हां येतात, याची वाट पाहात उभा होता. श्रीगुरु संगमावरून परतले तेव्हां त्या जागेजवळ आल्याबरोबर त्या भक्तानें त्यांना संपूर्ण शेत कापल्याचें सांगितलें. तेव्हां श्रीगुरु त्याला म्हणाले,

" अरे हें काय केलेंस ? मी तुला शेत काप असें गमतीनें सांगितलें होतें. त्यांतला विनोदाचा भाग लक्षांत न घेतां कच्चें शेत तूं उगाच कापून टाकलेंस. व्यर्थच नुकसानी झाली तुझी. "

" गुरुराया, तुमचें वाक्य म्हणजे आज्ञा. गुरूंची आज्ञा म्हणजे कामधेनु. मी आपणावर दृढ निष्ठा ठेवून हें काम केलें आहे. '

" भक्ता, तुझा जर इतका निर्धार असेल तर मनांत कांहीं चिंता करूं नकोस. तुला परिणामीं अत्यंत मोठा लाभ होईल. "

एवढें सांगून श्रीगुरुनाथ गांवांत परतले. बरोबर तो शूद्र पण गेला व मग आपल्या घरीं गेला. त्याच्या घरीं बायको व मुलें आपल्या तोंडचा घास गेला म्हणून आकांत करीत होतीं. त्या सगळ्यांना त्या शूद्रानें धीर दिला.

त्यांना तो सांगूं लागला, " अरे, तुम्ही कसली चिंता करतां ? गुरु-वाक्य म्हणजे कामधेनु. एकपट दिलेंत तर सहस्रपट ते श्रीगुरु तुम्हांला देतात. आपलें मन स्थिर करा. ज्यावर गुरुकृपा होते, त्याला कसलें दैन्य बाधणार ! म्हणूनच गुरुकृपेचा मोठा अमोल ठेवा आज मिळाला म्हणून आनंद वाटला पाहिजे. "

त्यानंतर आठ दिवस, दररोज तो शूद्र आपल्या घरच्या लोकांचें असेंच सान्त्वन करीत होता. आठ दिवसांनीं एक चमत्कार घडला. एकाएकीं ज्राची थंडी पडली. अत्यंत थंडगार वारा वाहूं लागला व सगळ्यांच्या

शेतांतील पिकाची नासाडी झाली. त्यांतच अकालीं मूळ नक्षत्रांत पाऊस पडला. साऱ्या गावांतले लोक चिंतामग्न झाले होते, पण त्या शूद्राच्या शेतांतील जोंधळ्यांच्या मुळांना मात्र त्या पावसानें पुनः धुमारे फुटले व ते कालांतरानें भराभर वाढून, त्या शूद्राचें शेत शंभरपट चांगलें पीक येऊन डोलूं लागलें ! तेव्हां इतर सर्वांचीं शेतें कुजून सपाट आडवीं पडलीं होतीं. त्या शूद्रभक्ताची बायको आनंदित झाली व शेतावर पूजा घेऊन गेली. साऱ्या लोकांना आश्चर्य वाटत होतें.

त्या शूद्रपत्नीनें आपल्या यजमानांची क्षमा मागितली. तिला श्रीगुरूंना पूर्वीं नांवें ठेवल्याबद्दल पश्चात्ताप झाला होता. शेत पिकून तयार झालें होतें. शेतावरील देवाची पूजा करून ती पतिपत्नी श्रीगुरूंची पूजा करावयाला गेलीं. श्रीगुरूंनीं येण्याचें कारण विचारतांच, त्यांनीं सर्व हकीगत सांगितली. श्रीगुरूंचें गुणवर्णन करून त्यांची पूजा व आरती केली. दोघेंहि श्रीगुरूंचा आशीर्वाद घेऊन घरीं परतलीं. एक महिन्यानें शेत कापलें तेव्हां अपार पीक आल्याचें आढळलें. त्या शूद्रानें महसूल अधिकाऱ्यांकडे जाऊन सांगितलें, " साऱ्या गांवाचें पीक बुडालें आहे. तेव्हां मी माझ्या पिकाचा अर्धा भाग तुम्हांला देण्याचें कबूल करतों. करारपत्रांत गेल्या वर्षाच्या दुप्पट देण्याचें लिहिलें असलें तरी अर्धा भाग घेतलात तर त्याहून किती तरी पट अधिक धान्य मिळेल. यंदा माझ्या शेतांत शतपट धान्य पिकलें आहे. "

" अरे सज्जन माणसा, तूं म्हणतोस हें खरें; पण आम्हीं अन्यायी आचरण कां करावें ? तुझ्यावर गुरुकृपा झाली. तुझें भाग्य उदयाला आलें. अधिक आलेलें पीक आपल्या घरीं ने व आनंद कर. आम्हीं फक्त करारपत्रांत लिहिलें आहे तेवढेंच धान्य खंड म्हणून घेऊं. "

" ठीक आहे. आपण पाहिजे तेवढें धान्य घ्या. उरलेलें मी ब्राह्मणांना व गोरगरिबांना फुकट वांटीन. "

आणि खरोखरच त्या शूद्रानें सरकारी खंड देऊन उरलेलें धान्य लोकांना वाटलें. असा आहे श्रीगुरुचरित्राचा महान् प्रभाव. ज्याची श्रीगुरूं-वर दृढ भक्ति, त्याला मिळतात सांऱ्या शक्ति. दैन्याचें राहात नाहीं नांव व होतो सुखाचा प्रादुर्भाव.

सिद्धमुनींची गोष्ट सांगून झाली होती. नामधारकानें श्रीगुरु रोजा अमरजासंगमावर स्नानाला जात असें ऐकलें होतें. त्याला अमरजानदीचें महत्त्व एवढें कां वाढलें होतें हें जाणून घेण्याची उत्कण्ठा लागून राहिली होती. सिद्धमुनींनीं ती त्याची उत्सुकता ओळखून अमरजा संगमाची महती नामधारकाला सांगितली.

• • •

# ‘ असा हा थोर अमरसंगम ’

आश्विन वद्य चतुर्दशीचा दिवस होता तो. श्रीगुरु शिष्यांना म्हणाले, “ गया, प्रयाग व वाराणशी अशी त्रिस्थळीची यात्रा करावी; असें मनांत आलें आहे. बायकामुलांसह तुम्हीं सर्वहि माझेबरोबर चला. ”

“ महाराज, आम्हांला प्रवासाची तयारी करायला कांहीं सवड पाहिजे. ”

“ अरे शिष्यांनो, असें कुठें फार लांब जावयाचें आहे आपणाला ? गांवाजवळ दोन तीन मैलांवर तर हीं सारीं क्षेत्रें आहेत. मग प्रवासाची तयारी कशाला ? ”

" काशी, गया, प्रयाग तर फार दूर आहेत असें आम्हीं ऐकलें होतें."

श्रीगुरूंनीं साऱ्या भक्तजनपरिवाराला आपणामागोमाग यावयाला सांगून, आपण स्वत: अमरजासंगमाचे दिशेनें निघाले. तेथें पोंहोचल्यावर ते साऱ्यांना म्हणाले, "अहो हीच ती त्रिस्थळी. इथें स्नान केलेंत कीं काशी, गया व प्रयाग क्षेत्रांत स्नान केल्याचें पुण्य लाभेल."

शिष्यांनीं गळ घातली म्हणून श्रीगुरूंनीं अमरजासंगमाची महती त्यांना सांगितली.

अमराजानदी उत्तरेकडे वाहात जाते याचें अपार पुण्य आहे. अमरजा नदीची गोष्ट जालंधर पुराणांत सांगितली आहे.

जालंधर नांवाचा एक राक्षस होता. त्यानें सर्व देवांना जिंकलें होतें. इंद्रनगरी त्यानें काबीज केली तेव्हां सगळे देव स्वर्गांतून भिऊन पळाले व आपलें सैन्य एकत्र करून, राक्षसांच्या सैन्याला तोंड देण्याचा फोल प्रयत्न त्यांनीं केला.त्या युद्धांत अनेक देव रणांगणावर पडले.तेव्हां देवांचा सेनापति इंद्र शंकरांकडे जाऊन त्यांना म्हणाला, " शिवशंकरा, महादेवा, आमच्या-वर मोठा अनर्थ ओढवला आहे. दैत्यांनीं देवांना मारलें आहे. असुरांपुढें सुर पराभूत झाले आहेत.आश्चर्य असें कीं, आम्हीं दैत्यांना मारिलें कीं त्यांचें रक्त जमिनीवर पडतांच,त्या रक्तबिंदूंपासून नवीन दैत्य उत्पन्न होतात. स्वर्ग, मृत्यु व पाताळ सर्वत्र दैत्यांचा प्रभाव आहे. त्यांनीं सगळ्या दिशांचा ताबा घेतला आहे. आपणच आतां देवांचें रक्षण करा."

हें ऐकतांच शिवशंकर फार क्रुद्ध झाले, व लगेच नंदीवर बसून राक्षसांचा समाचार घ्यायला निघाले. जीवन मिळून, दैत्यांचा वध करतां यावा अशाकरतां एखादें साधन देवांना द्यावें,अशी शंकरांची विनवणी केली तव्हां गिरिजारमण शंकरांनीं, अमृतमंत्राचा उच्चार करून संजीवनीचा घट इन्द्राला दिला. तें मंतरलेलें पाणी शिंपडतांच, धारतीर्थी पडलेले सगळे देव

जिवंत झाले व असुरांबरोबर लढायला गेले. सर्वांना संजीवनी दिल्यावर थोडेसें अमृत शंकरांनीं दिलेल्या घटांत शिल्लक होतें. इन्द्र तें घेऊन जात असतां, अचानक भूमीवर पडलें. तिथें पाण्याचा एक मोठा प्रवाह वाहूं लागला. तीच संजीवनी नदी होय. त्याच नदीचें दुसरें नांव अमरजा. या अमरजानदीचा व भीमरथी नदीचा संगम झाला आहे. तें स्थान प्रयागराज-तीर्थाएवढेंच पुण्यपावन झालें आहे. या संगमावर स्नान केल्यावर प्रदीर्घ आयुष्य, रोगराईपासून व इतर पापांपासून मुक्ति मिळते. सूर्यग्रहण, एकादशी या दिवशीं या संगमांत स्नान करण्याचें विशेष महत्त्व आहे.

या अमरजासंगमाजवळच विशेखा नांवाचें तीर्थ अश्वत्थवृक्षासमोर आहे. त्या अश्वत्थवृक्षाचें माहात्म्य कल्पवृक्षासारखें आहे. श्रीगुरूंचें वास्तव्य सदैव तिथें असतें. त्या वृक्षाखालीं उपासना करणाऱ्याला जें जें मनोवांच्छित असेल तें तें सर्व मिळतें. तेथील इतर पुण्यस्थानांचा परिचय करून द्यायचा तर, त्यापुढील पवित्र ठिकाण शंकराच्या भुवनांतील संगमेश्वर. [ शंकराच्या देवळांत घालतात तशा, तीन सव्यापसव्य प्रदक्षिणा तिथें घालाव्यात. ]

शंकराच्या देवळांत शिवलिंगासमोर नंदीची मूर्ति असते. त्या नंदीला स्पर्श करून शंकराचें दर्शन घ्यावयाचें असतें. त्याबद्दलची एक पद्धत लक्षांत ठेवायची तर ती अशी,

‘ वामहस्तीं वृषण धरोनी । तर्जनी अंगुष्ठ शृंगीं ठेवोनी ।

पूजा पहाती समालोचनीं । इंद्रासमान होय नर ॥ ४९·४४ ॥

त्यानंतर लागतें तें वाराणसीतीर्थ. अमरजासंगमापासून अर्धा कोस दूर आहे तें तीर्थ. नागेसी गांवांतल्या त्या तीर्थाबद्दल नुसती दंतकथा नव्हे, तर प्रत्यक्ष घडलेली एक गोष्ट आहे.

भारद्वाजगोत्राचा एक ब्राह्मण तेथें होता. पूर्ण विरक्त असा ईश्वरभक्त होता तो. नेहमीं करी शिवाचें ध्यान, विसरून जात असे देहभान. त्याच्यावर चंद्र-

मौलि प्रसन्न झाले होते. त्यामुळें ते भक्तप्रिय सदाशिव सदैव त्याच्या जवळ-पास रहात. त्या ब्राह्मणाची नेहमीं ब्रह्मानंदीं टाळी लागलेली असावयाची. तें पाहून गावांतलि लोक त्याला वेडा समजून, त्याची निंदा करूं लागले. त्याला दोन भाऊ होते.एकाचें नांव होतें ईश्वर, तर दुसऱ्याचें परमेश्वर. त्या दोघांनीं आपल्या त्या शिवभक्त भावाचा अव्हेर करून काशीयात्रेला जाण्याचा एकदा बेत केला. सर्व तयारी केली व दोघे निघाले, पण वरकरणीं भक्तींत बेहोष असलेल्या आपल्या भावाला म्हणाले,

" चल, काशीला जाऊं या. येतोस का ? आम्ही जात आहोंत. "

" अरे ईश्वरा, अरे परमेश्वरा, काशीला कशाला जातां ? विश्वेश्वर जवळच आहे. तो मी तुम्हांला येथेंच व त्वरित दाखवीन. "

" वा ! फार छान. दाखव तर मग तो विश्वेश्वर इथेंच. हो, म्हणजे काशीला जायचा खटाटोप व महाप्रयास न करतां येथेंच विश्वेश्वर भेटले तर फारच उत्तम. "

हें भावांचें आव्हान स्वीकारून, त्या शिवभक्त ब्राह्मणानें गंगेवर स्नान केलें व तो ध्यानाला बसला. काशीविश्वेश्वर तर सदैव त्याच्या सन्निधच होते. त्यानें ध्यानांत विश्वेश्वरांना विनविलें, " देवा, माझ्या या गांवांतच सदैव काशीक्षेत्राचें पुण्य लाभेल असें करा. "

भोळा सांबसदाशिव भक्तीला भुलला व त्यानें भक्ताच्या इच्छेप्रमाणें तेथेंच काशीचा देखावा उभा केला. मणिकर्णिका कुंड तेथें दिसूं लागलें व त्यांतून विश्वेश्वराची एक मूर्ति वर आली. काशींतल्या सर्व खुणा त्या कुंडांत होत्या.मणिकर्णिका कुंडांतलें पाणी वाहूं लागलें व भीमा नदीला तें मिळून सुंदर संगम झाला. ईश्वर व परमेश्वर या दोघांहि भावांना आपल्या ब्रह्मज्ञानी भावाची ओळख पटली. त्या दोघांना सांगितलें, " आपल्या वंशांत कोणी काशीला जाऊं नये. आज हें जें कुंड पाण्यानें तुडुंब भरलें

आहे, हीच आपली काशी. माझें नांव गोसावी आहे,अशी खूणगाठ बांधा. तुम्हीं पंढरापुरला जा. तिथें पुंडलीकवरद विठ्ठलाची आराधना करा. दरवर्षी कार्तिकीला मात्र येथें येत जा."

श्रीगुरूंनीं काशीक्षेत्राचा महिमा लोकांना सांगितला त्यानंतर पापविनाशी तीर्थावर ते गेले.त्यांत नुसतें स्नान केलें तरी पापाचा नाश होतो.त्या वेळीं आपली बहिण रत्नाई हिला श्रीगुरूंनीं बोलावून घेतलें. रत्नाई अल्यावर ते म्हणाले, "माझ्या भगिनी, तूं दर्शनाला आलीस तें बरें झालें. गेल्या जन्मीं दुष्कर्म करून तूं फार मोठा पापाचा डोंगर रचून ठेविला आहेस."

रत्नाई श्रीगुरूंच्या पायां पडली व म्हणाली, "मी तर अजाण, मूढ आहें. मला कुठलें पूर्वजन्माचें ज्ञान असावयाला? आपण ज्ञानज्योति आहांत. आपणच माझ्या पूर्वजन्माची ती कहाणी मला सांगा ना."

"अग रत्नाई, तूं गेल्या जन्मीं पांच मांजरांची हत्या केली होतीस. एकदां तुझ्या घरीं एक मांजरी तुझ्या घरांतील भांड्यांत व्याली होती. तुला तें माहीत नव्हतें. तूं त्या भांड्यांत न पाहतांच पाणी ओतलेंस व तो हंडा विस्तवावर ठेवलास. पाणी उकळतांच त्यांतील तीं पांच मांजरीचीं पिलें ठार मेलीं. त्या दोषामुळें तुला या जन्मीं पांढरें कोड झालें आहे."

"श्रीगुरुराया, पाप फेडायला लोक वाराणसीला जातात. मी तुझ्या दर्शनाला आलें आहें. तर माझें पाप आता धुऊन टाकावें."

"रत्नाई, जर पुढील जन्मीं हें पाप भोगायला तयार असशील, तर या जन्मीं यापुढें रोगमुक्त होशील."

'श्रीगुरुराया, आतां जन्ममरणाचा फेरा चुकावा ही तर इच्छा आहे, म्हणून तर तुमच्या चरणांचा आश्रय घेतला आहे. मी माझ्या पापाचें फळ याच जन्मीं भोगण्याला तयार आहें."

" ठीक आहे, रत्नाई तूं आतां असें कर, पापविनाशीतीर्थाला त्वरित जा. तिथें जाऊन नुसतें स्नान केलेंस कीं तुझें कोड बरें होईल. दररोज तेथें स्नान केलें तर सात जन्मांचे दोष दग्ध होतात. "

सिद्धमुनि नामधारकाला म्हणाले, " अरे नामधारका, मी प्रत्यक्ष या माझ्या डोळ्यांनीं पाहिलें आहे हें. त्या रत्नाबाइनें फक्त तीन दिवस स्नान करतांच तिचें कोडें बरें झालें. मग ती रत्नाई, त्या पापविनाशी तीर्थाजवळील मठांतच येऊन राहिली." श्रीगुरूंनीं त्यानंतर प्रगट केलेल्या तीर्थांत कोटितीर्थ, रुद्रपद, गयातीर्थ, चक्रतीर्थ ( ज्यांत स्नान केलें असतां पतितही ज्ञानी होतो, ) तें द्वारावती, मन्मथदहन गांवाच्या पूर्वेला असलेलें गोकर्ण-महाबळेश्वराप्रमाणेच महान् मल्लेश्वराचें देवस्थान यांचा समावेश होतो. अखंड श्रावण महिन्यांत देवावर अभिषेक करण्याचें व कार्तिक महिन्यांत केलेल्या दीपाराधनेचें पुण्य अनंत आहे. अशा रीतीनें गाणगापूरजवळच्या आठ तीर्थांचा परिचय करून देऊन श्रीगुरु पुनः गाणगापुराला मठांत परत आले. शिष्यांनीं मोठी समाराधना केली. मोठा आनंदीआनंद झाला.

त्यानंतर सिद्धमुनींना पूर्वी श्रीगुरूंचा जो एक धोबी भक्त होता त्याची आठवण झाली व नामकरणीच्या मनांत श्रीगुरुचरित्राचा पूर्वभाग किती ठसला आहे, हें जाणून घेण्याकरिता ते म्हणाले,

" काय रे नामकरणी, धोबी झाला राजा ही मी पूर्वी सांगितलेली गोष्ट तुला आठवते का ? "

" अहो सिद्धमुनि, आठवते तर. त्या धोब्यानें पुढील जन्मांत राज्यपद मिळावें असा वर मागितला होता व त्याचा जन्म वैदुर नगरांत मुसलमानाच्या राजवंशांत होणार हाता. त्याचें पुढें काय झालें तें सांगा. मी याबद्दलची माझी उत्कण्ठा इतके दिवस दाबून ठेविली होती. त्या मागील गोष्टीनंतर आपण एवढ्या रसाळ गोष्टी सांगितल्यात कीं, त्या धोब्याबद्दल प्रश्न विचारायचा मी विसरूनच जाई दर वेळीं. "

‘ नामधारका, तूं गुरुचरित्र मनांत चांगलें बिंबविलें आहेस. ऐक तर मग त्या धोब्याची पुढची गोष्ट.

• • •

# राजा झालेला धोबी

वैदुर नगराच्या मुसलमान राजवंशांत जन्म होऊन, श्रीगुरूंचा गेल्या जन्मांतील भक्त तो धोबी, कालांतरानें राज्यावर आला. पूर्वजन्मींच्या संस्कारांमुळें, मुसलमान असूनहि त्याची ब्राह्मणांवर विशेष भक्ति होती. मुनिजनांना सुद्धा तो यवन राजा खूप मदत करी. हिंदूंच्या देवळांना तो कांहींहि उपद्रव देत नसे. त्याचे राजेपुरोहित मौलवी त्याला शिकवीत.

“ आपण म्लेंछ जातीचे लोक. देवाब्राह्मणांची निंदा करणें हा आपला छंद असावा. या उलट आपण त्यांची सेवा करतां. आपणाला जातिधर्म पालन केल्यानेंच अनंत पुण्य लाभतें. शिवाय हे मंदबुद्धि हिंदु लोक दगडाची पूजा करतात. सर्वच वस्तूंना देव मानतात. लाकूड, झाड, गाय, पृथ्वी, चंद्र, अग्नि, सूर्य, नदी, तीर्थ या सर्वांनाहि देव म्हणतात. निराकार अशा त्या जगन्नियंत्याला साकार संकुचित असा मानतात. अशा त्या ब्राह्मणांचा ( काफिरांचा ) जे आदर करतात त्यांचा अधःपात होतो.’

“ अरे मौलवींनो, मला तुमचें हें संकुचित बोलणें ऐकून तुमचा अनिवार राग आला आहे. आपणच मला सांगतां कीं, सर्वेश्वर अणुरेणु, गवत, काष्ठ, सर्वांनीं पूर्ण आहे असें. सर्व सृष्टी ईश्वराची आहे. स्थावर-जंगमांत सवत्र एकच देव आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहा-

भूतांपासून साऱ्या वैश्विक जातींची उत्पत्ति झाली आहे. आतां पहा वरें, साऱ्यांची पृथ्वी एकच. कुंभार लोक त्याच पृथ्वीवरील माती घेतात व त्या मातीचीं विविध भांडीं बनवितात. पण त्या सर्व मातीच्या भांड्यांपाठीं माती हें एकच तत्त्व असतें. निरनिराळ्या आकारांच्या व रंगांच्या गाई असतात. पण त्यांचें दूध मात्र पांढरें व एकच गुणधर्मयुक्त असतें. सोन्याचे विविध अलंकार केले तरी त्या सर्व दागिन्यांचें मूळ कारण एक सोनेंच. तसेंच शरीरें निरनिराळीं असलीं तरी सर्वांचे ठिकाणीं असणारें चैतन्य तत्त्व म्हणजे आत्मा, एकच असतो. चंद्र एकच, पण दिसतो अनेक आकारांत. एका दिव्यावर हजार वाती लावल्या तर त्या सर्व मिळून दीपाकारच. मणि भिन्न असले तरी त्या मण्यांना जोडणारें सूत एकच असतें. त्यामुळें हारांत विविधता असूनहि हार या दृष्टीनें तो एकच असतो. तसेंच जगांत नानापरींच्या जाति असल्या तरी सर्वांचा हरि, म्हणजे देव एकच आहे. त्यांत भेदभाव करूं नये. आतां तुम्ही जें म्हणतां कीं, दगडाच्या देवाची पूजा ( हिंदु ) काफीर लोक करतात. त्याला माझें असें आहे उत्तर. तो विश्वात्मा जर जगांतल्या अणुरेणूंतहि आहे, तर त्या दगडाच्या बनविलेल्या मूर्तींतहि आहे. सगळीकडे आहे तसा तिथेंहि आहे. त्यांत ईश्वराचें वास्तव्य नाहीं असें नाहीं. आतां सगुण पूजा किंवा मूर्तींची पूजा ही ज्यांना देवाचें अमूर्त विश्वस्वरूप आकलन होत नाहीं त्यांच्याकरतां आहे. अन्तःकरण स्थिर नसलें म्हणजे एखाद्या बाह्य मूर्तीची खूण सांगतात. त्या प्रतिमेलाच नारायण किंवा असेंच कांहीं नांव ठेवून तिची पूजा करतात. सगुणांतून निर्गुणाकडे जाण्याचा तो एक मार्ग आहे. ज्यांच्या मनाला कांहीं प्रत्यक्ष आलंब असल्याशिवाय तें स्थिर होऊं शकत नाहीं त्यांच्याकरतां तो मार्ग हिंदुधर्मांत आहे. नाहीं तर आत्मारामाची पूजा कशी करावी,ज्ञानपूजा म्हणजे काय याचेंहि विवेचन हिंदूंच्या तत्त्वज्ञानांत आहेच कीं. तें तर शरीरें अनेक पण आत्मा एक, मूर्ति अनेक पण तत्त्व एक; विश्व बहुरूप पण

त्याची निर्मिति करणारें परब्रह्म एकच मानतात. तो परमात्मा एकरूप असूनहि त्याला बहुविध मानतात. असेंहि त्यांचें शास्त्र सांगतें. उलट ज्यांना एकदम अपूर्व, अव्यक्त, निराकार अशा सच्चिदानंदाची उपासना पेलणार नाहीं, अशा अज्ञ अज्ञानग्रस्त लोकांचीहि प्राथमिक तयारी म्हणून हिंदूंच्या शास्त्रांत सगुण पूजेची उत्तम सोय आहे. तेव्हां मुसलमान धर्मांत जर तुम्ही तो परमेश्वर सर्वांठायीं पूर्ण भरला आहे असें मानतां तर हिंदूंच्या देवमूर्तींना नांवें का ठेवतां? सर्वांठायीं असणारा तुमचा देव त्या मूर्तींत तेवढा नसतो का? म्हणून मी जरी मुसलमान असलों तरी, दुसऱ्याच्या धर्माची व समजुतींची निंदा कर असें मला माझ्या धर्मांत शिकविलें असल्याचें स्मरत नाहीं. या उलट ज्ञानवंतानें कुणाची निंदास्तुति करूं नये. जगांत अनेक जाति तशा वागण्याच्या विविध पद्धति."

अशा रीतीनें मौलवींना निरुत्तर करून राजानें आपला दानधर्म सगळ्या धर्मांच्या लोकांना खुला ठेवला होता. चांगला आचारशील असला तरी शरीरभोग कोणाला सुटला आहे? तसेंच त्या यवन राजाचें झालें. त्याच्या मांडीवर एक फोड झाला. अनेक वैद्यांचीं औषधें करून झालीं. परंतु गुण येईना. त्या फोडाला अनेक लेप लावूनहि तो बरा होईना.

गाणगापुरांत श्रीगुरूंच्या मनांत आलें, "हा यवनराजा कदाचित मला भेटावयाला येईल. तो व त्याचे मुसलमान अनुयायी जर येथें आले तर येथील ब्राह्मणांना तें उपद्रवकारकच होईल. मी इथें आहें, माझा महिमा एवढा मोठा आहे वगैरे गोष्टी आतां सर्वांच्या तोंडीं झाल्या आहेत. कांहीं यवन लोकहि मला भेटायला येऊं लागले आहेत. तरी आतां मला लौकिकार्थानें गुप्तरूपानें राहिले पाहिजे. ईश्वरनामसंवत्सर आला आहे. गुरु सिंह राशींत आला आहे, या निमित्तानें गौतमीतीर्थाच्या यात्रेला जावें."

श्रीगुरूंनीं सर्व शिष्यांना म्हटलें, "शिष्यांनो, उठा. गंगेला जाण्याची तयारी करा. राजाचें बोलावणें आलें आहे." शिष्यांना यवनराजा येणार

आतां कसें होणार अशी काळजी पडली. श्रीनरसिंहसरस्वतीच आपलें रक्षण करतील असें त्यांनीं आपल्या मनाचें सांत्वन केलें. श्रीगुरूंनीं शिष्यांना तसें सांगायला व त्या वैदूरच्या यवनराजाला पूर्वजन्मांतील घटनांची आठवण होण्याला एक गांठ पडली. त्या यवनराजाला मांडीवरील त्या फोडामुळें अपार कष्ट होत होते. ही व्याधि वैद्यांच्या हातून बरी होणारी नाहीं असा त्याला उमज पडला. तेव्हां त्यानें हिंदु ब्राह्मणांना बोलावून घेऊन कांहीं दुसरा उपाय विचारला. ते ब्राह्मण म्हणाले, "आमच्या हिंदुधर्माच्या कल्पनांप्रमाणें, पूर्वजन्मांत केलेलीं पापें रोगांचें रूप घेऊन या जन्मांत पीडा देतात. त्याला उपाय म्हणजे दानधर्म करावा. तीर्थयात्रा व देवदर्शन करावें. त्यामुळें व्याधि बरी होते; किंवा दुसरा उपाय म्हणजे एखाद्या चांगल्या सत्पुरुषाला निष्ठावंत भाव ठेवून शरण जावें. त्या साधुपुरुषाच्या केवळ कृपाकटाक्षरूपी अमृतानें रोग बरे होतात असा अनेकांचा अनुभव आहे."

'सत्पुरुषाचे कृपादृष्टीं । पापें जाती जन्म साठीं ।
मग रोग कैंचा पोटीं । स्फोटकादि त्वरित जाय ॥ ५०·४३ ॥'

असा त्या ब्राह्मणांचा सल्ला ऐकतांच तो यवनराजा त्यांना म्हणाला, "ब्रह्मवृंदहो, मला यवन म्हणूं नका. मी ब्राह्मणांचा दास आहें. पूर्वजन्मीं मी श्रीगुरुचरणांची सेवा केली होती. कांहीं थोडें पाप हातून घडलें होतें, त्यामुळें यवनकुळांत जन्म झाला आहे. आपण कृपा करून एखाद्या महंताच्या दर्शनानें कोणाचा रोग बरा झाल्याची हकीकत ऐकली असेल तर मला सांगा."

"महाराज, आपण मुसलमानधर्माचे, तर आम्ही ब्राह्मण. मग हें कसें काय जमावें?" असें त्या ब्राह्मणांनीं सांगितलें. त्यांच्या मनांत एकांतांतच असला घटना राजाला सांगावी असें होतें. तेव्हां त्या राजानें जातपात

लक्षांत न घेतां आपला उद्धार करावा अशी विनंति करतांच, त्या ब्राह्मणांनीं राजाचें अंत:करण पश्चात्तापदग्ध आहे हें ओळखून त्याला सांगितलें,

" महाराज, आपण पापविनाशी नांवाचें एक चांगलें ठिकाण आहे तिथें जा. एकांतस्थळ पाहून मनोभावानें तिथें स्नान करा. सहज मन रमविण्याकरतां म्हणून तिथें जात आहें, असें इतरांना भासवा. तुम्हांला खात्रीनें गुण येईल. "

त्या ब्राह्मणांचा सल्ला राजाला पटला व त्यानें त्यांचा बहुमान करून त्यांना परत पाठविलें. नंतर तो लगेच पापविनाशी तीर्थाला गेला. सर्व लवाजमा पाठीं ठेवून एकटाच गेला होता तो यवनराजा. त्यानें पापविनाशी तीर्थांत स्नान केलें. तेवढ्यांत तिथें एक यति आला. त्या मुनीला पाहतांच राजानें त्याला भावपूर्वक नमन केलें व आपल्या मांडीवरील स्फोटक त्या यतीला दाखवून तो फोड कसा बरा होईल, असें विचारलें. त्या यतीनेंहि त्या ब्राह्मणांप्रमाणेंच त्या राजाला एखाद्या महानुभावाचें दर्शन घ्यावयाला सांगितलें.

त्या वेळीं एका महंताच्या कृपादृष्टीनें असाध्य रोग बरा झाल्याची एक घटना त्या यतीनें यवनराजाला सांगितली.

• • •

# पिंगलेची गोष्ट

अवंति नांवाची एक नगरी होती. त्या नगरींत एक दुराचारी ब्राह्मण राहात होता. तो नेहमीं मदोन्मत्त असावयाचा. सर्व जातींच्या स्त्रियांशीं रममाण व्हायचा तो. स्नानसंध्यादि ब्राह्मणाच्या नित्य कर्मांचा त्यानें केव्हांच त्याग केला होता. त्या नगरांत पिंगला नांवाची एक नायकिण होती. तो दुराचारी ब्राह्मण पिंगलेच्या घरीं राहात असे. तिच्याबरोबर क्रीडा करी, व तिच्या घरींच भोजनादि घेई. पिंगला म्हणजे त्याचा जीव कीं प्राण होती. तिच्या संगतींत विविध विषयसुखें भोगतांना त्याला आपल्या कर्तव्याचा विसर पडला होता. कामभावनेचा पगडा एवढा जबरदस्त होता. तो विषय-लंपट ब्राह्मण पिंगला वेश्येच्या घरीं असतांना एकदा संध्याकाळच्या वेळीं ऋषभ नांवाचा एक महायोगी त्या पिंगलेच्या घरासमोरील रस्त्यावरून जात होता. त्याला पाहून पिंगला व तो तिचा प्रियकर या दोघांनींहि रस्त्यावर जाऊन त्याला भक्तिभावानें साष्टांग नमस्कार घातला. पिंगला त्या महायोग्याला आपल्या घरांत घेऊन गेली. एका सुंदर आसनावर बसवून, त्याची त्या दोघांनीं षोडशोपचारांनीं पूजा केली. त्याचें चरणतीर्थ दोघांनींहि प्राशन केलें व मग नाना प्रकारचीं उत्तम पक्वान्नें तयार करून त्याला जेवूं घातलें. जेवण झाल्यावर स्वच्छ पाणी आणून त्यांनीं त्याचे हात धुतले व मग बिछान्यावर बसवून दोघेंहि त्याचे पाय चेपूं लागलीं. त्या महायोग्याला थोड्याच वेळांत झोंप लागली. त्या दोघांनीं चार प्रहर उभे राहून त्याचे पाय चेपले. सेवेंत खंड पडूं दिला नाहीं. रात्र संपली. सूर्य उगवला. तेव्हां त्या तपस्व्याला जाग आली. त्या दोघांचा निरोप घेऊन तो महायोगी आपल्या निवासस्थानीं परत गेला. त्यानंतर अनेक वर्षे त्या ब्राह्मणानें पिंगलेच्या सहवासांत घालविलीं.

भोगांची आसक्ति तशीच होती, पण शरीर थकत चाललें होतें. तारुण्याचा वसंत संपून, वार्धक्याचा शिशिरऋतु चालू झाला होता. निसर्गक्रमाप्रमाणें पुढें एक दिवस तो ब्राह्मण मरण पावला. पिंगलेची प्राणज्योतहि विझली. पूर्वजन्मीं केलेल्या महायोग्याच्या सेवेचें फळ म्हणून त्या दुराचारी ब्राह्मणाचा दशार्णदेशाच्या राजघराण्यांतील राणीच्या पोटांत पुनर्जन्म झाला. राजाचें नांव होतें वज्रबाहु व ज्येष्ठ राणीचें नांव सुमति. वज्रबाहु राजानें मोठा समारंभ करून राणी सुमतीचे डोहाळे पुरविले. ज्येष्ठ राणी गर्भार आहे ही बातमी राज्यांत पसरतांच, सर्व लोकांना फार आनंद झाला. राजाला अद्याप मूलबाळ झालें नव्हतें. राजानेंहि मोठा सोहळा केला. राणी सुमतीच्या सवती मात्र मत्सरानें जळूं लागल्या. त्यांना सुमतीचा जयजयकार सहन होईना. एका राजसैनिकाला लांच देऊन त्या सवतींनीं सापाचें विष मिळविलें व नाना प्रयत्न करून त्या सुमतीला तें प्यायला दिलें. दैव बळकट म्हणून सुमतीला मृत्यु आला नाहीं. पण अन्नांतून पोटांत गेलेल्या सापाच्या विषामुळें तिच्या सर्वांगावर व्रण पडले. मोठ्या कष्टानें ती प्रसूत झाली. तिला मुलगा झाला म्हणून आनंद झाला, पण त्या चिमुकल्या जिवाच्या सर्वांगावर क्षतें पडून फोड होऊन त्यांतून लस वाहतांना पाहतांच त्या आनंदावर विरजण पडलें. वज्रबाहु राजालाहि फार कष्ट झाले. राजकुमाराच्या जन्मोत्सवाऐवजीं निरनिराळ्या वैद्यांचीच सभा भरवून, राणी व राजकुमार यांच्या व्याधीवर औषध शोधण्याची त्यांना पराकाष्ठा करावयाला सांगण्यांत आलें. अपार द्रव्य खर्च झालें. देशांतले,तसेच परदेशचे वैद्य सुद्धां आणून झाले; पण कांहीं केल्या राजकुमाराला व राणीला बरें वाटलें नाहीं. त्यांना रात्रंदिवस झोंप येत नसे. अंगावर आणखीच व्रण पडले व त्यांतून वाहणाऱ्या लशीची दुर्गंधि वाढूं लागली. कांहीं दिवसांनीं तर त्या मातापुत्रांच्या अंगावरील जखमांत किडेहि पडले. वज्रबाहु राजाला त्यांचे ते हाल पाहून अतोनात

दु:ख होई. पण शरीरभोगापुढें कोणाचें काय चालणार ? त्या मातापुत्रांना अन्नदक जात नव्हतेंच. जिवंत मरण भोगीत होतीं तीं बिचारीं. राजाला ते कष्ट पाहणेंहि अशक्य होऊं लागलें. अखेर त्या दोघांना अरण्यांत नेऊन ठेवावें असा त्यानें विचार केला. त्याच्या मनांत विचार आला,

' जे जे असती पापी जन । त्यातें जीवन अथवा मरण ।

भोगिल्यावांचोनि न सुटे जाण । आपुलें आपण भोगिजे ॥५०.९०॥

मनाची अशी समजूत घालून, त्यानें कोळ्यांना बोलावणें पाठविलें. रथहांक्याला सांगितलें, " माझ्या या बायकोला व मुलाला निर्मनुष्य अरण्यांत नेऊन सोड. " रथ जोडून झाला. त्यांत महाराणी सुमति व तिच्या बाळाला बसविण्यांत आलें तेव्हां राणीच्या दासदासींना रडूं कोसळलें. राणीचे वडील, भाऊ वगैरे सर्व आप्तहि जमले होते. सर्वांनाच गहिंवर आला. त्यांचें दु:ख पाहणें नको म्हणून त्या सर्वांनीं त्या मायलेकांचा त्याग करून आपली सुटका करून घेतली होती. राणी सुमतीच्या सवतींना मात्र आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. ठरल्याप्रमाणें सूत त्या मायलेकांना अरण्यांत सोडून आला.

तिकडे महाराणी सुमति मुलाला कडेवर घेऊन कशीबशी अडखळत,ठेंचकळत अरण्यांत चालत होती.त्या रानांत वाघ,सिंह वगैरे महाक्रूर श्वापदांचा संचार होता. मोठाले विषारी साप सळसळत होते. तिला वाटे, वाघानें आपल्याला खाल्लें तर किती बरें होईल ! जिवंत यमयातनांतून सुटेन तरी एकदाची. पाण्यावांचून घशाला कोरड पडली होती. देह व्याधीनें जर्जर झाला होता. वनांत वेताळ, ब्रह्मराक्षस, हत्ती, वाघ, भालू दिसतांच आपल्या बाळाला इजा होईल म्हणून तिच्या हृदयांत धडकी भरत होती. केस मोकळे सुटलेले, अनवाणीं हिंडतांना पायांत काटे मोडत होते. धोंड्यांना अडखळून ठेंचा लागत होत्या. खूप खूप

हिंडल्यावर ती निर्मनुष्य अरण्यांतून बाहेर पडली. तेथें तिला वाणी लोकांचीं गुरें चरतांना दिसलीं. जवळ गुराखीहि होते. तिनें त्या गुराख्यांकडे जाऊन पाणी मागितलें. त्यांनीं तिला "जवळच्या देवळांत जा, तिथें खूप पाणी मिळेल. खायलाहि मिळेल." असें सांगून देवळाकडे जाणारा रस्ता दाखविला. ती राणी त्या रस्त्यानें हळूहळू गेली, तेव्हां ती एका गांवांत पोचली. त्या गांवांत पुष्कळ लोकवस्ती होती. सारी प्रजा संतुष्ट दिसत होती. तेथील वैश्य राजाचें नांव पद्माकर होतें. तो महाधानिक पुण्यात्मा होता. 'राजाकडे जा. तो तुला खचित आश्रय देईल' असें सर्व लोकांनीं तिला सांगितलें. राजवाड्यांतील कांहीं दासी तेवढ्यांत तिथें आल्या. त्यांनीं त्या स्थितींत असलेल्या सुमतीची माहिती विचारली. त्यांना तिची दया आली व त्यांनीं त्या मायलेकांना आपल्या मालकाच्या घरीं नेलें. तिला पाहतांच त्या वैश्यराजाला फार दया आली. त्यानें त्या मायलेकांना एक स्वतंत्र खोली दिली. अन्नवस्त्र दिलें व दररोज आस्थेनें तिची विचारपूस करूं लागला. रोग वाढूं नये एवढे उपचार चालू ठेवले. असे कांहीं दिवस लोटल्यावर एक दिवस सुमतीवर दुर्दैवाचा आणखी एक घाला आला व तिचा मुलगा क्रूर काळानें हिरावून नेला! राणीचा शोक आवरणें कठीण होतें. पद्माकराच्या राण्यांनीं तिचें सान्त्वन करण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आपल्या बाळाचे गुण आठवून ती नाना प्रकारें त्याला उद्देशून शोक करीत होती. मोठमोठ्यानें रडत होती. तिची व मुलाची कायमची ताटातूट झाली होती.

'समस्तही दुःखांहूनी। पुत्रशोक केवळ वन्ही।
मातापितरांतें दाहोनी। भस्म करी परियेसा॥ ५०·१३०॥

आणि त्याच वेळीं ऋषभमुनि तिथे आले. महाज्ञानी ऋषभांना अंतर्ज्ञानानें सर्व हकीकत कळली होती. मागील जन्मांतील उपकार स्मरून ते आले होते. योगीमहाराजांना पाहतांच वाणी त्यांना सामोरा

गेला व त्यांचें यथोचित स्वागत त्यानें केलें. तेव्हा योग्यानें रडण्याचा आवाज कोणाचा असें विचारिलें. पद्माकरानें सविस्तर हकीगत सांगतांच तो कृपावंत योगी सुमतिराणीकडे धांवतच गेला व तिला म्हणाला, " बाई, मूढपणें दुःख कां करतां ? या पृथ्वीवर कोण जन्माला आला व कोण मेला? सगळाच भ्रम. जन्मलेल्या प्रत्येकाला मरण ठरलेलेंच आहे. देह हा कधीं तरी पडणारच. गंगेवरचा फेंस जसा तात्पुरता निराळा दिसला तरी कांहीं वेळानें गंगाजलांतच विलीन होतो तसेंच पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें आहे हें मानवी जीवन. पांच महाभूतांचा संयोग झाला कीं शरीरधारणा होते तर तींच पांच महाभूतें परत आपापल्या स्वरूपांत विलीन झालीं कीं, मृत्यु झाला असें आपणाला वाटतें. सत्त्व-रज-गुणांचा हा पसारा आहे. ज्ञानी लोक जन्मवार्ता ऐकून हर्षभरित होत नाहींत व मृत्यूचें दुःख मानीत नाहींत. पूर्वकर्माच्या प्रभावामुळें कोणी बालपणीं तर कोणी म्हातारपणीं मरण पावतात. केवळ मायामोहांत गुरफटून आपण हीं आईबाप, भाऊ, मुलगा वगैरे नातीं निर्माण केलीं आहेत. पूर्वजन्मीं तूं कोणाची आई होतीस, कोणाची बहीण होतीस तें तुला आठवतें का ? त्याचा तूं शोक करतेस का ? तसेंच हें दुःख विसर. जर कल्याण व्हावें असें वाटत असेल तर शंकराला शरण जा."

त्या वेळीं सुमतिराणीनें आपली सर्व हकीगत त्या योगिराजाला सांगितली. आतांपर्यंतच्या सर्व हालअपेष्टा मुलाकडे पाहून तिनें कशाबशा सहन केल्या होत्या. आतां मात्र जीवन भकास वाटूं लागलें होतें. जीवन आतां नीरस झालें होतें. तिची आतां मरावयाची तयारी होती. तिची ती विकल अवस्था पाहून व पूर्वजन्मींचे उपकार स्मरून त्या ऋषभ योग्यानें भस्म मंत्रवून तत्काळ त्या मेलेल्या राजकुमाराच्या कपाळावर लाविलें. तें भस्म त्या प्रेताचे तोंडांत घालतांच, राजकुमार पुनः जिवंत झाला.

बाळ उठून बसला. त्याचें सर्व अंग तेजःपुंज झालें. राणी सुमतीची व्याधीहि पूर्ण बरी झाली. त्या मायलेकरांनीं योगिराजाला साष्टांग नमस्कार घातला. तें मंतरलेलें भस्म त्या मायलेकरांच्या अंगाला आणखी लावतांच त्यांचें अंग अत्यंत सुंदर झालें. त्या योग्यानें त्यांना आशीर्वाद दिला, " तुम्हांला सदैव हीच रूपसंपदा लाभेल. म्हातारपण येणार नाहीं. राणी सुमति, तुझा मुलगा अनेक वर्षें राज्य करून आपल्या वडिलांहून अधिक कीर्तिमान् होईल. "

[ योगिराज निघून गेल्यावर, पद्माकर राजानें, वज्रबाहुराजाला संदेश पाठवून ती गोड घटना कळविली व मग सुमतिराणी व तिचा मुलगा आपल्या राज्यांत जाऊन सुखानें राहूं लागलीं. सुमतीच्या सवतींना योग्य तें प्रायश्चित्त आपोआपच मिळालें होतें. ]

वैदुरच्या यवनराजाला ही गोष्ट सांगून तो तापसी म्हणाला, " हे राजा, सत्पुरुषाची सेवा केलीस तर तुझी व्याधीहि संपूर्ण बरी होईल."

" यतिराज, असा सत्पुरुष कुठें भेटेल तें त्वरित सांगा मला. मी तिथें जाईन. मला त्याचें दर्शन व्हावें अशी उत्कंठा लागून राहिली आहे. "

" राजा, भीमानदीच्या तीरावर गाणगापुर नांवाचें एक गांव आहे. तिथें एक सत्पुरुष आहेत. त्यांच्याकडे तूं जा. त्यांचें नुसतें दर्शन घेतलेंस कीं, तुझ्या मांडीवरील रोगाची गांठ बरी होईल. "

तें ऐकतांच राजा ताबडतोब मनोभावानें तिकडे जाण्याकरितां निघाला. मुक्काम करीत करीत गाणगापुराला पोंचला. त्यानें गांवांतील लोकां-जवळ कोणी महान् तापसी त्या गांवांत कुठे राहतो, असें विचारिलें. सगळे लोक घाबरले. त्यांना वाटलें हा मुसलमान राजा श्रीगुरूचा ठावठिकाणा विचारतो आहे. म्हणजे एकंदरींत आतां कांहीं त्रास

होणार, असा सर्वांना संशय आला. गांवांतले लोक कांहींच सांगत ना. तेव्हां राजा फार रागावला. अखेर श्रीगुरु अमरजासंगमावर स्नानाला गेले असून अनुष्ठान संपल्यावर परत येतील असें त्यांनीं सांगितलें. तेव्हां तो यवनराजा एकटाच डोलींत बसून अमरजासंगमावर गेला. तिथें दुरूनच श्रीगुरूंना पाहतांच, तो पालखींतून उतरून पायीं चालूं लागला व श्रीगुरूंजवळ जाऊन त्यांना भक्तिपूर्वक नमस्कार करून जवळ उभा राहिला. तेव्हां श्रीगुरूंनीं त्याला विचारिलें, " काय रे धोब्या, हल्लीं कुठें असतोस ? आमचा दास झाला होतास त्याला खूप काळ लोटला." श्रीगुरूंचे ते बोल ऐकतांच त्या राजाला पूर्वजन्माचें ज्ञान झालें. त्यानें श्रीगुरूंना साष्टांग नमस्कार घातला व श्रीगुरुपादुकांवर लोळण घेतली. त्याचें अंत:करण सद्‌गदित झालें व अंगावर रोमांच उठले. त्या यवनराजानें श्रीगुरूंची अनेक प्रकारें विनवणी केली. श्रीगुरूंना ओळखतां आलें नाहीं याबद्दल त्याला लाज वाटत होती. त्यानें आपला उद्धार करण्याबद्दल श्रीगुरूंना प्रार्थना केली. श्रीगुरूंनीं, ' तुझी वासना पूर्ण होईल ' असा आशीर्वाद त्याला दिला.

तेव्हां यवनराजानें श्रीगुरूंना आपल्या मांडीवरील ती रोगाची गांठ फार दुखत असल्याचें सांगितलें, कृपादृष्टि करावी व त्या व्यथेंतून आपली सुटका करावी असें विनविलें. श्रीगुरु हंसले व त्याला म्हणाले,

' कुठें आहे ती गांठ ? दाखव पाहूं ! '

राजा मांडीवरील ती रोगाची गांठ पाहूं लागला तर कुठेंच दिसेना ! श्रीगुरूंना विनंति करण्याआधींच, नुसत्या त्यांच्या दर्शनानेंच त्या यवनराजाची व्यथा दूर झाली होती. तेव्हां तो यवनराजा ( म्हणजे पूर्वजन्मांतला धोबी ) श्रीगुरूंना म्हणाला, " गुरुराया, तुझ्या कृपेनें मी अष्ट ऐश्वर्यें भोगलीं. मुलगे व नातू पाहिले. आतां अंत:करणाची पूर्ण तृप्ति झाली आहे.

फक्त माझें वैभव आपण पाहावयाला यावें, अशी माझी इच्छा आहे. ही माझी हौस पुरवा. मग मी तुमच्या चरणीं लीन होईन. ”

“ अरे यवनराजा, आम्ही तर संन्यासी. तुझ्या नगरांत तर अनेक महापातकें चालतात. गोहत्या करण्यांत तर तुझ्या अनुयायांना आनंद वाटतो. जीवहिंसा, मद्यपान, जुगार वगैरे अनेक पातकें तिथें घडतात.अशा ठिकाणीं आम्हीं कसें यावें ? ”

“ गुरुराया, मी तुमचा जुना दास आहें. आपल्याच कृपेनें हें राज्यपद मला मिळालें. माझे पुत्रपौत्र आपणहि एकदां पहावे. मग मी तुमच्या सेवेंतच उरलेलें आयुष्य घालविण्याचा निश्चय केला आहे. ” राजानें विशेष काकुळतीनें असें विनवितांच, श्रीगुरूंनीं मनांत विचार केला, “ कलियुगांत लोक दुर्जन होणार.त्याआधीं मला गुप्त झालें पाहिजे.” श्रीगुरु संगमावरून निघाले. त्यांनीं राजाचें म्हणणें कबूल केलें. त्या यवनराजानें ताबडतोब आपल्या पालखींत श्रीगुरूंना बसविलें. श्रीगुरूंच्या पादुका आपल्या हातांत घेऊन, तो पायीं चालूं लागला. त्या वेळीं श्रीगुरु त्याला म्हणाले,

“ अरे राजा, तूं पालखींत बस. लोक तुझी निंदा करीत आहेत. तूं राष्ट्राचा स्वामी आहेस. तुझा जन्म म्लेंच्छ जातींतला आणि तूं ब्राह्मणाची सेवा करतोस म्हणून सारेजण तुला हंसतील व दोष लावतील.”

“ स्वामी, ऐका. मी राजा आहें तो लोकांपुरता. तुमच्यापुढें मी फक्त एक भक्त. तुमचें दर्शन झालें. मी आज धन्य झालों.”

एवढ्यांत राजाचें सारें सैन्य तिथें आलें. राजानें आपलें सारें ऐश्वर्य श्रीगुरूंना दाखविलें. श्रीगुरूंनीं पुनः आग्रह करतांच, त्या राजानें साऱ्या शिष्यांना पालखींत बसवून नेण्याची व्यवस्था करविली व आपण स्वतः घोड्यावर आरूढ झाला. श्रीगुरूंनीं संतुष्ट होऊन त्याला सांगितलें, “ अरे राजा, आम्ही संन्यासी-तापसी लोक. नित्य अनुष्ठान करावें लागतें. तुमच्याबरोबर जावयाचें म्हणजे वेळेवर संध्या वगैरे करतां येत नाहीं. याला

उपाय म्हणजे, तुम्हीं आपल्या परिवारासह मागून यावें. आम्ही शिष्यवर्गा-सह त्वरेनें पापविनाशी तीर्थावर जातों. तेथें आपण यावें. " राजा त्यावर कांहीं विनंति करण्याआधींच श्रीगुरु सर्व शिष्यांसह अदृश्य झाले व मनोवेगानें वैदुरपुराजवळील पापविनाशीतीर्थावर पोंचले. त्यांचें अनुष्ठान तेथें नियमित चालू झालें. सायंदेव साकरे यांचा मुलगा नागनाथ श्रीगुरूंना भेटावयाला तिथें आला. त्यानें श्रीगुरूंची षोडशोपचारें पूजा केली. इतरहि भक्त जमा झाले. यवनराजाला सांगितल्याप्रमाणें तो पापविनाशी तीर्थावर भेटायला येईल म्हणून, भक्तवृंदांच्या मेळाव्यांतून श्रीगुरु एकटेच त्या तीर्थाच्या ठिकाणीं गेले. तिकडे तो यवनराजा, श्रीगुरु शिष्यांसह एकाएकीं अदृश्य झालेले पाहून फार दुःखी झाला होता. त्याला वाटलें, श्रीगुरूंनीं आपली उपेक्षा केली असावी. पापविनाशीतीर्थावर भेट देतील हें आश्वासन मनांत ठेवून तो राजा पापविनाशीतीर्थाकडे निघाला. त्याची व्याधि आतां पूर्ण बरी झाली होती. चव्वेचाळीस कोस अंतर राजानें एका दिवसांत तोडलें व तो पापविनाशीतीर्थावर पोंचला. तिथें श्रीगुरूंची भेट झाली तेव्हां त्याला फार आनंद वाटला. तो श्रीगुरूंच्या पायां पडला व एकदां तरी आपल्या घरीं त्यांनीं यावें असा आग्रह त्यानें धरला. त्यानें सर्व नगर सजविलें व श्रीगुरूंच्या स्वागताकरितां मोत्यांचें तोरण बांधलें. नगरांत तोरणें उभारलीं व मोठा समारंभ केला. श्रीगुरूंना पाल-खींत बसवून राजधानींत नेलें. मुसलमान प्रजेला तें मुळींच आवडलें नाहीं. ते आपपसांत म्हणूं लागले, " काय हा दुराचारी राजा ! ब्राह्मणांची पूजा करतो. आपला जातिधर्म यानें सोडला आहे." या उलट सारी हिंदु प्रजा राजाचें कौतुक करूं लागली. राजा विप्रसेवक झाल्यावर राज्य चांगलें चालणार व आपल्या धर्माप्रमाणें आचरण करण्याची संधि आपणाला मिळणार असा विश्वास ब्राह्मणांच्या मनांत निर्माण झाला. वैदुरनगरांतले सर्व हिंदु प्रजाजन श्रीगुरूंना भेटायला आले. श्रीगुरु म्हणजे प्रत्यक्ष देवच

असल्यावर मुसलमान राजाहि त्यांच्या भजनीं कां लागणार नाहीं, असा विचार सर्वांच्या मनांत आला. श्रीगुरु महाद्वाराजवळ पोंचतांच, त्यांच्या रस्त्यावर पायघड्या अंथरण्यांत आल्या. राजवाड्यांत पोंचल्यावर राजानें श्रीगुरूंना महासिंहासनावर बसविलें. राजमंदिरांतील स्त्रियांनीं श्रीगुरूंना आरती ओवाळली. त्या वेळीं फक्त चार शिष्य श्रीगुरूंबरोबर होते. राजानें अंत:पुरांतील स्त्रिया व मुलें यांना श्रीगुरूंच्या पायांवर घातलें. त्या यवन-राजानें साष्टांग नमस्कार घातला, तेव्हां श्रीगुरूंनीं विचारिलें, " राजा, तुझ्या मनासारखें झालें ना सारें ? आणखी कांहीं इच्छा उरली आहे का ?"

" गुरुराया,आतां इतकीं वर्षें राज्य केलें. आतां राज्य पुरे झालें. उरलेलें आयुष्य तुमच्या सेवेंत घालवावें, असा माझा हट्ट आहे. "

" आमची भेट आतां श्रीपर्वतावर होईल. जेव्हां तुझे मुलगे राज्य करूं लागतील तेव्हां तूं माझ्या भेटीला ये. "

श्रीगुरूंनीं त्या राजाला आत्मज्ञान होईल असा आशीर्वाद देऊन ते गौतमयात्रेला निघाले. गौतमीनदींत स्नान करून ते गाणगापुराला परत गेले. तेथील साऱ्या लोकांना श्रीगुरुचरणांचें दर्शन होऊन, त्यांना फार आनंद वाटला. श्रीगुरूंनीं सगळ्या शिष्यांना एकत्र बोलाविलें व म्हटलें, " आमची फार प्रसिद्धि झाली आहे. यापुढें गुप्त राहावें असें मनांत आहे. तेव्हां श्रीपर्वतावर जाऊन तेथेंच गुप्तरूपानें राहावें असा निर्धार केला आहे. गाणगापुरांतहि माझा मनोमन वास असेलच. स्वतः मुसलमान राजा आला म्हणून इतर मुसलमानहि आपलें मनोवांछित पुरें करून घेण्याकरितां येथें येतील. म्हणून आतां गुप्त व्हावें यांतच कल्याण आहे. "

" महाराज, आपल्या निश्चयापासून आपणाला कोण परावृत्त करणार ?"

नामधारकाला श्रीगुरु खरोखरच गुप्त झाले का श्रीपर्वतावर गेले हें समजून घेण्याची फार उत्कंठा वाटत होती. त्याची इच्छा जाणून,

सिद्ध म्हणे ऐक वत्सा । कथा असे अति विशेषा ।
ऐकतांचि सकल दोषा । नासूनि इच्छित पाविजे ॥ ५१·३ ॥

●●●

# श्रीगुरुंची समाधि

श्रीगुरु गाणगापूर सोडून जाणार या विचारानें गाणगापुरांतील सर्वांना फार चिंता लागून राहिली. त्यांना फार दुःख वाटलें. त्यांचे शिष्य म्हणूं लागले, " श्रीगुरुराया, आम्ही शिष्य, तूं गुरु. तुला आम्ही बालकाप्रमाणें आहोंत. तर मग लहान मुलाचा अव्हेर करून, त्याला सोडून आई कधीं दूर जाईल का ?"

" बाळांनो, तुमच्या भावना मी जाणूं शकतों; पण हें लक्षांत घ्या. मी तुम्हांला सोडून जात नसून यापुढें फक्त गुप्तरूपानें येथें राहावें असें ठरविलें आहे. नित्य अमरजासंगमांत स्नान व दुपारीं मठधामांत विश्राम हा माझा क्रम यापुढेंहि चालू राहील, पण गुप्तरूपानें.

जे जे असती माझ्या प्रेमीं । त्यांतें प्रत्यक्ष दिसे नयनीं ।
लौकिकमतें आविद्याधर्मीं । जातों श्रीशैल्ययात्रेसी ॥ ५१·१५ ॥

मी प्रातःस्नान कृष्णाकाठीं औदुंबराच्या पुण्यपावन झाडाखालीं करून, विंदुक्षेत्रावर अनुष्ठान करतों. त्यानंतर दुपारीं भीमातीरावर येतों. त्यापुढील कार्यक्रम म्हणजे अमरजासंगमावर स्नान व मठांतील पूजेचा स्वीकार. माझा हा सर्व दिनक्रम यापुढेंहि चालू राहील. जे जे लोक करतील भक्ति, त्यांना येईल आमची प्रचीति व मग होईल त्यांच्या मनोकामनांची पूर्ति. संगमावर

असलेला अश्वत्थवृक्ष म्हणजे साक्षात् कल्पवृक्ष आहे. त्याशिवाय विघ्नहर्ता विनायक व अष्टतीर्थांचें पूजनहि तुम्हीं भक्तांनीं करावें. त्रिकाल आरती करीत जा. भक्तांनो, जा आतां परत. आम्ही शैलपर्वतावर जातों."

श्रीगुरूंना कसाबसा निरोप देऊन भक्त मठांत परतले तर तिथेंहि त्यांना श्रीगुरु दिसले. लोक विस्मित झाले. 'श्रीगुरूंना जो म्हणतो नर, त्याला मिळतें त्वरित यमपुर' असें त्यांना वाटलें.

सगळे पाहूं लागले तर मठांत कोणी दिसेना. फक्त प्रेमळ भक्तांना ते दिसत होते. अशा रीतीनें गुप्त रूपानें ते मठांत राहूं लागले. भक्तांना असा दृष्टान्त दाखवून श्रीगुरु श्रीशैलपर्वतावर पोंचले. गंगातीरावर जाऊन (बरोबर आलेल्या पट्ट) शिष्यांना त्यांनीं आज्ञा केली, "मला गंगेच्या पलीकडे जाऊन मल्लिकार्जुनाच्या रूपांत एकरूप व्हावयाचें आहे. तरी एक पुलांचें आसन तयार करा. त्यावर बसून मी पैलतीराला जाईन."

शिष्यांनीं शेवंती, कल्हार, मालती, रातकमळें अशीं विविध पुलें आणलीं व कर्दळीच्या पानांचें वेष्टन करून अतिशय सुंदर असें आसन तयार केलें. तें आसन बोटीसारखें नदींत सोडून श्रीगुरु त्यावर बसले.सगळे लोक दुःख करूं लागले. त्यांच्या भावना अनिवार झाल्या. श्रीगुरूंनीं त्यांचें सान्त्वन केलें. लौकिकमतानें ते जात होते, तरी भक्तांच्या घरीं व गाणगापुराला त्यांचें सान्निध्य सदैव राहील असें ते पुनःपुनः सांगत होते.

त्या वेळीं गुरु कन्याराशींत होता. बहुधान्य नांवाचें संवत्सर होतें.सूर्य उत्तरायणांत होता. माघ महिना. शिशिरऋतूचे दिवस. कृष्णपक्षांतील प्रतिपदा. शुक्रवार होता तो दिवस. त्या दिवशीं श्रीगुरु जणुं काय पुष्पक विमानांत बसले व आपल्या आनंदधामाकडे निघाले. "आनंदधामांत पोंचल्यावर " खूण म्हणून प्रसादाचीं शेवंतीचीं व जाईचीं फुलें पाठवीन. तुम्हीं तो प्रसाद घ्या व अखंड पूजा करा. आम्हांला गायनाची फार

आवड आहे. जे लोक माझ्या गुणांचें गायन करतील त्यांच्यावर माझें फार प्रेम राहील. त्यांच्या घरीं आम्ही सदैव राहूं. त्यांना ना व्याधींपासून भय, ना दुःख किंवा दारिद्र्याची भीति. जे लोक माझें चरित्र वाचतील किंवा ऐकतील त्यांच्या घरीं निरंतर लक्ष्मी, सुख व शांति नांदेल." असें सांगून श्रीगुरु निजधामाला गेले.तेव्हां शिष्यांना फार चिंता वाटूं लागली. ते गंगेत श्रीगुरूंना पाहूं लागले. तोंच कांहीं नावाडी त्या तीरावर आले. त्यांनीं श्रीगुरूंना पाहिल्याचें सांगितलें.

होडीवाले पैलतीरावर असतांना, संन्यासवेषधारी. हातांत दंड घेतलेले नृसिंहसरस्वती यतीश्वर त्यांना दिसल्याचें त्यांनीं सांगितलें. त्या मुनींनीं शिष्यांना निरोपहि सांगितला होता. होडीवाले सांगूं लागले, "आम्ही कर्दळीवनांत जात असलों,तरी आमचें निवासस्थान गाणगापूरच राहील" असा श्रीगुरूंचा निरोप आहे. नावाडी पुढें सांगू लागले," श्रीगुरुनाथांच्या पायांत सोन्याच्या पादुका होत्या. आपपल्या घरीं जाऊन सुखानें नांदा असा निरोप देऊन, प्रसादाचीं फुलें वाहात आलीं कीं तीं काढून माझ्या शिष्यांना द्या ' अशी आज्ञाहि त्यांनीं आम्हांला केली आहे. सर्व शिष्य व नावाडी गंगातीरावर होते. प्रसादाचीं फुलें वाहात येतांना दिसतात का तें ते पहात होते. इतक्यांत प्रसादाचीं चार फुलें वाहात आलीं. तीं श्रीगुरूंच्या मुख्य शिष्यांनीं भक्तिपूर्वक पाण्यांतून बाहेर काढलीं. श्रीगुरूंचे हे प्रमुख शिष्य कोण होते, असा प्रश्न नामधारकानें विचारला. तेव्हां सिद्धमुनि म्हणाले, "तसें पाहतां श्रीगुरूंचे पुष्कळ शिष्य होते. त्यांतल्या कांहींना संन्यासदीक्षा देऊन श्रीगुरूंनीं तीर्थयात्रेला पाठविलें होतें. कांहीं गाणगापुरांतच राहिले होते. कृष्णसरस्वती, बालसरस्वती, उपेंद्रमाधव-सरस्वती या सर्वांना श्रीगुरूंनीं संगमावरूनच निरोप दिला होता. कांहीं दुसरे शिष्य गृहस्थधर्माचें पालन करीत गांवोगांव नांदत होते. सायंदेव साकरे, नंदीनामा व नरहरि हे दोघे कवीश्वर,असे तिघेजण व नामधारका,

मला सांगायला आनंद वाटतो कीं, मीहि शेवटपर्यंत श्रीगुरूंबरोबर होतों. आम्ही चौघांनीं गुरुप्रसादाचीं तीं फुलें घेतलीं व परत आलों. तीं फुलें माझा जीव कीं प्राण आहेत.(श्रीगुरूंच्या पूजेंतहि शेवंती व जाईच्या फुलांना त्यामुळें अग्रक्रम मिळाला तर नवल नाहीं. ) नामधारका, श्रीगुरूंचें चरित्र अपार आहे. त्यांतलें थोडेंफार तुला सांगितलें. हें श्रीगुरुचरित्र वाचणें,त्याचें कीर्तन करणें ही अतिपवित्र गोष्ट. ती केली असतां ऐहिक व पारलौकिक अशा उभयविध सुखांची प्राप्ति होऊन धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांचाहि लाभ होतो. हें पुस्तक लिहून काढील त्याला सर्व सिद्धि प्राप्त होतील." नामधारकाला हें सर्व ऐकून संतोष वाटला. प्रत्यक्ष सिद्धमुनींच्या तोंडून श्रीगुरुचरित्र ऐकण्याचा मान त्याला मिळाला होता. त्याला सगळीं ऐश्वर्यें मिळालीं. त्याच्या साऱ्या इच्छा पूर्ण झाल्या. श्रीगुरुचरित्राची पोथी शुद्ध मनानें पूजा करून नीट जतन करून ठेवावी असें सिद्धमुनींनीं नामधारकाला सांगितलें. श्रीगुरु शैल्ययात्रेला निघाल्यावर पुढें काय झालें, तें सिद्धमुनींनीं नामधारकाला सांगितलें नव्हतें. त्याबद्दल त्यानें प्रश्न विचारतांच सिद्धमुनि सांगूं लागले.

• • •

## श्रीगुरुप्रसादाचा महिमा

नामधारका, श्रीगुरु गाणगापुराचा निरोप घेऊन निघाले तेव्हांची घटना सांगून अखेर ते निजधामाला पोंचल्यावर प्रसादाची खूण म्हणून फुलें वाहात आल्याचें मीं तुला आतांच सांगितलें. तेंच वर्णन पुनः एकदां सविस्तरपणें

तुला ऐकावयाची इच्छा आहे असें दिसतें. ठीक आहे. या वर्णनानें पुनः प्रत्येकाला आनंद वाटेल. श्रीगुरु श्रीपर्वतयात्रेला जाणार ही बातमी कळतांच गाणगापुरांतले सगळे लोक मठाकडे धांवत आले होते. त्यांनीं श्रीगुरूंना विनंती केली होती,

"स्वामी, आपण का जातां? आम्हांला तर असा भास होतो आहे कीं, आपण आपला अवतार समाप्त करावयाला चाललां आहांत. आपण निज अव्यक्त असूनहि, लोकांना सुव्यक्त झालांत. तुमच्या चरणांचें दर्शन म्हणजे पापाचें दहन. आपण गेल्यावर त्यापुढें लोक काय करतील? आम्ही यापुढें काय करावें? आमची काय गति? स्वामींची चरणनौका होती, तोंपर्यंत भवसागरांत बुडालों नव्हतों. तुमच्या आधारानें इतके दिवस जगलों. आपण गाणगापुराला वैकुंठ-पुराची सर आणली होती. आपण गेल्यावर रात्रीं दिव्याशिवाय घर दिसावें तसें हें नगर सुनें वाटेल. पाण्याशिवाय कमळाची जी अवस्था होईल तीच तुमच्या विरहांत आम्हां सर्वांची. आईबाप, सगळे नातेवाईक, इष्टमित्र, कुळदैवत सारें सारें श्रीगुरुनाथा, तुम्हीच होतांत. आपण मुलाप्रमाणें आम्हां सर्वांवर माया केलीत. आपल्या बाळांचा अव्हेर करून नका हो जाऊं येथून दूर!" लोकांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या सरींवर सरी ओघळत होत्या. सगळे लोक तळमळत होते. तें पाहून श्रीगुरु म्हणाले, "भक्तांनो, तुम्ही कांहीं खंत मानूं नका. आम्हीं याच गाणगापुरांत सदैव राहूं. फरक एवढाच कीं, आतां दृश्य स्वरूपांत आहोंत, ते यापुढें अदृश्य किंवा गुप्तरूपानें राहूं. अमरजासंगमावर स्नान करण्याचा माझा नियम यापुढेंहि चालूच राहील. आमची कीर्ति आतां राजदरबारापर्यंत पोंचली आहे. त्यामुळें राजाच्या परिवारांतले इतर यवनलोक कृपाप्रसाद मागण्या-करितां किंवा संदेहानें या गाणगापुराला सारखे येऊं लागतील. त्यामुळें प्रजेला निष्कारण उपद्रव होईल. म्हणून आम्हीच आतां गुप्त होतों. ज्याचा

भक्तिभाव दृढ असेल त्याला साक्षात् दर्शन देऊं. लौकिक अर्थानें आम्ही शैल्यपर्वतावर जात असलों तरी मनानें येथेंच राहूं. मठांत माझ्या पादुका ठेविल्या आहेत.त्या पादुकांची पूजा करा.तुमचे सारे मनोरथ सफल होतील."

# श्रीगुरुचरित्राची अवतरणिका

[ यापुढील ५२ व्या अध्यायांतील ओव्यांत ५१ व्या अध्यायांतील श्रीगुरूंच्या निजानंदगमनाच्या वेळचें वर्णन जसेंच्या तसें पुनः सांगितलें आहे. ]

बावन्न अध्यायांत वर्णन केलेलें हें गुरुचरित्र ऐकून नामधारकाचें मन ब्रह्मानंदांत निमग्न झालें होतें. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले होते. चित्तवृत्ति तटस्थ झाल्या होत्या. समाधिसुखाची अनुभूति त्याला आली होती. त्याचें शरीर जरासुद्धां हालत नव्हतें. अष्ट सात्त्विक भावांचें दर्शन त्याच्या शरिराला होत होतें.सिद्धमुनींनीं नामधारकाची ती स्थिति पाहिली; त्यांना फार सुख वाटलें,पण नामधारकाचे हातून यापुढें लोकोपकार व्हावा, त्यानें केवळ अमूर्त आनंदांत स्वस्थ राहूं नये म्हणून त्याला सावध करावा असें त्या सिद्धमुनींनीं ठरविलें व त्याला प्रेमभरानें आपल्या हातानें कुरवाळून आपल्या पोटाशीं धरलें. ते म्हणाले, " बाळा नामधारका, देहभांनावर आलास का ? तूं समाधिस्थ राहिलास तर श्रीगुरुचरित्राचें ज्ञान फक्त तुझ्याच मनांत राहील. त्याचा लोकांना उपयोग कसा होईल ? म्हणून अंतःकरणांत श्रीगुरूविषयीं दृढ भाव ठेवून, बाह्यतः जगांत रहावें.

तूं प्रश्न विचारलेस म्हणून आम्हांलाहि अमृतवाणी आठवली. कायिक, वाचिक व मानसिक व्यथेला दूर करणारी अशी अनुपम श्रीगुरूंची कथा तुझ्यामुळें मला आठवली. तूंहि ती एकाग्र चित्तानें ऐकलीस. नामधारका, प्रिय शिष्या, आतां समाधिभावांतून देहभानावर ये. ”

सिद्धमुनींनीं परोपरीनें असें विनविल्यावर नामधारकानें आपले डोळे उघडले; व हात जोडून तो सिद्धमुनींसमोर उभा राहिला. त्याच्या तोंडांतून तेव्हां शब्द साकार झाले, “ गुरुराया, तूंच या भवसागरांतून तरून जाण्याकरतां कृपेचें जहाज आहेस. आपण सांगितलेलें श्रीगुरुचरित्र अमृताहूनहि प्रभावी आहे. अमृतानें अमरत्व मिळतें; पण या श्रीगुरुचरित्रामृतानें परमतृप्ति आज मला लाभली. ही कथा अजून पुनःपुनः ऐकावी असें वाटतें. पुष्कळ औषधींचें सार काढून, तज्ज्ञ वैद्य ज्याप्रमाणें प्रभावी रसायन तयार करतात तसें या श्रीगुरुचरित्राचें सार आपण मला सांगावें. ”

“ नामधारका, तुझी इच्छा पूर्ण करण्यांत मला आनंदच वाटेल. ऐक तर या श्रीगुरुचरित्राचा सारांश. ” त्यानंतर सिद्धमुनींनीं श्रीगुरूंच्या चरित्राच्या ५२ अध्यायांतील सार नामधारकाला सांगून, श्रीगुरुचरित्राचें माहात्म्य त्याला पुनः एकदां संक्षेपानें सांगितलें. जसा भावार्थ तशी कार्यसिद्धि साधकाला होते. श्रीगुरुचरित्राचें पठण करणाऱ्या दत्तोपासकाला कलियुगांतहि श्रीगुरूंचा साक्षात्कार होणें शक्य आहे.

श्रीगुरुचरित्राची प्रदीर्घ अवतरणिका देण्याचे दोन मुख्य उद्देश सांगितले आहेत. श्रीगुरुचरित्र संपूर्ण वाचलेल्यांना यामुळें संक्षेपानें सर्व घटना सूत्ररूपानें लक्षांत याव्यात व ज्यांनीं वाचलें नसेल त्यांना तें मुळांतच सर्व वाचण्याची इच्छा उत्पन्न व्हावी.

नामधारकानें श्रीगुरुचरित्र या प्रासादिक ग्रंथाचा सप्ताह व पारायण कसें करावें याबद्दल प्रश्न विचारला. तेव्हां सिद्धमुनि म्हणाले,

" श्रीगुरुचरित्र, अंतःकरण पवित्र असतांना सदासर्वकाळ वाचावें. त्यामुळें इहपरत्र सुख मिळेल. दुसरा प्रकार म्हणजे शास्त्रनियमाप्रमाणें शुचिर्भूत होऊन विधिपूर्वक श्रीगुरुचरित्र सांत दिवसांत संपूर्ण वाचणें, हा होय. चांगला दिवस पाहून व स्नानसंध्या करून, श्रीगुरुचरित्र जिथें वाचावयाचें ती जागा रांगोळ्या वगैरे काढून सुशोभित करावी. वाचनाच्या वेळच्या देशकालादि गोष्टींचा उच्चार करून, पुस्तकरूपी श्रीगुरूंचें पूजन करावें. ब्राह्मणाचेंहि पूजन करावें. पहिल्या दिवसापासून समाप्तीपर्यंत एकाच ठिकाणीं, एकाच आसनावर वसावें. निरर्थक गोष्टींत मौन धरावें. कामक्रोधलोभावर संयम ठेवावा. गुरुचरित्र वाचण्याच्या जागीं मंगलदीप लावावे, देव, ब्राह्मण व वडीलधाऱ्या माणसांना वंदन करून, ईशान्य दिशेकडे ( पूर्वोत्तर ) तोंड करून बसावें व वाचनाला प्रारंभ करावा. "

सप्ताह वाचतांना दररोज किती अध्याय वाचावेत याचा क्रम त्यानंतर सिद्धमुनींना नामधारकाला सांगितला. ते पुढें म्हणाले, 'सप्ताह—वाचन करतांना, दररोजचा पाठ झाला कीं, उत्तरांगपूजन करून, श्रीगुरूंना नमस्कार घालून, कांहीं अल्पोपाहार करावा. रात्रीं उघड्या जमिनीवर झोपावें. सात दिवसांनीं वाचन पूर्ण झालें म्हणजे, ब्राह्मणसुवासिनी यांना भोजनाला आमंत्रण द्यावें व यथाशक्ति दक्षिणा देऊन त्यांना संतुष्ट करावें. असा सप्ताह वाचल्यानें श्रीगुरुदर्शन मनोमन होऊन, भूतप्रेतादि बाधा दूर होईल व सौख्य लाभेल."

श्रीगुरुचरित्र सांगणारे सिद्धमुनि हे कोणी कृपाळू ढग, त्यांनीं नामधारकरूपी चातकाची, श्रीगुरुचरित्ररूपी पावसाचें पाणी पिण्याची इच्छा तृप्त केली. त्या ढगानें यथेच्छ वृष्टि केली. त्यामुळें भक्तांबरोबर इतरांचाहि फायदा झाला आहे. सर्वांनाच अमृताचा लाभ झाला आहे. सिद्धमुनींसारख्या गुरूंना व नामधारकासारख्या एकनिष्ठ शिष्याला माझें सदैव वंदन असो.

श्रीगुरुरूपा नाराणय गुरुशिष्यरूपानें क्रीडा करतो व आपणच आपल्या खुणा दाखवितो. त्या अध्यात्मिक खुणा ज्याच्या त्यानें समजून घ्यावयाच्या आहेत असें सांगून श्रीसरस्वती गंगाधर यांनी या महान् ग्रंथाची अवतरणिका संपविली आहे. एकूण सात हजार तीनशें ओव्यांच्या या श्रीगुरुचरित्राचा हा गद्यअवतार, श्रीदत्तगुरु, श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती, लेखक श्रीसरस्वती गंगाधर, याना भक्तिभावपूर्वक वंदन करून व त्याचें स्मरण करून येथें पूर्ण करतों. श्रीगुरु नृसिंहसरस्वतींचे चार परम भक्त-सायंदेव, नंदीनामा, नरहरि व सिद्धमुनि-यांच्या स्मृतींनाहि सादर वंदन करतों व त्यांच्यासारखी एकनिष्ठ श्रद्धा व गुरुभक्ति वाचकांच्या व माझ्या मनांत श्रीगुरुदत्तकृपेनें निर्माण होवो असें आग्रहाचें मागणें श्रीगुरु-चरणीं मागून, हा प्रामाणिक प्रयत्न मला अध्यात्माची गोडी लावणाऱ्या व्रतबंधांतील गुरु, माझे वडील कै. गणेश गोपाळ देसाई गाडगीळ यांच्या पुण्यपावन स्मृतींना समर्पण करतों.]

॥ ॐ तत् सत् ॥

● ● ●

# भावार्थ श्रीगुरुचरित्र

## भाग २

## श्रीगुरुचरित्र व श्रीदत्तसंप्रदाय

### [ एक संक्षिप्त विवेचन ]

विषयसूचि:–[ १ ] श्रीगुरुचरित्राच्या लेखकांचा परिचय [ २ ] विविध पोथ्यांतील फरक [ ३ ] सप्ताहवाचनाची पद्धति [ ४ ] श्रीगुरुचरित्रवाचनाची फलश्रुति [ ५ ] श्रीगुरुचरित्रांतील गुरुगीतेचा भावार्थ [ ६ ] श्रीगुरुचरित्रांतील कानडी पदांचा मराठी शब्दार्थ [ ७ ] श्रीगुरुचरित्रांतील संकीर्ण संस्कृत श्लोक व स्तोत्रें [ ८ ] श्रीरंगावधूतस्वामीविरचित दत्तबावनी [ ९ ] बावन्न श्लोकी श्रीगुरुचरित्र [ १० ] श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचित तीन दत्तस्तोत्रें व करुणात्रिपदी [ ११ ] श्रीनारदविरचित दत्तस्तोत्र [ १२ ] श्रीशंकराचार्यांचें गुरु-अष्टक [ १३ ] श्रीदत्तस्तुति [ १४ ] श्रीदत्तात्रेय उपनिषद् [ १५ ] श्रीगुरुचरित्राचें संक्षिप्त रसग्रहण [ १६ ] श्रीदत्तसंप्रदायाचा परिचय.

## ( १ ) श्रीगुरुचरित्राचे लेखक

श्रीगुरुचरित्राच्या पहिल्या अध्यायांत, लेखक श्रीसरस्वती यांनीं स्वतःचा परिचय करून दिला आहे. श्रीगंगाधरपंत साखरे हे त्यांचे वडील. त्यांच्या आईचें नांव होतें चंपा. आपस्तंब शाखेच्या कौंडिण्य गोत्रांत जन्मलेल्या श्रीसरस्वती साखरे यांनीं श्रीगुरुचरित्राची रचना करून, आपल्या कुळाची उज्ज्वल परंपरा पुढें चालू ठेविली. त्यांनीं आपल्या पूर्वजांना वंदन करतांना आपला वंशक्रम दिला आहे. त्याप्रमाणें श्रीगुरुचरित्रांत वर्णन केलेले श्रीगुरूंचे पट्टशिष्य सायंदेव हे त्यांचे ज्ञात मूळपुरुष. सायंदेवानंतर नागनाथ, देवराव

गंगाधर असा वंशक्रम. सरस्वती असें त्या काळीं मुलाचेंहि नांव ठेवीत असत. श्रीगुरुचरित्राचे लेखक श्रीसरस्वती हे सायंदेवापासूनचे पांचवे पुरुष. सिद्धमुनींपासून समग्र गुरुचरित्र ऐकणारे नामधारक म्हणजेच श्रीसरस्वती साखरे होत, असें श्रीगुरुचरित्राधारानें सांगतां येतें. श्री. सरस्वती गंगाधर साखरे ह्यांची मातृभाषा कानडी होती. पहिल्या अध्यायांत श्रोत्यांना ते विनंति करतात—" न कळे ग्रंथप्रकार । नेणें शास्त्राचा विचार । भाषा न ये महाराष्ट्र । म्हणोनि विनवीं तुम्हांसी ॥ १·३५ ॥ सिद्ध-मुनींनीं नामकरणीला दाखविलेलें श्रीगुरुचरित्राचें पुस्तक मूळ कानडी भाषेंत किंवा दुसऱ्या कोणत्या भाषेंत असलें तरी श्रीसरस्वती गंगाधर यांनीं हें मराठी श्रीगुरुचरित्र लिहिलें तें स्वतःच्या कल्पनेनें नसून श्रीगुरुदेवाच्या आज्ञेनें लिहिलें आहे, असा श्रीगुरुचरित्रांतच स्पष्ट उल्लेख आहे. श्रीसर-स्वती गंगाधर यांनीं पहिल्या अध्यायांत श्रोत्यांची जी विनवणी केली आहे ती त्यांच्या विनयशीलतेची व सुंदर भाषाशैलीची जाणीव करून देते. ते म्हणतात, " श्रोते व पंडित वाचकांनो, मी एक सामान्य मनुष्य. माझ्या बोलण्याकडे आपण दुर्लक्ष कराल; पण तसें करूं नका. माशीच्या तोंडांतून गोळा झालेल्या मधाचें महत्त्व व पावित्र्य आपण मान्य करतां ना ? साध्या शिंपल्यांत सांपडतें म्हणून मोत्याची किंमत कमी होते का ? उंस बाहेरून वेडावांकडा व काळा असला तरी तो पिळल्यावर निघणारा रस अमृता-सारखा गोडच असतो ना ? तसेंच मी सामान्य मनुष्य असलों, माझे शब्द प्रभावी नसले, तरी मी वर्णन करीत असलेलें हें श्रीगुरूंचें चरित्र उज्ज्वल आहे. माझ्या दोषांकडे डोळेझांक करून, हें अमृत प्राशन करा तर मग. "

## ( २ ) विविध पोथ्यांतील फरक

' श्रीगुरूंचा अवतार शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांत झाला अशी प्रचलित समजूत आहे. श्रीगुरुशिष्य सायंदेव ह्यांचा नातू देवराव ह्याच्या

नातवानें हें मराठी श्रीगुरुचरित्र शके १४८० च्या सुमाराला लिहिलें असावें असें कांहींचें मत आहे, तर श्रीगुरुचरित्राचा अवतार शके १५०० च्या सुमारास झाला असावा असें दुसरे टीकाकार मानतात. हा फरक लक्षांत घेतला तरी सुमारें पावणेचारशें वर्षांपूर्वींपासून ही प्रचलित श्रीगुरुचरित्राची पोथी दत्तभक्तांच्या वाचनांत आहे. यांतील अध्यायांच्या संख्येबद्दल बराच मतभेद असून निरनिराळ्या पोथ्यांच्या आधारानें पाहिलें तर ४९, ५०, ५२ व ५३ अशी अध्यायसंख्या आढळते. अध्यायां-संबंधानें जसा मतभेद आहे, तसाच फरक श्रीगुरुचरित्रांतील ओव्यांच्या पाठांविषयींहि आहे. श्री. कामत यांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें, श्रीक्षेत्र गाणगापुर, कडगंची, औदुंबर, वाडी, कुरवपुर वगैरे ठिकाणीं जुन्या हस्त-लिखित पोथ्या आहेत. गाणगापूरच्या मूळ प्रतीवरून भक्तजन समग्र गुरुचरित्र लिहून घेत असत.

श्रीगुरुचरित्राच्या छापील प्रतींचा क्रम श्री. कामत यांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे–

(१) वि. बा. चांपेकर यांची शिळाप्रेसची प्रत, शके १७९१ (इ. स. १८६९).

(२) स. बा. खांडेकर यांची प्रत, शके १७९२ (इ. स. १८७०).

(३) नॅशनल छापखाना, शके १७९४ (इ. स. १८७२).

(४) धारवाडवृत्त छापखाना, शके १७९५ (इ. स. १८७३)

(५) निर्णयसागर छापखाना, शके १७९६ (इ. स. १८७४).

(६) ईश्वरतत्त्वप्रकाश छापखाना, शके १८०१ (इ. स. १८७९)

(७) ग्रंथप्रसाद छापखाना, शके १८०३ (इ. स. १८८१).

(८) आर्यसेवक छापखाना, शके १८११ (इ. स. १८८९).

याशिवाय सुवर्ण प्रिंटिंग छापखाना, अंबप्रसाद छापखाना, पार्वती-वरदा, श्रीरामतत्त्वप्रकाश, आर्यभूषण, चित्रशाळा वगैरे छापखान्यांत छापलेल्या पोथ्या प्रसिद्ध आहेत. श्री. कामत यांनीं संशोधित केलेली श्रीगुरुचरित्राची प्रत प्रथम शके १८६२ [ इ. स. १९४० ] सालीं प्रसिद्ध झाली. त्यानंतर कर्नाटक मुद्रणालयानें शके १८८१ [ इ. स. १९५९ ] मध्यें त्याची पंचमावृत्ति काढली. त्याच सालीं म्हणजे सप्टेंबर १९५९ मध्यें, चित्रलेखा एजन्सी,पुणें २ यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाच्या बांधणीच्या श्रीगुरुचरित्राच्या पोथीचा हें भावार्थ श्रीगुरुचरित्र लिहितांना मी उपयोग केला आहे. या प्रति सध्या दुकानांत उपलब्ध तरी आहेत म्हणून त्यांतील ओव्यांची संख्या उद्धृत केली आहे.

●●●

## ( ३ ) श्रीगुरुचरित्राच्या सप्ताहवाचनाची पद्धति

श्रीगुरुचरित्र सात दिवसांत वाचावयाचें असलें तर दर दिवशीं वाचावयाच्या संपूर्ण अध्यायांचा, ५३ अध्याय असलेल्या पोथींतील क्रम असा आहे. ९।२१।२९।३५।३८।४३।५३. श्री. कामत यांच्या पोथी-प्रमाणें, ५२ अध्याय असलेल्या पोथ्यांचा सप्ताहाचा क्रम.

७।१८।२८।३४।३७।४२।५१ असा आहे. श्रीगुरुचरित्र तीन दिवसांत वाचावयाचें असलें तर पहिल्या दिवशीं २४ पूर्ण, दुसऱ्या दिवशीं ३७ पूर्ण व तिसऱ्या दिवशीं ५३ अध्याय पूर्ण असा क्रम ठेवावा. श्रीगुरुचरित्राचीं पारायणें करणें म्हणजे प्रारंभापासून दररोज पांच, दहा, वीस, पंचवीस अशा जेवढ्या जमतील तेवढ्या ओंव्या दररोज वाचणें. अशा रीतीनें पोथी वाचून पूर्ण झाल्यावर पुनः पहिल्यापासून वाचणें.

एका दिवसांतहि समग्र श्रीगुरुचरित्र ( ओव्या सुमारें सात हजार ) वाचणारे साधक आहेत. त्यांना सुमारें १२ ते १८ तास तें समग्र वाचावयाला लागतात.

पोथी वाचतांना गुरुवारीं मृतसंजीवनाचे अध्याय वाचूं नयेत असा एक संकेत श्री. सत्येंद्रनाथस्वामी ( मुंबई ) यांनीं सांगितला.

सर्वसाधारणपणें श्रीगुरुचरित्रसप्ताहवाचनाचा प्रारंभ शनिवारीं करून शुक्रवारीं समाप्ति करावी. कारण शुक्रवार हा श्रीपादश्रीवल्लभ यांच्या निजानंदगमनाचा दिवस.

नाहीं तर भक्तिभाव निर्माण झाल्यावर केव्हांहि श्रीगुरुचरित्र वाचावें. त्याला मुहूर्त, वार वगैरे बघत बसण्याची जरूर नाहीं. पोथी वाचतांना सोवळें जरूर पाळावें. अर्थात्

अन्तःकरण असतां पवित्र ॥ सदाकाळ वाचावें श्रीगुरुचरित्र ।

अशी मुभा दिली असली तरी सोंवळ्या-ओंवळ्याचें अवडंबर करणें एक वेळ सोपें जाईल; पण ' अन्तःकरण असतां पवित्र ' ही अट पालन करणें वस्तुतः कठीण आहे, हें सूक्ष्म विचारांतीं लक्षांत ध्यावें.

विशिष्ट संकल्पांच्या पूर्तीसाठीं श्रीगुरुचरित्राच्या सप्ताहवाचनाचें अनुष्ठान निश्चित फलदायी ठरतें, असे अनेकांचे अनुभव आहेत.

सप्ताहानुष्ठांत सात या संख्येलाहि विशेष महत्त्व आहे. सप्ताहासाठीं एकान्ताचें स्थळ निवडावें. अरण्यांत, गिरिगुहेंत किंवा देवालयांत सप्ताह करावा. वाचनासाठीं श्रीदत्तमूर्तीसमोर, उत्तरेस किंवा पूर्वेस तोंड करून बसावें. दत्तमूर्ति आपल्या डाव्या किंवा उजव्या बाजूला येईल असें बसावें. दत्तमूर्ति नसेल तर पाटावर तांदूळ ठेवून त्यांवर सुपारी ठेवावी व त्या सुपारीच्या ठिकाणीं श्रीदत्तांचें आवाहन करावें. सप्ताहवाचनापूर्वी विधिपूर्वक संकल्प सोडावा. त्या सात दिवसांत ब्रह्मचर्य पाळावें. संध्याकाळीं उपवास करावा. शक्यतों सोंवळ्यानें वाचावें. रात्रीं देवाजवळच चटईवर किंवा घावळीवर झोंपावें. डाव्या कुशीवर झोंपलें असतां, संकल्पपूर्तीच्या दृष्टीनें संदेश ऐकूं येतात, असा अनुष्ठान करणाऱ्यांचा अनुभव आहे. सप्ताह पूर्ण झाल्यावर सातव्या दिवशीं, सुपारींतून श्रीदत्तांचें विसर्जन

करावें आणि नैवेद्य दाखवून समाराधना करावी. वाचनास बसल्यावर मध्येंच आसन सोडून उठूं नये. त्या वेळीं दुसऱ्याशीं बोलूं नये. सप्ताह-काळांत हविष्यान्न घ्यावें. प्रारंभ शनिवारीं करून शुक्रवारीं समाप्ति करावी. सप्ताहाचे सात दिवस नित्य प्रातःकाळीं काकडआरती, संध्याकाळीं प्रदोषारती व रात्रीं शेजारती करावी. दुपारच्या महापूजेंत पोथीची पूजा करतांना शक्य तर शमीपत्रें व महानैवेद्यांत घेवड्याची भाजी असावी वगैरे नियम निरनिराळ्या पोथ्यांतून दिलेले आढळतात. वाचन स्पष्ट करावें. केवळ उरकण्याच्या दृष्टीनें हवें तसें वाचूं नये. अक्षरांतून व्यक्त होणाऱ्या अर्थाकडे लक्ष द्यावें.

## ( ४ ) श्रीगुरुचरित्रवाचनाची फलश्रुति

श्रीगुरुचरित्रवाचनानें ऐहिक व पारलौकिक अशीं सर्व सुखें प्राप्त होतात. श्री. कामत यांच्या पोथींत, श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या मतें श्रीगुरुचरित्राच्या विशिष्ट अध्यायांची अठ्ठावीस, छप्पन्न किंवा एकशेंआठ परायणें केलीं असतां विशिष्ट मनोकामना पूर्ण होतील असा उल्लेख आहे. ती फलश्रुति अशी आहे—

[ १ ] आरोग्यप्राप्तीकरितां—१३ वा अध्याय.
[ २ ] पारमार्थिक गुरुकृपा— २ रा अध्याय.
[ ३ ] सद्गुरुप्राप्तीची तळमळ— १ ला अध्याय.
[ ४ ] पुत्रप्राप्ति – १९ वा अध्याय.
[ ५ ] संततीच्या आरोग्याची काळजी – २० व २१ अध्याय.
[ ६ ] आकस्मिक अरिष्टनिरसन —१४ वा अध्याय.
[ ७ ] द्रव्यसंकटपरिहार —१८ वा अध्याय.

'दत्त दत्त' किंवा 'श्रीदत्त जयदत्त' या नाममंत्राचा अखंड जप करावा.

[ वर उल्लेखिलेल्या अध्यायांच्या या पुस्तकांतील गोष्टींचा क्रम अनुक्रमणिकेंत पाहावा.]

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांनीं केलेल्या श्रीगुरुचरित्राच्या सुंदर संस्कृत अनुवादांतील कांहीं विशिष्ट श्लोक, त्यांच्याच पत्रांतील संदर्भ देऊन श्री. कामत यांनीं, विशिष्ट मनोकामनेच्या सफलतेकरितां जपावे असें म्हटलें आहे.तें साधकांच्या सोयीकरितां येथें देत आहें.

[ १ ] संकटपरिहाराकरितां—

अनसूयात्रिसंभूतो दत्तात्रेयो दिगंबरः। स्मर्तृगामी स्वभक्तांना-मुद्धर्ता भवसंकटात् ॥

[ २ ] सौभाग्यवर्धन—

जीवयामास भर्तारं मृतं सत्या हि मृत्युहा ।
मृत्युंजयः स योगीन्द्रः सौभाग्यं मे प्रयच्छतु ॥ २०·२२ ॥

[ ३ ] संततिवर्धन—

दूरीकृत्य पिशाच्यार्तिं जीवयित्वा मृतं सुतम् ।
योऽभूदभीष्टदः सिद्धिः स नः संततिवृद्धिकृत् ॥ ( २०-२१ )

[ ४ ] संपत्तिवर्धक—

दरिद्रविप्रगेहे यः शाकं भुक्त्वोत्तमश्रियम् ।
ददौ श्रीदत्तदेवः सः दारिद्र्याच्छ्रीप्रदोऽवतु ॥ ( अ. १८ )

## (५) गुरुगीता

त्रेपन्न अध्याय असलेल्या पोथ्यांत, गुरुगीता हा १७६ संस्कृत श्लोक असलेला गुरुगीतेचा अध्याय दिलेला नाहीं. श्री. कामत यांनीं आपल्या पोथींत, एकुणपन्नासाव्या अध्यायांत ( पृ. ६१४ ते ६३० ), गुरुगीतेचा अंतर्भाव केला आहे. कै. गजाननमहाराज बोरकर यांचे सुपुत्र श्री. रामकृष्णपंत बोरकर (ज्योतिषी) यांनीं आपल्याजवळील कामतांची दुर्मिळ पोथी मला सप्रेम भेट देऊन उपकृत केलें. त्यामुळें मला हें विवेचन करण्यास फार मोठी मदत झाली. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

गुरुगीता श्रीस्कंदपुराणाच्या उत्तरखण्डांत आहे. श्रीशिवशंकर व पार्वती यांचें संवादात्मक असें तिचें स्वरूप आहे.

गुरुभक्ति ही सर्व सुखांची जननी आहे, असें वसिष्ठ–शुकाचार्य आदि शास्त्रांचें मर्म जाणणारेहि सांगतात. भवार्णवांतून व सर्व व्याधींतून मुक्त करणारा एक श्रीनाथवैद्यच आहे, अशी प्रस्तावना करून, गुरुगीतेचा प्रारंभ पार्वतीच्या प्रश्नानें होतो.

'हा ईश्वरपार्वतींचा संवाद गुरूनेंच शिष्याला सांगितला' असा उल्लेख आहे.

गुरुगीता हा एक तंत्रशास्त्रांतीलहि भाग असल्यामुळें प्रारंभीं बीज, शक्ति, छंद, ऋषि, देवता व करन्यास यांचा निर्देश आहे. श्रीगुरु हे शिवस्वरूप आहेत. त्यांच्या चरणकमलांचें ध्यान करावें. नंतर त्यांची मानसपूजेच्या प्रकारानें षोडशोपचारें पूजा करावी. जपाचें उद्दिष्ट सांगावें व गुरुगायत्री व हंसगायत्री म्हणावी.

'गुरुदेवाय विद्महे परमगुरुभ्यो धीमही ।
तन्नो गुरुः प्रचोदयात् ॥
हंसहंसाय विद्महे परमहंसाय धीमहि ।
तन्नो हंसः प्रचोदयात् ॥

या मंत्राचें पुरश्चरण करावयाचें म्हणजे एक लाख बारा हजार वेळा त्यांचा जप करावयाचा, असा प्रारंभ करून पार्वतीचा प्रश्न दोन श्लोकांत वर्णन केला आहे. "हे देवदेवेशा, जगद्गुरु सदाशिवा, मला गुरुदीक्षा द्या. जीवाला ब्रह्मरूप कसें प्राप्त होतें तेंहि मला सांगा."

या प्रश्नाला शंकरांनीं जें प्रदीर्घ उत्तर दिलें तें गुरुगीता या नांवानें सार्थ झालें. त्यांत गुरूचें महत्त्व विविध प्रकारें वर्णन केलें आहे. गुरूशिवाय दुसरें निराळें ब्रह्म नाहीं. वेदशास्त्र, पुराणें, इतिहास मंत्रयंत्रादि विद्या, स्मृति, शैव, शाक्त, आगम, यज्ञ, व्रतें, तप, दान, जप, तीर्थ ह्या सर्वांचें, गुरुतत्त्वाची खरी

ओळख न पटल्यामुळें लोक पूजन करतात. श्रीगुरूंच्या सेवेमुळेच ' मी ब्रह्म आहें ' ही जाणीव जीवाला होते. गुरूंच्या पायांचें तीर्थ म्हणजे सर्व तीर्थांचें सार, पापरूपी चिखल धुऊन टाकणारें दिव्य अमृत, संसारांतून तरून नेणारी होडी, अज्ञानाचा नाश करण्याचें व ज्ञानवैराग्याच्या प्राप्तीचें साधन आहे. " अज्ञानमूलहरणं जन्मकर्मनिवारणं । ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं गुरुपादोदकं पिबेत् ॥ १४ ॥ ) गुरु स्वतः काशीविश्वेश्वर असून त्यांचें सदैव ध्यान करावें. आपली जातपात, आश्रम, कीर्ति, वैभव सारें सारें गुरुभक्तींत विलीन करावें. अनन्यचित्तानें गुरूचें आराधन करावें. गु या अक्षरानें अंधकार व ' रु ' या अक्षरानें त्या अंधकाराचा नाश करणारें दिव्य तेज, असा ' गुरु ' या शब्दाचा व्युत्पत्तिपर अर्थ आहे. गुरूला साष्टांग नमस्कार घालून सर्व अहंकार सोडावा. गुरु म्हणजेच ब्रह्मा, विष्णु, महेश्वर व तोच परब्रह्म, त्याला नमस्कार असो. शिव कोपला तर गुरु रक्षण करतो; पण गुरु क्रुद्ध झाले तर कोणीच त्राता नाहीं. गुरु या शब्दानें गुणातीत व रूपवर्जित असाहि अर्थ घ्यावा. आंधळ्याला सूर्योदय दिसत नाहीं त्याप्रमाणें मन्दभाग्य लोकांना श्रीगुरूंच्या परम रूपाची जाणीव होत नाहीं. उपनिषदांतील अमूर्त, निर्गुण-निराकार ब्रह्माचें सर्व वर्णन गुरूचेंच आहे.

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् । एकं नित्यं विमलमचलं सर्वधीःसाक्षिभूतं । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥८९॥

गुरूची निंदा करणाऱ्याला अधोगति प्राप्त होते. गुरूपुढें नुसता 'हुं' कार देऊं नये. खोटें बोलूं नये. गुरूला वादांत जिंकण्याचा प्रयत्न करूं नये. गुरुमार्गाचा अवलंब केल्यावर, सद्गुरूंच्या कृपेनेंच सत्य ज्ञान होतें.

१३१ ते १७५ या श्लोकांत गुरुगीतावाचनाची फलश्रुति सांगितली आहे.

सर्वबाधाप्रशमनं धर्मार्थकाममोक्षदम् ।
यं यं चिंतयते कामं तं तं प्राप्नोति निश्चितम् ॥ १४३ ॥

शिष्याचें द्रव्य हरण करणारे व्यावहारिक गुरु पुष्कळ असतात; परंतु शिष्याचा संसार-संताप हरण करणारे सद्गुरु दुर्लभ आहेत. संसार-सागर तरून जाण्याचा एकमेव मंत्र, ब्रह्मादिदेव व मुनींनीं पूजिलेला, दारिद्र्य,दुःख, भय व शोक यांचा विनाश करणारा हा महाभयनिवारक एकमेव मंत्र म्हणजे गुरुराजमंत्र. त्याला माझा नमस्कार असो.

विस्तारभयास्तव गुरुगीतेचा हा त्रोटक सारांशच येथें दिला आहे. आपापल्या गुरूवर दृढ श्रद्धा ठेवावी व त्याच्यांतच परब्रह्माला पहावें, असा मथितार्थ आहे.काया, वाचा, मनानें जेव्हां शिष्य गुरूची सेवा करतो,तेव्हांच तें खरें आत्मसमर्पण ठरतें.

## ( ६ ) श्रीगुरुचरित्रांतील कानडी पदें

## ( अध्याय ४२,१७२–१८० )

[ श्रीगुरुचरित्राच्या बेचाळिसाव्या अध्यायांत महाज्ञानी सायंदेव यांनीं श्रीगुरूच्या स्तुतिपर गायिलेलीं दोन कर्नाटक भाषेंतलीं पदें आहेत. तीं पदें देवनागरी लिपींत छापतांना पोथींत मुद्रणदोष झालेले आढळतात. शिवाय पदें रागदारींत म्हणण्याकरितां मूळ अक्षरांची ओढाताण केली असावी. या कानडी पदांचें वाचन करतांना त्रास होतो; अर्थ न कळल्यामुळें आनंदहि होत नाहीं. त्याकरितां श्री. कामत यांच्या पोथींतील (पृ. ५४६) पदांचे पाठ मान्य धरून व तेथें टीपेंत दिलेल्या मराठी भाषांतराचा उपयोग करून हीं दोन पदें शब्दार्थ व मराठी भावार्थासह येथें दिलीं आहेत. ह्या पदांच्या कर्नाटक भाषेंतील शुद्धतेबद्दल व त्यांच्या अर्थाबद्दल योग्य सल्ला देऊन, कर्नाटक व संस्कृत भाषापारंगत प्रा० डॉ. बी. एन्. के. शर्मा, एम्. ए; पीएच. डी. व त्यांचे सुपुत्र प्रा० भवानी शर्मा, एम्. ए. यांनीं जें बहुमोल साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें. ]

## पद १ : राग श्रीराग, पूर्वी किंवा जोगी

कंडेनिंदु कंडेनु–(मी) पाहिलें. इंदु–आज, भक्तजनर–भक्तजनांच्या. भाग्यनिधिय–भाग्यनिधीला.भूमंडळदोळगे भूमंडळद-भूमंडळाच्या. ओळगे. आंत. नारसिंह-सरस्वतिय-नारसिंह सरस्वतींना–कंडेनिंदु०॥ ध्रु० ॥

[भूमंडळामध्यें भक्तजनांचा भाग्यनिधि अशा नारसिंहसरस्वतीस्वामींना आज मीं पाहिलें ॥ ध्रु ०॥ ]

( १ ) कंडेनिंदु–कंडेनु-मी पाहिलें, इंदु–आज, दृष्टियिंद – दृष्टीनें, डोळ्यांनीं, वारिजदळ–कमलदलाप्रमाणें, पाद वन्नु–असलेल्या पायाला, हृदयकमल–हृदयकमळाच्या. दळि – आंत. भजिसे – आराधिलें असतां, सुखवनीव–सुखवनु + ईव = सुख देणाऱ्या. जगत्पतिय–जगत्पतीच्या ॥कंडेनिंदु० ॥ १ ॥

[ हृदयकमळामध्यें आराधिलें असतां सुख देणाऱ्या जगत्पतीच्या चरणकमळाला डोळे भरून मीं आज पाहिलें ॥ १ ॥ ]

( २ ) भोगिजनरिगेल्ल-भोगिजनरिगे--भोगिजनांना. एल्ल-सर्व.काम्यफलगळित्तु काम्यफळगळ–काम्यफळें.इत्तु--देऊन.सलहुत्तिरुव. सलहुत्त–रक्षण करीत. इरुव–असणाऱ्याय.योगिनियरोडे. योगिनियर-योगिनींचा. ओडेय–स्वामी. नारसिंह सरस्वतिय. पाद. कंडेनिंदु० ॥ २ ॥

[ सर्व संसारी भक्तजनांच्या सर्व इच्छा पूर्ण करून, रक्षण करीत असणाऱ्या, योगिनींचा स्वामी, श्रीनारसिंहसरस्वती, यांचे चरण मीं आज पाहिले. ॥ २ ॥]

( ३ ) वाक्यकारणनागि-वाक्यकारणनु–वाक्यकारण. आगि–होऊन जगदि –जगतांत. हिडिदु – धरून, पकडून. दंडकमंडलवनु–दंडकमंडलू. सगुणनेनिसि सगुणनु–सगुण. एनिसि–म्हणवून घेऊन. सुजनरिगोलिद-सुजनरिगें–सज्जनांना,ओलिद–प्रकट झालेला. प्रसन्न, होणाऱ्या. श्रीगुरुय-तिवरन्नु–श्रीगुरुयतिवरांना. ॥कंडेनिंदु०॥३॥

[सर्व वेदवाक्याचें कारण असलेलों अथवा वेदांतील महावाक्याचें लक्ष्य होऊन, ( निर्गुणस्वरूप असूनहि) दंडकमंडलु धारण करून, सगुण म्हणवून घेऊन, सज्जनांना प्रगट झालेल्या ( त्याच्यावर प्रसन्न होणाऱ्या ) श्रीगुरु-यतिश्रेष्ठांना मीं आज या जगांत पाहिलें. ।। ३ ।। ]

( ४ ) धरेगे–पृथ्वीतलावर. गाणगापुर-कैलास-गाणगापुररूपी कैलास. हरिदास ओडेय. हरिदासर-हरिदासांचा. ओडेय–स्वामी. एनिसि–म्हणवून घेणारा. करुणादिवरवित्तुकरुणदि–दयेमुळें. वरवित्तु–वर–वर इत्तु–देऊन. पोरेव–रक्षण करणारा, संभाळणारा, पालनपोषण करणारा. अनुदिन–दरादिवशीं. गुरुचरणवन्नु–गुरुचरणांना ।। कंडेनिंदु ०।।४।।]

[ पृथ्वीतलावरचा कैलासच असें जें गाणगापुर (क्षेत्र) त्याचा व हरिभक्तजनांचा स्वामी म्हणवून घेणारा तसेंच दयेमुळें वर देऊन नेहमीं सांभाळणारा असा जो श्रीगुरु, त्यांचे चरण मीं आज पाहिले ।।४।।

## पद २

कंडेनम्मा–कंडनु–मी पाहिलें. अम्मा–अग आई, अग बाई. इंदु–आज मंडळदोळगे-मंडळद-मंडळाच्या. ओळगे-आंत. यतिवरराय-यतिवरराजांच्या. चंद्रमन्ना–चंद्राला. ।। कंडेनम्मा ०।।ध्रु० ।।

[यतिवरमंडळांतील चंद्राला मीं आज पाहिलें ग बाई, पाहिलें. ।।ध्रु०।।

( १ ) तत्त्वबोधेय – तत्त्वबोध, तत्त्वोपदेशाच असलेल्या उपनिषद्-तत्त्वचरितन-उपनिषदांतील तत्त्वासारखें ज्याचें चरित्र आहे. व्यक्तवाद-व्यक्त झालेलें. परब्रह्ममूर्तियोनिसुवन–परब्रह्ममूर्ति. एनिसुवन – म्हणवून घेणारा. कंडेनम्मा ।। १ ।।

[ तत्त्वोपदेशाच असलेल्या, उपनिषदांतील तत्त्वांसारखें ज्याचें चरित्र आहे आणि व्यक्त झालेलें परब्रह्ममूर्ति असें म्हणवून घेणाऱ्या ( त्याला मीं आज पाहिलें ग बाई पाहिलें. ।। १ ।। ]

( २ ) शेषशयन–शेषशायी. परवेषकायकन–परवेष– श्रेष्ठ वेष. कायकन-देह धारण केलेल्या, लेसु-सहज. कृपेय–कृपेचा. निमेषनेंब : निमेषनु–कटाक्षवंत एंब–म्हणवून घेणारा. भाषा-ब्रीद, वचन. पालकन–पाळणाऱ्या, सार्थ करणाऱ्या. ॥ कंडेनम्मा०॥२॥

[ मूळचा शेषशायी असून आतां श्रेष्ठ यतिवेष धारण केलेला ज्याचा देह आहे अशाला व सहज उत्तम 'कृपाकटाक्षवंत' ' हें ब्रीद सार्थ करणाऱ्याला, [ म्हणजे ज्याचा कृपाकटाक्ष कधीं वायां जात नाहीं अशाला ] मीं आज पाहिलें, ग बाई पाहिलें. ॥२॥ ]

( ३ ) गंधपरिमळदिंद–गंधपरिमळ + इंद = गंधपरिमळानें शोभित–सुशोभित. आनंदसागरन-आनंदाचा सागर. चंदवुळ्ळ-चंद–सौंदर्य. उळ्ळ-युक्त, संपन्न. योगींद्रगोपीवृंदवल्लभन – योगींद्र गोपीजन यांना प्रिय अशाला ॥ कंडेनम्मा ०॥ ३ ॥

[ गंधपरिमळानें सुशोभित व आनंदाचा सागरच असलेल्या, योगींद्र व गोपीवृंदाला प्रिय अशा त्या सौंदर्यसंपन्न श्रीकृष्णपरमात्म्यालाच आज मीं पाहिलें, ग बाई पाहिलें. ॥३॥ ]

( ४ ) मंत्रकूटदि-मंत्रसमूहांत. मेरेदु-मिरवून. स्वतंत्रनादवन-स्वतंत्रनु–स्वतंत्र. आदवन–झालेल्या. इंतु–याप्रमाणें. निगमागमद–निगम आणि आगमांच्या. सकलकांतियुळ्ळवन – सकळकांति – उळ्ळ – युक्त वन–असणाऱ्या. ॥ कंडेनम्मा०॥४ ॥

[ सर्व मंत्रसमूहांत निष्णातपणें मिरवून, ( संगाचा त्याग केल्यानें ) स्वतंत्र झालेल्याला, त्याचप्रमाणें वेदशास्त्रांची सर्वकांति म्हणजे तेज धारण करणाऱ्या यतिवर्याला, मीं आज पाहिलें ग बाई पाहिलें. ॥४॥ ]

( ५ ) करिरायनेनिपंगे-करिरायनु-गजेंद्र. एनिपंगे–म्हणवून घेणाऱ्या. वरद–वर देणाऱ्या. गुरुरायन–गुरुराजाला. नारसिंहसरस्वातियंत्र–नारसिंह–

सरस्वति एंव—म्हणवून घेणाऱ्याला—नारीपुरुषनामकन—नारीपुरुष—स्त्री व पुरुष. नामकन—नांव धारण करणाऱ्या ॥ कंडेनम्मा ० ॥ ५ ॥

[ गजेंद्र म्हणविणाऱ्याला ( मोक्षरूप ) वर देणाऱ्या, नारसिंह-सरस्वती असें पुरुष व स्त्रीवाचक ( पुरुषप्रकृति अथवा शिवशक्ति उभयसूचक ) नांव धारण करणाऱ्या त्या गुरुराजाला, मीं आज पाहिलें ग बाई, पाहिलें ॥५॥]

## ( ७ ) श्रीगुरुचरित्रांतील संस्कृत श्लोक व स्तोत्रें

( १ ) मालाकमण्डलुरधः करपद्मयुग्मे । मध्यस्थपाणियुगले डमरुत्रिशूले । यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे । वन्दे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ॥ ( खालच्या दोन हातांत जपमाळ व कमंडलु धारण करणारा, मधल्या दोन हातांत डमरु व त्रिशूळ असणारा व वरच्या दोन हातांत शंख व चक्र धारण करणारा, ( अशा ब्रह्मा, विष्णु व शिवांच्या आयुधांनीं युक्त ) अत्रिऋषीला वर देणाऱ्या, सहा हातांच्या देवाला— दत्ताला-मी वंदन करतों.)

( २ ) बालार्कप्रभमिन्द्रनीलजटिलं भस्माङ्गरागोज्ज्वलं । शान्तं नादविलीनचित्तपवनं शार्दूलचर्माम्बरम् । ब्रह्मज्ञैः सनकादिभिः परिवृतं सिद्धैः समाराधितम् । दत्तात्रेयमुपास्महे हृदि मुदा ध्येयं सदा योगिभिः ॥ ( नुकत्याच उगवत्या सूर्याप्रमाणें तेजःपुंज, इंद्रनीलमण्याप्रमाणें काळ्याभोर जटांनीं युक्त, भस्मचर्चित उटीनें शोभून दिसणारा, शान्त, अनाहत नादांमध्यें ज्याचा मनोवायु लय पावला आहे अशा, वाघाचें कातडें परिधान करणारा, सनक आदि ब्रह्मज्ञांनीं वेढिलेला, सिद्धांकडून सेवा केला जाणारा व योगीलोकांकडून सर्वकाळ आनंदानें ध्यान करण्याला योग्य अशा अत्रिपुत्र दत्तांचें आम्ही आमच्या हृदयांत आनंदानें चिंतन करतों, त्यांची उपासना करतों.

( ३ ) गुरुः पिता गुरुर्माता गुरुरेव परः शिवः। शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन ॥ ( २·१३३ ) ॥ ( गुरु म्हणजेच वडील, आई व परमे-

श्वर शंकर होय. एखाद्यावर शंकर रागावले तर गुरु रक्षक असतो; पण ज्याच्यावर गुरु रुष्ट झाले त्याचें कोणीहि रक्षण करूं शकत नाहीं. )

( ४ ) गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवोमहेश्वरः । गुरुरेकः परब्रह्म तस्मात् गुरुमुपाश्रयेत् ।। २·१३६ ।। गुरु म्हणजेच ब्रह्मदेव, विष्णु व महेश्वर. गुरु हाच परब्रह्म म्हणून गुरूचा आश्रय करावा, गुरूला शरण जावें.

(५ ) हरौ प्रसन्नेऽपि च वैष्णवा जनाः । संप्रार्थयन्तो गुरुभक्तिमव्ययाम् ।। गुरौ प्रसन्ने जगदीश्वरः सदा । जनार्दनस्तुष्यति सर्वसिद्धिदः ।। २-१३८ ।। ( हरि प्रसन्न झाला तरी वैष्णवजन अव्यय अशी गुरुभक्ति करतात. कारण गुरु प्रसन्न झाले तर सर्व सिद्धि देणारा, जगाचा ईश्वर जनार्दन हाहि नेहमीं संतुष्ट होतो. गुरु प्रसन्न झाल्यावर ईश्वर भक्ताच्या आधीन होतो. )

(६) गुरुः सदा दर्शयता प्रवृत्तिं । तीर्थं व्रतं योगतपादिधर्मान् ।
आचारवर्णादिविवेकयज्ञान् । ज्ञानं परं भक्तिविवेकयुक्तम् ।।२·१४०।।

( सर्वकाळीं गुरूच आपल्या मनःप्रवृत्तीला वळण लावितात. तीर्थे, व्रतें, तपश्चर्या, योगाची उपासना, आचारधर्म,ज्ञानयज्ञ, भक्ति व सारासार विवेकयुक्त ज्ञान यांचें यथार्थ दर्शन करवून देणारे गुरूच होत.)

(७) गुरोर्विना न श्रवणं भवेत् कस्यापि कस्यचित् ।
विना कर्णेन शास्त्रस्य श्रवणं तत्कुतो भवेत् ।। ( २-१४६ )

गुरूशिवाय शास्त्रज्ञान कोणालाहि कुठेंच होणार नाहीं, कानांशिवाय ( म्हणजे बहिरा असलेल्याला ) शास्त्रांचें श्रवण कसें शक्य होईल ?

(८) यदा मम शिवस्यापि ब्रह्मणो ब्राह्मणस्य हि ।
अनुग्रहो भवेन्नृणां सेव्यते सद्गुरुस्तदा ।। ( २-२६१ )

( विष्णु म्हणाले, ' जेव्हां माझी, शंकराची किंवा ब्रह्मदेवाची कृपा मनुष्यावर होते, तेव्हांच त्याच्या हातून सद्गुरूची सेवा घडते. )

(९) यत्र यत्र दृढा भक्तिर्यदा यस्य महात्मनः । तत्र तत्र महादेवः प्रकाशमुपगच्छति ।। ( २·२७७ ) ( ज्या ज्या वेळीं ज्या ज्या

ठिकाणीं ज्या महात्म्याच्या मनांत दृढ गुरुभक्ति निर्माण होते तिथें तिथें महादेव स्वतः प्रकट होतात. अशा महात्म्यांना ईश्वर वश होतो.

(१०) स्त्रियः कामेन नश्यन्ति । ब्राह्मणा हीनसेवया । राजानो ब्रह्मदण्डेन यतयो भोगसंग्रहात् ॥ (७·१५९) (अतिशय कामसेवनानें स्त्रियांचा नाश होतो. हीन माणसाची किंवा कमी प्रतीची नोकरी केल्यामुळें ब्राह्मण नाश पावतात. राजाचें राज्य ब्राह्मणांना विनाकारण शिक्षा केल्यामुळें नष्ट होतें, तर इन्द्रियांचे विषय, शब्दस्पर्शादि सेवन केल्यामुळें, भोगांचा संग्रह केल्यामुळें यतींचा विनाश ओढवतो.)

(११) चरणं पवित्रं विततं पुराणम् । (८·५) (श्रीगुरूंचें पद-कमल हें अत्यंत पवित्र व अक्षय आहे. तें सर्वव्यापी व प्राचीन आहे.)

(१२) या गतिर्योगयुक्तानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् । सा गतिः सर्व जन्तूनां गौतमीतीरवासिनाम् । (१३·६८) ॥ (ऊर्ध्वरेता मुनींना, कोटि वर्षे तपश्चर्या करणाऱ्या तपस्व्यांना जी सद्‌गति मिळते तीच केवळ गौतमीनदीच्या तीरावर राहण्यानें तेथील प्राणिमात्रांना लाभते.)

(१३) यद्दिव्यपादद्वयमेव साक्षादधिष्ठितं देवनदीसमीपे । यदुत्तरे तीर-
निवासिरामो लक्ष्मीपतिस्त्वं निवसन् स नित्यम् ॥ १३·८३ ॥
( ज्याचीं दिव्य अशीं दोन पावलें देवनदीच्या जवळ उमटलीं आहेत, जिच्या उत्तर तीरावर जे लक्ष्मीपति राहातात, असे सदैव तिथे राहाणारे ते गुरुराय तुम्हीच आहांत.)

(१४) अत्यंतमार्गस्थितिमार्गरूपमत्यंतयोगादधिगम्यतत्त्वम् । मार्गं च मार्गं च विचिन्वतो मे मार्गोदयं माधव दर्शयेते ॥ १३·८४ ॥ श्रीगुरु माधवारण्याला म्हणाले-" मोक्षमार्गाचें स्वरूप, योगोपासनेच्या पराकाष्ठेनें उमजणारें तत्त्व असा सत्य मार्गाचा प्रकाश, माझें पदोपदीं ध्यान करणाऱ्या तुला मी दाखवितों.)

(१५) गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च हरेत् श्रीगुरुदर्शनम् ॥१३·१२९ ॥४२·१६६॥ गंगा पाप दूर करते. चंद्र ताप हरण करतो. कल्पतरूमुळें दैन्य दूर होतें; परंतु पाप, ताप व दैन्य हीं तिन्ही केवळ श्रीगुरूंचें दर्शनहि हरण करील. )

(१६) एता मुद्रा न जानाति गायत्री निष्फला भवेत् । एता मुद्रास्तु कर्तव्या गायत्री सुप्रतिष्ठिता ॥ ३६·४४५ ॥ ( गायत्रीमंत्राचा जप करतांना, सुमुख, संपुट, वितत, विस्तृत, द्विमुख, त्रिमुख, चतुर्मुख, पंचमुख, षण्मुख, अधोमुख, व्यापकांजलिक, शकट, यमपाश, ग्रथित, उल्मुकोमुल्क, प्रलंब, मुष्टिक, मत्स्य, कूर्म, वराह, सिंहाक्रान्त, महाक्रान्त, मुन्दूर आणि पल्लव अशा चोवीस मुद्रा कराव्या लागतात. त्या ज्याला माहीत नसतील त्यानें केलेला गायत्रीचा जप निष्फळ होतो. या मुद्रांसह केलेला जप दृढ होतो व त्यामुळें तो निःसंशय फलदायी होतो.

(१७) मुक्ताविद्रुमहेमनीलधवलच्छायैर्मुखैस्त्रीक्षणैः युक्तामिंदुकलानिबद्धमुकुटां तत्त्वार्थवर्णात्मिकाम् । गायत्रीं वरदाभयांकुशकशां शुभ्रं कपालं गुणम् । शंखं चक्रमथारविंदयुगलं हस्तैर्वहन्तीं भजे ॥ ( ३६·४६५३ ) मोतीं, विद्रुम व हेमनीलाप्रमाणें धवलकांतियुक्त मुखें असलेल्या, तीन डोळे असलेल्या, चंद्रकलेचा मुकुट धारण करणाऱ्या, परमतत्त्व हाच जिचा आत्मा आहे अशा, वरद, अभय, अंकुश व कशा अशा मुद्रा धारण करणाऱ्या, आपल्या हातांनीं शूल, कपाल, चाबूक, शंख, चक्र व दोन कमळें धारण करणाऱ्या त्या गायत्रीचें मी भजन करतों. ( त्या गायत्रीची उपासना करतों.)

(१८) कोणस्थको रौद्र यमश्च बभ्रुः कृष्णः शनिः पिंगल एव मंदः । नित्यं स्मरेत् व्याहरते च पीडां तस्मै नमस्ते रविनंदनाय ॥ ( ३९·८९ ) ( कोणस्थक, रौद्र, यम, बभ्रु, कृष्ण, शनि, पिंगल अशा विविध नांवांनीं

प्रख्यात असलेल्या रविपुत्र शनीचें जो रोज स्मरण करील त्याची पीडा शनिदेव दूर करील.त्या रविपुत्राला नमस्कार असो.

(१९) मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ । यादृशीं भावनां कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ॥ ४०-४९ ॥ ( मंत्र, तीर्थ, ब्राह्मण, देव, ज्योतिषी, वैद्य व गुरु यांच्याविषयीं जशी श्रद्धा असेल तसें फळ मिळतें. जसा भाव तशी सिद्धि प्राप्त होते.)

(२०) अन्तर्गृहेषु यात्रेयं यथावद्या मया कृता । न्यूनातिरिक्तया शंभुः प्रीयतामनया विभुः॥ ४१-१८५ ॥ ( ही अन्तर्गृहयात्रा मी यथाविधि केली आहे. तींत कांहीं कमीजास्त झालें असलें तरी तिनें काशी-विश्वेश्वर प्रसन्न होवो.)

(२१) इति मंत्रं समुच्चार्य क्षणं यो मुक्तिमान्भवेत् । विश्रम्य यायाद् भवने निष्पापः पुण्यभाग्भवेत् ॥४१-१८६ ॥ ( असा मंत्र म्हणून जो क्षणभर विश्रांति घेऊन काशीविश्वेश्वराच्या देवळांतून घरीं परत जाईल तो पापमुक्त होऊन पुण्यवान् होईल. )

(२२) वाराणस्यां दाक्षिणे भागे कुक्कुटो नाम वै द्विजः ।

तस्य स्मरणमात्रेण दुःस्वप्नः सुस्वप्नो भवेत् ॥ ४१·२०५ ॥

वाराणसीच्या दाक्षिणेकडे कुक्कुट नांवाचा ब्राह्मण होता. त्याच्या नुसत्या स्मरणानें वाईट स्वप्नें पडावयाचीं बंद होऊन चांगलीं स्वप्नें पडूं लागतील.)

(२३) जय विश्वेश विश्वात्मन् काशीनाथ जगत्पते ।

त्वत्प्रसादान्महादेव कृता क्षेत्रप्रदक्षिणा ॥ ४२-४७ ॥ हे विश्वेश्वरा, विश्वात्म्या काशीनाथा, जगत्पति, तुझा जय असो. तुझ्या प्रसादामुळें मी काशीक्षेत्राची प्रदक्षिणा पूर्ण करूं शकलों.)

( २४ ) यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥४२-१२६॥ ( अगदीं देवाप्रमाणेंच गुरूवरहि

ज्याची तुल्य श्रद्धा अथवा भक्ति असते त्यालाच गुरूनें सांगितलेल्या ज्ञानाचा प्रकाश होतो. त्यालाच सत्य ज्ञानाचा अर्थ उमजतो.)

[या संकीर्ण श्लोकांखेरीज दोन संपूर्ण संस्कृत स्तोत्रें श्रीगुरुचरित्रांत आहेत. या स्तोत्रांत प्रत्येकीं नऊ श्लोक आहेत. त्यांतील संस्कृतची रचना वृत्त व व्याकरण या दृष्टीनें सदोष आहे. परंतु भाविक भक्ताचे ते बोल आर्षरूपांप्रमाणें, व्याकरण व छंदशास्त्रांच्या मर्यादेंत बसवून केलेले नाहींत. ते उत्स्फूर्त आहेत. त्यामुळें 'निरंकुशाः कवयः' या न्यायानें तीं स्तोत्रें मुळाबरहुकूम दिलीं आहेत. त्यांतहि विविध पोथ्यांत पाठभेद आहेत. प्रत्येक श्लोकाचा अर्थ विस्तारभयास्तव दिला नाहीं. त्रोटक सारांश दिला आहे.]

## श्रीदत्तस्तोत्र ( ४०–१२१ ते १२९ )

( सांप्रदायिक वर्गांत याला महास्तोत्र म्हणतात. वाडी, गाणगापूर वगैरे दत्तक्षेत्रांत पालखीच्या प्रदक्षिणेच्या वेळीं हें स्तोत्र म्हणतात. )

इंदुकोटितेजकीर्णसिंधुभक्तवत्सलम् । नंदनात्रिसूनुदत्तमिंदिराक्षश्रीगुरुम्। गंधमाल्यअक्षतादिवृंददेववंदितम्। वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥१॥ मोहपाशअंधकारछायदूरभास्करम् । आयताक्ष पाहि श्रीवल्लभेशनायकम्। सेव्य भक्तवृंदवरद भूय भूयनमाम्यहम्। वंदयामि॥२॥ चित्तजादिवर्गषट्कमत्तवारणांकुशम्। सत्त्वसारशोभितात्म दत्तश्रियावल्लभम्। उत्तमावतारभूतकर्तृभक्तवत्सलम्। वंदयामि० ॥३॥ व्योमवायुतेजआपभूमिकर्तुमीश्वरम्। कामक्रोधमोहरहित सोमसूर्यलोचनम् । कामितार्थदातृभक्तकामधेनु श्रीगुरुम्। वंदयामि० ॥४॥ पुंडरीकआयताक्ष कुंडलेंदुतेजसम्। चंडदुरितखंडनार्थ दंडधारि श्रीगुरुम्। मंडलिकमौलिमार्तंडभासिताननम्। वंदयामि० ॥५॥ वेदशास्त्रस्तुत्यपादमादिमूर्ति श्रीगुरुम्। नादबिंदुकलातीत

कल्पपादसेव्ययमे । सेव्यभक्तवृंदवरद भूय भूय नमाम्यहम् । वंदयामि ॥६॥ अष्टयोग तत्त्वनिष्ठ तुष्टज्ञानवारिधिम् । कृष्णावेणितीरवास पंचनंदीसगमम् । कष्टदैन्यदूरभक्ततुष्टकाम्यदायकम् । वंदयामि० ॥ ७ ॥ नारसिंहसरस्वतीय नाम अष्टमौक्तिकम् । हारकृत्यशारदेन गंगाधराख्य आत्मजम् । धारणीकदेवदीक्ष गुरुमूर्तितोषितम् । परमानंद श्रीयपुत्रपौत्रदायकम् ॥ ८ ॥ नारसिंहसरस्वतीय अष्टकं च यः पठेत् । घोरसंसारसिंधु तारणाख्यसाधनम् ॥ सारज्ञानदीर्घआयुरारोग्यादि संपदाम् । चारुवर्गकामलाभ नित्यमेव यः पठेत् ॥ ९ ॥

[ शुष्क काष्टाला पालवी फुठल्यावर, ब्राह्मणाचें कोड बरें झालें. त्या वेळीं नरसिंहसरस्वती यतिवरांचें जें गुणगान त्यानें केलें तें या महास्तोत्रांत आहे. कोटिचंद्रांप्रमाणें तेजस्वी, भक्तवत्सल, करुणासागर, गंधमाल्यानें देववृंदांकडून सुपूजित, मोहपाशरूपी अंधकार दूर करणारे सूर्य, दीर्घ नयन, श्रीवल्लभ, भक्तांना वर देणारे, पंचमहाभूतांचे निर्माते, चंद्र व सूर्याच्या डोळ्यांनीं पाहणारे, वेदशास्त्रांनाहि प्रमाण,अष्टांगयोगज्ञ, ज्ञानसमुद्र, कृष्णा वगैरे पंचनदी संगमावर राहाणारे, नादबिंदुकला यांही पलीकडील, भक्तांचें कष्ट दैन्य दूर करणारे, असे नृसिंह-सरस्वती यांचें वर्णन यांत आहे. या स्तोत्राचें वाचन केलें असतां चतुर्वर्गफलप्राप्ति होते. ]

## नृसिंहस्तोत्र ( ४२-१३६-१४४ )

आदौ ब्रह्म त्वमेव सर्वजगतां वेदात्ममूर्ति विभो । पश्चात् क्षोणितले विनाशि दितिजे कृत्वावतारं प्रभो । हत्वा दैत्यमनेकधर्मरचितं भूत्वात्मजोऽत्रेर्गृहे । वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥ १ ॥ भूदेवाखिलमानुषं विदुजनावाधायमानं कालिम् ।वेदायुष्यमनेकवर्णमनुजा भेदादिभूतोन्नतिम् । छेत्ताऽधर्मतमांधकारहरणज्ञानप्रदीपोज्वलम् । वंदेऽहं० ॥ २ ॥ ध्यातस्त्वं हरिशंकरप्रतिगुरो जाताग्रजन्मं विभो । हेतुः सर्वविदोजनाय

तरणं ज्योतिःस्वरूपं जगत् । चातुर्थाश्रमस्थापितं क्षितितले पातुः सदा सेव्ययंयम । वंदेऽहं नरकेसरी० ॥३॥ चरितं चित्रमनेककीर्तिमतुलं परिभूत-भूमंडले । मूकं वाक्यं दिवांधकस्य नयनं, वन्ध्या च पुत्रं ददौ ॥ सौभाग्यं विधवाच दायक श्रियं, दत्वाच भक्तं जनम् । वंदेऽहं ॥ ४ ॥ दुरितं घोरदरिद्रदावतिमिर-हरणं जगज्ज्योतिषम् । स्वर्धेनुं सुरपादपूजितजना करुणाब्धि भक्तार्तितः नरसिंहेंद्र-सरस्वतीश्वर विभो, शरणागतं रक्षकम् । वंदेऽहं ० ॥६॥ गुरुमूर्तिश्चरणारविंदयुगलं-स्मरणं कृतं नित्यसौ । चरितं क्षेत्रमनेकतीर्थसलिलं सारितादि भागीरथी । तुरगामेधसहस्रगोविदुजनाः सम्यक् ददन् तत्फलम् । वंदेऽहं नरकेसरी ० ॥६॥ नो शक्यं तव नाम मंगलस्तुवं, वेदागमागोचरम् । पापघ्नं हृदयाब्जमंतरदलं निर्धारमीमांसितम् । भूयोभूयः स्मरन् नमामि मनसा,श्रीसद्गुरुं पाहि माम् । वंदेऽहं नरकेसरी ॥ ॥७॥ भक्तानां तरणार्थ सर्वजगतां दीक्षां ददन् योगिनां । सुक्षेत्रं पुरगाणगस्थितप्रभो, दत्वा चतुष्कामदम् । स्तुत्वा भक्तसरस्वती गुरुपदं जित्वाघदोषादिकम् । वंदेऽहं नरकेसरी ०॥८॥ एवं श्रीगुरुनाथमष्टकमिदं स्तोत्रं पठेन्नित्यसौ । तेजोवर्चबलोन्नतं श्रियकरं आनंदवर्धं वपुः । पुत्रापत्य-मनेकसंपदशुभा दीर्घायुरारोग्यताम् । वंदेऽहं नरकेसरी सरस्वती-श्रीपादयुग्मां-बुजम् ॥९॥

( हे नरकेसरी श्रीपाद श्रीदत्तात्रेया नृसिंहसरस्वती, तुझ्या पद-कमलांना मी वंदन करतों. सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी ब्रह्मरूपानें एकटा तूंच होतास. नंतर पृथ्वीला भारभूत अशा दैत्यांचा नाश करण्यासाठीं अवतार घेतलास. अत्रिऋषींच्या घरीं पुत्ररूपानें तूंच जन्मलास. कालिदोषामुळें लोकांनीं धर्म सोडून दिला,देवांनाहि उपवास पडूं लागले तेव्हां तूं अवतार घेऊन,सूर्याप्रमाणें महामोहरूप अंधकार ग्रासून टाकलास आणि धर्माचा सेतु दृढ केलास. हे सर्वानंदानिधाना, तूंच सर्व देव आहेस. सर्व भूमंडळ आपल्या अतुल कीर्तीनें तूं भरून टाकलेंस. मुक्याला वाचा, आंधळ्याला

डोळे, विधवेला सौभाग्य, वांझेला पुत्र, भक्तांना ऐश्वर्य देणाऱ्या तुला मी वंदन करतों. अघोर पातक, दारिद्र्य हरण करणारा, शरणागतांचा रक्षक तूंच आहे. निगमागमाला अगोचर अशा तुझ्या मंगल नामाचे यथार्थ स्तवन कोणालाहि पूर्णत्वानें करतां येणार नाहीं. माझ्या गुरुदेवा सेवकाला चारहि पुरुषार्थ देण्याकरता तूं श्रीक्षेत्र गाणगापुर येथें राहिला आहेस. तुझी स्तुति करून भक्त सरस्वतीनें सर्व दोष जिंकले. हें श्रीगुरुनाथाचें स्तोत्र रोज पठण केलें असतां सर्व मनोकामना पूर्ण होतील )

## ( ८ ) श्रीरंगावधूतस्वामी विरचित दत्तबावनी

गुजराती भाषेंतील दत्तबावनीचा पाठ शेंकडों भाविक दत्तभक्त नित्य करीत असतात. हें स्तोत्र अत्यंत रसाळ असून त्यांत श्रीगुरुचरित्राचें सार आहे. मूळ गुजरातींतच पण देवनागरी लिपींत हें स्तोत्र येथें दत्त-भक्तांच्या आनंदाकरितां दिलें आहे. ]

( १ ) जय योगीश्वर दत्तदयाळ तूज एक जगमां प्रतिपाळ ।।
( २ ) अत्रनसूया करी निमित प्रगटयो जगकारण निश्चित ।।
( ३ ) ब्रह्मा हरिहरनो अवतार शरणागतनो तारण हार
( ४ ) अंतर्यामी सत्‌चित्सुख बहार सद्‌गुरु द्विभुज सुमुख ।।
( ५ ) झोळी अन्नपूर्णा करमाह्य, शान्ति कमण्डल कर सोहाय ।।
( ६ ) क्यांय चतुर्भुज षड्‌भुजसार अनंतबाहु तू निर्धार
( ७ ) आव्यो शरणे बाळ अजाण ऊठ दिगंबर चाल्या प्राण ।।
( ८ ) सुणी अर्जुन केरो साद रिज्झो पूर्वे तू साक्षात् ।।
( ९ ) दिद्धी ऋद्धि सिद्धि अपार अंते मुक्ति महापद सार ।
(१०) कीधो आजे केम विलंब तुजविण मुझने ना आलंब ।।
(११) विष्णुशर्म द्विज ताऱ्यो एम् जम्यो श्राद्धमां देखी प्रेम ।
(१२) जंब दैत्यथी त्राश्या देव कीधी मेहर तें त्या ततखेव ।।

(१३) विस्तारी माया दितिसुत इन्द्र करे हाणाव्यो तूर्त ॥
(१४) एवी लीला कइं कइं शर्व कीधी वर्णवे का ते सर्व ॥
(१५) दोडयो आयु सुतने काम कीधी अने ते निष्काम ॥
(१६) बोध्या यदुने परशुराम साध्यदेव प्रल्हाद अकाम ॥
(१७) एवी तारी कृपा अगाध केम सुणे ना मारो साद ॥
(१८) दोड अंत ना देख अनंत मा कर अधवच शिशुनो अंत ॥
(१९) जोई द्विजस्त्री कीरो स्नेह थयो पुत्र तू निःसंदेह ॥
(२०) स्मर्तुगामी कलितार कृपाळ तार्यो धोबी छेद गमार ॥
(२१) पेटपीडथी तार्यो विप्र ब्राह्मणशेठ उगार्यो क्षिप्र ॥
(२२) करे केमना मारी व्हार जो आणी गम एकजवार ॥
(२३) शुष्काष्ठने आण्या पत्र थयो केम उदासीन अत्र
(२४) जर्जर वंध्या केरी स्वप्न कर्या सफळ ते सुतना कृत्स्न
(२५) करी दूर ब्राह्मणनो कोढ कीधा पूरण एना कोड ॥
(२६) वंध्या भेस दुझवी देव हर्यु दरिद्र तें तत खेव ॥
(२७) झालर खायी रिझ्यो एम् दीधो सुवर्णघट सप्रेम
(२८) ब्राह्मण स्त्रीनो मृत भरथार कीधो सजिवन ते निर्धार॥
(२९) पिशाच पीडा कीधी दूर विप्रपुत्र उठाड्यो शूर
(३०) हरी विप्रमद अंत्यजहाथ रक्ष्यो भक्त त्रिविक्रम तात ।
(३१) निमेषमात्रें तंतुक एक पहुंचाड्यो श्री शैले देख ।
(३२) एकीसाथे आठ स्वरूप धरी देव बहुरूप अरूप ॥
(३३) संतोष्या निजभक्त सुजात आपी परचा ओ साक्षात्
(३४) यवनराजनी टाळी पीड जातपातनी तने न चीड ॥
(३५) रामकृष्ण रूपें ते एम् कीधी लीला ओ कई तेम् ।
(३६) तार्या पत्थरगणिका व्याध पशुपंखीपण तुजने साध ।
(३७) अधम ओधारण तारो नाम गाता सरे न शांशा काम ।

(३८) आधि व्याधि उपाधि सर्व टळे स्मरणमात्रथी सर्व ॥
(३९) मूढ चोटना लागे जाण पामे नर स्मरणे निर्वाण ॥
(४०) डाकण शाकण भेंसासुर भूत पिशाचो जंद असूर ॥
(४१) नासे मोठे दईने तूर्त दत्त धून सांभळता मूर्त ।
(४२) करी धूप गाएजे एम् दत्तबावनी आ सप्रेम ॥
(४३) सुधरे तेना बन्ने लोक रहे न तेरे क्यां ए शोक ।
(४४) दासी सिद्धि तेणी थाय दुःख दरिद्र तेना जाय ॥
(४५) बावन गुरुवारे नितनेम करे पाठ बावन सप्रेम ॥
(४६) यथावकाशे नित्यनियम तेने कधी न दंडे यम ॥
(४७) अनेकरूपे एज अभंग भजता नडे न माया रंग ।
(४८) सहस्रनामे नामी एक दत्तदिगंबर असंग छेक ॥
(४९) वंदू तुजने वारेवार वेदश्वास तारा निर्धार
(५०) थाके वर्णवतां ज्या शेष कोण रांक हुं बहुकृत वेश ॥
(५१) अनुभवतृप्तीने उद्गार सुणी हंसे ते खाशे मार ।
(५२) तपसी तत्त्वमसि अे देव बोलो जय जय श्रीगुरुदेव ॥

## ( ९ ) ॥ बावन्नश्लोकी श्रीगुरुचरित्र ॥

[ श्रीगुरुचरित्राच्या दहा ओव्या तरी दररोज वाचण्याचा क्रम बरेचसे दत्तभक्त पालन करतात. खालील बावन्न ओव्यांत श्रीगुरुचरित्राचें त्यांतील ओव्या निवडूनच त्रोटक सार आणलें आहे. या ओव्या परंपरागत चालत आल्या असाव्यात. त्यांचें संकलन कोणीं केलें याबद्दल खुलासा मिळाला नाहीं; परंतु पुष्कळांच्या या ओव्या पाठहि असतात. या बावन्न ओव्या स्नानानंतर दररोज म्हटल्यास एक प्रकारचें मानासिक समाधान व आनंद मिळतो. ]

ॐ श्रीगणेशाय नमः । श्रीमद्दत्तात्रेय गुरवे नमः । अथ ध्यानम्: ।
दिगंबरं भस्मसुगंधलेपनं चक्रं त्रिशूलं डमरुं गदां च ।
पद्मासनस्थं रविसोमनेत्रं दत्तात्रेयं ध्यानमभीष्टसिद्धिदम् ।

काषायवस्त्रं वरदंडधारिणम्
कमंडलुं पद्मकरेण शंखम् ।
चक्रं गदाभूषितभूषणाढ्यं
श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ।।
कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनन्दनः ।
द्वापारे रामकृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभः ।।
ॐ नमोजी विघ्नहरा । गजानना गिरिजा-कुमरा ।
जयजयाजी लंबोदरा । एकदंता शूर्पकर्णा ।। २ ।।
त्रैमूर्तिराजा गुरु तूंचि माझा
कृष्णातिरीं वास करूनि ओजा
सद्भक्त तेथें करिती आनंदा
त्या देव स्वर्गी बघती विनोदा ।। २ ।।

( ३ ) जयजयाजी सिद्धमुनी । तूं तारक भवार्णवांतुनी ।
संदेह होता माझे मनीं । आजि तुवां छेडें केलें ।। ३ ।।
( ४ ) ऐसी शिष्याची विनंती । ऐकूनि सिद्ध काय बोलती ।
साधु साधु तुझी भक्ति । प्रीती पावो श्रीगुरुचरणीं ।।
( ५ ) भक्तजनरक्षणार्थ । अवतरला श्रीगुरुनाथ ।
सगरपुत्राकरणें भगीरथ । गंगा आणीतसे भूमंडळीं ।।
( ६ ) तीर्थे असती अपार परी । समस्त सांडूनि प्रीति करी ।
कैसा पावला श्रीदत्तात्री । श्रीपादश्रीवल्लभ ।।
( ७ ) ज्यावरी असे श्रीगुरूची प्रीती । तीर्थमहिमा ऐकावया चित्तीं ।
वांछा होतसे त्या ज्ञानज्योती । कृपामूर्ति यतिराया ।।

( ८ ) गोकर्णक्षेत्रीं श्रीपादयती । राहिले तीन वर्षें गुप्तीं ।
तेथूनि गुरु गिरिपुरा येती । लोकानुग्रहाकारणें ॥

( ९ ) श्रीपादकुरवपुरीं असतां । पुढें वर्तली कैसी कथा ।
विस्तारूनि सांग आतां । कृपामूर्ति दातारा ॥ ९ ॥

(१०) सिद्ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरुमहिमा काय पुससी ।
अनंतरूपें परियेसी । विश्वव्यापक परमात्मा ॥

(११) सिद्ध म्हणे ऐक वत्सा । अवतार झाला श्रीपाद हर्षा ।
पूर्ववृत्तांत ऐकिला ऐसा । कथा सांगितली विप्रस्त्रियेची ।

(१२) श्रीगुरु म्हणती जननींसी । आम्हां ऐसा निरोप देसी ।
अनित्य शरीर तूं जाणसी । काय भरंवसा जीविताचा ॥

(१३) श्रीगुरुचरित्र कथामृत । सेवितां वांछा अधिक होत ।
शमन करणारा समर्थ । तूंचि एक कृपासिंधु ॥

(१४) ऐकूनि शिष्याचें वचन । संतोष करी सिद्ध आपण ।
श्रीगुरुचरित्र कामधेनु जाण । सांगता झाला विस्तारें ॥

( १५ ) ऐक शिष्या शिरोमणी । धन्य धन्य तुझी वाणी ।
तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं । लीन झाली परियेसीं ।

( १६ ) विनवी शिष्य नामांकित । सिद्धयोगियातें पुसत ।
सांगा स्वामी वृत्तांत । श्रीगुरुचरित्र विस्तारें ॥

( १७ ) ऐक शिष्या नामकरणी । श्रीगुरुभक्तशिखामणि ।
तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं । लीन झाली निर्धारें ॥

( १८ ) ध्यान लागलें श्रीगुरुचरणीं । तृप्ति नोहे अन्तःकरणीं ।
कथामृतसंजीवनी । आणिक निरोपावी दातारा ॥

( १९ ) अज्ञानतिमिर रजनींत । निजलों होतों मदोन्मत्त ।
श्रीगुरुचरणवचनामृत । प्राशन केलें दातारा ॥

(२०) स्वामी निरोपिलें आम्हांसी । श्रीगुरु आले गाणगापुरासी ।
गौप्यरूपें अमरपुरासी । औदुंबरीं असती जाणा ॥
(२१) सिद्ध म्हणे नामधारका । ब्रह्मचारी कारणिका ।
उपदेशी ज्ञानविवेका । तये प्रेतजननीसी ॥
(२२) तुझा चरणसंपर्क होतां । झालें ज्ञान मज आतां ।
परमार्थी मन ऐकतां । झालें तुझे प्रसादें ॥
(२३) लोटांगणें श्रीगुरूसी । जाऊनि राजा भक्तीसी ।
नमस्कारी विनयेंसी । एकभावें करूनियां ॥
(२४) शिष्यवचन परिसोनी । सांगता झाला सिद्धमुनी ।
ऐक भक्ता नामकरणी । श्रीगुरुचरित्र अभिनव ॥
(२५) सिद्ध म्हणे ऐक बाळा । श्रीगुरूची अगम्य लीला ।
सांगतां न सरे बहुकळा । साधारण मी सांगतसें ॥
(२६) श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । नको भ्रमूं रे युक्तीसी ।
वेदान्त न कळे ब्रह्मयासी । अनंत वेद असती जाण ॥
(२७) चतुर्वेद विस्तारेंसी । श्रीगुरु सांगती विप्रासी ।
पुढें कथा वर्तली कैसी । विस्तारावी दातारा ॥
(२८) नामधारक म्हणे सिद्धासी । पुढील कथा सांगा आम्हांसी ।
उल्हास होतो माझे मानसीं । श्रीगुरुचरित्र अतिगोड ॥
(२९) पुढें कथा कवणेपरी । झाली असे श्रीगुरुचरित्रीं ।
निरूपावें विस्तारीं । सिद्धमुनि कृपासिंधो ॥
(३०) श्रीगुरुचरित्रसुधारस । तुम्हीं पाजिला आम्हांस ।
परी तृप्त नव्हे गा मानस । तृषा आणिक होतसे ॥
(३१) सिद्ध म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका ।
योगेश्वर कारणिका । सांगे स्त्रियांचे स्वधर्म ॥

(३२) पतिव्रतेची रीती ; सांगे देवांसी बृहस्पती ।
सहगमनाची फलश्रुति । येणेंपरी निरोपिली ।।
(३३) श्रीगुरु आले मठासी । पुढें कथा वर्तली कैसी ।
विस्तारूनि आम्हांसी । निरूपावें स्वामिया ।।
(३४) श्रीगुरु म्हणती दंपतीसी । ऐका पराशरऋषि ।
तया काश्मीररायासी । रुद्राक्षमहिमा निरूपिला ।।
(३५) पुढें कथा कैसी वर्तली । विस्तारूनि सांगा वहिली ।
मति माझी असे वेधली । श्रीगुरुचरित्र ऐकावया ।।
(३६) गाणगापुरीं असतां श्रीगुरु । महिमा झाला अपरंपारू ।
सांगतां न ये विस्तारू । तावन्मात्र सांगतसें ।।
(३७) ऐसा श्रीगुरु दातारू । भक्तजना कल्पतरू ।
सांगता झाला आचारू । कृपा करूनि विप्रासी ।
(३८) आर्त झालों मी तृषेचा । घोट भरवीं गा अमृताचा ।
चरित्रभाग सांगे श्रीगुरूचा । माझें मन निववी वेगें ।।
(३९) सिद्ध म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका ।।
साठ वर्षी वांझ देखा । पुत्रकन्या प्रसवली ।।
(४०) सिद्ध म्हणे नामधारका । अपूर्व वर्तलें आणिक ऐका ।।
वृक्ष झाला काष्ठशुष्का । विचित्र कथा परियेसा ।
(४१) जयजयाजी सिद्धमुनि । तूं तारक या भवार्णवांतुनी ।
नानाधर्म विस्तारूनि । श्रीगुरुचरित्र निरूपिलें ।।
(४२) मागें कथानक निरूपिलें । सायंदेव शिष्य भले ।
श्रीगुरूंनीं त्यांसी निरूपिलें । कलत्र पुत्र आणि म्हणती ।।
(४३) श्रीगुरु म्हणती द्विजांसी । या अनंतव्रतासी ।
सांगेन ऐका तुम्हांसी । पूर्वी बहुतीं आराधिलें ।।

( ४४ ) श्रीगुरु माझा मल्लिकार्जुन । पर्वत म्हणजे श्रीगुरुभुवन ।
आपण न ये आता येथुन । सोडूनि चरण श्रीगुरूचे ।
( ४५ ) तूं भेटलासी मज तारक । दैन्य गलें सकळहि दुःख ।
सर्वाभीष्ट लाधलें सुख । श्रीगुरुचरित्र ऐकतां ॥
( ४६ ) गाणगापुरीं असतां श्रीगुरु । ख्याती झाली अपारु ।
लोक येती थोरथोरू । भक्त बहुत झाले असती ॥
( ४७ ) सांगेन ऐका कथा विचित्र । जेणें होय पतित पवित्र ।
ऐसें हें श्रीगुरुचरित्र । तत्परतेसीं परियेसीं ॥
( ४८ ) श्रीगुरु नित्य संगमासी । जात होते अनुष्ठानासी ।
मार्गांत शूद्र परियेसीं । शेतीं आपुल्या उभा असे ॥
( ४९ ) त्रिमूर्तीचा अवतार । वेषधारी झाला नर ।
वसती केली गाणगापुर । कवण क्षेत्र म्हणूनियां ॥
( ५० ) तेणें मागितला वर राज्यपद धुरंधर ।
प्रसन्न झाला त्यासी गुरुवर । दिधला वर परियेसा ॥
(५१) राजभेटी घेऊनी । श्रीपाद आले गाणगाभुवनीं
योजना करिती आपुले मनीं । गौप्य रहावें म्हणूनिया ॥५१॥
(५२) म्हणे सरस्वती गंगाधर । श्रोतयां करी नमस्कार ।
कथा ऐका मनोहर । सकळाभीष्ट साधेल ॥ ५२ ॥
इति श्रीगुरुचरित्रकथाकल्पतरौ सिद्धनामामधारकऽ–
संवादे द्विपंचाशत्श्लोकं श्रीगुरुचरित्रं संपूर्णम् ॥

## (१०) श्री वासुदेवानन्दविरचित तीन दत्तस्तोत्रें व करुणात्रिपदी

[ प. प. श्रीवासुदेवआनंदसरस्वतीविरचित खालील तीन दत्त-स्तोत्रांचा व तीन पदांचा पाठ करून ऐहिक दुःखांतून पार पडून सुखाची वाटचाल सुकर झाल्याचा अनेकांचा अनुभव आहे. ह्या दत्तस्तोत्रांचें दररोज

पांच, अकरा, एक्कावन, एकशें आठ असे जमतील तेवढे पाठ करावेत. करुणात्रिपदीचे सोळा पाठ एका वेळीं केले असता व्यथित मनाला शांति मिळाल्याचा अनेक भाविकांचा अनुभव आहे. ही स्तोत्रें प्रासादिक व अधिकारी आहेत. भाविकांना तीं एकत्र वाचावयाला मिळावीत म्हणून येथें दिलीं आहेत. ]

## श्रीदत्तात्रेयस्तोत्र

( १ ) सर्वविद्याप्रदातारं वराभयकरं विभुम् ।
दत्तात्रेयं गुरुं वंदे भक्तांनामीहितार्थदम् ॥ १ ॥

( २ ) दत्तात्रेयं महात्मानं वरदं भक्तवत्सलम् ।
प्रपन्नार्तिहरं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ २ ॥

( ३ ) दीनबंधुं कृपासिंधुं सर्वकारणकारणम् ।
सर्वरक्षाकरं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ३ ॥

( ४ ) शरणागतदीनार्तपरित्राणपरायणं
नारायणं विभुं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ४ ॥

( ५ ) सर्वानर्थहरं देवं सर्वमंगलमंगलम् ।
सर्वक्लेशहरं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ५ ॥

( ६ ) शोषणं पापपंकस्य दीपनं ज्ञानतेजसः ।
भक्ताभीष्टप्रदं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ६ ॥

( ७ ) सर्वरोगप्रशमनं सर्वपीडानिवारणम् ।
तापप्रशमनं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ६ ॥

( ८ ) ब्रह्मण्यं धर्मतत्त्वज्ञं भक्तकीर्तिविवर्धनम् ।
आपदुद्धरणं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ८ ॥

( ८ ) जन्मसंसारबंधघ्नं स्वरूपानंददायकम् ।
निःश्रेयसप्रदं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ९ ॥

(१०) जयलाभयशः कामदातुर्दत्तस्य य स्तवम् ।
भोगमोक्षप्रदस्येमं प्रपठेत्स कृती भवेत् ।। १० ।।
इति श्री. प. पं. श्रीवासुदेवआनंदसरस्वती–
विरचितं श्रीदत्तात्रेयस्तोत्रं संपूर्णम् ।।

## श्रीदत्तात्रेय प्रार्थना-स्तोत्रम् ।।

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव । श्रीदत्तास्मान्पाहि देवाधिदेव । भावग्राह्य– क्लेशहारिन्सुकीर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।। १ ।। त्वं नो माता त्वं पिताऽप्तोऽधिपस्त्वम् । त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम् । त्वं सर्वस्वं नो प्रभो विश्वमूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।। २ ।। पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं । भीतिं क्लेशं त्वं हराशु त्वदन्यम् । त्रातारं नो वीक्ष्य ईशास्तजूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।। ३ ।। नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता । त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता । कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।। ४ ।। धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् । भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।। ५ ।। श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगलवर्धनम् । प्रपठेन्नियतो भक्त्या स श्रीदत्तप्रियो भवेत् ।। ६ ।। इति श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितश्रीदत्तात्रेयप्रार्थना स्तोत्रं संपूर्णम् ।।

( मनःस्थिरीकरणस्तोत्रम् )

अनसूयात्रिसंभूत दत्तात्रेय महामते ।
सर्वदेवाधिदेव त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ।। १ ।।
शरणागत दीनार्ततारकाऽखिलकारक ।
सर्वचालक देव त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ।। २ ।।
सर्वमंगलमांगल्य सर्वाधि व्याधिभेषज ।
सर्वसंकटहारिन् त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ।। ४ ।।

स्मर्तृगामी स्वभक्तांना कायदो रिपुनाशनः ।
भुक्तिमुक्तिप्रदः स त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ॥ ४ ॥
सर्वपापक्षयकरस्तापदैन्यनिवारणः ।
योऽभीष्टदः प्रभुः सत्त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ॥ ५ ॥
य एतत्प्रयतः श्लोकपंचकं प्रपठेत्सुधीः ।
स्थिरचित्तः स भगवत्कृपापात्रं भविष्यति ॥ ६ ॥
इति श्री. प. प. श्रीवासुदेवनंदसरस्वतीविरचित्तं
श्रीदत्तात्रेयस्तोत्रं संपूर्णम् ॥

### श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचित

# करुणात्रिपदी

( चाल—उद्धवा.शांतवन कर जा. )

शांत हो श्रीगुरुदत्ता मम चित्ता शमवी आतां ॥ ध्रु० ॥
तूं केवळ माता जनिता, सर्वथा तूं हितकर्ता ॥
तूं आप्त-स्वजन भ्राता, सर्वथा तूंचि त्राता ।
भयकर्ता तूं भयहर्ता दंडधर्ता तूं परिपाता ।
तुजवांचुनि न दुजी वार्ता ।
तूं आर्ता आश्रय दत्ता । शांत हो० ॥ १ ॥
अपराधास्तव गुरुनाथा, जरि दंडा धरिसि यथार्था ।
तरि आम्ही गाउनि गाथा, तव चरणीं नमवूं माथा ।
तूं तथापि दंडिसि देवा । कोणाचा मग करुं धावा ।
सोडविता दुसरा तेव्हां । कोण दत्ता आम्हां त्राता।शांत०॥२॥
तूं नटसा होउनि कोपी । दंडितांहि आम्ही पापी ।
पुनरपिही चुकत तथापि । आम्हांवरि नच संतापी ।
गच्छतः स्खलनं क्वापि । असें मानुनि नच हो कोपी ।

निजकृपा लेशा ओपी । आम्हांवरि तूं भगवंता॥शांत०॥३॥
तव पदरीं असतां ताता । आडमार्गी पाउल पडतां ।
सांभाळुनि मार्गावरता । आणिता न दुजा त्राता ।
निज बिरुदा आणुनि चित्ता । तूं पतीतपावन दत्ता ।
वळे आतां आम्हांवरता ।
करुणाधन तूं गुरुनाथा ॥ शांत हो० ॥ ४ ॥
सहकुटुंब सहपरिवार, दास आम्ही हें घरदार ॥
तव पदीं अर्पुं असार, संसाराहित हा भार ॥
परिहरिसी करुणासिंधो ।
तूं दीनानाथ सुबंधो ।
आम्हां अघलेश न बाधो ॥
वासुदेव प्रार्थित दत्ता । शांत हो श्रीगुरुदत्ता०॥ ॥ ५ ॥

## पद २ रें (चाल—इस तनधनकी०)

श्रीगुरुदत्ता जयभगवंता । तें मन निष्ठुर न करीं आतां ॥ ॥ ध्रु० ॥
( १ ) चोरें द्विजासी मारितां मन जें । कळवळलें तें कळवळो आतां ॥
( २ ) पोटशुळानें द्विज तडफडतां । कळवळलें तें कळवळो आतां ॥
( ३ ) द्विजसुत मरतां वळलें तें मन । हो किं उदासिन न वळे आतां ॥
( ४ ) सतिपति मरतां काकुळति येतां । वळलें तें मन न वळे कीं आतां ॥
( ५ ) श्रीगुरुदत्ता त्यजि निष्ठुरता । कोमल चित्ता वळवीं आतां ॥ ५ ॥

## पद ३ रें

जय करुणाधन निजजनजीवन । अनसूयानंदन पाहि जनार्दन ॥ध्रु०॥
( १ ) निजअपराधें उफराटि दृष्टि । होउनि पोटीं भय धरुं पावन ॥१॥
( २ ) तूं करुणाकर कधीं अम्हावर । रुससी न किंकरवरद कृपाघन ।
( ३ ) वारी अपराध तूं मायबाप । तव मनीं कोप लेश न वामन ॥

( ४ ) बालकापराधा गणे जरि माता । तरि कोण त्राता देईल जीवन ॥
( ५ ) प्रार्थि वासुदेवपदीं ठेवी भाव । पदीं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥

## ( ११ ) दत्तात्रेयस्तोत्रम् ।

[ श्रीनारदपुराणे नारदविरचितम् । ]

श्रीगणेशाय नमः ।

(१) जटाधरं पांडुरंगं शूलहस्तं कृपानिधिम् ।
सर्वरोगहरं देवं । दत्तात्रेयमहं भजे ॥ १ ॥
अस्य श्रीदत्तात्रेय स्तोत्रमंत्रस्य भगवान्नारद ऋषिः ।
अनुष्टुप छंदः श्रीदत्तः परमात्मा देवता । श्रीदत्तप्रीत्यर्थ
जपे विनियोगः । जगदुत्पत्तिकर्त्रे च स्थितिसंहारहेतवे ।
भवपाशाविमुक्ताय दत्तात्रेय नमोऽस्तु ते ॥ १ ॥
जराजन्मविनाशाय देहशुद्धिकरायच ।
दिगंबर दयामूर्ते दत्तात्रेय नमोऽस्तु ते ॥ २ ॥
कर्पूरकांतिदेहाय ब्रह्ममूर्तिधरायच ।
वेदशास्त्रपरिज्ञाय दत्तात्रेय नमोऽस्तु ते ॥ ३ ॥
ह्रस्वदीर्घकृशस्थूल नामगोत्रविवर्जित ।
पंचभूतैकदीप्ताय दत्तात्रेय नमोस्तु ते ॥ ४ ॥
यज्ञभोक्त्रे च यज्ञाय यज्ञरूपधराय च ।
यज्ञप्रियाय सिद्धाय दत्तात्रेय नमोऽस्तु ते ॥ ५ ॥
आदौ ब्रह्मा मध्ये विष्णुरंते देवः सदाशिवः ।
मूर्तित्रयस्वरूपाय दत्तात्रेय नमोऽस्तु ते ॥ ६ ॥
भोगालयाय भोगाय योगयोग्याय धारिणे ।
जितेंद्रिय जितज्ञाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ॥ ७ ॥
दिगंबराय दिव्याय दिव्यरूपधराय च ।

सदोदितपरब्रह्म दत्तात्रेय नमोऽस्तुते ॥ ८ ॥
जंबुद्वीपे महाक्षेत्रे मातापुरनिवासिने । जयमानसतांदेव
दत्तात्रेय० ॥९॥ भिक्षाटनं गृहे ग्रामे पात्रं हेममयं करे ।
नानास्वादमयी भिक्षा दत्तात्रेय० ॥ १० ॥ ब्रह्मज्ञानमयी मुद्रा
वस्त्रे चाकाशभूतले । प्रज्ञानधनबोधाय दत्तात्रेय०॥ ११ ॥
अवधूत सदानंद परब्रह्मस्वरूपिणे । विदेह देहरूपाय दत्तात्रेय०
॥१२॥ सत्यरूप सदाचार सत्यधर्मपरायण । सत्याश्रय परोक्षाय
दत्तात्रेय० ॥ १३ ॥ शूलहस्त गदापाणे वनमालासुकंधर ।
यज्ञसूत्रधर ब्रह्मन् दत्तात्रेय० ॥ १४ ॥ क्षराक्षरस्वरूपाय
परात्परतराय च । दत्तमुक्तिपरस्तोत्र दत्तात्रेय० ॥ १५ ॥
दत्तविद्याय लक्ष्मीश दत्तस्वात्मस्वरूपिणे । गुणनिर्गुणरूपाय
दत्तात्रेय० ॥ १६ ॥ शत्रुनाशकरं स्तोत्रं ज्ञानविज्ञानदायकम् ।
सर्वपापं शमं याति दत्तात्रेय० ॥ १७ ॥ इदं स्तोत्रं महद्दिव्यं
दत्तप्रत्यक्षकारकम् । दत्तात्रेयप्रसादाच्च नारदेन प्रकीर्तितम् ॥ १८॥

इति श्रीनारदपुराणे नारदविरचितं दत्तात्रेयस्तोत्रं संपूर्णम् ॥

## ( १२ ) श्रीशंकराचार्यकृतं गुर्वष्टकम् ।

श्रीगणेशाय नमः ।

(१) शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं यशश्चारु चित्रं धनं मेरुतुल्यम् ।
मनश्चेन्न लग्नं हरेरङ्घ्रिपद्मे ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।१।

(२) कलत्रं धनं पुत्रपौत्रादि सर्वं, गृहं बांधवाः सर्वमेतद्धि जातम् ।
गुरोरंघ्रिपद्मे मनश्चेन्न लग्नम् ॥ ततः किं० ॥ २ ॥

(३) षडंगादिवेदो मुखे शास्त्रविद्या, कवित्वादिगद्यं सुपद्यं करोति ।
गुरोरंघ्रिपद्मे० ॥ ३ ॥

(४) विदेशेषु मान्यः स्वदेशेषु धन्यः सदाचारवृत्तेषु मत्तो न चान्यः।
गुरोरंघ्रिपद्मे० ॥ ४ ॥
(५) क्षमामंडले भूपभूपालवृंदैः सदा सेवितं यस्य पादारविंदम्। गुरो-
रंघ्रिपद्मे० ॥ ५ ॥
(६) यशो मे गतं दिक्षु दानप्रतापाज्जगद्वस्तुसर्वं करे यत्प्रसादात्
गुरोरंघ्रिपद्मे०॥ ६ ॥
(७) न भोगे न योगे न वा वाजिराजौ। न कांतामुखे नैव वित्तेषु
चित्तम्। गुरोरंघ्रिपद्मे० ॥ ७ ॥
(८) अरण्ये न वा स्वस्य गेहे न कार्ये। न देहे मनो वर्तते मे त्वनर्घ्ये।
गुरोरंघ्रिपद्मे० ॥ ८ ॥
(९) अनर्घ्याणि रत्नानि मुक्तानि सम्यक्समालिंगिता कामिनी यामिनीषु।
गुरोरंघ्रिपद्मे० ॥ ९ ॥
(१०) गुरोरष्टकं यः पठेत्पुण्यदेही यतिर्भूपतिर्ब्रह्मचारी च गेही। लभेद्वांछि-
तार्थं पदं ब्रह्मसंज्ञं गुरोरुक्तवाक्ये मनो यस्य लग्नम्॥ १० ॥
इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकराचार्यविरचितं गुरोरष्टकं
समाप्तम्॥

## (१३) दत्तस्तुति

यतीरूप दत्तात्रया दंडधारी। पदीं पादुका शोभती सौख्यकारी।
दयासिंधु ज्याचीं पदें दुःखहारी। तुम्हांवीण दत्ता मला कोण तारी॥१॥
पदें पुष्करा लाजवीती जयाचीं। मुखाच्या प्रभे चंद्र मोहूनि याची।
घडो वास येथें सदा निर्विकारी। तुम्हांवीण दत्ता० ॥ २ ॥
नुनीटा असती पोटऱ्या गुल्फजानू। कटीं मौंज कौपीन ते काय वानूं।
गळां मालिका ब्रह्मसूत्रासि धारी। तुम्हांवीण दत्ता०॥ ३ ॥
गळां वासुकी भूषणें रुंडमाळा। टिळा कस्तुरी केशरी गंध भाळा।
जयाची प्रभा कोटिसूर्यासी हारी। तुम्हांवीण दत्ता० ॥ ४ ॥

जटाभार माथां प्रभा कुंडलांची । त्रयास्यें भुजा शस्त्र सायूध साची ।
त्रिशूळमाळादिक छाटिधारी । तुम्हांवीण दत्ता० ॥ ५ ॥
कली पातला पातका वाढवाया । तयानें जना मोहिलें गाढ वायां ।
जगीं अवतरे दुःखहारा असुरारी । तुम्हांविण दत्ता० ॥ ६ ॥
अनसूया सत्त्व हरावयासी । त्रिमूर्ति जातां करि बाळ त्यांसी ।
निजे पालखी सर्वदा सौख्यकारी । तुम्हांवीण दत्ता० ॥ ७ ॥
प्रसिद्ध असती क्षेत्रतीर्थें तयांचा । कली पातल्या जाहला लोप साचा ।
करी तत्प्रसिद्धी मिषें ब्रह्मचारी । तुम्हांवीण दत्ता० ॥ ८ ॥
मुखें वेद नीचाचिया बोलवीले । श्रीशैल्या क्षणें तंतुकालागिं नेलें ।
सुदेही करी विप्रकुष्ठा निवारी । तुम्हांवीण दत्ता० ॥ ९ ॥
दरिद्रें बहू कष्टला विप्र त्यासी । क्षणें द्रव्य देऊनि संतोषवीसी ।
दिला पुत्र वंध्या असुनी वृद्धनारी । तुम्हांवीण दत्ता० ॥१०॥
मनीं इच्छि विप्रैक व्हाया अन्नदान । असें जाणुनी कौतुका दावि पूर्ण ।
करी तृप्त लेशान्नि जो वर्ण चारी । तुम्हांवीण दत्ता० ॥११॥
विलोकूनियां शूद्रभक्ती मनीं ती । कृपें दीधलें पीक अत्यंत शेतीं ।
करी काशियात्रा कुमारा अधारी । तुम्हांवीण दत्ता०॥१२॥
नृपस्थानिं रंकासही स्थापियेलें । मदें व्यापिलें विप्र निर्गर्व केले ।
कृपादृष्टिनें स्फोटकातें निवारी । तुम्हांवीण दत्ता० ॥१३॥
द्विजाच्या घरीं घेवडा वेल ज्यानें । मुळापासुनी तोडिला तो तयानें ।
दिली संतती संपदा दुःखहारी । तुम्हांवीण दत्ता० ॥१४॥
शुष्कासुनी काष्ठही वृक्ष केला । गतप्राण तो पुत्र सजीव केला ।
औदुंबरीं आवडे वास भारी । तुम्हांवीण दत्ता० ॥१५॥
त्रिलोकीं अशी कीर्ति केली अगण्य ।अगम्यागमा ख्यातिही ज्याचि धन्य।
स्मरे भक्तिनें तद्भवदुखःहारी । तुम्हांवीण दत्ता० ॥१६॥
अनंतावधी जाहले आवतार । परी श्रीगुरू दत्त सर्वांत थोर ।

त्वरें कामना कामिकां पूर्णकारी । तुम्हांवीण दत्ता० ॥१७॥
तपें तीर्थदानें जपादी करीती । स्वहीतार्थ ते देवताला स्तवीती ।
परी केलि कर्में वृथा होती सारीं । तुम्हांवीण दत्ता० ॥१८॥
सदा आससी दत्त सर्वार्थकामा । त्वरें भेटसी टाकुनी सर्व कामा ।
मना माझिया आवरी दैन्यहारी । तुम्हांवीण दत्ता० ॥१९॥
मनीं आवडी गायनाची प्रभूला । करी सुस्वरें नित्य जो गायनाला ॥
तयाच्या त्वरें संकटांतें निवारी । तुम्हांवीण दत्ता० ॥२०॥
असे क्षेत्र काशी शिवाची पुरी ते । प्रभातीं करी स्नान गंगातिरीं तें ॥
करी कर्विरीं अन्हि भिक्षार्थ फेरी । तुम्हांवीण दत्ता० ॥२१॥
निशीं जाय निद्रार्थ मातापुरासी । सवें कामधेनू वसे तेजराशी ।
तसे श्वानरूपी सर्वे वेद चारी । तुम्हांवीण दत्ता० ॥२२॥
जनां मुक्तिचा मार्ग दावावयासी । कळाया स्वरूपप्रचीती तयांसी ॥
त्रिलोकीं करी जी निमिषार्ध फेरी । तुम्हांवीण दत्ता० ॥२३॥
असे रूप ठावें तुझें आसतांना । वृथा हिंडलों दैवतें तीर्थ नाना ।
परी शेवटीं पार्यि आलों भवारी । तुम्हांवीण दत्ता० ॥२४॥
जधीं जन्मलों नेणुं दुःखासुखाला । अयुर्दाय अज्ञानिं तो व्यर्थ गेला ॥
कळूं लागतां खेळलों खेळ भारी । तुम्हांवीण दत्ता० ॥२५॥
तृतीयांश आयुष्य ऐसेंचि गेलें । परी नाहिं त्वन्नाम मीं आठवीलें ।
अतां यौवन प्राप्त झालें अपारी । तुम्हांवीण दत्ता० ॥२६॥
परद्रव्य कांता पराची पहातां । स्मरादी रिपू ओढिती मानसातां ।
कसा घ्यावुं तूंतें मधुकैटभारी । तुम्हांवीण दत्ता० ॥२७॥
पुढें वृद्धता प्राप्त होईल वाटे । तिच्या यातना देखतां चित्त फाटे ।
कधीं भेटसी केविं हो चक्रधारी । तुम्हांवीण दत्ता० ॥ २८ ॥
अयुष्यार्ध निद्रार्णवामाजि गेलें । पणा तीन शेषांत तें जाण केलें ।
तयांनीं मना गोविलें दुःख भारी । तुम्हांवीण दत्ता० ॥ २९ ॥

अशा घोर मायासमुद्रा पहतां । भिवोनि पदीं पातलों तूमच्यातां ।
तरी क्लेशचिंतादि दुःखासि हारा । तुम्हांवीण दत्ता० ॥ ३० ॥
त्यजा मत्त पाखंड ते सज्जना हो । धरा मानसीं भक्ति निष्ठा दृढा हो ।
भवांबुधीच्या नेइ तो पैलतीरीं । तुम्हांवीण दत्ता० ॥ ३१ ॥
स्वतः घेतला दाखला सद्गुरुंचा । तसा घेति ते आणि घेतील साचा
मनःकामना होतसे पूर्ण सारी । तुम्हांवीण दत्ता० ॥ ३२ ॥
करी पाठ जो कां स्तुति ही त्रिकाळा । तयाच्या प्रतापें पडे भीति काळा ।
गुरू सर्व दारिद्र्य दुःखें निवारी । तुम्हांवीण दत्ता मला कोण तारी ॥ ३३ ॥

काया व्यर्थ तपादि यज्ञि हवनीं स्वाध्यायिं तीर्थाटनीं ।
शास्त्राच्या पठणीं जनीं वनिं गिरीं घोरांदरीं जाउनी ॥
अज्ञानें भिवुनी अरीसि नयनीं काळासही पाहुनी ।
द्वैवर्णाक्षर 'दत्त' घ्या तरि मुखीं कां शीणवावी कुगी ? ॥

## ( १४ ) ॥ दत्तात्रेयोपनिषत् ॥

दत्तात्रेयी ब्रह्मविद्यासंवेद्यानन्दविग्रहम् ।
त्रिपान्नारायणाकारं दत्तात्रेयमुपास्महे ॥ १ ॥

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः । स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः । स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः । स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

हरिः ॐ ॥ सत्यक्षेत्रे ब्रह्मा नारायणं महासाम्राज्यं किं तारकं तन्नो ब्रूहि भगवन्नित्युक्तः सत्यानन्दचिदात्मकं सात्त्विकं मामकं धामोपास्वेत्याह । सदा दत्तोऽहमस्मीति प्रत्येतत्संवदन्ति येन ते संसारिणो भवन्ति नारायणेनैवं विवक्षितो ब्रह्मा विश्वरूपधरं विष्णुं नारायणं दत्तात्रेयं ध्यात्वा सद्वदति । दमिति हंसः दामिति दीर्घं तद्बीजं नाम बीजस्थम् । दामित्येकाक्षरं भवति । तदेतत्तारकं भवति । तदेवोपासितव्यं विज्ञेयं गर्भादितारणम् । गायत्री छन्दः ।

सदाशिव ऋषिः । दत्तात्रेयो देवता । वटबीजस्थमिव दत्तबीजस्थं सर्वं जगत् । एतदेवैकाक्षरं व्याख्यातम् । व्याख्यास्ये षडक्षरम् । ओमिति द्वितीयम् । ह्रीमिति तृतीयम् । क्रीमिति चतुर्थम् । ग्लौमिति पञ्चमम् । द्रामिति षष्ठम् । षडक्षरोऽयं भवति । योगानुभवो भवति । गायत्री छन्दः । सदाशिव ऋषिः । दत्तात्रेयो देवता । द्रमित्युक्त्वाद्रामित्युक्त्वा वा दत्तात्रेयाय नम इत्यष्टाक्षरः । दत्तात्रेयायेति सत्यानन्दचिदात्मकम् । नम इति पूर्णानन्दकविग्रहम् । गायत्री छन्दः । सदाशिव ऋषिः । दत्तात्रेयो देवता । दत्तात्रेयायेति कीलकम् । तदेव बीजम् । नमः शक्तिर्भवति । ओमिति प्रथमम् । आमिति द्वितीयम् । ह्रीमिति तृतीयम् । क्रोमिति चतुर्थम् । एहीति तदेव वदेत् । दत्तात्रेयाय स्वाहेति मन्त्रराजोऽयं द्वादशाक्षरः । जगती छन्दः । सदाशिव ऋषिः । दत्तात्रेयो देवता । ओमिति बीजम् । स्वाहेति शक्तिः । संबुद्धिरिति कीलकम् । द्रामिति हृदये । ह्रीं क्रीमिति शीर्षे । एहीति शिखायाम् । दत्तेति कवचे आत्रेयेति चक्षुषि । स्वाहेत्यस्त्रे । तन्मयो भवति । य एवं वेद । षोडशाक्षरं व्याख्यास्ये । प्राणं देयम् । मानं देयम् । चक्षुर्देयम् । श्रोत्रं देयम् । षड्दशाशिराश्छिनत्ति षोडशाक्षरमन्त्रो न देयो भवति । अतिसेवापरभक्तगुणवच्छिष्याय वदेत् । ओमिति प्रथमं भवति । ऐमिति द्वितीयम् । क्रोमिति तृतीयम् । क्लीमिति चतुर्थम् । क्लूमिति पञ्चमम् । ह्रामिति षष्ठम् । ह्रीमिति सप्तमम् । ह्रूमित्यष्टमम् । सौरिति नवमम् । दत्तात्रेयायेति चतुर्दशम् । स्वाहेति षोडशम् । गायत्री छन्दः । सदाशिव ऋषिः । दत्तात्रेयो देवता । ॐ बीजम् । स्वाहा शक्तिः । चतुर्थ्यन्तं कीलकम् । ओमिति हृदये । क्रां क्रीं क्लूमिति शिखायाम् । सौरिति कवचे । चतुर्थ्यन्तं चक्षुषि । स्वाहेत्यस्त्रे । यो नित्यमधीयानः सच्चिदानन्दसुखी मोक्षी भवति । सौरित्यन्ते श्रीवैष्णव इत्युच्यते । तज्जापी विष्णुरूपी भवति । अनुष्टुप् छन्दो व्याख्यास्ये । सर्वत्र संबुद्धिरिमानीत्युच्यन्ते । दत्तात्रेय हरे कृष्ण उन्मत्तानन्ददायक । दिगम्बर मुने बालपिशाच ज्ञानसागर ॥ १ ॥ इत्युपनिषत् ॥

अनुष्टुप् छन्दः सदाशिव ऋषिः । दत्तात्रेयो देवता । दत्तात्रेयेति हृदये । हरे कृष्णेति शीर्षे । उन्मत्तानन्देति शिखायाम् । दायक मुन इति कवचे । दिगम्बरेति चक्षुषि । पिशाचज्ञानसागरेत्यस्त्रे । अनुष्टुभोऽयं मयाऽधीतः अब्रह्मजन्मदोषाच्च प्रणश्यन्ति । सर्वोपकारी मोक्षी भवति । य एवं वेदेत्युपनिषत् ॥ १ ॥

## इति दत्तात्रेयोपनिषत्सु प्रथमः खण्डः ॥ १ ॥

ओमिति व्याहरेत् । ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय स्मरणमात्रसंतुष्टाय महाभयनिवारणाय महाज्ञानप्रदाय चिदानन्दात्मने बालोन्मत्तपिशाचवेषायेति, महायोगिने अवधूतायेति अनसूयानन्दवर्धनात्रिपुत्रायेति सर्वकामफलप्रदाय ओमिति व्याहरेत् । भवबन्धमोचनाय ह्रीमिति व्याहरेत् । सकलविभूतिदायेति क्रोमिति व्याहरेत् । साध्याकर्षणायेति सौरिति व्याहरेत् । सर्वमनःक्षोभणायेति श्रीमिति व्याहरेत् । महोमिति व्याहरेत् । चिरंजीविने वषडिति व्याहरेत् । वशीकुरु वशीकुरु वौषडिति व्याहरेत् । आकर्षयाकर्षय हुमिति व्याहरेत् । विद्वेषय विद्वेषय फडिति व्याहरेत् । उच्चाटयोच्चाटय ठठेति व्याहरेत् । स्तम्भय स्तम्भय खखेति व्याहरेत् । मारय मारय नमः संपन्नाय नमः संपन्नाय स्वाहा पोषय पोषय परमन्त्रपरयन्त्रपरतन्त्रांश्छिन्धि च्छिन्धि ग्रहान्निवारय निवारय व्याधीन्निवारय निवारय दुःखं हरय हरय दारिद्र्यं विद्रावय विद्रावय देहं पोषय पोषय चित्तं तोषय तोषयेति सर्वमन्त्रसर्वयन्त्रसर्वतन्त्रसर्वपल्लवस्वरूपायेति ॐ नमः शिवायेत्युपनिषत् ॥ २ ॥

## इति दत्तात्रेयोपनिषत्सु द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

य एवं वेद । अनुष्टुप् छन्दः । सदाशिव ऋषिः । दत्तात्रेयो देवता । ओमिति बीजम् । स्वाहेति शक्तिः । द्रामिती कीलकम् । अष्टमूर्त्यष्टमन्त्रा भवन्ति । यो नित्यमधीते वाय्वग्निसोमादित्यब्रह्मविष्णुरुद्रैः पूतो भवति । गायत्र्या शतसहस्रं जप्तं भवति । महारुद्रशतसहस्रजापी भवति । प्रणवायुतकोटिजप्तो भवति । शतपूर्वाञ्छतापरान्पुनाति । स पङ्क्तिपावनो भवति । ब्रह्महत्यादि-

पातकैर्मुक्तो भवति । गोहत्यादिपातकैर्मुक्तो भवति । तुलापुरुषादिदानैः प्रपापानतः पूतो भवति । अशेषपापान्मुक्तो भवति । भक्ष्याभक्ष्यपापैर्मुक्तो भवति । सर्वमन्त्रयोगपारीणो भवति । स एव ब्राह्मणो भवति । तस्माच्छिष्यं भक्तं प्रतिगृह्णीयात् । सोऽनन्तफलमश्नुते । स जीवन्मुक्तो भवतीत्याह भगवान्नारायणो ब्रह्माणमित्युपनिषत् ॥ हरिः ॐ तत्सत् ॥

**॥ ॐ भद्रं कर्णेभिरिति शान्तिः ॥**

**इति दत्तात्रेयोपनिषत्सु तृतीयः खण्डः ॥ ३ ॥**

**॥ इति दत्तात्रेयोपनिषत्समाप्तम् ॥**

## श्रीदत्तात्रेय उपनिषदाचा सारांश

दत्तात्रेय-उपनिषदाचें स्वरूप तांत्रिक आहे. प्रारंभीं श्रीदत्तात्रेयदेवतेचें प्रतीक 'द' हें बीजाक्षर सांगितलें आहे. श्रीदत्तांचा एकाक्षरी मंत्र, म्हणजे 'दं' किंवा 'दां' आहे. त्याचे व इतर मंत्रांचे न्यास, छंद ऋषि वगैरे माहिती यांत आहे. सहा अक्षरांचा, आठ अक्षरांचा, बारा अक्षरांचा व सोळा अक्षरांचा दत्तमंत्र देऊन शेवटीं अनुष्टुभ् मंत्र आहे. दुसऱ्या खंडांत दत्तमाला मंत्रहि दिलेला असून तिसऱ्या खंडांत फलश्रुति सांगितली आहे. या मंत्रांवरून श्रीदत्ताचें सुंदर शब्दचित्र डोळ्यांसमोर उभ राहतें. तंत्रशास्त्रांत या विशिष्ट अक्षरांना फार मोठें स्थान असतें. त्यांच्या उच्चारानें होणाऱ्या नादलहरी प्रभावी ठरतात.

(१) सहा अक्षरांचा मंत्र—दं किंवा दां, ॐ, ह्रीं, क्लीं, ग्लौं द्रां ॥
(२) आठ अक्षरांचा मंत्र—द्रं, किंवा द्रां, दत्तात्रेयाय नमः ॥
(३) बारा अक्षरांचा मंत्र—ॐ आं ह्रीं, क्रों, एहि । दत्तात्रेयाय स्वाहा ॥
(४) सोळा अक्षरांचा मंत्र—ॐ ऐं,क्रों,क्लीं, क्लूं,ह्रां,ह्रीं, ह्रूं,सौः दत्तात्रेयाय स्वाहा ॥

(५) अनुष्टुभ् मंत्र— दत्तात्रेय हरे कृष्ण उन्मत्तानन्ददायक।
दिगम्बर मुने बाल, पिशाच ज्ञानसागर ॥

[ दुसऱ्या खंडांत दिलेल्या दत्तमालामंत्राचें पवित्र आचरण ठेवून, पुरश्चरण केल्यानें भूतपिशाच्चांची बाधा होत नाहीं व दुसऱ्यांची पीडा दूर करतां येते असें श्रीसत्येन्द्रनाथस्वामींनीं मला सांगितलें. ]

## ( १५ ) श्रीगुरुचरित्राचें संक्षिप्त रसग्रहण

महाराष्ट्रीयांच्या नित्य वाचनांत श्रीज्ञानेश्वरी, श्रीदासबोध, शिवलीलामृत, सप्तशती, एकनाथी भागवत, मनाचे श्लोक, भारत, भागवत, रामायण या ग्रंथांबरोबरच श्रीगुरुचरित्राला महत्त्वाचें स्थान आहे. श्रीगुरुचरित्र हा एक सिद्धमंत्ररूप व महाप्रासादिक ग्रंथ आहे. भक्तिमार्गांतील अथवा नामस्मरणमार्गांतील स्वकर्मच्युति हा जो शास्त्रोक्तदोष तो नाहींसा करून जनतेला स्वकर्मांच्या ठिकाणीं अभियुक्त करून भक्तिप्रवण करण्याकरितां आणि लोकांच्या ठिकाणीं त्याग व निर्भयता उत्पन्न करण्याकरितां श्रीगुरुचरित्राचा अवतार आहे, हें श्री. वि. के. पालेकर ऊर्फ अप्रबुद्ध यांचें मत अत्यंक उद्बोधक असेंच आहे. हा ग्रंथ निर्मल अंतःकरणानें वाचला तर हितकारक ठरतोच; परंतु सप्ताहपद्धतीनें वाचला तर त्वरित फल देतो असा साधकांचा अनुभव आहे. सकाम वाचकांनीं तंत्र पाळलें पाहिजे. ‘ अंतःकरण असतां पवित्र। सदा काळ वाचावें श्रीगुरुचरित्र ’ हा आदेश भक्तिप्रेमानें निष्काम वाचन करणाऱ्यांना आहेच. या श्रीगुरुचरित्राचें स्वरूप सिद्धमुनि व नामधारक यांच्यातील संवादात्मक असून, त्यांत सुमारें सात हजारांहून जास्त ओव्या आहेत. त्यांत पद्मपुराणांतील, महाभारतांतील वगैरे कथा घेतल्या आहेत. यांतील चंद्रसहराजाची गोष्ट, सीमंतिनीची गोष्ट वगैरे कांहीं गोष्टी शिवलीलामृत या ग्रंथांतहि आहेत; पण त्या गोष्टी येथें घेतांना

त्या श्रीगुरुचरित्राच्या पार्श्वभूमीला साजतील अशा मांडल्या आहेत. श्रीगुरु-उपासनेच्या पायावर आधारलेली कोणत्याहि देवतेची उपासना विशेष खुलून दिसते. श्रीगुरुचरित्राचीं पारायणें व सप्ताहवाचन दत्तभक्त सदैव करीत असतात. इहलौकिक व पारलौकिक कल्याण साधण्याचा हा मार्ग आहे. गुरुवारीं दत्ताचें स्मरण न होणारा महाराष्ट्रीय क्वचितच सांपडेल. आपल्या मोठ्या किंवा छोट्या घरांत, इतर देवांबरोबर श्रीदत्ताच्या फोटोला मानाचें स्थान द्यायला महाराष्ट्रीय जपत असतो. 'गुरुवारीं पेढे दत्ताला' म्हणून लहान मुलें गोड प्रसादाची वाट पाहात असतात. श्रीगुरुचरित्रांत श्रीदत्त व त्यापुढील त्यांचे दोन अवतार श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वती यांचें चरित्र वर्णन केलेलें आहे. पोथींतील भाषा रसाळ असून त्यांत आध्यात्मिक, सामाजिक, मानसशास्त्रीय, संगीत असे विविध विषय आले आहेत. श्रीगुरुचरित्राचा संदेश आचरणांत आणला पाहिजे. आपापल्या कामावरील आत्यंतिक निष्ठा हा तो प्रमुख संदेश. यांत श्रीगुरूंनीं केलेले चमत्कार, पातंजलयोगशास्त्रांतील, 'विभूतियोगा'चें वर्णन वाचणारांना निश्चित पटतील. योगसामार्थ्यामुळे, मनाचें केंद्रीकरण करून प्रचंड शक्ति संपादन करतां येते. पाश्चात्य देशांत या विद्येचा सखोल अभ्यास होत आहे. श्रीगुरुचरित्राचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांतील तडजोडीची वृत्ति. परान्न घेऊं नये असा हेका न धरतां, कुठें व केव्हां परान्न घेतलें असतां त्याचें पाप लागत नाहीं हें लगेच सांगितलें आहे. यांत दिलेल्या वेदांच्या शाखांचा अभ्यास हा स्वतंत्र संशोधनाचा विषय होऊं शकेल व तें संशोधन करण्याची इच्छा माझे गुरु डॉ. ना. ज. शेंडे यांनीं माझेजवळ प्रकट केली आहे. श्रीगुरुचरित्राचें साहित्यिक रसग्रहण हा एका प्रदीर्घ लेखाचा विषय होऊं शकेल.

श्रीगुरुचरित्रांतील सहाव्या अध्यायांत आलेल्या संगीताचा उल्लेख संगीत-

धोकिनांना निश्चितच हृद्य वाटेल. त्यांतील सहा स्वरांचा तक्ता असा—

| | | स्थान | आलाप साहश्य | देवता | रस | ओव्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १) षड्ज | ( सा ) | कंठ | मयूर | वह्नि | श्रृंगार | ६।४८-४९ |
| २) ऋषभ | ( री ) | हृदय | चाप | यम | अद्भुत | ६।५०-५१ |
| ३) गांधार | ( ग ) | नासिका | अज | चंद्र | ,, | ५२-५३ |
| ४) मध्यम | ( म ) | उर | क्रौंच | लक्ष्मी | करुण | ६।५४-५५ |
| ५) पंचम | ( प ) | कंठ | कोकिला | गणनाथ | हास्य | ६।५६-५७ |
| ६) धैवत | ( ध ) | ललाट | दर्दुर | नारदगणेश | बीभत्स | ६।५८-६१ |
| ७) निषाद | ( नी ) | तालव्य | हत्ती | तुंबर-सूर्य | भयानक | ६।६१-६३ |

शरीरशास्त्र, वेदांतशास्त्र, योगशास्त्र,आचारधर्म, नीतिनियम, संन्यासव्रत, तीर्थक्षेत्रांच्या यात्रेचें रोचक उदाहरणांच्या साहाय्यानें श्रीगुरुचरित्रांत सविस्तर वर्णन केल आहे. असें श्रीगुरुचरित्र, गोष्टीरूपानें वाचकांना देण्याचा मान मला मिळाला यामुळें मी कृतार्थ झालों.

‘ ऐसी कथा जयाचे घरीं । वाचिती नित्य प्रेमभरीं ।
श्रियायुक्त निरंतरीं । नांदती पुत्रकलत्रयुक्त । ॥ १·५५ ॥
रोग नाहीं तया भवनीं । सदा संतुष्ट गुरुकृपें करोनी ।
निःसंदेह सात दिनीं । ऐकतां बंधन तुटे जाणा ॥ १·५६ ॥

## ( १६ ) श्रीदत्तसंप्रदायाचा परिचय

श्रीदत्तअवतारांसंबंधींचे उल्लेख विष्णुपुराण, वायुपुराण, ब्रह्मपुराण आदि ग्रंथांत सांपडतात. देवीभागवत ( ४·१६ ) व मत्स्यपुराणांत दत्तपुत्र निमि याचा उल्लेख आहे. सध्यां दत्त म्हणून ज्या त्रिमूर्तिरूपाची पूजा करण्यांत येते, त्या रूपाची कल्पना, अनसूयेची सत्त्वपरीक्षा या पौराणिक कथेशीं निगडित आहे. अत्रीचा मुलगा म्हणून आत्रेय व अत्रीला तो देवांनीं दिला म्हणून दत्त, याप्रमाणें आत्रेयदत्त किंवा

दत्तात्रेय हें नांव त्या देवाला प्राप्त झालें. महाभारतांतील अनुशासनपर्वांत (अ.९१) स्वयंभू मन्वंतरांतील अत्रिऋषींच्या तीन पुत्रांपैकीं दत्त हा एक असल्याचें कथन केलें आहे. अल्र्क, प्रल्हाद, यदु व सहस्रार्जुन यांनीं दत्तांचें शिष्यत्व स्वीकारून, त्यांचेकडून ब्रह्मविद्या संपादन केली, असें वर्णन आढळतें. मार्गशीर्ष पौर्णिमेला अनसूयेच्या उदरीं दत्ताचा जन्म झाल्याबद्दल स्कंदपुराणांत उल्लेख आहे. अथर्वणवेदोपनिषदाला दत्तात्रेय असें नांव आहे.

## दत्तात्रेयाचें स्वरूप

त्रिमूर्तिदर्शक तीन तोंडें, सहा हात, दोन पाय, चार वेदांचे दर्शक चार श्वान व जवळ एक गाय असें दत्ताचें स्वरूप प्रचलित आहे. वैष्णव-मताभिमानीं व महनुभावपंथीय दत्त हा विष्णूचाच अंशभूत असून त्याला एकच मुख होतें असें मानतात. बुद्धाच्या कालानंतर खोदण्यांत आलेल्या कांहीं प्राचीन लेण्यांत दत्ताची त्रिमूर्ति दृष्टीस पडते. सृष्टि, स्थिति व लय हें ज्याचे खेळ त्या परमसमर्थ भगवन्ताचें रूप एकमुखी किंवा त्रिमुखी मानिलें तरी सारखेंच.

वेदकाळांत, अग्नि, मरुत् व सूर्य या तीन देवांनीं स्तुतिसूत्रांत मानाचें स्थान मिळविलें होतें. त्रिमूर्तीची कल्पना इतर मोठमोठ्या धर्मांतहि आहे. पारशी धर्मांत अग्नि, उदक व सूर्य या त्रयीच्या द्वारें देवाधिदेव अहुरमझ्दाची प्राप्ति होते व हीं तीन रूपें त्याचा साक्षात्कार पटवितात असें मानलें आहे. बुद्ध, धर्म व संघ या त्रयीस प्रत्येक बौद्धधर्मीयानें शरण जावें अशी त्या धर्माची आज्ञा आहे. ख्रिस्तीधर्माचे अनुयायी परमेश्वराचें अस्तित्व पिता, (देव), पुत्र (ख्रिस्त), व पवित्र आत्मा (होलि घोस्ट) या तीन स्वरूपांत मानतात. इजिप्तमधील ओसिहिस, इसिस व होरस या दैवी कुटुंबाच्या कल्पनेंतहि त्रिमूर्ति आहे.

सत्त्व, रज व तम या त्रिगुणांनीं हें जग भरलेलें असून परमेश्वर त्रिगुणात्मक आहे असें मत कांहीं उपनिषदांत मांडलें गेलें आहे. इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या सुमाराला शूद्रककर्त्यांनें रचिलेल्या मृच्छकटिकांत ( अंक ६ वा ) त्रिमूर्तीचा निर्देश आहे. यावरून सुमारें एक हजार वर्षांपूर्वींपासून ब्रह्मा, विष्णु व शिव या त्रिमूर्तिसंबंधानें ठाम मत बनत चाललें असावें असें वाटतें. महानुभावसंप्रदायाचे प्रवर्तक श्रीदत्तात्रेय नांवाचे संन्यासी म्हैसूर प्रांतांतील यादवगिरि ( मेलकोट ) येथें होऊन गेले असावेत असें एक मत आहे. महानुभावांच्या मतें श्रीदत्त हे चक्रधर कृष्णाचा अवतार होत. कृष्ण चक्रधर इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या मध्यांत होऊन गेलेले महानुभाव संप्रदायाचे निर्माते. त्यांच्यानंतर नागदेव भट्ट त्या संप्रदायाचे प्रवर्तक ठरले.

नागदेव भट्ट रामचंद्र नांवाच्या यादवराजाचे व ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. महानुभावांच्या मताप्रमाणें दर युगांत त्यांच्या संप्रदायाचा भिन्न भिन्न संस्थापक होऊन गेला. आद्य व दुसरे चार असे एकूण पांच संस्थापक व तीच पंच कृष्णाची कल्पना. महानुभावांचा प्रमुख ग्रंथ भागवत असला तरी मराठींतून या संप्रदायाच्या कर्त्यांनीं विपुल रचना केली आहे. दत्तात्रेय-उपनिषद् व दत्तात्रेयसंहिता, या संप्रदायाशीं निगडित असावींत.

श्रीविष्णूंनीं आपलें स्वतःचें दान अत्रिऋषींना दिलें म्हणून त्यांना दत्तात्रेय असें नांव पडलें असा एक उल्लेख आहे. रामावतारापूर्वीं होऊन गेलेले परशुराम दत्तप्रभूंचे शिष्य होते. दत्तांनीं परशुरामाला केलेला उपदेश त्रिपुरारहस्य नांवाच्या संस्कृत ग्रंथांत आहे. नृसिंहअवतारकालीन प्रल्हादाला दत्तानें उपदेश केल्याची कथाहि पुराणांत आहे.

लोकमान्य टिळकांनीं दत्तात्रेयाच्या स्वरूपाचें ज्योतिषशास्त्राच्या आधारानें एक रूपकात्मक वर्णन केलें आहे. विष्णूनें वराहाला, इंद्रानें वृत्राला व रुद्रानें प्रजापति ब्रह्मयाला जिथें गांठलें व जेथें आकाशगंगेनें तारकापुंजांचे दोन

भाग होतात व ज्या ठिकाणीं या तीन प्रमुख देवता एकमेकांना भेटल्या तिथें त्यांना श्वानसहित दत्त अशी संज्ञा मिळाली. श्रीदत्तांच्या जटेंतील मृगनयना-सारखा दिसणारा ठिपका, कृत्तिकेचे तीन चरण, रोहिणी व मृगाचे चार चरण मिळून दत्ताच्या पाठीमागें उभ्या असणाऱ्या गाईची आकृति तयार झालेली दिसते. रोहिणी व मृगनक्षत्र यांमधील अवका-शाची पोकळी औदुंबरवृक्षाच्या आकाराची दिसते. चाणिस मेज-रचा आकार दत्तांच्या पायांशीं लोळणाऱ्या कुत्र्यासारखा दिसतो.

## श्रीदत्तांचीं आयुधें व परिवार

श्रीदत्त हें अग्नीचें प्रतीक मानलें, तर अग्नीचें वाहन कुत्रा आहे म्हणून कुत्रे दत्तांच्या सान्निध असावेत. चार कुत्रे म्हणजे चार वेद व गाय ही पृथ्वीचें प्रतीक आहे अशी एक कल्पना आहे; तर काम, क्रोध, मद व मत्सर किंवा इच्छा, वासना, आशा व तृष्णा यांचीं रूपें म्हणजे हे चार कुत्रे असून त्यांना श्रीदत्तांनीं काबूंत ठेविलें आहे असेंहि एक मत आहे. गाय हें मायेचें प्रतीक आहे असाहि एक उल्लेख आहे. कुत्र्यांची वेदांशीं एकरूपता मानणारे, पांढऱ्या रंगाचा पण अंगावर काळे ठिपके असलेला तो ऋग्वेद, काळा पण पांढरे ठिपके असलेला तो यजुर्वेद, पूर्ण सफेद रंगाचा कुत्रा तो सामवेद, तर पिंगट रंगाचा कुत्रा तो अथर्ववेद असा बारीक तपशीलहि देतात.

## दत्तांचीं आयुधें

शंख, चक्र, कमळ, दण्ड, त्रिशूळ व कमंडलु हीं दत्तांच्या हातांतील आयुधें. शंख, चक्र,गदा व पद्म हीं विष्णूचीं चार आयुधेंहि दत्तांच्या बाबतींत दाखविलीं जातात. एकमुखी व षड्भुज दत्ताच्या, खालच्या दोन हातांत माळा व कमंडलु असतो, मधल्या हातांत डमरू व त्रिशूळ, तर वरच्या

हातांत शंख व चक्र असतात. हीं क्रमानें ब्रह्मा, शिव व विष्णु यांचीं आयुधें आहेत.

श्रीरंगाधूतस्वामींनीं दत्तात्रेयांचें आधिभौतिक व आध्यात्मिक स्वरूप वर्णन केलें आहे. सूर्य म्हणजे अत्रि, अ म्हणजे नाहीं त्रि म्हणजे हिंवाळा, उन्हाळा व पावसाळा हे तीन किंवा सकाळ, दुपार,सायंकाळ ह्या तीन वेळा. अत्रि सूर्य व अनसूया पृथ्वी यांच्या संयोगानें उत्पन्न होणारें अन्न म्हणजेच दत्ताचें आधिभौतिक रूप. आध्यात्मिकदृष्ट्या दत्तरूप ॐकाराचें प्रतीक आहे, तर गायत्रीचें प्रतीक आहे गाय. दत्तमंत्रांतील ' द ' या बीजाक्षराचें महत्त्व फार मोठें आहे. बृहदारण्यकांत ढगांच्या ' द द द ' या गडगडाटांतून, देवांना दमन करण्याचा, मानवांना दान करण्याचा व असुरांना दया करण्याचा उपदेश मिळाल्याचा उल्लेख आहे. दत्त शब्दाचा व्युत्पत्त्यर्थ देतांना ते म्हणतात—

दया दान अरु दमन है दद्दाका यह भेद ।

तत्ता विषयाभ्यास है ताको तूं कर भेद ।

शेतकऱ्याच्या स्वरूपाचें श्रीदत्तस्वरूपाशीं साम्य दाखवून शेतकऱ्याचीं गाय, कुत्रे व आयुधें यांच्याशीं सुंदर तुलना श्रीरंगावधूतस्वामींनी केली आहे. आजच्या ' जय किसान ' या घोषणेला दत्तस्वरूपाचें नवें स्पष्टीकरण पोषक असेंच वाटतें.

दातार असे यवनलोकहि देवाला मानतात तें देणारा, दाता, दत्त याच अर्थानें. आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक असा त्रिविध अर्थ प्रत्येक गोष्टीला असतो. आध्यात्मिक दृष्टीनें दत्त हा प्रणववाचक शब्द परमात्म्याचा वाचक आहे. ॐकाराच्या अकार, उकार व मकार या तीन मात्रा, सत्, चित्, आनंद स्वरूप किंवा अस्ति, भाति व प्रिय या तीन अवस्था म्हणजेच दत्ताचीं तीन मुखें होत. देह हाच सह्याद्रि त्याच्या मध्यवर्ती असलेलें

९४०३०

हृदय तोच माहूरगढ; अपरोक्ष ज्ञान तो अत्रि, एक लक्षण प्रेमभक्ति तीच अनसूया व या दोघांच्या समन्वयापासून उत्पन्न होणारें विज्ञान, निर्गुण, सक्रिय साक्षात्कार किंवा प्रत्यक्ष अनुभव तोच दत्त असें सुंदर विवरण श्रीरंगावधूतस्वामींनीं दिलें आहे. शांडिल्य उपनिषदांत दत्ताचें एक मुखी व चार भुजांचा असें वर्णन आहे.

श्रीदत्तांनीं यज्ञसंस्था व वर्णव्यवस्थेचें पुनरुज्जीवन केलें असा हरिवंशांत ( १-४१ ) उल्लेख आढळतो. संन्यासमार्गाचा पुरस्कार त्यांनींच केला असा वायुपुराणांत व शिवशत यांत उल्लेख आहे. संन्यासोपनिषदांतहि श्रीदत्तच संन्यासज्ञानाचे निवेदक आहेत. जाबालदर्शन या उपनिषदांत योगमार्गाचें सविस्तर वर्णन श्रीदत्तांनीं केलें आहे. गाणगापुर, नरसोबाची वाडी, मिरजजवळील औदुंबर, गोवा येथील सांखळी व म्हैसूरमधील बाबाबुडन भागांतील पिताचें देऊळ वगैरे प्रमुख दत्तक्षेत्रें आहेत.

## ॥ श्रीदत्ताची आरती ॥

त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।
नेति नेति शब्दें न ये अनुमाना । अखंड समाधि ध्यान मुनिजना ॥ १ ॥
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता । आरति ओंवाळितां हरली भवचिंता
॥ ध्रुव. ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त । अभाग्यासी कैसी न कळे ही
मात । पराही परतली तेथे कैंचा हेत । जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥
जय देव० ॥ २ ॥ दत्त येवोनियां उभा ठाकला । साष्टांग नमूनी प्रणिपात
केला ॥ प्रसन्न होउन आशीर्वाद दिधला । जन्ममरणाचा फेरा चुकवीला ॥
जयदेव जयदेव० ॥ ३ ॥ दत्तदत्त ऐसें लागलें ध्यान । हरपलें मन झालें
उन्मन । मीं-तूंपणाची झाली बोळवण । एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥
जयदेव० ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ॥ वृण्वन्तु सन्तु ॥
अनुक्रम.......................... दि:..........................
क्रमांक .......................... नों: दि: ....................

REFBK-0014529